
म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र. १२६०



# लिंडन जॉन्सन

# …नदर्शन

REFBK-0014485

बूथ मूनी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत.

युनायटेड स्टेट्स्चे राष्ट्राध्यक्ष

# लिंडन जॉन्सन

लेखक :

बूथ मूनी

अनुवादक :

आम्बादास अग्निहोत्री

REFBK-0014485

वोरा अँण्ड कंपनी पब्लिशर्स प्रा. लिमिटेड,
३, राउंड बिल्डिंग, मुंबई २

Copyright © 1956, 1963, 1964
by Booth Mooney
The LYNDON JOHNSON STORY
by Booth Mooney
Published by Farrar, Straus and Company,
New York

✦ ✦ ✦

आवृत्ति पहिली : १९६५

✦ ✦ ✦

मूल्य : रु. २-५०

✦ ✦ ✦

प्रकाशक : **अ. ल. गाडगीळ**
वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रा. लि.,
३, राउंड बिल्डिंग, मुंबई २.

✦ ✦ ✦

मुद्रक : **रा. ब. कुलकर्णी**
मनोजय मुद्रणालय,
१३८-१३९ नारायण पेठ,
पुणें २.

४००७२
१२६०

## परिचय

आपले जोडीदार लिंडन जॉन्सन हेच असावेत, अशी राष्ट्राध्यक्ष केनेडी ह्यांची अगदी प्रथमपासून इच्छा होती. कारण वॉशिंग्टन येथील एक पत्रकार जोसेफ अल्सॉप ह्यांच्याशीं बोलतांना केनेडी म्हणाले होते, "अमेरिकन राजकारणांतील माझ्या माहितीच्या व्यक्तींमध्यें जॉन्सन हेच सर्वांत लायक आहेत, आणि स्वदेशाविषयीं राष्ट्राध्यक्षाला जशी कळकळ असायला हवी, तशीच खरीखुरी कळकळ त्यांना वाटते, असें माझें मत आहे." ता. २२ नोव्हेंबर १९६३ रोजीं एका मारेकऱ्याच्या गोळीला राष्ट्राध्यक्ष केनेडी बळी पडले, तेव्हां त्यांनीं आपल्यामागें अमेरिकन जनतेसाठीं वारसा म्हणून जें ठेवलें त्यांतला सर्वांत मोठा आणि महत्त्वाचा वारसा म्हणजे युनायटेड स्टेट्स्‌चे ३६ वे राष्ट्राध्यक्ष लिंडन बी. जॉन्सन हेच होत.

राष्ट्राध्यक्ष बनलेल्या ह्या पुरुषाची घडण कशी झाली ह्याची अधिकृत गाथा ह्या पुस्तकांत कथन करण्यांत आलेली आहे. टेक्सस प्रांतांतील एका शेतीवाडीवर जन्माला आलेला एक मुलगा तारुण्यांत पदार्पण करण्यापूर्वीच राजकीय कार्यक्षेत्रांत उतरला आणि त्याच्या राजकीय कारकीर्दीची परिणति अखेर, युनायटेड स्टेट्स्‌मधील आणि कदाचित् जगामधील सर्वांत सत्तासंपन्न व जबाबदारीच्या अधिकारपदावर आरूढ होण्यांत झाली. अशा ह्या पुरुषाचें व्यक्तित्व बालपणापासून साकारण्याला कोणत्या शक्ति कारणीभूत झाल्या आणि कोणत्या शक्तींनीं त्याला राजकारणाकडे आकृष्ट केलें, ह्याची कहाणी ह्या पुस्तकांत सांगितलेली आहे.

राष्ट्राध्यक्षीय जबाबदारीला आवश्यक असणारी उत्कृष्ट तालीम आधीं मिळूनच राष्ट्राध्यक्ष जॉन्सन आतां त्या पदावर विराजमान झालेले आहेत. प्रथम प्रतिनिधिसभेंत आणि नंतर सेनेटमध्यें, अशीं जवळ जवळ चोवीस वर्षें, कॉंग्रेसचे सभासद ह्या नात्यानें, त्यांनीं कामगिरी बजावलेली आहे. 'सेनेटच्या इतिहासांतला पहिलाच कार्यक्षम पक्षनेता,' अशा शब्दांत त्यांचा गौरव शासनक्षेत्रांतील तज्ज्ञांनीं आणि राजकीय पुढाऱ्यांनीं केलेला आहे. जवळजवळ तीन वर्षें ते उपराष्ट्राध्यक्ष होते. त्या अवधींत, युनायटेड स्टेट्स्‌च्या आणि जगाच्या भवितव्याशीं निगडित असणारे जे जे धोरणविषयक निर्णय ठरविले गेले, त्यांच्याशीं जॉन्सन ह्यांचा घनिष्ठ संबंध आलेला होता. युनायटेड स्टेट्स्‌च्या हितसंबंधांच्या दृष्टीनें, जगांतील अनेक राष्ट्रांच्या राजधान्यांचे दौरे त्यांनीं केले; बर्लिनसारख्या वादग्रस्त ठिकाणांना भेटी दिल्या. त्या दौऱ्यांची माहिती 'दि लिंडन जॉन्सन स्टोरी'-मध्यें ग्रथित करण्यांत आलेली आहे. राष्ट्राध्यक्षपद स्वीकारल्यानंतर जॉन्सन ह्यांनीं कॉंग्रेसच्या संयुक्त बैठकीपुढें केलेलें पहिलेंच भाषण, त्याचप्रमाणें स्वतःच्या राजकीय तत्त्वज्ञानाची रूपरेषा देणारा जो लेख त्यांनीं टेक्सस विद्यापीठाच्या त्रैमासिकांत १९५८ सालीं लिहिला होता तो लेख, ह्यांचाहि अंतर्भाव ह्या चरित्रग्रंथांत करण्यांत आलेला आहे.

पुस्तकाचे लेखक बूथ मूनी ह्यांनीं वयाच्या सतराव्या वर्षापासूनच वृत्तपत्रव्यवसायाला आणि लेखनाला सुरुवात केली. राष्ट्राध्यक्ष जॉन्सन ह्यांच्याशीं त्यांचा परिचय १९५२ सालापासून आहे. जॉन्सन हे सेनेटर असतांना, सहा वर्षें, मूनी हे त्यांचे मदतनीस होते. मूनी ह्यांनीं हा चरित्रग्रंथ प्रथम १९५६ सालीं लिहिला. प्रस्तुत आवृत्ति, त्याची सुधारून वाढविलेली आवृत्ति आहे.

० ० ०

# माझें राजकीय तत्त्वज्ञान †

▱ ▱ ▱

**लिंडन बी. जॉन्सन**

दा. क्र. १९८६५

अग्रक्रमानें सांगायचें झाल्यास मी प्रथम स्वतंत्र माणूस आहें, नंतर अमेरिकन नागरिक आहें, युनायटेड स्टेट्स्च्या सेनेटचा सभासद आहे आणि डेमॉक्रॅटिक पक्षाचा अनुयायी आहें.

त्याचप्रमाणें, मी उदारमतवादी आहें, स्थितिवादीहि आहें, टेक्ससचा रहिवाशी आहें, करदाता आहें, पशुपाल आहें, व्यापारव्यवसायी आहें, ग्राहक आहें, पालक आहें, मतदार आहें; आणि पूर्वी होतों तितका तरुण नाहीं, आणि पुढें होण्याची अपेक्षा करतों आहें, तितका वृद्धहि आज नाहीं. ह्या सर्व माझ्याच भूमिका; पण क्रम कांहीं लावलेला नाहीं.

पहिल्या परिच्छेदामध्यें नमूद केलेल्या संज्ञांच्या अर्थांना मर्यादा घालूं शकेल, अर्थांत बदल करूं शकेल, सुधारणा करूं शकेल असा किंवा त्या संज्ञांशीं संयोग-चिन्हानें संबद्ध असलेला एकादा तरी वर्णनपर शब्द दुसऱ्या परिच्छेदांत असेल असें मला वाटत नाहीं. म्हणूनच, माझें राजकीय तत्त्वज्ञान एक किंवा दोन शब्दांत सांगणें मला शक्य नाहीं आणि तसें सांगण्याचा प्रयत्न करण्याची उत्कंठादेखील मला नाहीं. हें जनवृत्तीच्या प्रचलित प्रवाहाविरुद्ध असेल, पण मी जाणूनबुजूनच हा मार्ग पत्करलेला आहे.

प्रादेशिक, आर्थिक, व्यावसायिक, धार्मिक, वांशिक किंवा अन्य प्रकारचीं विरुदें चिकटवून अमेरिकन नागरिकांचें वर्गीकरण करण्याच्या आणि त्यांच्यावर चिठ्ठ्या चिकटवून त्यांना फाइलींत नीट ठेवण्याच्या प्रथेविरुद्ध तीव्र बंडखोरीची भावना माझ्या श्रद्धांच्या मुळाशीं आहे. 'तुझें राजकीय तत्त्वज्ञान काय ?' असा प्रश्न आपण एकमेकांना ज्या सहजपणानें विचारतों, त्याबद्दलच मला उद्वेग वाटतो.

---

† हा लेख प्रथम 'दि टेक्सस क्वॉर्टर्ली' ह्या नियतकालिकांत प्रसिद्ध झालेला आहे.

हा प्रश्न मला नेहमीं उद्वेगजनक वाटतो, ह्याचें कारण, त्या प्रश्नामागं कांहीं लबाडी वा कावा असल्याचा मला वास येतो, हें खास नव्हे. तो प्रश्न भावडेपणानें विचारला जातो म्हणूनच मला खुपतो. अशा भाबडेपणामुळे तत्त्वज्ञान आणि पोथीवंद सिद्धांत ह्यांची गल्लत केली जाते; त्या प्रश्नाचें उत्तर एक-दोन शब्दांत देणें शक्य आहे असें गृहीत धरलें जातें. आपलें राजकीय तत्त्वज्ञान हें आपल्या साऱ्या जीवनानुभवाचें सार असतें, असें माझ्या प्रत्ययास आलेलें आहे. माणसाच्या जीवनानुभवाचें सार एका विशेषणात्मक शब्दांत सांगतां यावें इतका कांहीं मानव ईश्वरानें एकारलेला किंवा निर्जीव बनविलेला नाहीं. पण असें असूनदेखील, प्रत्येक माणसाचें तत्त्वज्ञान आंकडेवार माहितीच्या कोष्टकांत दामटण्याचा अट्टाहास आम्ही आजकाल चालविलेला आहे. प्राध्यापक, विद्यार्थी, सरकारी नोकर, नोकऱ्यांसाठीं अर्ज करणारे, व्यवस्थापक, कामगार-पुढारी इत्यादि अनेक लोकांची, ज्याप्रमाणें, वय, वजन, उंची, डोळ्यांचा आणि केसांचा रंग वगैरे माहिती नोंदावयाची त्याप्रमाणेंच शेवटीं त्यांच्या तत्त्वज्ञानाबद्दलहि एक प्रश्न विचारायचा, इतक्या पातळीवर माणसाचें तत्त्वज्ञान आणून ठेवण्याचा आजकाल आमचा खाक्या आहे.

अशा माहितीच्या पंगतीला व्यक्तीचें तत्त्वज्ञान बसविणें हें विसंगत आहे.

राजकीय तत्त्वज्ञानाची वैयक्तिक पृथगात्मता ही अमेरिकन स्वातंत्र्याची कोनशिला आहे. त्यांतहि विशेषतः आपल्या राष्ट्राच्या मूलभूत विधानांत सुस्पष्टपणें ग्रथित केलेला तो एक हक्क आहे. आपली समाजव्यवस्था योग्य प्रकारें कार्यवाहीत येण्यासाठीं ही पृथगात्मता अपरिहार्य आहे, असें मी मानतों. असें मानणें हा माझ्या स्वतःच्या तत्त्वज्ञानाचा एक भाग आहे.

आपल्या मूलभूत विधानांत, अमूक एक आर्थिक, सामाजिक किंवा धार्मिक पोथीबंद राष्ट्रीय सिद्धांत आदेश म्हणून मांडलेला नाहीं. त्या दृष्टीनें आपलें मूलभूत विधान——आपली राज्यघटना इतर राष्ट्रांच्या, फार काय, पश्चिम युरोपांतील स्वतंत्र राष्ट्रांच्या मूलभूत विधानांपेक्षांहि अगदीं आगळी आहे.

उदाहरणार्थ, त्यांत औद्योगिक स्वातंत्र्याचा–'फ्री एंटरप्राइज 'चा उल्लेख नाहीं, पक्ष आणि पक्षपद्धति ह्यांचा उल्लेख नाहीं. अमूक एक पोथीबंद

७५०७२ चारित्र
७२८० २८/१२/६४

सिद्धांतावर किंवा तत्त्वावर निष्ठा असली पाहिजे अशी बंधनात्मक तरतूदहि नाहीं.

तरी पण, शासन हें तत्त्वज्ञानाचेंच मूर्तस्वरूप असतें. क्रियाशील शासनाचें मार्गदर्शन तत्त्वज्ञांकडूनच होत असतें. राज्यघटनेनें सत्तेला ज्या मर्यादा घालून दिलेल्या आहेत त्यांच्या चौकटींत, 'अमेरिकन सरकारचे खरेखुरे तत्त्वज्ञ' ही भूमिका अमेरिकन जनतेनें वजावली पाहिजे, हाच आमच्या व्यवस्थेचा आदेश आहे; बहुधा हेंच आमच्या व्यवस्थेचें अधितत्त्व आहे असें मला वाटतें.

अत्यंत उदात्त विचार आहे हा; पण अनेक उदात्त आणि सुंदर गोष्टीं-प्रमाणें त्यांतहि कांहीं नाजुक भाग आहेत. आजकाल हे नाजुक भाग चिरडून टाकण्याची आम्हांला घाई झालेली दिसते. आमच्या राजकीय श्रद्धांची व्यक्तिगत पृथगात्मता आम्ही चिरडून टाकीत आहोंत, अमेरिकन नागरिकांची प्रतवारी आणि क्रमवारी लावण्याच्या भरांत आपापला मार्ग निवडण्याची वृत्ति यांत्रिक बनवीत आहोंत आणि चिकित्सक विचार-मंथनाच्या प्रक्रियेचें निमूर्लन करीत आहोंत.

ह्यावर कोणी कदाचित् असें म्हणतील कीं, माझा पिंड टेक्सस प्रांतीयाचा आहे आणि त्याचा आविष्कार म्हणजेच वरील प्रकाराविरुद्ध असलेली माझी बंडखोरी होय. पण, ह्या म्हणण्याशीं मी सहमत नाहीं. टेक्सस प्रांतांतील माणसें स्वतंत्र वृत्तीचीं आणि व्यक्तिनिष्ठ आहेत हें खरें; पण आम्ही स्वतःच कांहीं वेळां समजतों त्याप्रमाणें हे गुण कांहीं केवळ आमचीच मिरास-दारी नव्हेत. मूलतः हे गुण साऱ्या अमेरिकेचे आहेत. आणि आपल्या प्रजा-सत्ताकाच्या सुदैवानें ते साऱ्या देशभर ठायीं ठायीं रुजलेले आहेत; एखाद्या विशिष्ट विभागांतच सांठलेले नाहींत. तेव्हां, पोथीवंद सिद्धांताच्या नांवा-खालीं प्रत्येक अमेरिकन व्यक्तीला एखाद्या कळपांत ढकलण्याच्या प्रथेविरुद्ध असलेली माझी तीव्र प्रतिक्रिया, माझ्यांतील टेक्सस प्रांतीयापेक्षांहि माझ्यां-तील अमेरिकनाचीच आहे असें माझें ठाम मत आहे.

हें लिहीत असतांनाच मला जाणीव आहे कीं, ज्या सेनेटमध्यें मी काम करीत आहें, बहुमतवाल्या पक्षाचा अधिकृत नेता ह्या नात्यानें काम करीत आहें त्या सेनेटकडे कांहीं जण बोट दाखवितील. तेथें दोन पक्ष आहेत,

दोन तत्त्वप्रणाली आहेत ही गोष्ट तुमच्या प्रतिपादनाविरुद्ध जाणारी, त्याच्याशीं विसंगत अशी नाहीं का, असा ह्या लोकांचा सवाल असेल, पण वस्तुस्थिति ह्याच्या उलट आहे. काँग्रेसमध्यें काम करण्याची सुसंधि मला लाभली नसती तर, तत्त्वज्ञानाच्या पृथगात्मतेबद्दल मला आज जो आदर वाटतो तो कदाचित् निर्माणच झाला नसता.

आपल्या शासनयंत्रणेंत, काँग्रेसचें मुख्य कार्यच मुळीं राष्ट्रीय स्वरूपाचे निर्णय ठरविणें हें आहे : सतरा कोटि व्यक्तींचें प्रतिनिधित्व करणाऱ्या ५३१ व्यक्तींना एकत्र आणून, राष्ट्रानें कोणता मार्ग अनुसरावयास पाहिजे, ह्याबद्दल त्यांची अनुमति मिळविणें हेंच काँग्रेसचें मुख्य कार्य आहे. आम्ही ह्या ना त्या – नांवें कोणतींहि असोत – ठोकळेबाज पोथीबंद सिद्धांताचे गुलाम असतों तर मग, सोव्हिएट प्रिसिडियमची बैठक भरविणें जितकें निरर्थक तितकेंच काँग्रेसची बैठक भरविणेंहि अकारण ठरलें असतें. पण आम्ही तसे पोथीबंद सिद्धांताला बांधलेलों नाहीं. एखादा निर्णय पक्षीय विभागणीवर आधारून आणि केवळ मतें मोजून काँग्रेसनें घेतला तर तो, माझ्या मतें अत्यंत संशयास्पद निर्णय ठरेल; आणि हें माझें मत म्हणजे माझ्या स्वतःच्या तत्त्वज्ञानाचेंच अंग–अत्यंत महत्त्वाचें अंग आहे.

वरील विवेचनानंतर, पर्यायानें, माझ्या स्वतःच्या श्रद्धांमागील तत्त्वें, माझ्या स्वतःच्या तत्त्वज्ञानाचीं निश्चित तत्त्वें सांगणें क्रमप्राप्त आहे. तीं तत्त्वें पुढीलप्रमाणें आहेत ·

पहिलें : प्रत्येक अमेरिकन व्यक्तीपाशीं सांगण्यासारखें कांहीं तरी असतें आणि तें त्या व्यक्तीचें म्हणणें दुसऱ्यांना ऐकविण्याचा हक्क, आमच्या समाजव्यवस्थेंत, त्या व्यक्तीला आहे असें मला ठामपणें वाटतें.

दुसरें · प्रत्येक राष्ट्रीय समस्येवर राष्ट्रीय तोडगा असतोच असतो असा माझा विश्वास आहे, आणि हा विश्वास असल्यामुळें मला ठामपणें वाटतें कीं, प्रत्येक प्रश्नाला दोन बाजू अपरिहार्यपणें असतातच असें नव्हे.

तिसरें : भौतिक, मानवी वगैरे सर्व प्रकारच्या साधनसामग्रीचा पुरेपूर उपयोग करणें हें सरकारी धोरणांचें परमोच्च उद्दिष्ट असलें पाहिजे असें मी मानतों. जे हक्क आम्ही अविभाज्य मानतों त्यांच्या संरक्षणाइतकेंच हें उद्दिष्ट श्रेष्ठ आहे.

चवथें माझ्या मतें, अपव्यय–साधनसामग्रीचा अपव्यय, जीवसंपत्तीचा अपव्यय किंवा सुसंधीचाहि अपव्यय–हा आपल्या समाजाचा कायमचा शत्रू आहे, आणि अपव्यय थांबविणें ही, सरकारच्या सर्व जबाबदाऱ्यांमध्य अत्यंत कसून पार पाडलीच पाहिजे अशी, जबाबदारी आहे.

मी मान्य करतों कीं, हीं तत्त्वें साधींसुधीं आहेत. अर्थात् तीं वैयक्तिकहि आहेत. कारण हीं तत्त्वें मीं दुसऱ्या कोणाचीं किंवा कोणाकडून अंगीकारलेलीं नाहींत, खरें म्हणजे त्या माझ्या श्रद्धाच आहेत. पन्नास वर्षांपेक्षां जास्त व्यतीत झालेल्या आयुष्यांत स्वतःच्या अनुभवानें बाणलेल्या त्या श्रद्धा आहेत–मी त्या अनुसरत आलेलों आहें.

पहिल्या तत्त्वाबद्दल बोलायचें तर, मला जाणीव आहे कीं, प्रत्येक अमेरिकनापाशीं सांगण्याजोगें कांहीं तरी असतें आणि आपलें म्हणणें दुसऱ्यांना ऐकविण्याचा त्याला हक्क आहे ही कल्पना आजच्या काळांत अति आदर्शवादी मानली जाईल. पण माझा विश्वास आहे कीं तत्त्वतः किंवा व्यवहारतः ती तशी नाहीं.

वॉशिंग्टन येथें माझें काम करतांना मला नेहमीं माझ्या जन्मस्थानाची व तेथील माणसांची आठवण होते. टेक्ससमधील डोंगराळ भागांत माझा जन्म झाला. हा भाग त्या वेळीं आडवळणाला होता. आज तितका नसला तरी कांहींसा दूर आणि आडवळणालाच आहे. माझे शेजारी, मित्र आणि नातलग आपापलें स्वतंत्र जीवन जगतात. ते पूर्ण स्वावलंबी नसले तरी स्वयंसिद्ध आहेत.

अनेक राष्ट्रीय प्रश्नांच्या चर्चेपासून हे लोक खूप दूर असतात. पण असें अंतर आहे म्हणून किंवा एखाद्या विशिष्ट विषयाबद्दल त्यांना असणारी माहिती मर्यादित असते म्हणून, कॉंग्रेसच्या सभागृहांत आम्ही जे निर्णय ठरवितों त्यांत ते कमी प्रमाणांत सहभागी असतात असें नाहीं. जॉन्सन सिटी, ब्लँको, स्टोनवॉल, हाय इत्यादि ठिकाणीं रहाणाऱ्या लोकांना मी ओळखतों. म्हणूनच मला माहीत आहे कीं, ह्या लोकांमध्यें मतैक्य घडवून आणणें ही गोष्ट, वॉशिंग्टनमध्यें सेनेटच्या सभासदांचें मतैक्य घडवून आणण्यापेक्षांहि अत्यंत अवघड आहे. पण व्यक्ति तितक्या प्रकृति ह्या

न्यायाच्या बाबतींत, माझे हे शेजारी–किंवा साऱ्याच टेक्ससमधील मतदार–इतर ठिकाणच्या अमेरिकनांपेक्षां कांहीं निराळे आहेत असें नव्हे. बहुमताचा दृष्टिकोन जितका समंजसपणाचा असूं शकतो, तितकेच कांहींतरी चांगले गुण अल्पमताच्या दृष्टिकोनांत असूं शकतात. माझ्या मतें, हे चांगले गुण असल्यास त्यांची दखल घेणें हें आमचें कर्तव्य आहे; केवळ बहुमतालाच मान तुकवून संतुष्ट रहातां कामा नये. कारण, बहुमत हें कितीहि समंजसपणाचें असलें तरीसुद्धां तें म्हणजे कांहीं साऱ्या शहाणपणाचा गड्डा नव्हे.

आज आपण, बहुश: सहनशक्तीवरचा ताण टाळण्यासाठीं सोयीस्कर मार्गांचा अवलंब करतों. सतरा कोटि अमेरिकनांचें म्हणणें ऐकून घेणें म्हणजे दमछाटीचेंच काम. म्हणून, ही ऐकण्याची, त्यांच्या मनाचा कसून थांग घेण्याची जबाबदारी टळावी ह्यासाठीं आम्ही मतविभागणी, वर्गवाऱ्या, फेरवर्गवाऱ्या करून निर्णय ठरवितों. पण एका तत्त्वावर अशी मतविभागणी केल्यावर तेंच तत्त्व जेव्हां आम्ही अन्य प्रश्नांना आणि निर्णयांनासुद्धां लागूं करतों तेव्हां मात्र परिस्थिति अति चिंताजनक बनते. कारण, तसें करण्यांत आम्ही आमच्या अमेरिकन राजकीय तात्त्विक विचारांमध्यें, खऱ्या अर्थानें तत्त्वज्ञानाची पद्धति अवलंबीत नाहीं; तर, पोथीबंद सिद्धांतावर निष्ठा ठेवणाऱ्या संप्रदायांची पद्धति अवलंबितों. आम्ही फसवीं समीकरणें तयार करतों. त्या समीकरणांतून चुकीचींच उत्तरें हातीं लागतात.

ही समीकरणाची प्रक्रिया बव्हंशीं आमच्या पक्षपद्धतीचें अंग आहे. "प्रत्येक प्रश्नाला दोन बाजू असतात" ह्या भ्रामक कल्पनेला ही समीकरणपद्धति पोषक ठरते. देशांत दोन पक्ष आहेत हें खरें, पण दोन पक्ष म्हणजे दोन बाजू, दोन भूमिका असें मुळींच नाहीं. पण आम्ही दोन भूमिकांची कल्पना उरीं कवटाळतों आणि पुन: एकदां मनाचें समाधान करून घेतों कीं, पक्षीय बहुमतानें ज्या अर्थीं निर्णय ठरला आहे त्या अर्थीं बहुमताची किंवा अल्पमताची भूमिका पुन: एकदां तपासून बघण्याची कांहींच आवश्यकता नाहीं. ज्याअर्थीं एखाद्या प्रश्नावर दोन भूमिका आहेत त्याअर्थीं कोणती तरी एकच स्वीकारली जाऊं शकते आणि म्हणूनच, राजकीय बलाबलानें ठरलेल्या निर्णयाची अधिक कसून फेरतपासणी करण्याची जरूरी नाहीं, अशी आमची विचारसरणी आहे.

माझी विचारसरणी ह्यापेक्षां निराळी आहे. जेफर्सन आणि मॅडिसन ह्यांच्यासारख्या पुरुषांच्या विचारप्रणालीवर आधारलेल्या अमेरिकन राजकीय तत्त्वज्ञानाच्या अगदीं विरुद्ध, वरील सार्वत्रिक दृष्टिकोन आहे, असें मला वाटतें. एखाद्या प्रश्नावर, सर्व विचारी माणसांना मान्य होणारा राष्ट्रीय तोडगा सांपडेपर्यंत, खराखुरा तोडगा सांपडला असें म्हणतां येणार नाहीं. आणि तसा तोडगा शोधण्यासाठीं आमच्या आयुष्याचीं कित्येक वर्षें खर्चीं पडलीं तरी, तो तोडगा हातीं लागेपर्यंत आमचें काम संपणारें नाहीं, असें मला ठामपणें वाटतें.

ह्या संदर्भांत, माझ्या तत्त्वज्ञानाचीं, तिसरें आणि चवथें, हीं तत्त्वें बरोबर लागू पडतात. अठराव्या शतकाच्या तत्त्वज्ञानाच्या—त्या काळांतील मर्यादित ज्ञान आणि कल्पना ह्यांच्या चौकटीच्या—बंधनांत अमेरिकेला घटनात्मक मर्यादानियमांनीं जखडून टाकलेलें असतें तर, आज आपलें राष्ट्र आहे तसें कदापि घडलें गेलें नसतें. १८० पेक्षां अधिक वर्षांच्या कालावधींत आपल्या राष्ट्राची थोरवी जी वाढत गेली तिचें मूळ, वृद्धिंगत होत गेलेल्या ज्ञानाचा उपयोग स्वायत्त शासनामध्यें करण्याचें आपल्याला जें स्वातंत्र्य आहे, त्यांत आहे. निराळ्या शब्दांत हेंच असें म्हणतां येईल कीं, अमेरिकेनें चोखाळावयाचा मार्ग ठरविणें विद्यमान पिढीच्या हातीं सोपविण्यांत आलेलें असल्यामुळेंच राष्ट्राला आजची थोरवी लाभलेली आहे. अशा रीतीनें, आपल्या राज्यघटनेच्या अठराव्या शतकांतील तत्त्वज्ञानांत विकासाला वाव ठेवलेला होता. म्हणूनच आज देखील तें तत्त्वज्ञान खणखणीत आहे, आपल्या विसाव्या शतकाच्या दृष्टीनेंहि तें अद्याप उचित आहे.

इतर सर्व राष्ट्रांप्रमाणेंच, आपल्या राष्ट्रापाशींहि निसर्गानें बहाल केलेली, परिस्थितिसापेक्ष असलेली आणि मानवी बुद्धीच्या रूपानें असलेली कांहीं साधनसंपत्ति आहे. अन्य राष्ट्रांकडून जिंकून किंवा लुबाडून घेतल्याखेरीज ह्या साधनसंपत्तींत आपण अधिक भर घालूं शकणार नाही. तेव्हां, उपलब्ध साधनसामग्रीच्या आधारावरच, आम्हांला व्हावेंसें वाटतें तसें होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ह्या साधनसंपत्तीचा पुरेपूर उपयोग करून न घेतां, आम्ही असंतुष्ट राहूं तर तें वारसा हक्कानें लाभलेलें भाग्य अव्हेरण्यासारखें ठरेल; ती कर्तव्यच्युति ठरेल.

माझा पिंड टेक्ससससारख्या भूमींतला आहे, म्हणूनच मला असें तीव्रतेनें वाटतें हें उघडच आहे. माझ्या सार्वजनिक जीवनांत, ज्या ज्या कार्यामध्यें मी सहभागी झालों त्या सर्व कार्यांत, मला अत्यंत अभिमानास्पद वाटणारें यशस्वी कार्य म्हणजे १९३०–४० च्या कालखंडांत झालेलें, कोलोरॅडो नदीच्या खालच्या पात्राच्या विकासाचें कार्य होय. येथेंहि नदीच्या प्रवाहाला धरणें बांधलीं किंवा पुराच्या पाण्याला पायबंद घातला ह्यापेक्षां त्या प्रदेशाचा अपव्यय संपला ह्याचा मला अभिमान वाटतो.

जो प्रदेश, माझ्या तरुणपणीं, अगदीं अनुत्पादक आणि कुचकामी होता, तोच आज राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचें आणि साधनसंपत्तीचें महत्त्वाचें अंग बनला आहे. विशेष महत्त्वाची गोष्ट ही कीं, त्या साऱ्या भूमींतील मानवी साधनसंपत्तीचा अपव्यय कमी झालेला आहे. इतर कोणत्याहि कारणामुळें असो वा नसो, पण ग्रामीण भागांतील घराघरांत वीज खेळूं लागली ह्या एकाच कारणामुळें तरुणांच्या आकांक्षांना साफल्याचीं नवीं क्षितिजें दिसूं लागलीं आहेत. टेक्ससच्या त्या डोंगराळ मुलुखांतील स्त्री-पुरुषांना नापिकी खडकाळ भूमीवर निष्फळ खडतर कष्ट उपसावे लागत असत, तें त्यांचें दुर्दैव आतां संपलेलें आहे. सरकारची खरीखुरी जबाबदारी पार पाडली गेली हाच ह्याचा अर्थ आहे.

अशा प्रकारचा अपव्यय नष्ट झाला कीं, उलट, सरकारवर एक अखंड जबाबदारी येऊन पडते. ही जबाबदारी सर्वच बाबतींत असते. नव्या संधी-मुळें जनतेला मिळणारा लाभ, निष्काळजीपणानें केलेली भरमसाट उधळ-पट्टी आणि लादलेले जादा कर ह्यांच्या द्वारें लुबाडून, सरकारनें स्वत: अपव्यय न करणें ही ती जबाबदारी आहे. ही बाब म्हणजे अमेरिकन सरकारपुढील एक बिकट समस्या होऊन बसलेली आहे. आणि ह्या बाबतींत कित्येकदां आम्ही चुकीचे निकष लावतों.

सरकारच्या अत्युत्साहापायीं जसा जनतेच्या साधनसामर्थ्याचा अपव्यय होऊं शकतो, तसाच सरकारच्या निष्क्रियतेमुळें देखील होऊं शकतो. उदा-हरणार्थ, जगांतील राष्ट्राराष्ट्रामधील बलाबलाच्या प्रश्नावर सरकार आत्मसंतुष्ट बनण्याचा धोका असतो. हा अपव्ययच आहे. कम्युनिझमच्या बाबतींत आंतरराष्ट्रीय आघाडीवरील सामसूम म्हणजे अमेरिकन

साधनसामर्थ्याचा आणि स्वातंत्र्याच्या साधनाचा सर्वात प्रचंड अपव्यय होय. अशी ही सामसूम युद्धाला कारण होत नसली तरी देखील तो अपव्ययच होय. कोणत्याहि चैतन्यशील सरकारनें, देशी किंवा परदेशी अशा कोणत्याहि आघाडीवर परिस्थिति कुजत राहूं देतां कामा नये. त्यानें, जोमानें, धैर्यानें आणि विश्वासानें राष्ट्रीय हिताचा मार्ग शोधण्यासाठीं प्रयत्नरत राहिलें पाहिजे.

हींच माझ्या राजकीय तत्त्वज्ञानाचीं तत्त्वें आहेत.

जे लोक, व्यक्तीचें तत्त्वज्ञान आणि समाजांत रूढ झालेले ठोकळेबाज सिद्धांत, हीं दोन्ही समानच लेखतात, ते मला सतत विचारीतच रहातील कीं, ह्या प्रश्नावर किंवा त्या प्रश्नावर किंवा आणखी एखाद्या प्रश्नावर तुमची ‘ भूमिका ’ काय ? तत्त्वज्ञानाचा जो अर्थ मला अभिप्रेत आहे त्यानुसार, समस्यांवरील तोडगे म्हणजे कांहीं तत्त्वज्ञान नव्हे; तत्त्वज्ञान म्हणजे अधिक टिकावू आणि व्यापक असा दृष्टिकोन होय. असा दृष्टिकोन ठेवून मी विविध प्रश्न जसजसे पुढें येतात तसतशीं त्यांचीं उत्तरें शोधूं शकतों. आणि मला खात्रीपूर्वक वाटतें कीं तीं उत्तरें मला मिळूं शकतील. मग ते प्रश्न १९५८ सालचे असोत कीं १९७८ सालचे असोत.

माझ्या वैयक्तिक पसंतीनें मी डेमोक्रॅटिक पक्षाचा अंगीकार केलेला आहे. कारण त्या पक्षांत राहूनच मी जास्त चांगल्या प्रकारें माझ्या श्रद्धा व्यवहारांत आणूं शकतों, त्यांना मूर्त स्वरूप देऊं शकतों.

ह्याव्यतिरिक्त, मी आणखी कसा आणि कोण आहें, हें अन्य लोक त्यांना योग्य वाटेल त्याप्रमाणें ठरवूं शकतील. मी स्वतः मात्र माझीं अशीं कांहीं पृथक् लक्षणें आहेत असें मानीत नाहीं.

मी प्रारंभींच सांगितलें आहें कीं, महत्त्वानुसारी क्रमानें, मी प्रथम स्वतंत्र माणूस आहें, नंतर अमेरिकन नागरिक आहें, युनायटेड स्टेट्स्च्या सेनेटचा सभासद आहें आणि डेमोक्रॅटिक पक्षाचा अनुयायी आहें. माझ्यापुरतें हें वर्गीकरण इथेंच संपतें.

# लेखकाचें निवेदन

▱ ▱ ▱

'**दि** लिंडन जॉन्सन स्टोरी' हें चरित्र मी प्रथम लिहिलें तेव्हां चरित्र-नायकाकडील नोकरींतून मी नुकताच मुक्त झालेलों होतों. ही नोकरी सोडली ती कायमची, असेंच मी धरून चाललों होतों. पण, – पुढें युनायटेड स्टेट्स्‌चे छत्तिसावे राष्ट्राध्यक्ष होणार असलेल्या ह्या पुरुषामध्यें दुसऱ्याला आपलेंसें करण्याचा गुण जबरदस्त आहे. आणि कदाचित्, 'तुझी मला जरुरी आहे' ह्या आवाहनानें विरघळून जाणारा माझा स्वभावहि त्याला कारण असेल. १९५६ च्या प्रारंभीं जेव्हां हें पुस्तक प्रकाशित झालें तेव्हां मी पुन: एकदां लिंडन बेन्स जॉन्सन ह्यांच्या कचेरींत कामावर रुजू झालेलों होतों. १९५८ च्या शरदऋतूपर्यंत मी तिथें होतों.

सारांश, जवळजवळ सहा वर्षं ह्या पुरुषाच्या हाताखालीं काम केल्या-नंतर, आणि नोकरीचा काळ आनंदांत व्यतीत केल्यानंतर, मी हें चरित्र वस्तुनिष्ठपणें आणि असंदिग्धपणें लिहिलें आहे असा आव मी आणूं शकत नाहीं. ज्या व्यक्तीचा मी अत्यंत चाहाता बनलेलों आहें, त्या व्यक्तीच्या आयुष्यांतील कांहीं ठळक घटना, कसल्याहि अवडंबराविना सांगण्याचा मुख्यत: हा उपक्रम आहे. त्यांच्याकडील नोकरी सोडल्यानंतरच्या काळांत त्यांच्याविषयींची माझी आदराची भावना वाढतच गेलेली आहे.

प्रथमावृत्तीला लिहिलेल्या प्रस्तावनेंत चरित्रनायकानें माझें वर्णन, " एके काळीं राजकीय शत्रू असलेला, पण नंतर निकटवर्ती मित्र बनलेला " ह्या शब्दांत केलेलें आहे. हें वर्णन अगदीं अचूक आहे, आणि त्याबद्दल दोन्ही बाजूंनीं मला शरम वाटत नाहीं. युनायटेड स्टेट्स्‌च्या सेनेटसाठीं १९४८ सालीं झालेल्या निवडणुकीच्या वेळीं मी लिंडन जॉन्सन ह्यांच्या प्रति-स्पर्ध्याच्या पक्षाला होतों. हें काम मी पेशा म्हणून पत्करलें होतें त्याचप्रमाणें वैयक्तिक कल म्हणूनहि पत्करलें होतें, आणि त्या प्रचारांत केवळ वरवर नव्हे, तर हिरीरीनें भाग घेतला होता. माझा उमेदवार त्या निवडणुकींत पडला आणि लिंडन जॉन्सन विजयी झाले. विजयी उमेदवार आणि पराभूत उमेदवार ह्यांच्या मतांतील अंतर, शोचनीय वाटावें इतकें कमी होतें; पण लिंडन जॉन्सन अखेर विजयी झाले एवढें खरें.

२०० ५२ चारित्र
१२८० २८।११५४

## तेरा

त्यानंतर थोडयाच दिवसांत, हळूहळू शंका येऊं लागली कीं, मला 'चांचपून' पाहिलें जात आहे; टेक्ससमधून निवडून आलेल्या ह्या नव्या सेनेटरचें लक्ष माझ्याकडे वेधलें आहे. प्रथम माझा त्यावर फारसा विश्वास बसेना. पण त्यांचें लक्ष वेधण्याचें कारण मला गौरवास्पद वाटावें असें होतें. त्यांना वाटूं लागलें होतें कीं, मी त्यांच्या प्रतिस्पर्ध्यासाठीं चोख कामगिरी बजावलेली होती आणि मला जर संधि आणि प्रोत्साहन मिळेल तर मी त्यांच्यासाठींहि चोख कामगिरी बजावूं शकेन.

त्यांची पात्रता, प्रेरक सामर्थ्य, उत्साह-शक्ति हे गुण माझ्या मनांत त्यांच्याविषयीं गाढ आदर निर्माण करण्यास कारणीभूत झालेले आहेत. कोणत्याहि समस्येच्या मुळालाच हात घालण्याची त्यांची पद्धति, मार्ग दिसतांच कृति करण्याची तडफ, आणि त्या समस्येची योग्य उकल करण्यासाठीं आवश्यक तर चढाऊ पवित्रा घेण्याची त्यांची धडाडी, ह्या गुणांमुळें त्यांच्याविषयीं मला गाढ आदर वाटूं लागला.

वरील प्रकारची माझी भावना असल्यानंतर मी त्यांच्याविषयीं पूर्ण वस्तुनिष्ठपणें सोडाच; पण अंशमात्र वस्तुनिष्ठपणें तरी लिहूं शकेन अशी अपेक्षाच करतां येत नाहीं. आणि तसें मी लिहिलें आहे असा माझा दावादेखील नाहीं. आमच्या राजकीय-सामाजिक नेत्यांमधील थोरपणाची उणीव तीव्रतेनें जाणवावी अशा काळांत अमेरिकेला लाभलेला थोर पुरुष, अशी त्यांच्याविषयीं माझी भावना आहे.

कांहीं काळापूर्वीं, लिंडन जॉन्सन ह्यांचे पूर्वज ज्या सरहद्द विभागांतून आले, तिथें एक वाक्प्रचार रूढ होता. तो ह्या पुरुषाला तंतोतंत लागू पडेल. तो वाक्प्रचार असा : "विहिरीवर सोबतीला नेण्याला योग्य माणूस." ह्या वाक्प्रचाराचें स्पष्टीकरण अगदीं साधें आहे. रेड इंडियन टोळयांशीं चकमकी झडत असत त्या काळांत कोणीहि व्यक्ति पाणवठयाच्या ठिकाणीं एकाकी जाण्याचा अविचार करीत नसे. कारण, अशा ठिकाणीं एकटयादुकटयावर हल्ला करण्यासाठीं शत्रू नेहमीं टपून बसलेला असे. म्हणून पाणी आणण्याला निघालेला इसम सोबतीला शक्य तर दुसरा माणूस घेत असे—विश्वासू आणि धीट असा सोबती, "विहिरीवर सोबतीला नेण्याला योग्य असा माणूस."—म्हणजे, खरोखरच, लिंडन जॉन्सन यांच्यासारखा.

# प्रथमावृत्तीची प्रस्तावना

□ □ □

प्रस्तावना-लेखक जेव्हां प्रस्तावना लिहितात तेव्हां जें कांहीं लिहितात तें तसेंच कां लिहितात, ह्याबद्दल मला नेहमींच अचंबा वाटत आलेला आहे. मुळांत प्रस्तावनांची आवश्यकताच काय, हें देखील मला एक गूढ वाटत आलेलें आहे. अत्यंत बहिर्मुख वृत्तीच्या माणसालादेखील अंतर्मुख होण्याला सर्वांत अधिक भाग पाडणारी गोष्ट म्हणजे स्वत:विषयींच्या पुस्तकाला स्वत:च प्रस्तावना लिहिणें.

मी बऱ्याचशा प्रस्तावना वाचलेल्या आहेत. त्यामुळें मला ठाऊक आहे कीं, प्रस्तावनालेखकानें कांहीं इन्कार नमूद करण्याची प्रथा आहे. हे इन्कार बहुधा पहिल्या दोन-तीन परिच्छेदांत नमूद करायचे असतात. ह्या बाबतींत चाकोरी तोडणारा बंडखोर मी नसल्यामुळें परंपरागत मार्गाचाच अवलंब करीत आहें. मात्र योगायोग असा कीं मी नमूद करणार असलेले इन्कार रूढ संकेतानुसार असले तरी खरे देखील आहेत.

तेव्हां, प्रथम सांगायचें म्हणजे हें कांहीं 'लिहवून घेतलेलें', 'अधिकृत चरित्र' नव्हे. सार्वजनिक जीवनांत वावरणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला वृद्धपणीं आपला पूर्वेतिहास 'नीटनेटक्या स्वरूपांत' मांडला जावा अशी तळमळ वाटूं लागते. पण तशी तळमळ वाटण्याइतका मी, वयाच्या सत्तेचाळिसाव्या वर्षींच कांहीं वृद्ध झालेलों नाहीं. पूर्वेतिहास नीटनेटका मांडणें ह्याचा रोकडा अर्थ हा कीं चरित्रनायकाचें चित्र शक्य तों अनुकूल दिसेल असें रंगवायचें ! पण ही तळमळ जशी मला नाहीं, तशीच आम्हां टेक्ससनिवासियांना मागें वळून बघण्याची संवयहि नसते. आमची परंपरा आहे सरळ पुढें बघण्याची— आपण कुठें होतों, आपल्यामागून कोण येत आहे हें आम्ही मागें वळून बघत नसतों. आमच्या पूर्वेतिहासाकडे बघायला, आम्हीं जगाचा निरोप घेतल्या-नंतर, भरपूर वेळ असतो—इतरांना.

दर्जेदार प्रस्तावनांमध्यें लेखक आणखी एक रूढ पवित्रा घेत असतात, तसा मी देखील घेतों. आपलें चरित्र 'अधिकृत' नाहीं असें सांगून झाल्यानंतर,

ग्र००८२
१२६०
चारे ४

स्वत:संबंधींच्या त्या पुस्तकांत आपल्याला खरोखरच तसा कांहीं रस वाटत नाहीं असा आव आणण्यापर्यंत चरित्र-नायकाची मजल जाते. आणि नंतर मात्र तो म्हणतो कीं, "अर्थात् आपल्या लेखन-विषयाची लेखकाला चांगली जानपछान आहे."

वरील प्रकारचा पवित्रा मीं घेतला तर तोदेखील वस्तुस्थितीला धरून आहे. बूथ मूनी ह्यांनीं नुकताच लिंडन जॉन्सन ह्या व्यक्तीच्या सान्निध्यांत तीन वर्षांचा काळ कंठिलेला आहे. ह्या काळांत त्यांना सर्व प्रकारचा ताण सोसावा लागलेला आहे आणि सर्व प्रकारच्या परिस्थितींतून जावें लागलेलें आहे. एके वेळीं ते माझ्या राजकीय शत्रूंपैकीं एक होते आणि आतां निकट-वर्ती मित्र झालेले आहेत. ह्याबद्दल मला अभिमान वाटतो; कोणाहि सुबुद्ध माणसाला सुखविणाराच हा अभिमान आहे. तीन वर्षें ते माझ्या वॉशिंग्टनच्या कचेरींतील कार्यकर्त्यांपैकीं एक होते. ह्याशिवाय ते टेक्सस-निवासी आहेत. टेक्ससच्या परंपरेंत मुरलेले आहेत. त्यांच्यापाशीं लेखकाची निरीक्षण-शक्ति आणि परिणाम जोखण्याची समजशक्ति आहे. त्या 'लोन स्टार' राज्याकडून † जो सामर्थ्याचा आणि ऐक्यभावनेचा वारसा मिळालेला असतो तो बूथ मूनी ह्यांना लाभलेला आहे.

सारांश, त्यांना टेक्ससची ओळख आहे, तशीच वॉशिंग्टनचीहि आहे. जिथें सध्यां मी बहुमतवाल्या पक्षाचा नेता म्हणून काम करतों त्या युनायटेड स्टेट्स् सेनेटची–स्वतंत्र लोकशाही शासनानें निर्माण केलेल्या त्या विलक्षण गुतागुंतीच्या अत्यंत अपूर्व अशा संस्थेची जानपछानहि त्यांना अनुभवानें झालेली आहे.

मला आशा आहे कीं, वाचकांना हें पुस्तक आवडेल. मी वाचलें आहे आणि मला आवडलें आहे. ह्यांतील अनेक गोष्टी मी निराळ्या पद्धतीनें

---

† युनायटेड स्टेट्स्मध्यें सामील होण्यापूर्वीं टेक्सस स्वतंत्र प्रजासत्ताक होतें. वर पांढरा पट्टा, खालीं तांबडा पट्टा आणि मध्यें निळ्या पट्ट्यावर एकच तारा ( लोन स्टार ) असा त्या राज्याचा ध्वज आहे. म्हणूनच त्या राज्याचें नांव 'लोन स्टार स्टेट' असें आहे. टेक्सस ह्या नांवाचें मूळ तेजास ( Tejas ) हा रेड इंडियन बोलींतील शब्द–त्याचा अर्थ मित्र.

सांगितल्या असत्या; त्यांतला बराचसा भाग, मुख्यत: आपमतलबासाठींच, काढूनदेखील टाकला असता आणि लेखकानें उल्लेख न केलेल्या अनेक गोष्टींवर मी भर दिला असता. तथापि एकूण हें पुस्तक मला खूपच आवडलें आहे. आणि बऱ्याच दिवसांपासून मला समजून चुकलें आहे कीं, लिंडन जॉन्सनविषयीं स्वत: लिंडन जॉन्सन ह्यांचा असलेला दृष्टिकोन कांहीं खरोखर अचूक आणि इष्टहि असतो असें नाहीं. मला वाटतें कीं, ह्या पुस्तकांत यथार्थदर्शनाचा अभाव असलाच तर त्याला कारण लेखकाची अति सहृदयता आहे. स्नेहभावांतून निर्माण झालेला हा प्रमाद आहे आणि सर्व प्रमादांत अत्यंत सहजक्षम्य आहे. शिवाय अशा आल्हाददायक मुद्द्यावर भांडण उकरून काढण्याइतका पढतमूर्ख माणूस सार्वजनिक क्षेत्रांत कुणी असेल असें मला वाटत नाहीं. अर्थात् मीहि नाहीच.

बोलायला मिळालेंच आहे. तेव्हां थांबण्यापूर्वीं लिंडन जॉन्सन ह्या व्यक्तीविषयीं मी कांहीं थोडेंसें सांगूं इच्छितों. मला वाटतें, मी डेमोक्रॅटिक पक्षाचा आहें ही गोष्ट कांहीं गुपित नाहीं. मी सदैवच त्या पक्षाचा असणार आहें. त्या पक्षाचें अनुयायित्व हा, सर्वप्रथम, मला लाभलेला वारसा आहे. पूर्वजांपासून चालत आलेला वारसा आहे. जॉन्सन घराण्यांतील आणि बेन्स घराण्यांतील सर्वच्या सर्व व्यक्ति, अगदीं पुरातन काळापासून, त्याच पक्षाच्या झेंड्याखालीं रहात आलेल्या आहेत.

पण, हें पुस्तक वाचणाऱ्यांना आणि मला न ओळखणाऱ्या लोकांना मी अगदीं ठासून सांगूं इच्छितों कीं, मी डेमोक्रॅटिक पक्षाचा आहें ह्याचें कारण केवळ भौगोलिक नाहीं; विशिष्ट घराण्यांत जन्म हें तें कारण आहे असें नाहीं किंवा केवळ टेक्ससच्या परंपरेचाहि तो भाग नाहीं, ही गोष्ट त्यांनीं लक्षांत घ्यावी. मी भाग्यवान् जन्मलों ही गोष्ट खरीच; पण सार्वजनिक जीवनांत सव्वीस वर्षे व्यतीत केल्यानंतर मला बौद्धिक दृष्ट्या आणि अनुभवानें पटलें आहे कीं, जन्मत:च डेमोक्रॅटिकपक्षीय असणें भाग्याचें आहे.

सरळ साध्या शब्दांत हेंच सांगायचें म्हणजे मी डेमोक्रॅटिक पक्षाचा आहें त्याच्या मुळाशीं तात्त्विक श्रद्धा आहे. भावी पिढ्यांना देण्याजोगें, दुसऱ्या पक्षापेक्षां डेमोक्रॅटिक पक्षापाशीं जास्त आहे. त्याच्या विशाल छत्राखालीं

आणि फडफडत्या निशाणाखालीं अनेक हितसंबंध आणि अनेक समाजगट नेहमीं एकत्र आलेले आहेत आणि मला खात्री आहे कीं पुढेंहि नेहमींच असे उत्साहानें एकत्र येतील.

दुसरा पक्ष हा एकेरी हितसंबंधावर आधारलेला पक्ष आहे. हा एकमेव हितसंबंध म्हणजे व्यापारी-धंदेवाईक वर्ग होय. असा एकमेव हितसंबंध असणें हें सनदशीर आहे. ह्या वर्गानें युनायटेड स्टेट्स्च्या विकासाला प्रचंड हातभार लावलेला आहे आणि त्या वर्गाला किंवा त्यांच्यांतल्या कोणालाहि डेमोक्रॅटिक पक्षांत वाव आहेच. पण ह्या पक्षांत त्यांचें स्थान अनेक हितसंबंधांपैकीं एक असेंच राहील. त्यांचे हक्क, खास अधिकार आणि कर्तव्यें ह्यांचा विचार, शेतकरी, पशुपालक, कामगार इत्यादींच्या हक्कां-बरोबरच आणि कर्तव्यांबरोबरच केला जाईल; देशांतील विविध गटांच्या आणि विभागांच्या विविध हक्कांबरोबरच आणि आकांक्षांबरोबरच केला जाईल. ह्या विचारांत टेक्ससच्या हक्कांचा आणि आकांक्षांचा अंतर्भाव होतोच.

( १९५६ ) **लिंडन बी. जॉन्सन**

सर्व जनतेच्या दुःखाचा हा क्षण आहे, आपली अमाप हानि झालेली आहे.

माझ्या दृष्टीनें हें तीव्र वैयक्तिक दुःख आहे. मी जाणून आहें कीं, मिसेस केनेडी आणि त्यांचा परिवार ह्यांच्या दुःखांत सारें जग सहभागी आहे.

मी माझ्याकडून शिकस्त करीन. तेवढेंच मी करूं शकतों. त्यासाठीं मी तुमचें साह्य अपेक्षितों, आणि परमेश्वराचेंदेखील.

ता. २२ नोव्हेंबर १९६३ **लिंडन बी. जॉन्सन**

# १

**त्या** धिप्पाड पुरुषाचा चेहरा दुःखाघातानें जडावलेला दिसत होता. कातडी बांधणीच्या बायबलवर त्यानें हात टेकलेला होता. जिच्या केंसांचा रंग करडा बनलेला आहे अशी एक स्त्री त्या पुरुषासमोर उभी होती. ती स्त्री अगदीं अस्पष्ट कंपित स्वरांत कांहीं शब्द वाचीत होती आणि तो पुरुष त्या शब्दांचा पुनरुच्चार करीत होता :

"मी गंभीरपणें प्रतिज्ञा घेतों कीं, युनायटेड स्टेट्स्च्या राष्ट्राध्यक्षाचीं कर्तव्यें मी माझी सारी क्षमता पणाला लावून पार पाडीन. आणि युनायटेड स्टेट्स्च्या राज्यघटनेचें समर्थन, संरक्षण आणि जतन करीन. परमेश्वर मला साह्यभूत होवो."

इतकाच साधासुधा विधि पार पडला आणि बालपणीं टेक्ससमधील शेतवाडीवर काम केलेले, तरुणपणीं शिक्षक असलेले लिंडन बेन्स जॉन्सन हे युनायटेड स्टेट्स् ऑफ अमेरिका ह्या राष्ट्राचे राष्ट्राध्यक्ष बनले.

ती १९६३ च्या नोव्हेंबरची २२ तारीख होती.

दोन तासांपेक्षांहि कमी कालावधीपूर्वीच, त्या शुक्रवारच्या दुपारीं एक वाजतां, जॉन फिट्झेराल्ड केनेडी ह्यांना मृत्यूनें गाठलें होतें. मारेकऱ्याच्या हातून मृत्युमुखीं पडलेले ते अमेरिकेचे चवथे राष्ट्राध्यक्ष होत. डलासच्या रस्त्यांतून राष्ट्राध्यक्षांची मिरवणूक चाललेली होती. त्यासाठीं व्हाईट हाऊसची खास गाडी विमानानें आणविली गेली होती. त्या गाडींत राष्ट्राध्यक्ष बसलेले होते. डलासच्या (टेक्सस्) एका उपनगरांतून ही गाडी जात असतां एका वखारीच्या खिडकींतून कुणा नेमबाजानें दोन गोळ्या रायफलमधून झाडल्या. त्या गोळ्या राष्ट्राध्यक्ष केनेडींच्या डोक्यांत आणि देहांत घुसल्या. राष्ट्राध्यक्ष पुनः शुद्धीवर आलेच नाहींत.

दोनच महिन्यांपूर्वीं राष्ट्राध्यक्षांनीं, पुनःपुन्हा उठणाऱ्या एका अफवेचा आणखी एकदां जोरदार इन्कार केलेला होता. १९६४ च्या राष्ट्राध्यक्षीय निवडणुकींत जॉन्सन ह्यांना बाजूला सारण्यांत येणार आणि उपराष्ट्राध्यक्षीय उमेदवार म्हणून केनेडी दुसऱ्याच व्यक्तीची निवड करणार अशी ती अफवा होती. राष्ट्राध्यक्ष केनेडींनीं अनेक प्रसंगीं ठासून घोषित केलेलें होतें कीं १९६० च्या निवडणुकीप्रमाणेंच १९६४ च्या निवडणुकींत-देखील जॉन्सन हेच आपले जोडीदार असतील. पत्रकारांना दिलेल्या अखेरच्या मुलाखतींत केनेडींना असाच प्रश्न विचारण्यांत आला होता. उपराष्ट्राध्यक्षीय उमेदवार म्हणून तुम्हांला जॉन्सन हेच हवेत काय आणि जॉन्सन ह्यांनाच ही उमेदवारी मिळेल अशी तुमची अपेक्षा आहे काय? राष्ट्राध्यक्ष केनेडींनीं ठासून उत्तर दिलें होतें, "अर्थातच!"

लिंडन जॉन्सन ह्यांचा राष्ट्राध्यक्षपदाचा शपथविधि, 'यू. एस्. एअर फोर्स वन' या विमानाच्या एका खोलींत झाला. हें विमान राष्ट्राध्यक्षांसाठीं असतें. विमान डलासच्या 'लव्ह' विमानतळावर विसावलेलें होतें. त्या दिवशीं सकाळींच तें विमान नजीकच्या फोर्ट वर्थ येथून राष्ट्राध्यक्ष आणि त्यांचा परिवार ह्यांना घेऊन आलेलें होतें. आदल्या रात्रीं राष्ट्राध्यक्ष आणि उपराष्ट्राध्यक्ष ह्यांचा मुक्काम फोर्ट वर्थला होता.

शपथविधि जिल्हा न्यायाधीश सेरा टी. ह्यूज ह्यांच्या हस्तें पार पडला. ह्या वयोवृद्ध महिलेला जॉन्सन कुटुंबांत मित्रत्वाचें मानाचें स्थान आहे. हुतात्मा बनलेल्या राष्ट्राध्यक्षांनीं दोनच वर्षांपूर्वीं त्यांची नेमणूक न्यायाधीशपदीं केलेली होती.

त्या जेट विमानाच्या पिछाडीच्या खोलींत जॉन्सन ह्यांच्या उजव्या हाताला त्यांची अर्धांगी उभी होती. पतिवियोगाची आपत्ती कोसळलेल्या मिसेस केनेडी डाव्या हाताला उभ्या होत्या. शपथविधीच्या वेळीं उपस्थित रहाण्याची इच्छा मिसेस् केनेडींनींच व्यक्त केली होती. "परमेश्वर मला साह्यभूत होवो." ह्या शब्दांचा पुनरुच्चार करून झाल्यावर नव्या राष्ट्राध्यक्षांनीं त्या दोन्ही स्त्रियांच्या गालांचें हळुवार चुंबन घेतलें आणि अन्य उपस्थितांवर क्षणार्ध दृष्टिक्षेप टाकला. त्या छोट्या खोलींत पंचवीस एक व्यक्ति दाटीवाटीनें उभ्या होत्या. टेक्ससच्या दोन दिवसांच्या दौऱ्याच्या

वेळीं राष्ट्राध्यक्ष केनेडी आणि उपराष्ट्राध्यक्ष जॉन्सन ह्यांच्या समवेत रहाण्यासाठीं कॉंग्रेसचे कांहीं सभासद वॉशिंग्टनहून आलेले होते. दिवंगत राष्ट्राध्यक्षांच्या कचेरींतील कांहीं अधिकारी होते. मोजकेच पत्रकार होते.

सर्वांचें लक्ष एकाच पुरुषावर केंद्रित झालेलें होतें. त्या पुरुषानें एक प्रदीर्घ श्वास घेतला. त्याच्या अंगांतील काळ्या कोटाखालील खांदे ताठ झालेले भासले.

तो पुरुष उद्गारला, " ठीक आहे, हें विमान वॉशिंग्टनला परत नेऊं या."

ह्या उद्गारांत व्यक्त झालेली भावना वैशिष्ट्यपूर्ण होती.

ज्या पुरुषावरोबर १९६० च्या राष्ट्राध्यक्षीय निवडणुकींत डेमोक्रॅटिक पक्षातर्फे उमेदवारी मिळविण्यासाठीं लिंडन जॉन्सन ह्यांनीं सामना दिला होता आणि त्यानंतर तीन वर्षे निकटवर्ती सहकार्य करीत असतांना त्यांच्या मनांत ज्या पुरुषाविषयीं उघडउघड प्रेमादर निर्माण झाला होता, अगदीं उत्कट वैयक्तिक जिव्हाळा निर्माण झाला होता, त्या पुरुषाच्या खुनामुळें ते अगदीं सुन्न होऊन गेले होते. पण त्या परिस्थितींतदेखील, ज्या जबाबदारीचें गांभीर्य शब्दांनीं सांगतां येणें अशक्य, अशा जबाबदारीला तोंड देण्यासाठीं लिंडन जॉन्सन हे निर्धारानें सज्ज झाले होते. त्यांनीं आपलें दुःख अंगाबाहेर झटकून टाकलें, इतकेंच नव्हे, त्या दुःखामुळें येणारी अगतिकताहि झटकून टाकली होती.

त्या क्षणीं जें करावयास हवें होतें आणि भविष्यकाळांत जें करावें लागणार होतें तें करणें अपरिहार्यच होतें. कारण नियतीनेंच तें योजलेलें होतें.

ज्याच्या मनांत अखंड खळबळ चालू असते अशा त्या उत्साही टेक्सस-निवासी पुरुषाचा पंचावन्नावा जन्मदिन होऊन नुकतेच तीन महिने झालेले होते. ह्यापूर्वींहि नियतीनें जॉन्सन ह्यांना आव्हान दिलेलें होतें. तीन वेळां दुर्दैवानें त्यांच्यावर जमीनदोस्त व्हावें इतके जोरदार हल्ले चढविलेले होते. पण त्यांनीं कायमचा पराभव पत्करलेला नव्हता.

युनायटेड स्टेट्स्च्या सेनेटसाठीं ते पहिल्यांदा उभे राहिले त्यावेळीं पराभूत झाले होते. पण सात वर्षांनंतर ते पुनः त्या रिंगणांत उतरले आणि यशस्वी झाले.

ते सार्वजनिक जीवनांतील अत्यंत गुंतागुंतीच्या व्यक्तिमत्त्वांपैकीं एक आहेत, त्याचबरोबर अत्यंत सुस्पष्ट बोलणाऱ्या नेत्यांमध्येंहि त्यांचा समावेश होतो. या नव्या राष्ट्राध्यक्षाला, कसोटीस उतरणाऱ्या सत्य माहितीचा ठाव घेण्याची आणि परिशीलनानें योग्य ठरणाऱ्या मतांची दखल घेण्याची अखंड तळमळ आहे. अत्यंत मर्मभेदकपणें ते दुसऱ्यांच्या मनाचा ठाव घेतात. स्वतःच्या कार्याला पूरक ठरतील अशा कल्पनांच्या अखंड शोधांत ते असतात. आणि दिवसाकाठीं कधीं चवदा, कधीं सोळा किंवा अठरा तासहि काम करतात. आणि काम करतात तें त्यांतून कांहीं तरी चांगलें निष्पन्न होईल असेंच. ज्यांच्या विचारांचा ठाव घेण्याचा प्रयत्न ते करतात त्यांची दमछाट होते, पण जॉन्सन ह्यांच्यामध्यें मात्र त्या विचारमंथनानें नवचैतन्य संचरतें.

शारीरिक उत्साहाला बौद्धिक कसरतीची जोड देऊन इतरांना असाध्य ठरलेल्या गोष्टी त्यांनी साधलेल्या आहेत. त्यांच्या कचेरींतील नोकर वर्गाला —त्यांच्यापैकीं कांहीं जणांना तरी—कांहीं कांहीं वेळां वाटतें कीं, आपल्या ह्या वरिष्ठानें जरा कमी धडपड करावी. जॉन्सन ह्यांच्याइतकें नसेल, पण जवळजवळ तितकेंच कसून हे लोक काम करतात. अनेकदां ते कुरकूर करतात. पण, स्वतःबरोबर त्यांना दौडायला लावणाऱ्या ह्या पुरुषाबद्दल त्यांना वाटणारी निष्ठा निर्विवाद आहे; थोडेंसेंच चांचपून पाहिलें तर ही निष्ठा जाज्ज्वल्य आहे असेंच आढळून येईल.

नव्या राष्ट्राध्यक्षांच्या प्रचंड सामर्थ्याचा एक विशेष, किचकट तपशील हाताळण्याची त्यांची पात्रता हाच केवळ नसून, ताठर वृत्तीच्या आणि हेकट स्वभावाच्याहि माणसांना गोंजारून वळणावर आणणें हाहि आहे. ह्यामुळेंच ते, माजी उपराष्ट्राध्यक्ष रिचर्ड एम्. निक्सन ह्यांच्या शब्दांत सांगायचें म्हणजे, "आपल्या काळांतील सर्वांत कर्तबगार राजकारणधुरंधरांपैकीं एक" ठरले आहेत. डेमोक्रॅटिक पक्षाचा एक कांग्रेस-सदस्य म्हणतो, "लिंडन ह्यांच्या यशाचें रहस्य देवाणघेवाण वृत्तींत आहे. तुम्ही त्यांच्या सांगातीं रहाल तर इथें तिथें त्याची परतफेड केल्याशिवाय ते रहाणार नाहींत. लिंडनना अशा गोष्टींचें विस्मरण होत नाहीं." इतरांना बरोबर घेऊन काम करण्याचें हें कौशल्य त्यांनीं अत्यंत उत्कृष्ट कलेंत परिणत केलेलें आहे. त्यांची भूमिका सदैव संघनायकाची राहिलेली असली तरी संघांतील एक खेळाडू ही भूमिकाहि ते अचूकपणें बजावतात.

ठाणे. ग्रंथालय
२०७०२
चरित्र
१२६०
२८/१२/८४

# लिंडन जॉन्सन

ते एक असामान्य कार्यरत पुरुष आहेत. कामें पार पाडून घेणें आणि तीं देखील अयोग्य विलंबाविना, हें त्यांचें सूत्र आहे. पण त्याचबरोबर त्यांची वृत्ति, उबळ येतांच धांवत सुटणाऱ्या माणसाची नाहीं, उलट सावधगिरीनें पाऊल टाकण्याचीच आहे. संकटकालीं धोक्याचा इशारा देणाऱ्या कळीकडे त्यांचा हात आपोआप कधींच जायचा नाहीं. अशा वेळीं ते विचार करतात. पुन:पुन्हा विचार करतात. उलटसुलट मुद्द्यांचा विचार करतात. ते अत्यंत जबाबदार वृत्तीचे पुरुष आहेत.

असे हे लिंडन जॉन्सन, राष्ट्राध्यक्ष ह्या नात्यानें कांहीं थोडया तासांचा पहिलाच विमान-प्रवास करून डलासहून वॉशिंग्टन (डी. सी.) ला आले. राजधानीच्या शिवेवर असलेल्या अॅन्ड्र्यूज विमान तळावर युनायटेड स्टेट्स् विमानदलाचें पहिल्या क्रमांकाचें तें जेट विमान उतरल्यावर राष्ट्राध्यक्ष जॉन्सन विमानाबाहेर आले आणि नभोवाणीच्या व दूरचित्रवाणीच्या असंख्य ध्वनिक्षेपकांसमोर येऊन त्यांनीं सावकाश आणि गंभीर स्वरांत पुढील शब्द उच्चारले :

" सर्व जनतेच्या दु:खाचा हा क्षण आहे. आपली अमाप हानि झालेली आहे.

" माझ्या दृष्टीनें हें तीव्र वैयक्तिक दु:ख आहे. मी जाणून आहें कीं, मिसेस केनेडी आणि त्यांचा परिवार ह्यांच्या दु:खांत सारें जग सहभागी आहे.

" मी माझ्याकडून शिकस्त करीन. तेवढेंच मी करूं शकतों. त्यासाठीं मी तुमचें साह्य अपेक्षितों, आणि परमेश्वराचें देखील. "

इतके मोजके, आवश्यक आणि तळमळीचे शब्द एकदांचे बोलून झाले आणि राष्ट्राध्यक्ष आपल्या पत्नीसह, त्यांना व्हाईट हाऊसकडे नेण्यासाठीं उभ्या असणाऱ्या हेलिकॉप्टरच्या दिशेनें चालूं लागले. त्यांचा चेहरा खिन्न दिसत होता.

नंतर कांहीं थोडयाच क्षणांत त्यांचीं पावलें पुन: जमिनीला लागलीं. आणि त्या क्षणापासून ते स्वत:चे धनि राहिले नव्हते. आतां ते राष्ट्राचे आणि जनतेचे झाले होते.

□ □ □

# १

१९०८ साल. ऑगस्ट महिन्याची २७ तारीख. रविवार. माध्यान्ह नुकतीच उलटून गेलेली होती. एक वयोवृद्ध सद्‌गृहस्थ आपल्या शेतवाडींत घोड्यावर स्वार झाला. ही शेतवाडी टेक्ससमधील एका गांवासन्निध होती. तें गांव त्या सद्‌गृहस्थानेंच वसविलें होतें आणि त्याचेंच नांव गांवाला देण्यांत आलेलें होतें. खोगिरावर ताठ बसून त्यानें घोडयाला गति दिली. त्या गांवांतील आपल्या प्रत्येक शेजाऱ्याच्या घरासमोर तो सद्‌गृहस्थ घोडा थांबवीत होता, प्रत्येकाला ठराविक शब्दांत, गंभीर स्वरांत वर्दी देत होता. ते शब्द होते :

"आज सकाळीं माझ्या घरीं युनायटेड स्टेट्‌सचा एक सेनेटर जन्माला आला—मला नातू झाला."

टेक्ससमधील त्या गांवाचें नांव जॉन्सन सिटी. सॅम्युएल इलाय जॉन्सन (सीनिअर) हे गांवांतील आणि आसपासच्या भागांतील लोकांना सुपरिचित होते. त्यांच्या शब्दावर लोकांचा विश्वास होता. कुटुंबांतील मंडळींच्या दृष्टीनें तर, जॉन्सन कुटुंबांतील त्या नवागताचें भवितव्य, त्याचें नामकरण होण्याआधींच ठरून गेलेलें होतें. त्यानंतरच्या काळांत नातवाविषयीं अभिमान बाळगणारे ते आजोबा आपलें वरील भाकित वारंवार पुनःपुन्हा वर्तवीत असत. आणि त्या मुलाचें सुडौल मस्तक, पाणीदार डोळे, प्रगत बुद्धि, निश्चयी वृत्ति आणि मोहक व्यक्तित्व न्याहाळणाऱ्यांचा, त्या वृद्धाच्या शब्दांवरचा विश्वास अधिकाधिक दृढ होत गेला.

## लिंडन जॉन्सन

लिंडन जॉन्सन ह्यांचा जन्म राजकारणी घराण्यांतच झालेला होता. त्यांचे वडील टेक्ससच्या विधानसभेवर पांच वेळां निवडून आलेले होते. त्यांच्या मातेचे वडीलहि विधानसभेच्या कामकाजांत सहभागी झालेले होते. त्या राज्याच्या परराष्ट्रमंत्र्याच्या कचेरींतहि त्यांनीं काम केलेलें होतें. त्यांच्या आईची आई, मेक्सिकोपासून फुटून स्वतंत्र होऊं बघणाऱ्या टेक्ससच्या स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यावर स्वाक्षऱ्या करणाऱ्या नेत्यांपैकीं एका नेत्याची पुतणी होती. ज्या सान जासिन्टोच्या लढाईनें टेक्ससला स्वातंत्र्याच्या संग्रामांत विजय मिळवून दिला त्या लढाईंत ह्या पुरुषानें भाग घेतला होता. टेक्सस प्रजासत्ताकाच्या पहिल्या कॉंग्रेसमध्यें हा पुरुष सभासद म्हणून निवडून आलेला होता. आईच्या आईचा एक चुलता केन्टकीचा राज्यपाल होता. स्थलांतर करण्यापूर्वीच्या काळांत, आपल्या पहिल्या मातृदेशांत (स्कॉटलंड-मध्यें) ह्या महिलेचे पूर्वज अनेक पिढ्या स्कॉटलंडच्या लोकसभेंत आपल्या जिल्ह्याचें प्रतिनिधित्व करीत आलेले होते.

लिंडन जॉन्सन ह्यांचे वडील, सॅम इलाय जॉन्सन (ज्युनिअर) ह्यांनीं शिक्षक, शेतकरी आणि कायदेमंडळाचे सभासद अशा विविध भूमिका आयुष्यांत वजावल्या होत्या. १९०४ सालीं ते प्रथम राज्याच्या विधानसभेवर निवडून आले तेव्हां त्यांचें वय सत्तावीस होतें. लागोपाठ पुन: एकदां ते सभासद म्हणून निवडून आले होते. कांहीं काळानंतर दोन-दोन वर्षांसाठीं असें तीन वेळां त्यांनीं विधानसभेंत प्रतिनिधित्व केलें. त्यांच्या ह्या सार्वजनिक कार्याचा उत्तरकाळ म्हणजे पहिल्या महायुद्धाचा काळ. त्यावेळीं टेक्ससमध्यें त्यांचें नांव सर्वविश्रुत झालें तें त्यांनीं प्रतिनिधि-सभेंत केलेल्या एका भाषणामुळें. त्या भाषणांत त्यांनीं सहिष्णुतेचें आवाहन केलें होतें. साऱ्या देशांत युद्धकालीन देशभक्तीचें वारें संचारलें असलें तरी त्याच्या जोडीला समजूतदारपणा आणि न्यायवृत्ति हीदेखील असावयास पाहिजेत, असें अत्यंत कळकळीचें आवाहन त्या भाषणांत होतें.

विधानसभेचे सदस्य ह्या नात्यानें अनेक रचनात्मक विधेयकांचें जनकत्व सॅम जॉन्सन ह्यांच्याकडे जातें. पहिल्या वेळीं निवडून आल्यानंतर थोड्याच दिवसांत त्यांनीं, टेक्ससच्या स्वातंत्र्य-संग्रामाचें स्मारक-स्थान,– सान

अॅन्टोनिओमधील अलामो किल्ला–खरेदी करण्यासाठीं पैसा मंजूर करण्याबाबतचें विधेयक मांडलें. हें विधेयक मंजूर झालें. यादवी युद्धांत दक्षिणी राज्यांतर्फे लढलेल्या वीरांच्या विधवांसाठीं आसरागृह उभारण्याची तरतूद करणारें विधेयक त्यांनींच तयार केलें होतें. सुधारलेले राजरस्ते तयार करून चिखल तुडविण्याचें शेतकऱ्यांवरील संकट दूर व्हावें म्हणून त्यांनीं कसून प्रयत्न केले. राज्यांतील अवर्षणग्रस्त विभागांना साह्य करण्यासाठीं सरकारी पैसा उपलब्ध झाला तो, त्यांनींच पुढाकार घेऊन केलेल्या प्रयत्नांमुळें.

कायदेमंडळांत प्रथम निवडून आल्यानंतर, थोड्याच दिवसांनीं टेक्सस विधानसभेच्या सभापतीच्या निवडणुकीसाठीं मतदान झालें. त्यावेळीं उमेदवार म्हणून ईशान्य टेक्सस भागांतील एक तरुण सभासद उभा होता. सॅम जॉन्सन ह्यांचें मत त्या तरुणाला मिळालें. त्या तरुणाचें नांव होतें सॅम रेबर्न.

सॅम जॉन्सन ह्यांचा विवाह १९०७ च्या ऑगस्टमध्यें रिबेका बेन्स हिच्याशीं झाला. सॅम जॉन्सन ह्यांच्या आधीं त्या मतदार संघांतून कायदेमंडळावर प्रतिनिधि म्हणून निवडून येणारे जोसेफ डब्ल्यू. बेन्स ह्यांची रिबेका ही कन्या. विवाहपूर्व अनुनयाची सॅम जॉन्सन ह्यांची रीत म्हणजे रिबेकाला सभा-संमेलनांना घेऊन जाणें ! संयुक्त संघराज्याच्या सैनिक वीरांचा मेळावा भरला होता. तेथें होणारीं सेनेटर जो बेली आणि चार्ली कल्बर्सन व राज्यपाल टॉम कॅम्पबेल ह्यांचीं भाषणें ऐकण्यासाठीं सॅमनी रिबेकाला नेलें होतें. टेक्ससच्या विधानसभेंत विल्यम जेनिंग्ज ब्रायान हे कसें अस्खलित वक्तव्य करतात तें ऐकण्यासाठींहि सॅमनीं तिला एकदां कायदेमंडळाच्या बैठकीला नेलें होतें.

"जिला राजकारणांत खरोखरच गोडी वाटते अशी मुलगी आढळतांच सॅम भाळले !" असे उद्गार त्यांच्या पत्नीनें कांहीं वर्षांनंतर काढले होते.

रिबेका ही एक दृढनिश्चयी आणि बाणेदार तरुणी होती. पित्याची आर्थिक परिस्थिति खालावली तेव्हां तिनें स्वतःच्या पायांवर उभें राहून बेलर कॉलेजांतील शेवटच्या वर्षाचें शिक्षण पुरें केलें. जिलेस्पी परगण्याचें

मुख्य ठिकाण असलेल्या फ्रेडरिक्सबर्ग येथें ती वक्तृत्वाचे वर्ग चालवीत असे. विवाहानंतर ह्या जोडप्यानें पेडरनेल्स नदीकांठच्या जॉन्सन सिटीमध्यें संसार थाटला. तेथेंच एक वर्षाच्या कालावधीनंतर, आजोबानें ज्या नातवाचें वर्णन 'भावी सेनेटर' असें केलें होतें त्याचा—वरील जोडप्याच्या प्रथम अपत्याचा जन्म झाला.

लिंडन जॉन्सन ह्यांना लाभलेली कौटुंबिक पार्श्वभूमि विविधांगी आहे. त्यांच्या कुळांत आणि आप्त-स्वकीयांत कांहीं सरकारी अधिकारी होऊन गेले, धर्माधिकारी होऊन गेले; पशुपाल, पत्रकार, मळेवाले, शिक्षक असे अनेक लोक होऊन गेले. त्यांचा एक पूर्वज एका महाविद्यालयाचा अध्यक्ष होऊन गेला. 'अमेरिकन क्रांतीच्या कन्यका' ( डॉटर्स ऑफ दि अमेरिकन रिव्होल्यूशन ) ह्या संघटनेच्या संस्थापकांतहि ह्या घराण्यांतील एक व्यक्ति होती.

त्यांचे आजोबा, सॅम्युएल इलाय जॉन्सन (सिनि.) ह्यांचा जन्म १८३८ सालीं अॅलाबॅमा येथें झाला, जेसी जॉन्सन आणि ल्यूसी वेब बार्नेट जॉन्सन ह्या जोडप्याचें हें दहावें अपत्य. सॅम्युएल इलाय यांच्या माता-पित्यांची बहुतेक हयात जॉर्जियामध्यें व्यतीत झाली. १८४६ मध्यें त्यांनीं टेक्ससमध्यें स्थलांतर केलें. दहा वर्षांनंतर पित्याचा अंत झाल्यावर तरुण सॅम आणि त्याचा भाऊ टॉम ह्या दोघांनीं पशुपालनाच्या व्यवसायाला सुरुवात केली. गुरें खरेदी करायचीं, जिलेस्पी परगण्यांत त्यांना कांहीं काळ चरायला ठेवावयाचें आणि नंतर तीं गुरें कॅन्झसच्या निरनिराळ्या बाजारपेठांमध्यें नेऊन विकायचीं असा हा व्यवसाय होता. त्या शतकाच्या मध्यास ह्या बंधूनीं कायमचें घरठाण उभारलें. त्या भागांतील ती पहिलीच वसाहत होय— त्यालाच आज जॉन्सन सिटी ह्या नांवानें ओळखण्यांत येतें.

सॅम्युएल इलाय जॉन्सन ह्यांनीं यादवी युद्धांत लष्करी सेवा बजावली. १८६७ सालीं त्यांचा विवाह इलायझा बन्टनशीं झाला. रॉबर्ट होम्स बन्टन आणि जेन मॅकिन्टॉश बन्टन ह्या जोडप्याची ही कन्या आणि टेक्ससच्या स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यावर व टेक्सस प्रजासत्ताकाच्या राज्यघटनेवर स्वाक्षरी करणाऱ्या जॉन व्हीलर बन्टन ह्यांची पुतणी होय. जॉन व्हीलर

खन्टन हे त्या प्रजासत्ताकाच्या पहिल्या काँग्रेसमध्यें होते. इलायझाची एक आतेबहीण मेरी डीशा हीच 'अमेरिक क्रांतीच्या कन्यका' ह्या संघटनेची एक संस्थापिका होय.

रिबेका वेन्सचे वडील जोसेफ विल्सन बेन्स ह्यांचा जन्म त्या शतकाच्या पांचव्या दशकाच्या मध्यास ल्युइझिआनामध्यें झाला. पण त्याचें संगोपन आणि शिक्षण मात्र टेक्ससमध्यें झालें. त्यांनींहि यादवी युद्धांत सैनिकी कामगिरी वजावली. ते शिक्षक होते, वकीलहि होते. मॅक्कीनी येथें त्यांनीं एक साप्ताहिक सुरू केलें. त्यानंतर ते कायदेमंडळाचे सभासद होते. परराष्ट्र मंत्र्यांचें पदहि त्यांनीं मंडित केलें होतें.

त्यांचे वडील जॉर्ज डब्ल्यू. बेन्स हे बाप्तिस्त पंथाचे पाद्री होते. प्रथम आर्कॅन्सॉ, नंतर ल्युइझिआना आणि अखेर टेक्सस अशी त्यांची जीवित-परिक्रमा झाली. आर्कॅन्सॉच्या कायदेमंडळांतहि त्यांनीं काम केलें. बाप्तिस्त पंथाचें टेक्ससमधून प्रसिद्ध होणारें पहिलें साप्ताहिक त्यांच्याच संपादकत्वा-खालीं प्रकाशित होत असे. १८६१ सालीं ते बेलर विद्यापीठाच्या धर्मशिक्षण महाविद्यालयाचे अध्यक्ष झाले होते, पण एकच वर्षानें त्यांनीं प्रकृति-अस्वास्थ्यामुळें त्या जागेचा राजीनामा दिला. विख्यात सॅम ह्यूस्टन ह्यांची आणि जॉर्ज वेन्स ह्यांची चांगलीच दोस्ती होती.

ह्या आप्तस्वकीय पूर्वजांकडून लिंडन जॉन्सन ह्यांनीं अन्य कांहीं वारसा मिळविलेला असो वा नसो, पण शारीरिक उत्साहाचा प्रचंड सांठा त्यांना लाभलेला आहे, ह्यांत मात्र शंका नाहीं. त्यांची आई आणि त्यांना बाल-पणापासून जाणणारीं माणसें सांगत कीं, हा पोरगा म्हणजे जिवंत डायनॅमोच होता.

छोटा लिंडन एक आनंदी, चळवळ्या-चटपट्या आणि निरोगी पोरगा होता. शेतवाडीवर करण्याजोगीं अनेक कामें असत. लिंडन तीं सारीं करीत असे. पालकत्वाच्या जबाबदारीची उत्कट जाणीव असणाऱ्या मातेच्या जागरूक देखरेखीखालीं आणि स्वाभिमानी, बुद्धिमान् पित्याच्या काळजी-पूर्वक मार्गदर्शनाखालीं हा पोरगा, त्या प्रदेशांतील डोंगराळ भागांत वावरणाऱ्या सशांप्रमाणें वेगानें वाढत गेला.

पोराचें मन आणि शरीर हीं दोन्हीहि तल्लख होतीं. त्याच्या खूप लहानपणापासूनच त्याच्या आईनें त्याला बायबल, इतिहास, पुराणें ह्यांतील कथा सांगायला सुरुवात केली होती. लिंडनला प्रत्यक्ष घडलेल्या सत्यकथा सर्वांत अधिक आवडत असत. तो आईला सतत विचारीत असे, " खरं आहे हें ? असं खरोखरच घडलंय का ?"

लिंडन दोन वर्षांचा होण्यापूर्वीच रिबेका बेन्स जॉन्सन हिनें त्याला ठोकळ्यांच्या साह्यानें धुळाक्षरें शिकविलीं होतीं. तिसऱ्या वर्षींच तो बालगीतें, लाँगफेलो आणि टेनिसन ह्यांच्या कांहीं कविता पाठ म्हणूं शकत असे. चवथ्या वर्षीं कुणाच्या मदतीशिवाय त्याला वाचतां येऊं लागलें होतें.

पांचव्या वर्षीं शाळेंत दाखल झाल्यानंतर मात्र स्वारी पुस्तकांकडे सहजासहजीं आकर्षिली गेली नाहीं. शाळेंत अभ्यासाव्यतिरिक्त कराव्याशा वाटणाऱ्या अनेक गोष्टी होत्या आणि त्याच जास्त भुरळ पाडणाऱ्या होत्या.

जुन्या प्रगतिपत्रकांवरून दिसून येतें कीं, निरनिराळ्या विषयांत लिंडनची प्रगति चांगलीच होती. अपवाद फक्त ' वागणूक ' ह्या विषयाचा. त्या सदरांत ' ब ' श्रेणीच्या पुढें कधींच प्रगति झाली नाहीं. त्याच्या अभ्यासांतील प्रगतीचें कारण, त्याला स्वतःला शिकण्यांत वाटणारी गोडी हें नसून, आईची चिकाटी हेंच जास्त होतें. आपला मुलगा करारी आहे हें आईला माहीत होतें, पण तिचा करारीपणा कांहीं उणा नव्हता. अभ्यास चुकविण्यासाठीं लिंडननें कितीहि क्लृप्त्या लढविल्या तरी प्रत्येक क्लृप्तीवर त्याला शिकायला भाग पाडणारा तोडगा आई शोधून काढीतच असे.

लिंडनची आई सांगत असे, " लिंडननें शाळेंत नेमून दिलेला अभ्यास मुळींच केलेला नाहीं ही गोष्ट कित्येकदां सकाळच्या न्याहारीच्या वेळेपर्यंत माझ्या लक्षांत आलेली नसे. ती लक्षांत आली कीं मग मी त्याचें पुस्तक आणून त्याच्या वडिलांच्या पुढ्यांत ठेवीत असें. अन् न्याहारी संपेपर्यंत, आदल्या रात्रीं चिरंजीवांनीं कोणती उजळणी करायला हवी होती ह्याची चर्चा मी माझ्या पतींसमवेत करीत असें.

" वडील माणसांच्या बोलण्यांत तोंड घालूं नये ही शिस्त लिंडनच्या अंगीं चांगलीच मुरलेली होती, त्यामुळें मुकाट्यानें ऐकणें त्याला भाग पडे.

अन् ऐकून धडा त्याला समजत असे. ह्याशिवाय, रोज सकाळीं तो शाळेंत जायला निघाला कीं फाटकापर्यंत मी त्याच्याबरोबर जात असें अन् त्याला इतिहासांतील गोष्टी सांगत असें. भूगोलाची माहिती देत असें. बीजगणित समजावून सांगत असें. त्या दिवशीं शाळेंत होणाऱ्या धड्यांची त्याची पूर्व तयारी करून घेण्याबद्दल मी जागरूक असें."

ज्ञानाचे डोस असे सक्तीनें पाजण्याची आवश्यकता पडत असली तरी, मुलामध्यें उपक्रमशीलता आणि कल्पकता या गुणांचा विकास ज्याप्रकारें होत होता तो बघून मातापित्यांना समाधान वाटत होतें. शाळा कांहीं थोडे मैल लांब होती; लिंडन स्वतःच्या तट्टावरून शाळेंत जात असे. त्यानें सभोवतीं मित्रमंडळ जमविलें होतें. हे सारे मित्र त्याच्यापेक्षां वयानें मोठे होते. अनेकदां तो एखाद्या मित्राला रात्रीच्या मुक्कामासाठीं घरीं घेऊन येत असे. पांच मुलांतील सर्वांत वडील मुलगा आपण आहोंत, त्या आपल्या जबाबदारीच्या स्थानाची गंभीर जाणीवहि त्याला होती.

जॉन्सन सिटी हायस्कूलमधून शालान्त परीक्षा १९२४ सालीं तो उत्तीर्ण झाला. त्याच्या वर्गांत सात विद्यार्थी होते, आपल्या वर्गाचा तो अध्यक्ष होता. त्या वर्षीं झालेल्या आंतरशालेय वक्तृत्व-स्पर्धेंत लिंडन आणि त्याचा एक दोस्त या दोघांनीं बक्षिसें पटकावलीं.

शालान्त परीक्षेंतून पार पडणें म्हणजे लिंडनच्या दृष्टीनें पांच वर्षांच्या कंटाळवाण्या कालावधीची परिसमाप्ति होती. महाविद्यालयांत जाण्याचा त्याचा विचार नव्हता. पुस्तकांना कायमचा रामराम त्यानें ठोकला होता. त्याला जगाच्या आखाड्यांत उतरण्याची इच्छा होती. आपण चांगले बाप्ये झालों असें त्याला वाटूं लागलें होतें. आणि उंचीपुरतें बोलायचें तर तो पुरुष झालाच होता. त्याची उंची सहा फुटांपेक्षां जास्त झालेली होती. मात्र शरीर टेलिफोनच्या खांबाप्रमाणें सडपातळ होतें.

त्याच्या मातापित्यांना मात्र तळमळ होती कीं, मुलानें महाविद्यालयांत जावें. पण त्यांच्या भावनेशीं तो सहभागी नव्हता. पुढील शिक्षणाच्या विषयावर पडदा पडावा ह्या हेतूनें त्यानें पांच मित्रांसह कॅलिफोर्नियाच्या सहलीचा बूट काढला. ह्या प्रकाराला घरांतून पोबारा करणें असें म्हटल्यास वावगें नव्हतें.

कॅलिफोर्नियांतील कांहीं महिन्यांच्या भटकंतींत हा पोरगा खूप कांहींसें शिकला. त्याच्याजवळचे आणि त्याच्या मित्रांजवळचे पैसे लवकरच संपले. कामाच्या शोधार्थ सारे निरनिराळ्या दिशेला निघून गेले.

त्या दिवसांविषयीं बोलतांना लिंडन जॉन्सन ह्यांनीं कांहीं काळानंतर उद्गार काढले आहेत : "त्या वेळीं आयुष्यांत प्रथमच 'मिताहारा'चें व्रत मी अंगीकारलें होतें. माझ्या भोजनाच्या पदार्थांच्या यादींतला पहिला पदार्थच मुळीं 'खायला कांहीं नाहीं' हा असे ! समुद्रकिनाऱ्याच्या ह्या टोंकापासून त्या टोंकापर्यंतचा मुलूख मी पायांखालीं तुडविला. भांडीं घासण्याचें, उपाहारगृहें आणि खानावळी येथें वाढप्याचें अशीं कामें केलीं. मिळालें तेव्हां शेतावरहि काम केलें. मी दिवसेंदिवस अधिकाधिक लुकडा बनत गेलों. घरची आठवण जास्त जास्त अस्वस्थ करूं लागली."

अर्थात् ह्या परिस्थितींतून मार्ग होता. मिळेल तें काम करीत करीत, आणि गांवाच्या दिशेनें जाणाऱ्या वहानांतून फुकटा प्रवास टप्प्याटप्प्यानें करीत करीत टेक्ससमध्यें यायचें व गांव गाठायचें हा तो मार्ग होता. त्या उंच किडकिडीत तरुणानें अखेर हाच मार्ग पत्करला. पुनः घरीं परतल्याचा त्याला फार आनंद झाला. पण महाविद्यालयांत जाण्याच्या कल्पनेला मात्र अद्याप त्याच्या मनांत थारा मिळत नव्हता.

जॉन्सन सिटीपाशींच रस्त्यावर काम करणाऱ्या कामगारांच्या एका जथ्यांत त्यानें काम मिळविलें. फावड्यानें रेती-खडी ओढणें, लॉरी चालविणें, ढकलगाडी लोटणें इत्यादि कामें केलीं. हातांना घट्टे पडले. शनिवारच्या रात्री त्यानें नेमस्त मौजमजेंतहि घालवल्या.

आई मात्र आपल्या वैशिष्टयपूर्ण चिकाटीनें मुलाच्या मनावर एक मुद्दा बिंबविण्याची प्रत्येक संधि साधीत असे. प्रत्येक वेळीं ती त्याला बजावीत असे, "काम — मग तें हातानें करावयाचें असो कीं बुद्धीनें असो, — प्रतिष्ठेचेंच असतें. पण शिक्षण असलें कीं सर्व प्रकारच्या सुसंधि खुल्या होतात."

सॅम जॉन्सन आपल्या मुलाशीं त्याच्या कामाबद्दल बोलत. ते म्हणत, "साध्या गोष्टींत समाधानी असणें हें चांगलेंच. मजूर होण्यावर संतुष्ट असणाऱ्या माणसाच्या मनावर कसलेंच दडपण नसतें. अर्थात् त्याच्या

मनांतहि ठणठणाटच असतो. पण रस्त्यावर काम करण्यांत जन्म घालवायला राजी असणाऱ्या माणसांचें मन रिकामें असलें म्हणून कांहीं अडत नाहीं."

असले उद्‌गार वारंवार कानीं पडण्याचा अखेर परिणाम झाला. त्याच-बरोबर त्या तरुण पोराला जें कंटाळवाणें कष्टप्रद काम करावें लागे त्याचीहि प्रतिक्रिया झाली.

एका सायंकाळीं लिंडन कामावरून घरीं परत आला. त्या दिवशीं हवा-मान सर्द होतें आणि हवेंत गारवाहि होता. त्या दिवशीं त्याला विशेष कष्टाचें काम करावें लागलें होतें. घरांत आल्याबरोबर त्यानें सांगून टाकलें, "केवळ हातांनीं काम करण्याला मी विटून गेलोंय. मी डोक्याचें काम करूं शकेन कीं नाहीं हें सांगतां येत नाहीं. पण मी प्रयत्न करून बघायला तयार आहें. आई, तूं अन् बाबा माझ्या कॉलेज-शिक्षणाची व्यवस्था करूं शकत असाल, तर शक्य तितक्या लवकर जायला मी तयार आहें."

आई ताबडतोब उठली आणि टेलिफोनपाशीं गेली. तिनें त्या कुटुंबाच्या एका घरोब्याच्या व्यक्तीला फोन केला. ती व्यक्ति साऊथवेस्ट टेक्सस स्टेट टीचर्स कॉलेजची पदाधिकारी होती. टेक्सस राज्याची राजधानी ऑस्टिन येथून चाळीस मैल अंतरावर असलेल्या सान मार्कस येथें तें महाविद्यालय आहे. पुढील सहामाहीच्या सुरुवातीलाच मुलाला महाविद्यालयांत दाखल होतां येईल अशी व्यवस्था आईनें जागच्या जागीं बसून केली. १९२७ च्या फेब्रुआरीमधील ही घटना होय.

लिंडनपाशीं पैसे अगदीं थोडे होते. तो जॉन्सन सिटी बँकेंत गेला आणि स्वतःच्या स्वाक्षरीच्या वचनचिठ्ठीवर त्यानें पंचाहत्तर डॉलर कर्ज काढलें. महाविद्यालयांत त्याला कॉलेजची देखभाल करण्याची नोकरी मिळाली. तें काम त्याला आवडत नव्हतें. कमींत कमी दिवस हें काम आपल्याला करावें लागावें असा त्याचा प्रयत्न सुरू झाला. पदवी संपादन करण्यासाठीं चार वर्षें खर्ची घालणें त्याला पसंत नव्हतें. कालाचा अपव्यय करण्याचा आतां त्याला वीट आला होता.

उच्च शिक्षणाबद्दल पूर्वी तुच्छता बाळगणारा तो तरुण आतां आधाश्या-प्रमाणें ज्ञान आत्मसात् करूं लागला. इतर विद्यार्थी निघून गेल्यानंतर तो एकटाच अभ्यास करी. अभ्यासाच्या पुस्तकाचें मोठ्यानें वाचन करी.

वर्गांत त्याचें एकट्याचेंच राज्य असे. तिथें तो वक्तृत्वकलेची तालीम घेत असे. द्वारपालकाचीं जीं कामें असत तीं इतर लोकांपेक्षा कमी वेळांत उरकण्याचें तंत्र तो शिकला. आणि त्यामुळें वांचलेल्या वेळाचा उपयोग महाविद्यालयाच्या अध्यक्षांचा चिटणीस म्हणून आणखी एक नोकरी करण्याकडे तो उपयोजूं लागला, उरणारा वेळ सतत अभ्यासाकडे लावूं लागला.

इतकें करूनहि त्याची सारी उत्साहशक्ति कांहीं संपत नव्हती. त्या वयांत तरुण मंडळी निरनिराळ्या खेळांमध्यें रस घेतात. लिंडन वादविवादांत आणि राजकारणांत रस घेऊं लागला. महाविद्यालयाचा प्रथम क्रमांकाचा वक्ता हें स्थान त्यानें संपादन केलें. विद्यार्थ्यांच्या राजकारणांत, व्यायामपटूंच्या वर्चस्वाखालीं असणाऱ्या 'ब्लॅक स्टार्स' नांव धारण करणाऱ्या गटाचें वर्चस्व होतें. ह्या गटाच्या हातून विद्यार्थी-राजकारणाचीं सूत्रें हिरावून घेण्यासाठीं त्यानें नवीन पक्ष संघटित केला. त्याचें नामकरण 'व्हाईट स्टार्स' असें करण्यांत आलें. ही संघटना म्हणजे विद्यार्थी-राजकारणांतील लिंडनचा पहिला विजय होय.

कॉलेजच्या वृत्तपत्राचें संपादन लिंडन करीत असे. अनेक बहिःशाल चळवळींतहि त्याचा पुढाकार होता. लिंडनला वक्तृत्वाचे धडे देणारा मार्गदर्शक आणि लिंडनच्या बरोबरीनें वादांत भाग घेणारा सहकारी ह्यांच्यासह त्याचें त्या काळांतलें काढलेलें एक छोटें छायाचित्र त्याच्या आजोळच्या चित्रसंग्रहांत आहे. तें चित्र पुसट झालेलें आहे. चित्रांत तो उंच, सडपातळ तरुण आपला छोटासा चेहेरा खालीं झुकवून मेजावरील कागदावर एकाग्रतेनें टांचणें लिहीत आहेसें दिसतें. कदाचित् लौकरच होणाऱ्या वादविवादांत करावयाच्या भाषणाचीं तीं टिपणें असतील. त्याचा चेहेरा अत्यंत गंभीर दिसत आहे.

अभ्यासाच्या दृष्टीनें लिंडनची श्रेणी उत्कृष्ट होती. आयुष्यभर साथ देतील असे अनेक मित्र त्यानें त्या काळांत जोडले.

लिंडन जॉन्सन ह्यांनीं साऊथवेस्ट टेक्सस टीचर्स कॉलेजांतील शिक्षणक्रम संपवून १९३० च्या ऑगस्टमध्यें पदवी संपादन केली. त्यावेळीं त्यांचें वय अवघें बावीस होतें. महाविद्यालयांत प्रविष्ट झाल्यापासून साडेतीन वर्षांच्या

कालावधींत त्यांनीं हें शिक्षण पुरें केलें होतें. महाविद्यालयीन शिक्षणाची पूर्वतयारी म्हणून असणारा तीन महिन्यांचा अभ्यासक्रम आणि महाविद्यालयाचा पूर्ण चार वर्षांचा अभ्यासक्रम असा सव्वाचार वर्षांचा अभ्यासक्रम त्यांनीं साडेतीन वर्षांत पुरा केला होता. शिवाय ह्याच कालावधींत आवश्यक ती पैशाची तरतूद करण्यासाठीं दक्षिण टेक्ससमधील एका छोटया गांवांत वर्षभर शिक्षकाची नोकरी त्यांनीं केली होती. म्हणजे साडेतीन वर्षांतून हें वर्ष वजा केलें पाहिजे.

पदवीधर बनल्यानंतर त्यांनीं ह्यूस्टन येथील एका विद्यालयांत जाहीर व्याख्यानें देणें आणि वक्तृत्वस्पर्धेत भाग घेणें ह्या गोष्टींचें शिक्षण देण्याचें काम पत्करलें. त्या विषयाची स्वतंत्र शाखा त्या विद्यालयांत होती. विद्यालयांत दक्षिण अमेरिकेंतून आलेले अनेक विद्यार्थी होते. इंग्लिशभाषी विद्यार्थ्यांबरोबर त्यांचे अनेकदां खटके उडत असत. त्यांच्यामधील मतभेद मिटविण्याची करामत हा तरुण शिक्षक करीत असे. सामोपचारानें एकत्र नांदण्याची प्रवृत्ति लोकांत बाणविण्याच्या कौशल्याचा उपयोग लिंडन जॉन्सन करीत असत. अशा उपयोगाच्या द्वारें त्यांनीं आपल्या ह्या कलेंत अधिकच प्रावीण्य संपादन केलें.

अध्यापनाची त्यांना आवड होती आणि ते शिकवीतहि असत चांगले. त्यांच्या मार्गदर्शनाखालीं तयार झालेल्या वक्त्यांनीं राज्य वादविवाद स्पर्धांमध्यें बक्षिसें पटकावलीं. ते विद्यार्थ्यांत लोकप्रिय होते. सहकारी शिक्षकांतहि लोकप्रिय होते.

तथापि राजकारणांत भाग घेण्याची घराण्याची परंपरा ते विसरूं शकत नव्हते. त्यांचें मन राजकारणाकडे सतत ओढ घेत असे. तशी संधि निर्माण होतांच त्यांनीं ती झटकन् पटकावली. १९३१ च्या उत्तरार्धांत अखेरीस टेक्ससमधील एका काँग्रेस-सदस्याचा चिटणीस म्हणून वॉशिंग्टनला जाण्याचा आलेला मोका त्यांनीं साधला. त्यानंतर आजवर ह्या ना त्या प्रकारें ते नेहमींच राजकारणांत वावरत आलेले आहेत.

□ □ □

# ३

वॉशिंग्टनच्या राजकीय रंगभूमीवरचा लिंडन जॉन्सन ह्यांचा हा प्रथम प्रवेश काँग्रेससदस्य रिचर्ड एम्. क्लेबर्ग ह्यांच्या छत्राखालीं झालेला होता. टेक्ससमधील ' किंग रँच 'चे अत्यंत समृद्ध आणि विशाल अशा पशुपालनाच्या वाडीचे क्लेबर्ग हे मालक होते. हे श्रीमान् गृहस्थ टेक्ससच्या दूरंपरेंतले एक मवाळ राजकारणी होते. १९३१ च्या नोव्हेंबरमध्यें झालेल्या जादा खास निवडणुकींत ते प्रतिनिधिसभेवर निवडून आले होते. क्लेबर्ग ह्यांच्या निवडणूक प्रचार मोहिमेंत जॉन्सन ह्यांनीं भाग घेतला होता. सभांमधून भाषणें केलीं होतीं. व्यक्तिशः मतदारांना भेटून प्रचार केला होता. हा चढाऊ वृत्तीचा तरुण, त्या श्रीमान् पशुपालकाच्या मनांत भरला होता.

राष्ट्राच्या राजधानींत त्या काळांत स्थित्यंतरें, घडामोडी ह्यांना नुसतें उधाण आलेलें होतें. तरुण, बुद्धिमान्, राजकारणी पिंड असणाऱ्या व्यक्तीच्या पष्टीनें तो अत्यंत मोक्याचा काळ होता. आणि विशेषतः तो तरुण डेमोक्रॅटिक पक्षाचा असल्यास फारच महत्त्वाचा होता तो काळ.

राष्ट्राध्यक्षपदावर हर्बर्ट हूवर हे होते. सेनेटमध्यें रिपब्लिकन पक्षाचेंच बहुमत अद्याप होतें. पण प्रतिनिधिसभेचीं सूत्रें मात्र, अल्पशा बहुमताच्या जोरावर का होईना डेमोक्रॅटिक पक्षाच्या हातीं होतीं. १९३२ च्या सार्वत्रिक निवडणुकींत हूवर ह्यांच्या सरकारचा संपूर्ण धुव्वा उडणार असें राजकीय निरीक्षक खात्रीनें धरून चाललेले होते. आपल्या पक्षाचें सरकार आल्यानंतर काय काय करावयाचें ह्याच्या मोठमोठ्या योजना डेमोक्रॅटिक पक्ष रचीत होता. राष्ट्राला ग्रासणाऱ्या भयंकर आर्थिक मंदीला पायबंद घालण्याचा प्रयत्न करण्यासाठीं केंद्र सरकारनें नव्या यंत्रणा केव्हांच उभारायला सुरुवात केली होती.

खळबळजनक कल्पना आणि अस्वस्थ, चेतलेले लोक ह्यांनीं भरलेलें तें वातावरण जॉन्सन ह्यांच्या पिंडाशीं अगदीं जुळणारें होतें. आपल्यासाठीं *योग्य स्थान वॉशिंग्टन हेंच आहे हें त्यांनी चटकन् हेरलें. वॉशिंग्टनमध्यें कायमचें ठाण मांडण्याच्या दिशेनें त्यांनीं जाणीवपूर्वक प्रयत्नांना हात घातला.*

त्या वेळी सेनेटर टॉम कोनॅली ह्यांचे चिटणीस असलेले आर्थर पेरी हे वॉशिंग्टनमध्यें मुरलेले गृहस्थ आहेत. कॉंग्रेसच्या कार्यपद्धतीचें त्यांना उत्कृष्ट आकलन झालेलें आहे. आपल्या आठवणी सांगतांना ते म्हणतात कीं, "कॉंग्रेसच्या परिसरांतील चिटणिशी कामांत मुरलेल्या लोकांना ह्या नवागतानें अगदीं प्रभावित करून टाकलें.

"डिक क्लेबर्ग लिंडनना आमच्या कचेरींत घेऊन आले त्या दिवसाची मला आठवण आहे. 'तुला जें जें माहीत आहे तें तें सर्व माझ्या नव्या चिटणिसाला शिकव आणि त्याला वॉशिंग्टनची माहिती करून दे' असें क्लेबर्ग ह्यांनीं मला सांगितलें. लिंडननीं माझें नांव माहीत होतांच प्रश्नांची सरबत्ती सुरू केली. भेटलेल्या प्रत्येक व्यक्तीला असेच प्रश्न विचारण्याचा त्यांनीं सपाटा लावला. शक्य तें सारें शिकण्याचा आणि तेंहि झपाट्यानें शिकून घेण्याचा त्यांचा निर्धार स्पष्ट होता."

आणि जॉन्सननीं खरोखरच द्रुतगतीनें सारें ज्ञान आत्मसात् केलें.

पेरी ह्यांनीं पुढें म्हटलें आहे, "त्यांना एखादी गोष्ट पुन: सांगण्याचा प्रसंग कधींच येत नसे. तो किरकोळ देहयष्टीचा तरुण अपेक्षेप्रमाणें अनभिज्ञ होता, पण थोड्याच महिन्यांत वॉशिंग्टनमधील कामांत तो तरबेज झाला. त्याच्या आधीं वीस-वीस वर्षे वॉशिंग्टनमध्यें राहिलेल्या कांहीं लोकांपेक्षांहि तो त्या कार्यपद्धतींत जास्त चांगला तरबेज झाला."

जॉन्सन, पेरी आणि कॉंग्रेस सदस्यांचे चिटणीस असणारे अन्य अनेक तरुण कॅपिटॉल हिलवरील डॉज हॉटेलांत वास्तव्याला असत. आपल्या कामाच्या स्थळापासून त्यांचं वास्तव्य शरीरानें आणि मनानेंहि फार दूर नव्हतें. जेव्हां प्रत्यक्ष काम करीत नसत तेव्हां आपल्या कामाबद्दलच ते विचार करीत असत किंवा आपसांत बोलत असत.

त्यांच्या वरिष्ठांप्रमाणेंच त्यांचींहि मतें भिन्नभिन्न होतीं. पण त्यांचीं मनें नवें जाणून घेण्याला आसुसलेलीं होतीं आणि ग्रहणशीलहि होतीं. जेवतांना

ते राजकीय प्रश्नांची चर्चा करीत असत; आपल्या कचेऱ्यांपासून कांहीं गल्ल्यांच्या अंतरावर असलेल्या त्या निवासगृहाकडे चालत जातांना, आपल्या म्हणण्याचें समर्थन करण्यासाठीं आणि दुसऱ्याचे मुद्दे खोडण्यासाठीं आवाज उंचावीत असत; अमेरिकन सरकारच्या परिस्थितीबद्दलचीं आपलीं ठाम मतें व्यक्त करण्यासाठीं रात्रीं एकमेकांच्या खोलींत गोळा होत असत.

जोरजोरानें हातवारे करीत आणि प्रक्षुब्ध आवाजांत बोलणाऱ्या गटांतच बहुधा लिंडन जॉन्सन हे सामील असलेले दिसत. जितकें बोलायचें तितकें ते पूर्ण बोलून घेत असत; पण त्याचबरोबर जास्तींत जास्त ऐकून घेण्याचेंहि काम करीत असत.

त्या काळच्या आठवणी सांगतांना आर्थर पेरी ह्यांनीं म्हटलें आहे, " दुपारच्या जेवणासाठीं आमच्यापैकीं कांहींजण उपाहारगृहांत जात असूं तेव्हां लिंडन हे आम्हा सर्वांच्या पुढें असत. चटकन् एक थाळी घेऊन, तींत हवे असलेले पदार्थ भरून ते घाईनें एखाद्या टेबलाशीं जात असत आणि खाद्यपदार्थांवर तुटून पडत असत. आम्ही बाकीचे लोक टेबलाजवळ येईपर्यंत त्यांचें खाणें संपलेलें असे. बहुधा, नव्हे नेहमींच असें घडत असे.

" त्यामुळें आमचें जेवण चालू असतांना आमच्यावर प्रश्नांचा भडिमार करण्यास ते मोकळे असत. प्रश्नांचीं उत्तरें पटलीं नाहींत तर वाद घालायला सुरुवात होई. त्यांच्यासारखा तुफान वादविवादपटु आम्ही अद्याप दुसरा बघितलेला नाहीं. वाद घालीत बसण्याचा त्यांचा उद्देश, आपल्या मुद्द्यांचीं सर्व संभाव्य उत्तरें शोधणें हा असे. हें सत्य फार उशिरां माझ्या ध्यानीं आलें. कोणत्याहि प्रश्नाचीं सर्व संभाव्य उत्तरें स्वतःला माहीत आहेत अशी खात्री करून घेण्याचा त्यांचा प्रयत्न असे. "

जॉन्सन ह्यांनीं अनेक मित्र जोडले. जॉन्सन देखणे होते. संगतिप्रिय होते. वादविवादांत ते प्रतिपक्षाची दाणादाण उडवीत, पण मैत्रीच्या संभाषणांत त्यांच्या बोलण्याची भुरळ पडल्याशिवाय राहात नसे. त्यांच्या वडिलांचे एक जुने दोस्त सॅम रेबर्न हे प्रतिनिधिसभेचे सभापति झाले. त्यांनीं जॉन्सनना आपल्या छत्राखालीं स्थान दिलें. पण, त्यामुळें 'कॅपिटॉल हिल'मधील त्यांनीं संपादिलेल्या स्वतंत्र स्थानाला कसलीहि बाधा झाली नाहीं.

काँग्रेससदस्यांच्या चिटणिसांची स्वतःची संघटना होती. तिचें नांव त्यांनीं 'छोटी काँग्रेस' असें ठेवलें होतें. वॉशिंग्टनला येऊन जॉन्सन ह्यांना फक्त एक वर्ष झालेलें असतांना कुणीतरी सहज सुचविलें कीं, त्यांनीं त्या छोटया काँग्रेसच्या सभापतिपदासाठीं उमेदवार म्हणून उभें राहावें. ही सूचना गंभीरपणें केलेली नव्हती. कारण खऱ्या काँग्रेसप्रमाणेंच ह्या काँग्रेस-मध्येंहि वडिलकीच्या क्रमानुसार पदाधिकारी निवडण्याची काटेकोर पद्धति अवलंबिली जात असे. खऱ्या काँग्रेसमध्यें नव्या सभासदांनीं ऐकावें आणि शिकावें, ही प्रथा जशी पाळली जाई तशीच प्रथा छोटया काँग्रेसमध्येंहि पाळली जात असे.

पण टेक्ससमधून आलेल्या ह्या नव्या चिटणिसानें वरील सूचना एक गंमत म्हणून मुळींच मानली नाहीं. जॉन्सन निवडणुकीला उभे राहिले आणि त्यांनीं ती जिंकली. विजय संपादण्यासाठीं त्यांनीं अगदीं साधा मार्ग अनुसरला होता. ज्यांनीं त्यापूर्वी छोटया काँग्रेसच्या कार्यांत कधींच लक्ष घातलें नव्हतें असे अनेक चिटणीस होते. कांहीं मित्रांच्या मदतीनें जॉन्सन ह्यांनीं त्या लोकांना सभासद करून घेतलें. स्वाभाविकपणेंच हे नवे सभासद लिंडन जॉन्सन ह्यांनाच सभापतिपदासाठीं पाठिंबा द्यायला वचनबद्ध होते. ह्या लोकांनीं जुन्या नेत्यांना पार जमीनदोस्त केलें.

राष्ट्राध्यक्ष रुझवेल्टपुरस्कृत 'न्यू डील' कार्यक्रमाची अंमलबजावणी वेगानें चालू होती. शासनविषयक नव्या कल्पना कार्यान्वित करण्याचे प्रयोग धडाक्यानें सुरू होते. त्या काळचें तें वॉशिंग्टनचें भारलेलें वातावरण जॉन्सन ह्यांना फारच आवडूं लागलें. इतर अनेक अमेरिकनांप्रमाणें, टेक्ससमधून आलेल्या ह्या तरुणालाहि फ्रँकलिन डेलॅनो रूझवेल्ट ह्यांच्यांत नवनेतृत्वाचा साक्षात्कार झाला. रोज सकाळीं न्याहारीपूर्वी सारें जग पालटून टाकण्याच्या गोष्टी करणाऱ्या लोकांच्या गराड्यांत जॉन्सन वावरत होते. त्यामुळें प्रयत्न करण्यापूर्वीच हातपाय गाळणाऱ्या 'रडतराउतां'बद्दल जॉन्सनना कायमची नावड वाटूं लागली. त्यांना स्पष्ट दिसत होतें कीं, अशा घाबरट जीवांना जें कदापि साध्य होऊं शकणार नाहीं असें वाटत होतें, तें प्रत्यक्षांत घडतें आहे.

७८ चारे ५१
१२-६० २८/१२/६४

त्या साऱ्या घटनांच्या धमालींत जॉन्सन ह्यांचें कार्य, एका कॉंग्रेस सभासदाच्या कचेरीच्या चौकटींत मर्यादित होतें. पण ते डिक क्लेबर्ग ह्यांच्या कचेरींत वेळेआधीं लौकर जात आणि उशिरापर्यंत काम करीत. कॉंग्रेस सभासदाच्या कचेरीचा कारभार चालविण्याबाबत जें जें शिकण्याजोगें होतें तें तें सारें त्यांनीं आत्मसात् केलें. आपल्या मतदार संघांतील लोकांच्या हिताच्या गोष्टी कशा घडवून आणाव्यात, सरकारी खात्यांकडून अपेक्षित कामें करवून घेण्यासाठीं काय करावें, आपल्या मतदार संघांतून नोकऱ्या मिळविण्यासाठीं आलेल्या लोकांना नोकऱ्या कशा मिळवून द्याव्यात आणि नोकऱ्या मिळविणें अशक्य ठरल्यासहि त्या लोकांच्या मनांतील आपल्या प्रतिनिधीबद्दलचा स्नेहभाव कायम राहावा म्हणून काय करावें, ह्या साऱ्या गोष्टी जॉन्सन त्या कचेरीच्या चार भिंतींत बसून शिकले.

कॉंग्रेसमध्यें प्रभावी आणि महत्त्वाच्या व्यक्ति कोण आहेत आणि त्यांनीं आपलें स्थान कसें मिळविलें, ह्याचेंहि ज्ञान जॉन्सन ह्यांनीं संपादन केलें. कॉंग्रेसमध्यें वडिलकीच्या क्रमानें वरचा क्रमांक मिळविण्याचें महत्त्व सभासदाच्या दृष्टीनें कां आहे, ह्या प्रश्नाचा उलगडा प्रत्यक्ष निरीक्षणांतून त्यांना झाला. सॅम रेबर्नसारख्या ज्ञानी आणि अनुभवी नेत्यापासून त्यांनीं धडे घेतले. आणि जातील तिथें प्रश्न विचारण्याचा त्यांचा सपाटा सतत चालू होताच.

जॉन्सन मधूनमधून आपल्या प्रांतांत—टेक्ससमध्यें—जाऊन येत असत. १९३४ च्या सप्टेंबरमध्यें ते ऑस्टिनला गेले असतां तिथें त्यांना एक मुलगी भेटली. तिला बघतांच त्यांच्या मनांत विवाहाचे विचार घुमले. त्या तरुणीचें नांव क्लॉडिया टेलर असें होतें. पण ती तान्हुली असतांना एका परिचारिकेनें तिचें टोपण नांव ‘लेडी बर्ड’ असें ठेवलें आणि पुढें तेंच नांव रूढ झालें. ही सुंदर, मोहक, तेजस्वी तरुणी पूर्व टेक्ससमधील एका सधन जमीनदार व्यापाऱ्याची मुलगी होती.

जॉन्सन ह्यांचें वैशिष्ट्य हें कीं ओळख होऊन कांहीं मिनिटें होतात न होतात तोंच त्यांनीं तिला ‘डेट’ची† सूचना केली. त्यांनीं मनाशीं निर्णय घेऊन टाकला होता, मग कालापव्यय करण्याची कांहीं जरूरी नाहीं अशी

---

† अनुनयाच्या हेतूनें होणाऱ्या भेटीगांठी, फिरायला जाणें वगैरे.

त्यांच्या मनाची धारणा होती. पण, त्या रात्रींच मार्शलला—स्वतःच्या गांवीं—तिला जायचें होतें त्यामुळें तिनें नकार दिला.

वॉशिंग्टनला आल्यावर जॉन्सननीं तिच्यावर तारा, दूरध्वनि, पत्रें ह्यांचा मारा करण्यास सुरुवात केली. पुन: त्यांना टेक्ससमध्यें जाणें शक्य व्हायला दोन महिन्यांचा कालावधि लोटावा लागला. अखेर त्यांना लेडी बर्डबरोबर 'डेट' मिळाली. त्यांनीं विवाहासाठीं तिचें मन वळविलें.

कांहीं वर्षांनंतर मनांत त्या आठवणी घोळवीत त्यांच्या पत्नीनें उद्‌गार काढले होते, "कित्येकदां लिंडन माणसाला श्वास घेण्याइतकीहि उसंत लाभूं देत नाहींत."

ता. १७ नोव्हेंबर १९३४ रोजीं त्या दोघांचा विवाह झाला. जोडपें मधु-चंद्रासाठीं मेक्सिकोकडे रवाना झालें. परत येऊन वॉशिंग्टनला बिऱ्हाड थाटल्यावर, झरझर बोलण्याची संवय असलेल्या त्या पुरुषाला साक्षात्कार झाला कीं, पत्नीच्या रूपानें आपल्याला दुहेरी ठेवा लाभला आहे. लिंडन जॉन्सन ह्या व्यक्तीला उत्तम अर्धांगी लाभली होती आणि ठायींठायीं भ्रमंती करणाऱ्या राजकारणी पुरुषाला आदर्श सहचरी मिळाली होती.

वॉशिंग्टनमध्यें बिऱ्हाड थाटून स्थिरस्थावर होण्याला थोडीशी उसंत मिळते न मिळते तोंच त्या जोडप्याला तिथून निघावें लागलें. १९३५ च्या ऑगस्टमध्यें, सत्ताविसाव्या वाढदिवसाला कांहीं थोडेच दिवस बाकी असतांना जॉन्सन ह्यांची नेमणूक नॅशनल यूथ ॲडमिनिस्ट्रेशनचे टेक्सस राज्याचे प्रशासक म्हणून झाली.

'न्यू डील' कार्यक्रमांत नॅशनल यूथ ॲडमिनिस्ट्रेशनला महत्त्वाचें स्थान होतें. ह्या कार्यक्रमाचा उद्देश साधा पण प्रशंसनीय होता. रस्त्यांच्या कोपऱ्यांवर रिकामटेकडेपणानें रेंगाळणाऱ्या आणि रस्तोरस्तीं भटकणाऱ्या तरुणांना कामाला जुंपणें हा त्याचा उद्देश होता—मग तें काम शिक्षणाचें असेल किंवा रोजगार मिळविण्याचें असेल. त्या तीव्र मंदीच्या काळांत हजारों तरुण मुलें रिकामीं बसून होतीं. त्यांना पुढील कांहींच आशा दिसत नव्हती; अशीं मुलें म्हणजे युनायटेड स्टेट्‌स्‌च्या भवितव्याच्या दृष्टीनें आशास्थानाऐवजीं धोकाच ठरण्याची भीति होती.

[illegible] 92६६० [illegible] २८।१२।६४

वॉशिंग्टनला आल्यापासून जॉन्सन ह्यांनीं आपल्या भूतपूर्व विद्यार्थ्यांना आणि महाविद्यालयांतील सहाध्यायांना साह्य करण्याचे प्रयत्न खूपच केले होते. त्यांच्यापैकीं कित्येकांना राजधानींत नोकऱ्या मिळवून देण्याची त्यांनीं व्यवस्था केली होती. त्याचप्रमाणें टेक्ससमध्येंच उच्च शिक्षण घेतां यावें म्हणून कांहीं जणांना स्थानिक नोकऱ्याहि मिळवून दिल्या होत्या. ते तरुणांचे जन्मजात नेते होते.

नॅशनल यूथ ॲडमिनिस्ट्रेशनमध्यें नेमण्यांत आलेल्या देशांतील साऱ्या प्रशासकांत जॉन्सन हे सर्वांत तरुण होते. आणि सर्वांत उत्कृष्ट प्रशासक ठरण्याचा त्यांचा निर्धार होता. आपल्या नव्या कामगिरीवर रुजू होण्यासाठीं ते ऑस्टिनच्या विमानतळावर विमानांतून उतरले तेव्हां भेटलेल्या पत्रकारांपाशीं त्यांनीं उद्गार काढले, " माझ्या दृष्टीनें ही कामगिरी म्हणजे मी स्वत: बेकार होण्याचा (तरुणांना कामें मिळून प्रशासकाची आवश्यकताच न राहाण्याचा) कसून प्रयत्न करणें होय. "

त्यांच्या कार्यामुळें राष्ट्रभर लाभावयाच्या लौकिकाची पहिली झलक त्यांना अनुभवण्यास मिळाली. टेक्ससमध्यें त्यांनीं उभारलेल्या संघटनेचा आदर्श पुढें ठेवून कित्येक राज्यांतल्या संघटना उभारल्या गेल्या. क्रीडांगणें तयार करणें, राजरस्त्यांलगत उद्यानें वसविणें, जमिनीची धूप थांबविणें, अशीं अनेक प्रकारचीं कामें त्यांनीं हजारों तरुणांना मिळवून देऊन रोजगाराला लावलें. खाजगी मालकांकडे बेकार तरुणतरुणींची शिफारस करून अनेकांना नोकऱ्या मिळवून दिल्या. नॅशनल यूथ ॲडमिनिस्ट्रेशनच्या वतीनें महाविद्यालयांना मिळणाऱ्या पैशाचा योग्य विनियोग व्हावा, लायक आणि गरजू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण पुरें करतां येईल ह्या दृष्टीनेंच परिणामकारक रीतीनें तो पैसा खर्चिला जावा, ही गोष्ट महाविद्यालयांच्या चालकवर्गाच्या मनावर त्यांनीं बिंबविली.

टेक्ससमधील सुमारें तीस हजार तरुण-तरुणींच्या जीवनाला नॅशनल यूथ ॲडमिनिस्ट्रेशननें वळण लावलें. ह्यापैकीं अठरा हजार मुलामुलींना माध्यमिक आणि उच्च शिक्षण पूर्ण करण्याची संधि ह्या कार्यक्रमामुळें लाभली. बाकीच्या बारा हजारांना संघटनेमार्फत ह्या ना त्या प्रकारच्या नोकऱ्या मिळाल्या.

ह्या कार्याविषयीं पुढें केव्हां तरी बोलतांना जॉन्सन म्हणाले, "आम्ही केंद्रें स्थापन केल्यानंतर, तिथें हीं मुलें येऊं लागलीं. दुर्दैवाला आणि परिस्थितीला शिव्याशाप देत तीं येत होतीं. त्यांना रोजगाराला वंचित करणाऱ्या आणि रोजगाराची आशाहि नष्ट करणाऱ्या आर्थिक संकटाखालीं तीं मुलें पिचून निघालेलीं असत. पण आमच्यापाशीं आल्यानंतर, त्यांच्या कपाळावरच्या आठ्या जाऊन चेहेऱ्यावर स्मित झळकू लागत असे.

"कार्याला सुरुवात झाल्यानंतर पहिले कांहीं दिवस मी रोज सकाळीं सर्वांच्या आधीं कामाच्या जागेवर दाखल होण्याचा प्रयत्न करीत असें. पण माझ्या ध्यानांत आलें कीं, कामावर सर्वांआधीं कोण येतो ह्याच्या स्पर्धेलाच जणु मी चालना दिली होती. कामावर येण्याची उत्कंठा माझ्याइतकीच त्यांनाहि असल्याचें आढळून आलें. केवळ संधीच्या अभावींच आपण अगतिक आहों हें माझ्या नजरेस आणून देण्याची त्यांची धडपड होती. आणि त्यांना संधि उपलब्ध करून देण्यासाठीं माझी धडपड होती.

"कामाच्या संवयीबरोबर कौशल्य-कारागिरी वाढत गेली. कारागिरींत तरबेज झालेल्यांना संधि मिळू लागली. रूझवेल्ट ह्यांच्या सरकारनें इतर कांहीहि कार्य केलें नसतें तरी तरुणांच्या विमोचनासाठीं स्थापलेल्या ह्या एकाच संघटनेच्या कार्यामुळें त्या सरकारचें अस्तित्व समर्थनीय ठरलें असतें."

आपल्या कामगिरीकडे बघण्याची जॉन्सन ह्यांची अशी भूमिका असल्यामुळेंच नॅशनल यूथ ॲडमिनिस्ट्रेशनच्या मुख्य संचालकाकडून त्यांना गौरवपर शिफारसपत्र मिळालें. ह्या टेक्ससनिवासी तरुणानें कोणत्याहि राज्य-प्रशासकापेक्षां उत्कृष्ट कामगिरी बजावली, असे उद्गार त्या संचालकानें काढले.

स्वाभाविकच आपल्या ह्या कामांत जॉन्सन ह्यांना व्यक्तिशः अमाप समाधान लाभलें. टेक्ससमधील तरुणवर्गासाठीं कांहीं तरी करण्याची आंतरिक इच्छा, शिक्षकी पेशानें आयुष्याची सुरुवात केल्यापासूनच जॉन्सन ह्यांना होती. आपण करीत असलेल्या कार्यावर श्रद्धा असणारा तो पुरुष आहे.

नॅशनल यूथ ॲडमिनिस्ट्रेशनमध्यें हें काम करून जॉन्सन ह्यांनीं आणखीहि एक अमाप फायदा पदरांत पाडून घेतला. त्या कामामुळें, त्यांनीं स्वतःचें

राजकीय सामर्थ्य उभारण्यासाठीं लागणारा भक्कम आणि टिकाऊ पाया तयार करून ठेवला.

असेंच घडणें अपरिहार्य होतें. नॅशनल यूथ ॲडमिनिस्ट्रेशनच्या राज्य-प्रशासकाच्या पदावर आरूढ होऊन वर्षहि झालें नाहीं तोंच, टेक्ससमधील हजारों तरुण 'लिन' ह्या जवळिकीच्या नांवानें जॉन्सन ह्यांना संबोधूं लागले. आपल्या आर्थिक विमोचनाला व्यक्तिशः जॉन्सन हेच कारण आहेत, अशी त्या तरुणांची भावना झाली. जनतेविषयीं जिव्हाळा असणाऱ्या माणसाच्या दृष्टीनें हें श्रेय कांहीं कमी नव्हतें; पण राजकारणांत संधि प्राप्त करून घेण्यासाठीं जाणीवपूर्वक प्रयत्न करणाऱ्या व्यक्तीच्या दृष्टीनें तर हा मोठाच फायदा होता.

आणि ती संधि १९३७ सालीं आली. टेक्ससच्या मध्य भागांतील प्रतिनिधिसभेच्या मतदार संघाचे प्रतिनिधि जेम्स पी. ब्युकॅनन हे वारले. त्यांच्या जागीं निवडावयाच्या नव्या प्रतिनिधीच्या निवडणुकीसाठीं खास निवडणूक होणार होती. प्रतिनिधि अचानक मृत झाल्यास त्याच्या जागेसाठीं होणाऱ्या निवडणुकींत नोंदलेल्या सर्व मतांत बहुमत मिळालें तरच तो प्रतिनिधि विजयी ठरेल असें नेहमींचें बंधन नसतें. उमेदवार कितीहि उभे राहोत, सर्वांत जास्त मतें ज्याला मिळतील तो विजयी ठरतो.

ह्या निवडणुकीला उभें राहाण्यासाठीं जॉन्सन ह्यांनीं नॅशनल यूथ ॲडमिनिस्ट्रेशनमधील आपल्या जागेचा राजीनामा दिला. ह्या निवडणुकी-साठीं आणखी नऊ उमेदवार उभे होते. त्यांच्यापैकीं कांहींजण तर जॉन्सन ह्यांच्यापेक्षां किती तरी लोकप्रसिद्ध होते प्रचारासाठीं पैसाहि त्यांच्यापाशीं जास्त होता. 'न्यू डील' वर नाखूष असणाऱ्या स्थितिवादी राजकीय नेत्यांचा त्या उमेदवारांनाच पाठिंबा होता. जॉन्सन ह्यांनीं उमेदवारी जाहीर केल्यावर वृत्तपत्रांतून जी प्रतिक्रिया व्यक्त झाली ती बघतां, त्यांच्या उमेदवारीची गंभीर दखल कोणीच घेतलेली नाहीं, विरोधक म्हणून त्यांचें महत्त्व कोणालाच वाटत नाहीं, असेंच दिसून आलें.

ह्या तरुण उमेदवाराच्या प्रचाराचीं सूत्रें अत्यंत साधींसुधीं असत. प्रत्येक अमेरिकन नागरिकाला योग्य राहणीमान लाभलें पाहिजे. शेतकरी आणि पशुपालक ह्यांना अन्य व्यावसायिक वर्गाच्या बरोबरीनें समान संधि मिळाली

पाहिजे. कामगारांना काम मिळण्याचा हक्क आहे आणि त्याचबरोबर व्यापार-उद्योगाला साह्यभूत होणारें आणि त्याच्या विकासाला प्रेरणा देणारें भक्कम राष्ट्रीय धोरण पाहिजे. ह्या आणि अशा साध्या सूत्रांत जॉन्सन आपली भूमिका निवडणूक प्रचाराच्या व्यासपीठावरून मांडीत असत.

ही प्रचारपद्धति तशी ठीक असली तरी जॉन्सन ह्यांना स्पष्ट कल्पना होती कीं, तेवढ्यानें विजयाची हमी मिळूं शकणार नाहीं. आपल्या प्रचाराला नाट्यमय स्वरूप आलें पाहिजे, सर्वांच्या तोंडीं आपण चर्चेचा विषय झालें पाहिजे. तसें घडण्यासाठीं कांहीं तरी केलें पाहिजे असें त्यांना वाटूं लागलें.

त्याच सुमारास, रूझवेल्ट ह्यांनीं वरिष्ठ न्यायालयाबद्दलचें आपलें नवें धोरण घोषित केलें होतें. ह्या धोरणावर वादाचें प्रचंड वादळ उठलें. परखड भाषेंत आपलीं मतें व्यक्त करण्याची संवय असलेल्या टेक्ससमधील लोकां-पैकी अनेकजण ह्या धोरणाला विरोध करण्यासाठीं उभे ठाकले. वृत्तपत्रें आणि संस्थाहि आपलीं विरोधी मतें कडक भाषेंत व्यक्त करूं लागल्या. जॉन्सन ह्यांनीं 'न्यू डील'प्रमाणेंच रूझवेल्ट ह्यांच्या न्यायालयविषयक योज-नेला आपला पाठिंबा जाहीर केला.

ज्या ठिकाणीं जॉन्सन ह्यांचा महाविद्यालयीन उच्च शिक्षणाचा काळ व्यतीत झाला त्या सान मार्कस येथील प्रचाराच्या पहिल्याच सभेंत त्यांनीं केलेल्या आव्हानपर आणि आवाहनपर भाषणांत त्यांनीं लोकांना बजावलें,

"सामान्य माणसाच्या जीवनांत सुधारणा व्हावी असें ह्या जिल्ह्यांतील जनतेला वाटत असेल तर मी तुमचा प्रतिनिधि म्हणून काँग्रेसमध्यें जाऊं इच्छितों. सरकारची सूत्रें पैसेवाल्यांच्या हातीं न राहातां लोकांना तीं सूत्रें स्वतःच्या हातीं राहावींत असें वाटत असेल, ह्या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्ना-वर तुम्ही रूझवेल्टना पाठिंबा देऊं इच्छित असाल तर मला निवडून द्या.

"पण, ह्या जिल्ह्यांतील लोकांना रूझवेल्ट ह्यांना पाठिंबा द्यावयाचा नसेल तर त्यांनीं कोणाहि वकिलाला – किंवा कायदेमंडळावर दडपण आणण्यासाठी पडद्याआडून सूत्रें हलविणाऱ्या उमेदवाराला निवडून दिलें तरी माझी तक्रार नाहीं."

त्या जिल्ह्यावर साऱ्या राष्ट्राचें लक्ष कसें केंद्रित झालेलें आहे, जिल्ह्यां-तील लोक जो निर्णय घेतील त्याचा राष्ट्रीय दृष्ट्या कसा अत्यंत गंभीर

आणि दूरगामी परिणाम होणार आहे ह्याची स्पष्ट जाणीवहि त्यांनीं कौशल्यानें आपल्या मतदारांना करून दिली.

आपल्या भाषणांत जॉन्सन ह्यांनीं मतदारांना आणवी बजावलें, " डेमोक्रॅटिक पक्षाकडे कल असणाऱ्या राज्याच्या मध्यवर्ति मतदार संघांतून कॉंग्रेससाठीं होणारी ही निवडणूक आहे. ह्या निवडणुकीचें महत्त्व इतकें आहे कीं, साऱ्या राष्ट्राचे डोळे तिच्यावर केंद्रित झालेले आहेत. ज्या राष्ट्रीय प्रश्नावर तुम्ही मतदान करणार आहांत त्या प्रश्नावर साऱ्या राष्ट्रांतील जनतेचें लक्ष केंद्रित झालेलें आहे. "

ह्या प्रचाराच्या भाषणाचा तात्कालिक परिणाम जॉन्सन ह्यांनीं अपेक्षिला होता तसाच झाला. न्यायालयविषयक योजनेला विरोध जाहीर करणाऱ्या उमेदवारांनीं आपल्या तोफा जॉन्सन ह्यांच्यावर रोखल्या. सर्वच विरोधी उमेदवारांच्या प्रचारांत टीकेसाठीं का होईना पण जॉन्सन ह्यांच्या नांवाचा सतत उल्लेख होऊं लागल्यामुळें इतर कोणत्याहि उमेदवारापेक्षां त्यांनाच जास्त प्रसिद्धी मिळूं लागली. सर्वच उमेदवार अत्यंत जळजळीत भाषेंत आपली पुराणप्रिय स्थितिवादी भूमिका मांडूं लागल्यामुळें 'न्यू डील'-ला निश्चित पाठिंबा असणाऱ्या मतदारांबरोबरच कमीअधिक अनुकूल कल असणारे मतदारहि जॉन्सन ह्यांच्या बाजूला वळूं लागले.

ह्याबरोबरच, जॉन्सन इतर कोणाहि उमेदवारापेक्षां अधिक कसून प्रचार करीत होते. कॉंग्रेसच्या त्या दहाव्या मतदार संघांतील दहाहि परगण्यांतील गांवागांवामधून आणि खेड्यापाड्यांतून त्यांची किडकिडीत अंगलट असलेली मूर्ति सतत भ्रमंती करीत होती. त्यांच्या प्रचाराची मोहीम अहोरात्र चालू होती. त्यांच्या बरोबरीनेंच लेडी बर्ड– त्यांची पत्नी– ही सुद्धा प्रचारांतला वांटा उचलीत होती. नॅशनल यूथ ॲडमिनिस्ट्रेशनतर्फे काम करीत असतांना त्यांनीं जे उत्साही तरुण मित्र जोडले होते तेहि त्यांच्या बाजूनें प्रचार करीत होते. त्या तरुणांच्या कुटुंबांचा आणि त्या कुटुंबांशीं घरोबा असणाऱ्या लोकांचाहि त्यांना पाठिंबा मिळत होता.

ह्या तरुण उमेदवाराला पाठिंबा द्या, मदत करा अशी विनंती करणारीं पत्रें जॉन्सन ह्यांचे पुरस्कर्ते आपल्या इष्टमित्रांना लिहूं लागले, भेटून विनंती करूं लागले. त्यामुळें जिल्ह्यांतील असंख्य लोक त्यांना कॉंग्रेसवर

निवडून देण्यासाठीं धडपडूं लागले. अशा प्रकारचा संघटित पाठिंबा त्यांना भावी राजकीय जीवनांतील चढाओढीच्या राजकारणांत उपयुक्त होणार होता.

निवडणुकीच्या दोनच दिवस आधीं ह्या तरुण उमेदवाराला ऑस्टिन येथील रुग्णालयांत दाखल होणें भाग पडलें. अॅपेंडिक्सची शल्यक्रिया तांतडीनें करण्याची आवश्यकता होती. ते रुग्णालयांतील शय्येवर पडून असतांनाच ता. १० एप्रिलच्या रात्रीं निवडणुकीचा निकाल हातीं आला.

दुसऱ्या क्रमांकाच्या उमेदवाराच्या दुपटीपेक्षां जास्त मतें मिळून जॉन्सन निवडून आले.

निवडणुकीच्या निकालाच्या दुसऱ्याच दिवशीं काढलेल्या पत्रकांत जॉन्सन ह्यांनीं म्हटलें होतें, " काँग्रेसमध्यें प्रतिनिधि म्हणून मी प्रथमच जात आहें. ह्या पहिल्या खेपेस वारंवार उठून भाषणें करण्याचा सपाटा चालू ठेवण्याचा माझा इरादा आहे. मी जग उलथेंपालथें करूं शकेन असें नव्हे; आणि प्रतिनिधि म्हणून काँग्रेसमध्यें गेल्यावरोबर युनायटेड स्टेट्स्चें स्वरूप पार बदलून टाकण्यास मी समर्थ आहें असेंहि मला वाटत नाहीं. "

◇ ◇ ◇

# ४

कॉंग्रेसमध्यें प्रविष्ट झालेल्या ह्या नवागतानें राष्ट्राध्यक्ष फ्रॅंकलिन डी. रूझवेल्ट ह्यांच्या सदिच्छेच्या उबेंत आपल्या नव्या कारकीर्दीची सुरुवात केली.

जॉन्सन ह्यांनीं निवडणुकींत विजय संपादिला त्याच सुमारास राष्ट्राध्यक्ष मेक्सिकोच्या आखातांत जलपर्यटन करीत होते. ज्या राज्यांत डेमोक्रॅटिक पक्षाच्या गोटांतदेखील 'न्यू डील' कार्यक्रमाविरुद्ध कुरकूर चालू होती त्या राज्यांत जॉन्सन ह्यांनीं 'न्यू डील'चा झेंडा फडकवीत विजय मिळविलेला होता. अशा तरुणाशीं वातचीत करण्याची आपली इच्छा राष्ट्राध्यक्षांनीं व्यक्त केली.

राष्ट्राध्यक्षांची नौका गाल्व्हेस्टन बंदरांत नांगरण्यांत आली असतांना जॉन्सन ह्यांना त्या नौकेवर नेण्यांत आलें. त्यांचे जिव्हाळ्याचे निकटवर्ति मित्र टेक्ससचे राज्यपाल जेम्स व्ही. ऑलरेड ह्यांनीं जॉन्सन ह्यांची राष्ट्राध्यक्षांशीं ओळख करून दिली. (योगायोग वा कांहीं कारण असो, पण जॉन्सन आणि ऑलरेड ह्या दोघांनींहि आपल्या कोटांवर हवाई ऑर्चिडचीं फुलें खोवलेलीं होतीं.) राष्ट्राध्यक्षांच्या खास आगगाडींतून आपल्यासमवेत टेक्ससचा प्रवास करण्याचें निमंत्रण रूझवेल्ट ह्यांनीं जॉन्सन ह्यांना दिलें. त्या प्रवासांत जॉन्सननीं, आपण निवडणूक प्रचार कशा प्रकारें केला, त्याची माहिती राष्ट्राध्यक्षांना सांगितली. त्यांच्या मतदार संघांत दोन मोठ्या धरण योजना अपुऱ्या राहिलेल्या होत्या, त्या पुऱ्या करण्याचें महत्त्व आपल्या विशिष्ट पद्धतीनें मोजक्या शब्दांत त्यांनीं राष्ट्राध्यक्षांच्या ध्यानीं आणून दिलें. आणि मनाशीं कोणत्याहि प्रकारें आढेवेढे न घेतां त्यांनीं रूझवेल्ट ह्यांच्या मोहक व्यक्तित्वाचा प्रभाव स्वतःवर पडूं दिला.

कांहीं वर्षांनीं ह्याबाबत एका मित्राशीं बोलतांना जॉन्सन म्हणाले, " ते थोर पुरुष होते आणि ही गोष्ट त्यांच्या सान्निध्यांत आल्यावर कांहीं क्षणांतच माणसाच्या मनावर बिंबत असे. त्यांना जें करावेंसें वाटतें तेंच करण्याची तुमचीहि इच्छा आहे अशी भावना ते माणसाच्या मनांत निर्माण करीत असतात आणि मी पाहिलेल्या कोणाहि व्यक्तीपेक्षां त्यांची बुद्धि अत्यंत तल्लख होती. संभाषणांत, त्यांच्या विचारांबरोबर धांवणें फार कठीण जाई. कारण तुमचा मुद्दा आत्मसात् करून ते झटकन् पुढील विचाराला हात घालीत असत."

अर्थात् स्वत: जॉन्सन ह्यांच्या व्यक्तित्वाचा ठसाहि राष्ट्राध्यक्षांच्या मनावर उमटला. काँग्रेसमध्यें आरमारी प्रश्नांच्या बाबतींत, 'तुमचा चांगला उपयोग होऊं शकेल' असे सूचक उद्गार त्यांना निरोप देतां देतां राष्ट्राध्यक्षांनीं काढले. अर्थात्, आरमार हा राष्ट्राध्यक्ष रुझवेल्ट ह्यांचा मुख्य लाडका विषय होता. आणि त्या विषयांत रस घेण्यासाठीं काँग्रेस सभासदांचे मन वळविण्याची संधि ते नेहमींच हुडकीत असत.

आगगाडीचा प्रवास संपला होता. राष्ट्राध्यक्षांनीं त्या काँग्रेसच्या नव्या तरुण सभासदाला म्हटलें, "हा फोन नंबर घ्या. वॉशिंग्टनला आल्यावर ह्या नंबरवर फोन करून टॉमशीं बोला. आपलें काय बोलणें झालें तें त्याला सांगा."

टॉम म्हणजे टॉम कोर्कोरान. 'न्यू डील' कार्यक्रमाच्या प्रारंभींच्या कालखंडांत एक प्रभावी व्यक्ति म्हणून ते सुविख्यात झालेले होते. त्यांच्या उत्साहीपणामुळें त्यांना 'टॉमी द कॉर्क' म्हणत. वॉशिंग्टनला येतांच मुळींच वेळ न घालवितां जॉन्सन ह्यांनीं त्यांना फोन केला.

काँग्रेसचे सभासद म्हणून ता. १४ मे १९३७ रोजीं जॉन्सन ह्यांच्याकडून सभापति विल्यम बी. बँकहेड ह्यांनीं शपथ घेवविली. त्यानंतर थोड्याच दिवसांनीं, जॉन्सन सभागृहांत पिछाडीस उभे असतांना प्रतिनिधिसभेंतील एक वडे पुढारी कार्ल व्हिन्सन हे जॉन्सन ह्यांच्यापाशीं आले. जॉर्जियाचे हे नेते नेव्हल अफेअर्स कमिटी ह्या प्रभावी यंत्रणेचे अध्यक्ष होते.

विशिष्ट पद्धतीनें हेल काढून बोलत ते म्हणाले, " तरुण दोस्ता, एक झकास खाना आणि झक्क गप्पागोष्टी यांबद्दल मी तुझा ऋणी आहें."

जॉन्सन त्यांच्याकडे आश्चर्यानें बघतच राहिले.

व्हिन्सन पुढें म्हणाले, "मला व्हाईट हाऊसमध्यें भोजनाचें निमंत्रण होतें. राष्ट्राध्यक्षांनीं नेहमींप्रमाणेंच उत्तम पाहुणचार केला. मला त्यांनीं कां बोलावलें असेल हें कांहींच मला आकलन होईना. पण त्यांना कांहीं तरी बोलायचें आहे हें मी ओळखलें होतें. अखेर ते—अगदीं सहजपणें मला म्हणाले, 'कार्ल, एक छान तरुण काँग्रेसमध्यें नुकताच आलेला आहे. आरमारी प्रश्नांत त्याचा खूप उपयोग होईल असें मला वाटतें.' ते अर्थात् कमिटीबद्दल बोलत होते."

ते दोघे त्या ठिकाणीं अद्याप उभे होते. त्या पुढाऱ्याच्या बोलण्याचा पूर्ण अर्थ त्या 'छान तरुणाच्या' अद्याप ध्यानीं यायचा होता, तोंच ध्वनिक्षेपका-वरून सभागृहाच्या शिरस्तेदाराचा घोगरा आवाज ऐकूं आला. 'टेक्ससचे जॉन्सन ह्यांची नेमणूक नेव्हल अफेअर्स कमिटीवर करण्यांत आली आहे,' अशी घोषणा त्यानें केली. अशा पदावर नव्या सभासदाची नेमणूक सहसा केली जात नाहीं. जॉन्सन ह्यांच्या 'व्हाईट हाऊसमधील मित्रानें' त्यांच्यावर अनेकदां केलेल्या मेहेरबानीचें हें पहिलें उदाहरण होतें.

राष्ट्राध्यक्षांनीं आपल्याविषयीं दाखविलेल्या आस्थेबद्दल जॉन्सन ह्यांना कृतज्ञता वाटत होती. रूझवेल्ट हे एक थोर पुरुष आहेत ही त्यांची श्रद्धाहि दृढ होती. पण सरकारी ठरावांवर संमतीचा शिक्कामोर्तब यांत्रिकपणें करणारा रवरी शिक्का आपण नव्हे हें त्या नव्या काँग्रेस सदस्यानें लौकरच दाखवून दिलें. ते स्वतःच्या बुद्धीनें चालणारे आहेत. एखाद्या आकर्षक व्यक्तित्वाला भुलून, मग तें व्यक्तित्व कितीहि प्रभावी असो, जॉन्सन हे आपल्या तत्त्वा-पासून कधींहि विचलित होत नाहींत.

जॉन्सन प्रतिनिधिसभेंत सभासद म्हणून बसूं लागल्यानंतर थोड्याच दिवसांत तसा प्रसंग आला. शेतकऱ्यांना मध्यवर्ति सरकारकडून मिळणाऱ्या कर्जांवर व्याजाचा दर कमी ठेवलेला होता. ही सवलत आणखी वर्षभर चालू ठेवण्यासंबंधींचें विधेयक सभागृहापुढें होतें. तें विधेयक धुडकावण्याचा आदेश राष्ट्राध्यक्षांकडून आलेला होता. तो आदेश सभागृहापुढें विचारार्थ आलेला होता. चालू अधिवेशनाच्या प्रारंभींच, सॅम रेबर्न ह्यांची बहुमतवाल्या पक्षाचे नेते म्हणून निवड झालेली होती. त्यांनीं, राष्ट्राध्यक्षांचा धुडकावणीचा आदेश

सभागृहानें मंजूर करावा अशी सूचना मांडली होती. पण पक्षनेत्याच्या ह्या आदेशाची तमा न बाळगतां शेतकऱ्यांची ती सवलत चालू ठेवण्याची मागणी करणाऱ्या विधेयकाच्या बाजूनें जॉन्सन ह्यांनीं मत नोंदलें.

तसें करणें ही साधीसुधी गोष्ट नव्हती. राष्ट्राध्यक्ष हे त्यांच्याबद्दल जिव्हाळा बाळगणारे आणि रेबर्न हे तर त्यांचे राजकीय मार्गदर्शक, त्या दोघांच्या मर्जीविरुद्ध जाण्याचा तो प्रश्न होता. पण, जॉन्सन ह्यांची त्या प्रश्नाबाबतची विचारसरणी तर्कशुद्ध होती. व्याजाचा माफक दर सर्वच शेतकऱ्यांच्या दृष्टीनें आवश्यक आहे आणि विशेषतः आपल्या जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या दृष्टीनें तर फारच आवश्यक आहे असें त्यांचें ठाम मत होतें.

जॉन्सन ह्यांच्या विचारांमध्यें टेक्ससच्या त्या दहाव्या मतदार संघाला सर्वप्रथम स्थान होतें. त्या जिल्ह्याचे आपण सेवक आहोंत, प्रतिनिधिसभेंत त्या जिल्ह्याच्या हितसंबंधांच्या रक्षणार्थ प्रयत्न करणें हें आपलें कर्तव्य आहे अशी त्यांची भावना होती. आणि व्यावहारिक राजकारणाच्या दृष्टीनें सुद्धां त्या जिल्ह्यासाठीं जेवढें करतां येईल तेवढें करणेंच समंजसपणाचें होतें.

आणि पुढील घटना बघतां, जॉन्सन आपल्या त्या मतदार संघासाठीं पुष्कळ कांहीं करूं शकले.

सभासदत्वाच्या दोन वर्षांच्या कालावधींत, इतर कोणाहि सभासदाला आपल्या मतदार संघासाठीं मंजूर करून घेतां आल्या असतील, त्यापेक्षां किती तरी जास्त योजना जॉन्सन ह्यांनीं आपल्या मतदार संघासाठीं मंजूर करून घेतल्या.

त्यांची पहिली कामगिरी म्हणजे, कोलोरॅडो नदीच्या खालच्या पात्राच्या विकासाची लक्षावधि डॉलरची योजना मंजूर करवून घेणें, ही होय. पूर-नियंत्रण करून कोलोरॅडो नदीच्या पाण्याचा विकासासाठीं उपयोग झाला पाहिजे, शेतकऱ्यांना स्वस्त दरांत वीज उपलब्ध झाली पाहिजे असें त्यांचें ठाम मत होतें आणि हा उद्देश साधण्याचा त्यांचा निर्धार होता.

खाजगी वीज कंपन्यांचा कंपू, हें 'न्यू डील' कार्यक्रमाचें हल्ल्याचें आवडतें लक्ष्य होतें. ह्या कंपूविरुद्धच्या लढ्यांत जॉन्सननीं तनमनानें उडी घेतली. ग्रामीण विद्युतीकरण खात्याच्या संस्थापनेच्या कल्पनेचा त्यांनीं हिरीरीनें पुरस्कार केला.

त्यांचा मुद्दा असा कीं, "शेतकऱ्याचें उत्पन्न खालच्या पातळीवर आहे; तें योग्य पातळीवर आणणें अत्यावश्यक आहे. आणि तसें आपल्याला करायचें असेल तर शेतकऱ्यांना माफक दरांत वीज उपलब्ध झाली पाहिजे; तसें होऊं नये असें म्हणण्यामागें कसलाहि तर्कशुद्ध विचार असूं शकणार नाहीं. शेतकऱ्यांना शेतकामांत विजेची गरज आहे. स्वतःचीं घरें अधिक सुखसोयींनीं रहातां येईल अशीं बनविण्याची त्यांना गरज आहे. शहरवासियांना उपलब्ध असणारी संधि शेतकऱ्यालाहि मिळाली पाहिजे."

काँग्रेस-सभासद झालेल्या जॉन्सनना, आपल्या बालपणींच्या शेतवाडीवरील जीवनाचा विसर पडलेला नव्हता. त्या वेळीं घरांत घासलेटचे दिवे वापरावे लागत असत. त्यांच्या आईला हातानें कपडे धुवावे लागत आणि त्यांचे भाऊ हातांनींच विहिरींतून पाणी खेंचीत असत. ह्या संदर्भात त्यांनीं उद्गार काढले, "विजेपुरतें बोलायचें तर माझ्या आजोबांच्या वेळीं आमच्या शेतवाडीवरील व घरांतील जें जीवन होतें त्यापेक्षां चांगलें जीवन आज आम्हांला लाभलें आहे असें मुळींच म्हणतां येणार नाहीं."

१९३९ च्या जानेवारींत मध्य टेक्ससमध्यें सार्वजनिक मालकीची वीज-पुरवठा संघटना अस्तित्वांत आली. त्या भागांतील सोळा परगण्यांत वीज-पुरवठा करणारी एक खाजगी कंपनी होती. त्या कंपनीची मालमत्ता 'लोअर कोलोरॅडो रिव्हर अथॉरिटी 'नें खरेदी केली. त्या सोळा परगण्यांपैकीं बहुतेक परगणे जॉन्सन ह्यांच्या जिल्ह्यांतच अंतर्भूत होते.

वरील योजना साकार होतांना खूपच तीव्र संघर्ष झाला. वरील अथॉरिटीचे संचालक आणि खाजगी वीज कंपनीचे अधिकारी ह्यांच्यांत झालेल्या एका बैठकीच्या वेळीं जॉन्सन खूपच प्रक्षुब्ध झाले होते आणि बोलण्याच्या भरांत वीज कंपनीच्या अध्यक्षांना उद्देशून ते बोलून गेले, "You go to hell" ("जा ! मरा ! खड्डयांत पडा ! ").

ह्या प्रकारामुळें बैठक मोडली. त्यानंतर जॉन्सन ह्यांना वरील अथॉरिटीचे मुख्य सल्लागार अल्वीन जे. व्हर्ट ह्यांनीं स्वतःच्या कचेरींत भेटीला बोलाविलें. व्हर्ट हे जॉन्सन ह्यांचे मित्र होतेच, पण अनुभवानें परिपक्व बनलेल्या त्यांच्या मतांविषयीं जॉन्सन ह्यांना गाढ आदर होता. बैठकींत जॉन्सन ह्यांनीं दाखविलेल्या वृत्तीबद्दल अथॉरिटीच्या इतर संचालकांनीं

त्यांच्याशीं हस्तांदोलन करून त्यांचें अभिनंदन केलें होतें. तसेंच अभिनंदन करण्यासाठीं व्हर्ट ह्यांनीं आपल्याला बोलावलें असावें असा जॉन्सन ह्यांचा कयास होता. पण तसा त्यांचा उद्देश नव्हता हें सिद्ध झालें.

व्हर्ट ह्यांच्या कचेरींत ते दोघे स्थानापन्न झाल्यावर जॉन्सन ह्यांना व्हर्ट म्हणाले, "लिंडन, मी काय सांगतों तें ऐक. ह्या व्यवसायाशीं माझा अनेक वर्षांचा संबंध आहे. एका मोठ्या कंपनीच्या–वजनदार कंपनीच्या अध्यक्षाला 'खड्ड्यांत जा !' असें सांगणारा तूं फार मोठा माणूस आहेस असें इतर संचालकांनीं भासविलें तेव्हां तुला फार बरें वाटलें असेल हें मी जाणतों. पण त्यामुळेंच बैठक मोडली हें माहीत आहेच तुला. ज्या प्रश्नांची उकल करण्यासाठीं आपण बैठक भरविली होती ते प्रश्न मात्र तसेच अनिर्णीत राहिले आहेत. ...लिंडन ! अनेक वर्षांपूर्वीच मी एक धडा शिकलेलों आहें. एकाद्याला, 'गो टु हेल !' असें आपण सहज म्हणून जातों पण आपण तसें म्हटलें म्हणून कांहीं तसें घडत नसतें."

व्हर्ट ह्यांचा उपदेश जॉन्सन पुढील काळांत कधींच विसरले नाहींत. आणि स्वत: अल्वीन व्हर्ट ह्यांनाहि ते कधीं विसरले नाहीत. १९४० च्या प्रारंभीं व्हर्ट ह्यांची नेमणूक उपगृहमंत्री म्हणून झाली. ह्या जागेवर त्यांनीं उत्कृष्ट कामगिरी बजावून लौकिक संपादिला. व्हर्ट ह्यांच्या ह्या नेमणुकीचें श्रेय जॉन्सन ह्यांना होतें.

मध्य टेक्ससमधील शेतकरी आणि अन्य रहिवासी ह्यांना स्वस्त वीज उपलब्ध करून देण्याच्या योजना जोरानें पुढे रेटण्याचा जॉन्सन ह्यांचा नेटाचा प्रयत्न सुरू होता. त्या वेळीं ग्रामीण वीजपुरवठा खात्याच्या (रूरल इलेक्ट्रिफिकेशन ॲडमिनिस्ट्रेशन) वॉशिंग्टन येथील अधिकाऱ्यांनी उद्गार काढले, "तुमच्या योजना फारच भव्य आहेत. तुम्हांला सारेंच कांहीं हवें आहे, पण तुम्हांला कांहीं तरी मिळावें एवढाच प्रयत्न आम्ही करूं शकूं. जास्त नाहीं."

कार्य टाळण्याच्या सबबी शोधण्यापेक्षां कार्य घडवून आणण्याचे मार्ग शोधून काढण्यावरच भर देणाऱ्या त्या पुरुषाला वरील शब्द म्हणजे आव्हानच होतें. त्यांनीं आपले प्रयत्न तसेच नेटानें चालू ठेवले.

आणि ग्रामीण विभागाला वीजपुरवठा मिळवून देण्याच्या जॉन्सन ह्यांच्या धडपडीची एक ठळक फलश्रुति म्हणजे त्यांच्या जिल्ह्यांत स्थापन झालेली ग्रामीण वीजपुरवठा संघटना ही अखिल जगांतील सर्वांत मोठी वीजपुरवठा योजना आहे. शेतकऱ्यांना पूर्वी विजेसाठीं जो खर्च येई त्यांत वरील योजनेमुळें पंचवीस टक्के कपात झाली. शेतकऱ्यांकडून विजेचा होणारा वापर झपाट्यानें प्रचंड प्रमाणांत वाढला. आणि त्यामुळें शेतकऱ्यांना मिळणारे फायदे उघड उघड दिसूं लागले.

ग्रामीण विद्युतीकरणासाठीं जॉन्सन ह्यांनीं प्रयत्न सुरू केले तेव्हां टेक्ससमधीलच त्यांच्या कांहीं मित्रांनीं इशारा दिला होता कीं, विजेचा उपयोग करण्यांत शेतकऱ्यांना रुळविणें अशक्य आहे आणि त्यांना विजेची किंमत देतां येणार नाहीं. ह्याला जॉन्सन ह्यांनीं उत्तर दिलें कीं, आपल्या-साठीं वीज उपलब्ध होण्याची संधि निर्माण होतांच शेतकरी त्या संधीवर तुटून पडलेले नाहींत अशी एक तरी ग्रामीण विद्युतीकरण योजना मला दाखवून देणाराशीं स्टेट्सन हॅटची पैज लावायला मी तयार आहें... 'स्टेट्सन हॅट' हें शिरस्त्राण टेक्ससमध्यें सुप्रतिष्ठितपणाचें चिन्ह मानलें जातें.

"मला एकहि स्टेट्सन हॅट ह्या मुद्द्यावर गमवावी लागलेली नाहीं कधींच !" असे उद्गार जॉन्सन ह्यांनीं अभिमानानें काढले आहेत.

ग्रामीण वीजपुरवठ्याच्या क्षेत्रांत, जॉन्सन ह्यांनीं केलेल्या कार्याचें एक फलित असें कीं, रूरल इलेक्ट्रिफिकेशन ॲडमिनिस्ट्रेशनच्या मुख्य प्रशासकाचें पद त्यांनीं स्वीकारावें अशी सूचना राष्ट्राध्यक्ष रूझवेल्ट ह्यांनीं केली. टेक्ससमधून आलेल्या ह्या आपल्या अनुयायाच्या कर्तबगारीची राष्ट्राध्यक्षांना चांगलीच जाणीव होती. पण, त्यांच्या सूचनेला जॉन्सन ह्यांनीं आभारपूर्वक नकार दिला. कॉंग्रेसमध्यें राहून आपल्या जिल्ह्याची सेवा बजावण्याला मी वचनबद्ध आहें अशी माझी भावना आहे आणि तें वचन पाळण्याची माझी इच्छा आहे, असें स्पष्टीकरण त्यांनीं नकार व्यक्त करतांना केलें. अशीं अधिकारपदें चालून येणें ह्याचा अर्थ वरिष्ठ नेत्यांच्या खास मर्जीतील ती व्यक्ति आहे असा केला जातो. त्यामुळें ती व्यक्ति अनेकदां इतरांच्या मर्जीतून उतरते. पण जॉन्सन ह्यांच्या बाबतींत तसें मात्र कांहींच घडलें नाहीं.

टेक्ससच्या त्या दहाव्या जिल्ह्यांतील लोक त्यांना 'हमखास काम फत्ते करणारा पुरुष' म्हणूनच गौरवीत होते. अनेक लहान लहान गांवांतील डाक कचेऱ्यांसाठीं नव्या इमारती बांधण्याकरितां पैसा मंजूर करून घेण्याच्या चळवळीला त्यांनीं जोरदार पाठिंबा दिला. आपल्या जिल्ह्यांत जमिनीची धूप थांबविणाऱ्या मध्यवर्ति सरकारी योजना हातीं घेतल्या जाव्यात म्हणून त्यांनीं प्रयत्न केले. शेतमालाच्या पतीवर कर्जे देण्याच्या योजनांत वाढ व्हावी म्हणून त्यांनीं प्रयत्न केले. आग्नेय भागांतील वाहतुकीचे दर कमी व्हावेत ह्यासाठीं त्यांनीं कसून प्रयत्न केले. नॅशनल यूथ अॅडमिनिस्ट्रेशन, सिव्हिलियन कॉन्झर्व्हेशन कोअर ह्यांच्यासारख्या तरुणांना मदत करणाऱ्या संस्थांना त्यांचा पाठिंबा पुढेंहि चालू राहिला.

एका ख्रिसमसमध्यें ऑस्टिन येथील त्याच्या कांहीं मित्रांनीं, राज्याच्या राजधानींतील कांहीं गलिच्छ वस्त्या जॉन्सन ह्यांना दाखविल्या. त्या भागांत मुख्यत: निग्रो आणि मेक्सिकन लोक रहात होते. त्या लोकांना ज्या हीन परिस्थितींत जीवन कंठावें लागत होतें तीं बघून जॉन्सन ह्यांना भयंकर धक्का बसला. ते वॉशिंग्टनला परतले ते त्या लोकांसाठीं कांहीं तरी करायचा निर्धार करूनच. आणि टेक्ससमधील सरकारी घरबांधणी योजनेसाठीं पांच लक्ष डॉलर वेगळे मंजूर करण्याची आवश्यकता त्यांनीं कॉंग्रेसला पटवून दिली.

जॉन्सन ह्यांना असें आढळून आलें कीं, शेती स्वावलंबी बनविण्यासाठीं न्यू डील कार्यक्रमाखालीं ज्या योजना अमलांत येत असत त्यांच्या अंमलबजावणींत अनेकदां निग्रो शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष होतें. हा दोष काढून टाकण्यासाठीं जॉन्सन ह्यांनीं प्रयत्न केले. ह्या संदर्भांत बोलतांना, त्या काळांत फार्म सिक्युरिटीज् अॅडमिनिस्ट्रेशनचे पस्तीस सालानंतर उपप्रशासक असलेले मिलो पर्किन्स म्हणतात, "निग्रो शेतकऱ्यांसाठीं झगडणारा दक्षिण भागांतला हा पहिलाच कॉंग्रेस सभासद होय."

आपल्या मतदार संघांतील कोणाहि व्यक्तीनें केलेली योग्य विनंती जॉन्सन कधींच दुर्लक्षिण्यासारखी किरकोळ मानीत नसत. अशा विनंतीची ते व्यक्तिश: दखल घेत असत. आलेल्या प्रत्येक पत्राचें उत्तर चोवीस तासांच्या आंत रवाना झालेंच पाहिजे असा कडक नियम त्यांनीं आपल्या कचेरीतील कर्मचाऱ्यांना घालून दिलेला होता. जेव्हां काम इतकें प्रचंड वाढलें कीं,

काँग्रेसतर्फे मंजूर झालेला नोकरवर्ग अपुरा पडूं लागला तेव्हां त्यांनीं स्वतःच्या खिशांतून पगार देऊन जादा माणसें नेमलीं. ते स्वतः आणि त्यांचा नोकरवर्ग रोज दहा, कधीं बारा तर कधीं चवदा-चवदा तास काम करीत असत.

जॉन्सन ह्यांची कारकीर्द प्रारंभापासून बघत आलेल्या त्यांच्या एका मित्रानें उद्‌गार काढले आहेत, " काम चापून घेणारा आणि स्वतः करणारा एक विलक्षण खटाटोपी माणूस म्हणजे जॉन्सन त्या काळांत ते थोडे गर्विष्ठहि होते. त्यामुळें अनेकदां लोकांत कटुता निमाण होई. त्यांची सौम्य वृत्ति ही फार उशीरा निर्माण झालेली आहे. कांहीं असो पण कामें पार पाडून घेण्यांत त्यांचा हातखंडा होता.

" त्यांची उंच सडपातळ मूर्ति कॅपिटॉल हिलवर सर्वत्र वावरतांना दिसत असे. वॉशिंग्टनमध्यें अनेक वर्षे राहिलेल्या कोणाहि काँग्रेस सभासदापेक्षां वा अन्य व्यक्तीपेक्षां जॉन्सन जास्त काँग्रेस सभासदांना आणि त्यांच्या चिटणिसांना ओळखीत होते. कसलाहि सौदा जमविण्यांत ते वस्ताद होते. स्वतःला हवें तें पदरांत पाडून घेण्यांत ते कुशल होते. त्या काळांतहि ते आपल्या व्यक्तित्वानें भारून टाकीत असत. समोरचा टणक माणूसहि विरघळल्याशिवाय रहात नसे.

" त्या काळांतील लिंडनना ओळखणाऱ्या लोकांना, त्यांच्या नंतरच्या काळांतील यशाबद्दल आश्चर्य वाटत नाहीं. राजकारणांत चमकूं शकेल अशा तरुणाचा अस्सल नमुना म्हणून काँग्रेसमध्यें नुकत्याच वावरूं लागलेल्या लिंडन जॉन्सनकडे त्यावेळीं बोट दाखवितां आलें असतें. "

काँग्रेस सभासदाचा चिटणीस म्हणून काम करीत असतांना वॉशिंग्टनमध्यें एकादें काम कसें फत्ते करून घ्यावें ह्याचें तंत्र त्यांनीं आत्मसात् केलें होतें, तेंच तंत्र पुढेंहि ते उपयोजीत आले आहेत. अर्थात् त्यांना अनुकूल अशाहि कांहीं विशेष गोष्टी होत्या.

व्हाईट हाऊसशीं ते विनासायास संपर्क साधूं शकत असत. राष्ट्राध्यक्षच त्यांना चाहणारे होते. शिवाय राष्ट्राध्यक्षांच्या खाजगी चिटणिसाची—ग्रेस टॅलीचीहि त्यांच्यावर मर्जी होती आणि राष्ट्राध्यक्षांना आपलें म्हणणें ऐकविणें ग्रेस टॅलीमुळें त्यांना सुलभ जात असे. आवश्यक त्यावेळीं रेबर्न ह्यांच्या मदतीवर ते अवलंबून राहूं शकत असत. टेक्ससमधील आणखी एक कसलेले

काँग्रेस सदस्य राईट पॅटमन ह्यांचाहि जॉन्सन ह्यांना उपयोग होई. जॉन्सन ह्यांचे वडील टेक्ससच्या कायदेमंडळाचे सभासद असतांना पॅटमन हेहि त्यांच्याबरोबर कायदेमंडळाचे सभासद होते. आणि नेव्हल अफेअर्स कमिटीचे अध्यक्ष कार्ल विन्सन ह्यांची तर जॉन्सन ह्यांच्यावर बहाल मर्जी होती.

यूरोपवर युद्धाचे ढग दाटूं लागले आणि युनायटेड स्टेट्स्नें आपल्या संरक्षण योजनांकडे बारकाईनें लक्ष द्यावयास सुरुवात केली; त्याबरोबर आरमारी समितीवरील जॉन्सन ह्यांच्या स्थानाला वाढतें महत्त्व प्राप्त झालें. त्यांचें वैयक्तिक वजन अधिक प्रभावी ठरूं लागलें. टेक्ससमधील कॉर्पस ख्रिस्टी येथील प्रचंड आरमारी–वैमानिक शिक्षण तळ उभारण्याच्या कामीं इतर कोणापेक्षांहि जॉन्सन ह्यांनींच जास्त प्रयत्न केले. टेक्ससमधील ह्यूस्टन आणि ऑरेंज ह्या दोन शहरांची निवड जहाजबांधणीच्या गोद्या उभारण्यासाठीं झाली. त्या कामीं सरकारला निर्णय घ्यायला लावण्यामागें जॉन्सन ह्यांचाच हात होता. टेक्सस विद्यापीठांत आरमारी राखीव अधिकाऱ्यांच्या शिक्षणाचें केंद्र सुरू करण्याच्या बाबतींत आणि डलास येथें आरमारी संशोधन केंद्र स्थापण्याच्या बाबतींत त्यांनीं जातीनें प्रयत्न केले.

वरील संरक्षण केंद्रें जिथें स्थापन करण्यांत आलीं तीं ठिकाणें जॉन्सन ह्यांच्या मतदार संघाच्या बाहेरचीं आहेत. पण प्रत्येक स्थळाची योग्यायोग्यता ठरवितांना त्या त्या कार्यासाठीं तें तें शहर जास्तींत जास्त चांगलें आहे कीं नाहीं हीच कसोटी जॉन्सन ह्यांनीं लावली होती.

महायुद्धापासून अलिप्त रहाण्याचा प्रयत्न युनायटेड स्टेट्स्ला साधणार नाहीं, आपलें राष्ट्र युद्धांत ओढलें जाणें अटळ आहे असें जॉन्सन ह्यांना खात्रीनें वाटत होतें आणि त्या दृष्टीनें राष्ट्र मुळींच सज्ज नाहीं हें त्यांना माहीत होतें. राष्ट्राला सज्ज बनविण्यासाठीं जें जें करणें शक्य असेल तें तें करण्याची त्यांची इच्छा होती. आणि त्यासाठीं आपल्या राज्यानें शक्य तितका वांटा उचलावा अशी त्यांना उत्कट तळमळ होती.

आणि नजीकच्या भविष्यकाळाचें असें चित्र दिसत असल्यामुळेंच, रूझवेल्ट ह्यांना तिसऱ्या वेळीं, पूर्वपरंपरा मोडून, राष्ट्राध्यक्षपदासाठीं उभे करणेंच अत्यावश्यक आहे असें त्यांना वाटत होतें.

४००५२ ७२६० चारि १ २०।११।६५

त्यांच्या मताशीं टेक्ससमधील सर्वच लोक सहमत नव्हते. उलट, आपल्या राज्यांतीलच जॉन नॅन्स गार्नर ह्यांना राष्ट्राध्यक्षपदाची उमेदवारी देण्यांत यावी अशी तीव्र भावना त्या राज्यांत होती. गार्नर हे स्थितिवादी धोरण असलेले गृहस्थ रूझवेल्ट ह्यांच्या दोन्ही राष्ट्राध्यक्षीय कारकीर्दींत उप-राष्ट्राध्यक्ष होते. गार्नरना पाठिंबा देण्याच्या चळवळीचा परिणाम टेक्सस-मधील डेमोक्रॅटिक पक्षांत फूट पडण्यांत होण्याचा धोका होता.

उपराष्ट्राध्यक्षाबद्दल जॉन्सन ह्यांच्या मनांत गौरवभाव आणि आदर होता. जॉन्सन ह्यांचे अनेक मित्र गार्नर ह्यांच्या उमेदवारीला अनुकूल होते. टेक्ससच्या दहाव्या मतदार संघाचें प्रतिनिधित्व करणाऱ्या ह्या कॉंग्रेस सभासदाला वाटत होतें कीं, राष्ट्राच्या इतिहासांत पूर्वी कधींहि आला नसेल असा विकट क्षण आलेला असतां पक्षांत फूट पडणें शोचनीय आहे.

म्हणून जॉन्सन आणि रेबर्न ह्यांनीं त्या प्रश्नाचा विचार केला. नंतर रूझवेल्ट ह्यांच्याशीं सल्लामसलत केली. आपल्या योजनेला रूझवेल्ट यांचा पाठिंबा मिळवून जॉन्सन आणि रेबर्न कामाला लागले. त्यांनीं गार्नरच्या पुरस्कर्त्यांशीं तडजोड घडवून आणली. त्या राज्याच्या परिषदेनें निवडलेल्या प्रतिनिधींनीं गार्नर ह्यांच्या उमेदवारीला राष्ट्रीय परिषदेंत पाठिंबा द्यावा, पण त्याच्या मोबदल्यांत, रूझवेल्ट ह्यांच्या उमेदवारीविरुद्ध चालणाऱ्या प्रचार मोहिमे-पासून दूर रहाण्याला वचनबद्ध असावें अशी ती तडजोड होती.

जॉन्सन ह्यांचें वैशिष्ट्य हें कीं वरील वादांतील दोन्ही पक्षांच्या लोकांशीं त्यांचे संबंध उत्तमच राहिले. ते राष्ट्राध्यक्ष रूझवेल्ट ह्यांच्या बाजूचे आहेत हें माहीत असूनहि गार्नर ह्यांच्या पुरस्कर्त्यांचाहि त्यांच्यावर विश्वास होता. परस्परविरोधी गटांचा असा सारखाच विश्वास संपादन करणारे पुरुष देशांत विरळाच होते.

१९४० च्या कॉंग्रेसच्या निवडणुकींत जॉन्सन ह्यांच्यापुढें केवढें तरी काम वाढून ठेवलेलें होतें. प्रतिनिधिसभेचीं सूत्रें काबीज करण्यासाठीं रिपब्लिकन पक्षाला फक्त अठ्ठेचाळीस जागा मिळवायला हव्या होत्या. निवडणुकीपूर्वी फक्त कांहीं थोडे आठवडे आधीं एकूण रंग स्पष्ट दिसत होता कीं, तेवढ्याच काय पण आणखीहि जागा त्या पक्षाला मिळतील.

डेमोक्रॅटिक पक्षाच्या प्रचार समितीचीं परिस्थिति ढासळलेल्या बुरुजा-सारखी झालेली होती. त्या समितीचें कार्य इतकें मंदावलें होतें कीं, मदतीची अत्यंत निकड असलेले पक्षीय उमेदवारसुद्धां समितीच्या मदतीची अपेक्षा बाळगीनासे झाले होते. समितीच्या कचेरीशीं संबंधित असणाऱ्या कांही लोकांना वाटूं लागलें होतें कीं, ह्यापेक्षां समिती गुंडाळलेली काय वाईट?

विल्यम बँकहेड ह्यांच्या निधनानंतर प्रतिनिधिसभेचे सभापति म्हणून त्या वर्षाच्या सप्टेंबरमध्येंच निवडले गेलेले सॅम रेबर्न हे वास्तववादी आणि व्यवहारी दृष्टीचे गृहस्थ होते. त्यांनीं आणि कायदेमंडळांतील डेमोक्रॅटिक पक्षाचे नेते जॉन डब्ल्यू. मॅकॉर्मॅक ह्यांनीं रूझवेल्ट ह्यांना भेटून स्पष्ट शब्दांत सांगितलें कीं, समितीबाबत कांहींतरी केलें पाहिजे आणि तेंहि तावडतोब केलें पाहिजे. तुमच्या सूचना काय आहेत त्या सांगा, असें राष्ट्राध्यक्षांनीं उलट म्हटलें. त्या दोघांपाशीं योजना तयारच होती. प्रचार समितीचीं सूत्रें लिंडन जॉन्सन ह्यांच्या हातीं सोपवावीत असें त्यांनीं सुचविलें.

आणि दुसऱ्याच दिवशीं सकाळीं जॉन्सन ह्यांनीं प्रचार समितीचीं सूत्रें हातीं घेतलीं. त्यांना रीतसर पदाधिकार असा कांहींच नव्हता, स्वतंत्र कचेरी मात्र देण्यांत आलेली होती. आणि त्यांना आदेश एकच होता : निवडणुकींत डेमोक्रॅटिक उमेदवार निवडून आणा! आपला सारा उत्साह आणि कामाची पोटतिडीक त्यांनीं समितीच्या कचेरींतील नोकरवर्गामध्यें प्रतिबिंबित केली आणि त्या नोकरवर्गासह प्रचाराच्या उरलेल्या तीन वर्षाच्या अवधींत रोज जास्तींत जास्त वेळ काम करून प्रचाराचा धडाका उडवून दिला.

त्यांच्या कामाचा परिणाम निवडणुकीच्या निकालावरूनच सिद्ध झाला. त्या निवडणुकींत डेमोक्रॅटिक पक्षाचे पूर्वीपेक्षांहि जास्त उमेदवार निवडून येऊन त्या पक्षाचें बळ वाढलें. आणि सभागृहाचीं सूत्रें हातीं येण्याऐवजीं रिपब्लिकन पक्षानें प्रत्यक्षांत सहा जागा गमावल्या.

दीडशेंपेक्षां जास्त उमेदवारांना निवडणूक लढविण्याला जॉन्सन ह्यांनीं सक्रिय मदत केली. आणि राजकारणाचें देवाण-घेवाण हें स्वरूप लक्षांत घेतल्यास यशस्वी उमेदवारांना ह्या मदतीचा विसर पडण्याची शक्यताच नव्हती.

स्वतः जॉन्सन ह्यांच्या फेरनिवडीबाबत तशी कांहींच अडचण कधींच नव्हती. १९३८ च्या निवडणुकींत ते बिनविरोध निवडून आले होते. पुनः १९४० च्या निवडणुकींतहि त्यांची निवड बिनविरोधच झाली होती.

यूरोपमध्यें 'लुटूपुटूच्या' युद्धानंतर नाझींना लागोपाठ विजय मिळूं लागले, तसा जॉन्सन ह्यांनीं राष्ट्राला इशारा द्यायचा सपाटा सुरू केला. तयारीच्या दृष्टीनें युनायटेड स्टेट्स् मागें आहे असें त्यांनीं राष्ट्राला बजा-वायला सुरुवात केली. रूझवेल्ट आणि सरकारांतील अन्य उच्चाधिकारी ह्यांच्याशीं निकट संपर्क असल्यामुळें, भावी काळाच्या आवश्यक तरतुदीच्या दृष्टीनें देश किती मागें आहे ह्याची जॉन्सनना तीव्र जाणीव होती.

१९४१ च्या एप्रिलमध्यें टेक्ससच्या कायदेमंडळांत भाषण करतांना त्यांनीं कळकळीचें आवाहन केलें कीं, 'दुसरे सारे प्रश्न दुय्यम समजा आणि राष्ट्राला युद्धासाठीं सज्ज करण्यासाठीं शक्य तितक्या वेगानें प्रयत्न करा.' त्यांच्या नेहमींच्या भाषणपद्धतीपेक्षां फारच अस्खलित वक्तृत्व होतें त्यांचें ह्या वेळीं.

"आपल्याला सुसज्ज व्हायला कितीसा अवधि आहे?" त्यांनीं भाषणांत प्रश्न केला.

आणि प्रश्नाचें उत्तर स्वतःच दिलें, "सत्य हें आहे कीं, अवधि मुळींच नाहीं."

ते म्हणाले, "तुफान आपल्या दाराशीं यावयास कांहीं महिने लागतील कीं कांहीं दिवसांत, आठवड्यांत वा तासांत तें येऊन धडकेल ह्याची आपल्याला कांहींच कल्पना नाहीं. तेव्हां आपसांत वाद-वितंडवाद करण्यांत आपण एक मिनिटाचाहि अपव्यय केला तर जी हानि होईल ती फोर्ट नॉक्समधील सारें सोनें खर्चूनहि भरून काढतां येणार नाहीं. गमावलेला एक सेकंद म्हणजे जागतिक विनाशाच्या दिशेनें टाकलेलें एक पाऊल होय.

"आज मी तुमच्यापुढें कामगारांचा मित्र ह्या नात्यानें उभा आहें. पण कामगारांना देखील माझें सांगणें आहे कीं, तुम्ही जेव्हां संप करण्याचें ठरवितां तेव्हां तुम्ही केवळ स्वतःच्या स्वातंत्र्याचा विचार करतां कामा नये. तुमच्या व्यावसायिक स्वातंत्र्यापेक्षांहि तुमच्या देशाच्या प्रत्येक नागरिकाचीं श्रेष्ठतर स्वातंत्र्यें आहेत, त्याचाहि तुम्ही विचार केला पाहिजे. तुमच्या

सरकारचा विचार केला पाहिजे, तुमचें आणि तुमच्या अमोल स्वातंत्र्यांचे रक्षण करण्यासाठीं सरकारच्या आवश्यकता काय आहेत ह्यांचा विचार केला पाहिजे.

"मी व्यापारी आणि उद्योगधंदेवाले ह्यांचाहि मित्र आहें. पण त्यांनाहि माझें सांगणें आहे कीं, तुमच्या आणि अमेरिकेंतील कोणत्याहि अल्पसंख्य गटाच्या हक्कापेक्षां श्रेष्ठ असे कांहीं हक्क आहेत. सरकार तुमच्याकडे कांहीं मागूं शकतें. आणि ज्या अर्थीं तुमचें आणि तुमच्या हितसंबंधांचें रक्षण सरकारनें करावयाचें आहे त्या अर्थीं सरकारला साद देणें हें तुमचें कर्तव्य आहे.

"शेतकऱ्यांसाठीं मी मोठमोठे लढे दिलेले आहेत. पण शेतकऱ्यांनाहि माझें सांगणें आहे कीं, तुमच्याकडे कांहीं मागण्याचा सरकारला हक्क आहे आणि तुम्हीहि त्या मागणीला साद दिली पाहिजे.

"कामगार असो, भांडवलदार असो वा शेतकरी असो–कोणा एका गटाच्या सुरक्षिततेपेक्षां साऱ्या राष्ट्राची सुरक्षितता महत्त्वाची आहे. आपापल्या सुरक्षिततेसाठीं प्रत्येक अल्पसंख्य वर्ग रस्सीखेंच करूं लागला आणि तसें करतांना स्वतःसाठीं साऱ्या जनतेच्या हितावर तिलांजलि देऊं लागला तर तुम्ही स्वतः खणलेल्या खड्ड्यांत स्वतः जाऊन पडाल.

"आपण असंघटित, मद्दड, हट्टी, स्वार्थी बनू तर आपल्याला स्वतंत्रहि रहातां येणार नाहीं."

टेक्ससच्या कायदेमंडळाच्या संयुक्त बैठकीनें प्रचंड टाळ्यांच्या गजरांत ह्या भाषणाला साथ दिली.

जॉन्सन दुसऱ्याच दिवशीं वॉशिंग्टनला आले. राष्ट्राध्यक्ष रूझवेल्ट पत्रकारांना मुलाखत देण्याच्या तयारींत होते; त्यापूर्वी कांहीं क्षणच आधीं जॉन्सन व्हाईट हाऊसमध्यें गेले आणि ते बाहेर पडले ते एक घोषणा करण्यासाठीं. ता. ९ एप्रिलला निधन पावलेल्या सेनेटर मॉरिस शेपर्ड ह्यांच्या रिकाम्या झालेल्या जागेसाठीं जॉन्सन ह्यांची उमेदवारी जाहीर करणारी ती घोषणा होती. घोषणापत्रक व्हाईट हाऊसच्या पायऱ्यांवर उभे राहूनच त्यांनीं वाचलें.

नंतर कांहीं मिनिटांनीं, पत्रकारांच्या बैठकींत रूझवेल्ट ह्यांना जॉन्सन ह्यांनीं केलेल्या घोषणेवर भाष्य करण्याची विनंती करण्यांत आली.

राष्ट्राध्यक्ष म्हणाले, "टेक्ससमधील ह्या सेनेटच्या निवडणुकीच्या संदर्भांत मी तीन गोष्टी सांगूं शकतों. पहिली : आपला सेनेटर कोण असावा हें ठरविण्याचा हक्क टेक्ससच्या जनतेचा आहे. दुसरी : प्रत्येकाला ठाऊक आहे कीं प्राथमिक निवडणुकींत मी भाग घेऊं शकत नाहीं. आणि तिसरी : सत्यच सांगायचें तर लिंडन जॉन्सन हे माझे फार फार जुने दोस्त आहेत."

आपले उद्‌गार जसेच्या तसे प्रसिद्ध करण्याला राष्ट्राध्यक्षांनीं परवानगी दिली.

आपली उमेदवारी जाहीर करणारी घोषणा जॉन्सन ह्यांनीं अगदीं मोजक्या शब्दांत केली होती. वॉशिंग्टनमधील आपल्या कार्याचा अनुभव त्यांनीं नमूद केला होता आणि राष्ट्राध्यक्षांना व त्यांच्या धोरणांना पाठिंबा देत राहीन असें आश्वासन दिलेलें होतें. टेक्ससमधील वृत्तपत्रांत जॉन्सन ह्यांच्या घोषणेपेक्षां त्यांच्या उमेदवारीला रूझवेल्ट ह्यांचा 'आशीर्वाद' आहे हीच बातमी अधिक ठळकपणानें छापण्यांत आलेली होती.

आणि ह्या 'आशीर्वादा'चा परिणाम संमिश्र झाला. रूझवेल्ट ह्यांच्या सरकारला कट्टर विरोध संघटित होत होता. ह्या विरोधकांत कांहीं वजनदार पुढारी होते. केवळ रूझवेल्ट ह्यांचा पाठिंबा आहे एवढ्याच कारणासाठीं ह्या लोकांना जॉन्सन ह्यांचें वावडें वाटत होतें. रूझवेल्ट त्यांना पाठिंबा देतात ना, मग आमचा विरोध असणारच, असा त्यांचा खाक्या !

सेनेटच्या त्या निवडणुकींतील इतर उमेदवार वजनदार होते. राज्यपाल डब्ल्यू. ली-ओ'डॅनिअल हे एक होते. स्वतःला ते 'अरण्यवासी खेडुत' म्हणवून घेत. त्यांचे विचार अत्यंत मवाळ होते. मार्टिन डायस हे दुसरे उमेदवार पूर्वी काँग्रेसचे सभासद होते आणि प्रतिनिधिसभेच्या अन्‌अमेरिकन ॲक्टिव्हिटीज कमिटीचेहि प्रमुख होते. तिसरे उमेदवार टेक्ससचे ॲटर्नी जनरल जेराल्ड सी. मान हे लोकप्रिय आणि कर्तबगार गृहस्थ होते.

ओ'डॅनिअल आणि डायस हे 'न्यू डील'वर विदारक टीका करीत असत आणि 'न्यू डीलचा पित्त्या' ह्या शब्दांत हे लोक जॉन्सन ह्यांना हिणवीत असत. युद्धाची अशुभ कृष्णछाया युरोपवर जशी जशी वाढत गेली तशी तशी टेक्ससमध्यें अलिप्ततावादी वृत्ति डोकें काढूं लागली होती. ह्या वृत्तीला चेतविण्यासाठीं ओ'डॅनिअल जाणीवपूर्वक आवाहन करीत असत.

जॉन्सन ह्यांनीं आपल्या पहिल्या भाषणापासून अखेरपर्यंत प्रचाराचें एकच सूत्र ठेवलें होतें. 'आपल्याला वाटतो आहे, त्याहून अधिक उशीर झाला आहे !' इशाऱ्याच्या ह्या एका सूत्रांत त्यांच्या प्रचाराचें सार सांगतां येईल. स्वातंत्र्याचा जाहीरनामा मंजूर झाल्यानंतरच्या काळांत पूर्वी कधींच निर्माण झाला नसेल इतका भयंकर धोका देशाला निर्माण झालेला आहे असा इशारा देऊन, ह्या भयानक आंतरराष्ट्रीय संकटाच्या क्षणीं राष्ट्राध्यक्षांच्या पाठीशीं उभे रहा असें आवाहन ते टेक्ससच्या जनतेला करीत असत. राष्ट्राला सुसज्ज बनविण्याचा कार्यक्रम अधिक संघटित करण्याची आवश्यकता ते प्रतिपादन करीत असत. ब्रिटनला सर्व प्रकारची मदत दिली पाहिजे असें ते सांगत असत.

पुन:पुन्हा ते आपल्या श्रोत्यांना सांगत, " मी शांतताप्रेमी आहें. युद्धाचा मला तिरस्कार आहे. तुमच्या मुलाला युद्धावर पाठविण्यासाठीं माझें मत देण्याचा प्रसंग ज्या दिवशीं येईल त्या दिवशीं लिंडन जॉन्सन काँग्रेसमधील आपली खुर्ची सोडून त्या पोराबरोबर जायला सिद्ध होईल. "

स्थानिक, देशांतर्गत प्रश्नाबाबत जॉन्सन ह्यांची भूमिका अतिउदारमतवादी नव्हती कीं कट्टर स्थितिवादीहि नव्हती. त्या काळांत मध्यममार्गी राजकारणी लोक विरळाच होते. अशा फारशी गर्दी नसलेल्या मार्गावर जॉन्सन वाटचाल करणारे होते.

आपल्या प्रचारांत जॉन्सन शेतीमालासाठीं शेतकऱ्यांना जीवनमानाप्रमाणें किंमती मिळाव्यात हा मुद्दा मांडीत असत. वृद्धांना निवृत्तिवेतन देण्याची देशाची राष्ट्रीय योजना असावी असें प्रतिपादन करीत असत. माणूस साठ वर्षांचा होतांच त्याला निवृत्तिवेतन सुरू व्हावें असें ते सांगत. माता व बालकें यांच्या कल्याणाच्या योजना मध्य सरकारनें हातीं घ्याव्यात असें ते सुचवीत असत. आणीबाणीच्या काळांत राष्ट्राच्या गरजूपणाचा गैरफायदा कामगार आणि भांडवलदार ह्या दोघांनाहि घेतां येऊं नये अशी तरतूद सरकारनें केली पाहिजे अशीहि त्यांची सूचना असे.

जॉन्सन हे सरकारचे 'होयबा' आहेत ह्या आरोपाला उत्तर देतांना ते म्हणत असत, " होय, मी 'होयबा' आहें पण माझी जात विशिष्ट आहे. जें जें अमेरिकन त्याला त्याला मान तुकविणारा 'होयबा' मी आहें. ह्या प्रजासत्ताकाच्या संरक्षणासाठीं जें जें उपयुक्त ठरेल त्याला मान्यता देणारा

'होयबा' मी आहें. आणीबाणीच्या क्षणीं प्रत्येक सच्च्या सैनिकानें असायला पाहिजे तसा आमच्या सरसेनानींचा हुकूम मानणारा 'होयबा' मी आहें."

प्रचारासाठीं विमानाचा जास्तींत जास्त उपयोग करणारे जॉन्सन हे टेक्ससमधील पहिलेच उमेदवार होते. आपल्या विरोधकांपेक्षां त्यांनीं जास्त दौरा केला आणि जास्त मतदारांना ते भेटले. त्यांच्या प्रचाराच्या धुमाळींत, प्रचारांत तरबेज नसतील पण ज्यांच्यापाशीं अमाप उत्साह होता असे हजारों तरुण स्त्री-पुरुष सहभागी होते. नॅशनल यूथ अॅडमिनिस्ट्रेशनचे राज्यप्रशासक ह्या नात्यानें आपल्याला मदत करणाऱ्या 'लिन'ला ही मंडळी विसरलेली नव्हती. हे निष्ठावान् दोस्तच काय ते जॉन्सन ह्यांच्या बाजूनें प्रचारक होते.

जॉन्सन ह्यांचे तीन प्रमुख प्रतिस्पर्धी साऱ्या राज्यांत लोकप्रसिद्ध होते. उलट, आपल्या प्रतिनिधिसभेच्या मतदार संघांतील दहा परगण्यांबाहेर जॉन्सन मुळींच प्रसिद्ध नव्हते. त्यांनीं फार उशीरां सुरुवात केली होती. प्रचार मोहिमेच्या अखेरच्या अखेरच्या काळांत घेतल्या गेलेल्या लोकमताच्या चांचण्यांवरून असें दिसून येत होतें कीं, जॉन्सन वेगानें वाढता पाठिंबा मिळवीत आहेत. निवडणुकीच्या ऐन आधीं झालेल्या चांचणीवरून जॉन्सन थोडेसे आघाडीवरच असावेत असा अंदाज करतां येत होता. ह्या निवडणुकींतहि सर्वाधिक मतें मिळविणारा उमेदवार विजयी ठरणार होता.

ता. २८ जून १९४१ रोजीं मतदान संपल्यानंतर पांचच तासांनीं राज्यांतील ठिकठिकाणांहून आलेल्या मतांच्या आंकड्यांवरून जॉन्सन हे ओ'डॅनिअल-पेक्षां तीन हजार मतांनीं आघाडीवर असल्याचें दिसून आलें. जेराल्ड मान हे तिसरे व त्यांच्या मागें मार्टिन डायस होते. इतर किरकोळ उमेदवारांना मिळालेल्या मतांची संख्याहि किरकोळच होती.

दुसऱ्या दिवशीं जॉन्सन ओ'डॅनिअलपेक्षां पांच हजार मतांनीं आघाडीवर होते, तोंपर्यंत ९६ टक्के मतें मोजून झालेलीं होतीं. वृत्तपत्रांनीं जॉन्सन ह्यांचें सविस्तर चरित्रहि प्रसिद्ध करून टाकलें. साऱ्या टेक्ससमधून आणि वॉशिंग्टनमधून अभिनंदनपर संदेशहि येऊं लागले.

पण राज्यांतील आडवळणाच्या छोट्या छोट्या परगण्यांतून मतदानाचे आंकडे अद्याप येतच होते. जॉन्सन ह्यांच्या प्रचाराचें सूत्र, नाझी आक्रमणाला तोंड देण्यासाठीं राष्ट्रानें सज्ज झालें पाहिजे, हें असल्यामुळें ज्या दहा

परगण्यांमध्यें जर्मनवंशीय नागरिकांची बहुसंख्य वस्ती होती तिथें जॉन्सन ह्यांना ओ'डॅनियल ह्यांच्या मतांच्या फार फार तर निम्मीं मतें पडलीं. आणि ह्यामुळें दोघांच्या मतसंख्येंतील अंतराची उलटापालट झाली.

शेवटच्या मतांच्या आंकड्यांवरून ओ'डॅनिअल विजयी ठरले. एकूण नोंदल्या गेलेल्या सहा लाख मतांच्या मानानें दोघांच्या मतसंख्येंतील १३११ हें अंतर मामुली होतें.

मतांची फेरमोजणी करण्याची मागणी करा अशी जॉन्सन ह्यांच्या कांहीं मित्रांनीं गळ घातली. पण त्यांनीं नकार दिला. त्यांची निराशा झाली होती; पण त्यांच्यांत कटुता निर्माण झाली नव्हती.

ते म्हणाले, " हा एक खेळ आहे. पुन: केव्हां तरी खेळूं या ! "

प्रतिनिधिसभेंतील आपल्या कामावर रुजू होण्यासाठीं ते विमानानें वॉशिंग्टनला परत आले.

त्यानंतर पांचच महिन्यांनीं जपाननें पर्ल हार्बरवर बॉंबफेक केली. युद्ध जाहीर करणाऱ्या ठरावावर प्रतिनिधिसभेंत मतदान केल्यानंतर एकच तासानें जॉन्सन ह्यांनीं आरमारांत प्रत्यक्ष कामगिरीवर जाण्याची इच्छा व्यक्त केली. त्यापूर्वीं अनेक वर्षें आधीं ते राखीव आरमारी अधिकारी म्हणून भरती झाले होते. तीनच दिवसांनीं आरमारांत लेफ्टनंट कमांडर म्हणून त्यांची नेमणूक झाली. लढाऊ दलाचा गणवेश परिधान करणारे, प्रतिनिधिसभेचे ते पहिलेच सभासद होते.

□ □ □

# ७

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. १४४८५
ग्रंथ ... (स्थळ प्रत)

आरमारांतील प्रत्यक्ष कामगिरीवर जॉन्सन हे फक्त सात महिन्यांपेक्षां थोडा अधिक काळ होते. १९४२ च्या जुलैमध्यें राष्ट्राध्यक्ष रूझवेल्ट ह्यांनीं हुकूम काढून लष्करी कामगिरीवर असणाऱ्या सर्व काँग्रेस सभासदांना वॉशिंग्टन येथील आपापल्या कामावर रुजू होण्यास फर्माविलें. पण तेवढ्या थोड्या अवधींत त्यांनीं खूप विस्तृत प्रदेशांत भ्रमण केलें होतें.

आरमारांत दाखल झाल्यानंतर जॉन्सन ह्यांना सान फ्रान्सिस्को येथें नेमण्यांत आलें होतें. युनायटेड स्टेट्स्-न्यूझीलंड आरमारी कमांडच्या सेनानीच्या कचेरींत ही नेमणूक झालेली होती. पण नेमणूक झाल्याबरोबर परदेशांत जाण्यासाठीं त्यांचें मन तळमळूं लागलें.

डेन्व्हर येथें असलेल्या आपल्या भावाची भेट झाली असतां जॉन्सन ह्यांनीं तक्रार केली, "मला युद्धाशीं संबंधित असें तिथें कांहींच आढळत नाहीं. मला कांहीं कामच नाहीं. ह्या नोकरीपेक्षां काँग्रेसमध्यें मी देशासाठीं जास्त काम करूं शकेन. मी वॉशिंग्टनला जात आहें तिथें राष्ट्राध्यक्षांशीं बोलणार आहें. त्यांना माझ्या बाबतींत कांही तरी करायला लावीन."

त्याप्रमाणें जॉन्सन वॉशिंग्टनला गेले आणि त्यांनीं व्हाईट हाउसला भेट दिली. तेथील मुक्कामांत ते थोडा वेळ आपल्या स्वत:च्या कचेरींतहि जाऊन आले. त्या कचेरीचीं सूत्रें लेडी बर्डच्या हातीं होतीं. पतीच्या गैरहजेरींत त्यांचें काम त्यांची अर्धांगी विनावेतन करीत होती. आरमारांत दाखल झाल्याबरोबर जॉन्सन ह्यांनीं, आरमारांत असेपर्यंत काँग्रेस सभासद म्हणून वेतन घेणार नाहीं असें कळविलें होतें काँग्रेस सभासद म्हणून त्यांचें वार्षिक वेतन दहा हजार डॉलर होतें. तर लेफ्टनंट कमांडर म्हणून त्यांना वार्षिक फक्त तीन हजार डॉलर मिळणार होते.

वॉशिंग्टनहून सान फ्रान्सिस्कोला परत आल्यावर लौकरच जॉन्सन न्यूझीलंडकडे रवाना झाले. तेथून पुढें त्यांचा काळ खूपच धमालींत गेला.

आरमारांतून परत काँग्रेसमध्यें येईपर्यंतच्या काळांत पॅसिफिकच्या रणक्षेत्रांत त्यांनीं खूपच भ्रमंति केली. राष्ट्राध्यक्षांना सादर करावयाच्या अहवालाला आधारभूत अशी माहिती मिळविण्यासाठीं त्यांनीं बरेच दिवस ऑस्ट्रेलियांत जनरल डग्लस मॅकआर्थर ह्यांच्या समवेत व्यतीत केले. एका टेहेळणी बाँबफेक्या विमानांतून ते प्रवास करीत असतां जपानी लढाऊ विमानांतून झालेल्या माऱ्यामुळें त्यांच्या विमानाचें एक इंजिन निकामी झालें होतें. त्यांचें विमान कसेंबसें न्यू गिनीमधील आपल्या तळावर परतं शकलें होतें.

ह्या कामगिरीवर असतांना जॉन्सन ह्यांनीं जें शौर्य-धैर्य दाखविलें त्याबद्दल स्वत: मॅकआर्थर ह्यांनीं त्यांना 'सिल्व्हर स्टार' पदक बहाल केलें. ह्यावेळीं मॅकआर्थर ह्यांनीं दिलेल्या प्रशस्तिपत्रांत म्हटलें आहे, "न्यू गिनीमधील शत्रूच्या मोर्च्यांची माहिती मिळवून, बलाबलाच्या परिस्थितीचें चक्षुर्वैसत्यम् ज्ञान मिळविण्यासाठीं निरीक्षक म्हणून जाण्याकरितां जॉन्सन स्वेच्छेनें पुढें झाले. शत्रूकडून मारा होत असतां, बिकट संकटांतहि त्यांनीं नमूद करण्याजोगी शांत वृत्ति दाखविली. त्यांच्या धाडसीपणामुळेंच अमोल अशी माहिती मिळवून ते परत येऊं शकले."

त्या विमानांत असणाऱ्या एका वैमानिकानें नंतर सादर केलेल्या अहवालावरूनहि असें दिसून येतें कीं, नागरी जीवनांत जॉन्सन ह्यांची जी कार्यपद्धति होती तीच आरमारांतहि होती. १९४३ सालीं प्रसिद्ध झालेल्या डब्ल्यू. एल्. व्हाइट ह्यांच्या 'क्वीन्स डाय प्राउडली' ह्या पुस्तकांत हा अहवाल समाविष्ट करण्यांत आला आहे. 'स्वूझ'–त्या विमानाचें नांव–ऑस्ट्रेलियांतील एका ओसाड पडलेल्या गौळीवाड्याच्या आवारांत कसें उतरलें ह्याचें वर्णन केल्यानंतर त्या वैमानिकानें म्हटलें आहे,

"आम्ही विमानांतून बाहेर पडलों. थोड्याच वेळांत ऑस्ट्रेलियन पशुपाल जमिनींतील खंदकांतून सरपटत येतांना दिसूं लागले. दुसऱ्या कुठून ते उपटले असें मला वाटत नाहीं. आणि हे लोक जमिनीवर येतात न येतात तोंच लेफ्टनंट

कमांडर जॉन्सन ह्यांचा उद्योग सुरू झाला. त्यांनीं त्या लोकांशीं ओळख करून घ्यायला सुरुवात केली.

"आम्ही कुठें आहोंत हें त्या लोकांनीं जॉन्सनना सांगितलें. आम्हांला गांवांत नेण्यासाठीं एकादी मोटारगाडी मिळविण्यासाठीं त्यांच्यापैकीं कांहीं जण धांवले. गांवांतून आम्हांला टेलिफोन करतां येणार होता. आणखी लोक जमा झाले, जॉन्सननीं त्यांच्याशींहि हस्तांदोलन केलें. नंतर आमच्याकडे येऊन ते म्हणाले, 'झक्क लोक आहेत हे!'—कदाचित् त्यांच्या स्वतःच्या टेक्ससमधील लोकांचा अपवाद सोडल्यास जगांतील सर्वांत उत्कृष्ट लोक हेच होत असेंच जणु त्यांना म्हणावयाचें होतें.

"थोड्याच वेळांत त्यांच्या जन्म-नांवांनीं त्यांना हाक मारण्याइतकी जॉन्सन ह्यांची त्यांच्याशीं सलगी झाली. लोकरीवर भरपूर संरक्षक जकात बसविणें कां आवश्यक आहे, हेंहि त्या लोकांनीं जॉन्सनना सांगावें इतकी जवळीक त्यांच्यांत निर्माण झाली. आणि तो देश सोडण्यापूर्वी त्या देशांत जॉन्सन ह्या व्यक्तीसाठीं त्यांनीं अनेक चहाते मिळविले ह्यांत शंकाच नाहीं. 'स्वूझ'च्या वैमानिकांना आणि अन्य नोकरांना तर त्यांनीं खात्रीनेंच आपले चहाते बनविले होते. हा 'मतदार संघ' ते केव्हांहि जिंकू शकतील."

आणि टेक्ससमधील दहावा जिल्हा ह्या आपल्या मतदार संघांत स्वतःच्या गैरहजेरींत देखील विजय मिळविण्यांत त्यांना अडचण पडली नाहीं. १९४२ च्या निवडणुकीसाठीं त्यांचा उमेदवारीचा अर्ज बावीस हजार मतदारांच्या स्वाक्षऱ्या असलेल्या अर्जासह रुजूं करण्यांत आला. ह्या अर्जावर सह्या घेणाऱ्या संघटकांनीं लेडी बर्डला लिहिलेल्या पत्रांत म्हटलें होतें, "लिंडन बी. जॉन्सन हेच पुनः कॉंग्रेसवर निवडून जावेत अशी मतदारांची उत्कट हार्दिक इच्छा आहे."

त्यावेळीं स्वतः जॉन्सन ऑस्ट्रेलियांत होते. आपल्या उमेदवारीची त्यांना दादहि नव्हती. अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या तारखेआधीं दोनच आठवडे ही वार्ता त्यांना कळली होती. त्यांच्याविरुद्ध कोणीच उभे राहिले नव्हते.

जॉन्सन पुनः आपल्या कॉंग्रेसमधील कामावर रुजू झाले. पण पॅसिफिक-मधील युद्धपरिस्थितीच्या गंभीर चिंतेनें त्यांना ग्रासलेलें होतें. वॉशिंग्टनला

परतल्यावरोबर त्यांनीं तावडतोब राष्ट्राध्यक्षांची भेट घेतली. बराच वेळ त्यांचें बोलणें झालें. परिस्थितीचें स्पष्ट आणि वास्तववादी चित्र त्यांनीं राष्ट्राध्यक्षांपुढें उभें केलें. नंतर प्रतिनिधिसभेंत आणि इतरत्रहि केलेल्या भाषणांत त्यांनीं स्पष्ट इशारा दिला कीं, युनायटेड स्टेट्स् आणि दोस्त राष्ट्रें युद्ध हरतील कीं काय अशी भीति आहे.

न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया, न्यू गिनी इत्यादि ठिकाणीं असलेल्या लढवय्यांना त्यांनीं जवळून पाहिलें होतें. त्यांची बाजू त्यांनीं एका भाषणांत जोरदारपणानें मांडली आणि कांहीं उच्चाधिकाऱ्यांच्या कार्यक्षमताहीनतेवर कडाडून हल्ला चढविला.

त्या भाषणांत ते म्हणाले, " चंचल, मठ्ठ, स्वार्थी आणि नालायक असे जे सेनानी, आरमारी अधिकारी आणि अन्य लष्करी उच्चपदस्थ असतील त्यांना दूर केलें पाहिजे. ' लाल फीत ' कापून टाकणें हा कांहीं गुन्हा नव्हे ही गोष्ट आपण स्पष्टपणें दाखवून दिली पाहिजे.

" आपल्या लढवय्यांना जगांतील सर्वांत उत्कृष्ट नेतृत्व आणि युद्धसामग्री पुरविणें हें आपलें कर्तव्य आहे. वेगवान् बाँबफेकीं विमानें आणि देशांतर्गत राजकारण, रणगाडे आणि रणनीति, आरमारी जहाजें आणि जनतेचा निर्धार ह्यांची सांगड आपल्याला घातली पाहिजे. व्यवस्थापक आणि कामगार-नोकर वर्ग ह्यांची अशी सांगड घातली गेली पाहिजे, कीं सुरळीत चालणाऱ्या यंत्राप्रमाणें कामें झालीं पाहिजेत. खात्यांतील भांडणें, क्षुद्र हेवेदावे ह्यांचें उच्चाटण झालें पाहिजे. "

एकादा धर्मसंग्राम लढविणाऱ्या पुरुषाचाच जॉन्सन ह्यांचा पिंड आहे. आणि त्यांना अत्यंत प्रिय असा विषय आतां मिळालेला होता. प्रत्येक संधि साधून ते पुन:पुन्हा आपलें म्हणणें मांडीत होते. १९४२ च्या शरद् ऋतूमध्यें 'ऑरेगॉन' ह्या जुन्यापुराण्या युद्धनौकेला मोडींत काढण्यांत आलें, त्यावेळीं केलेल्या भाषणांतहि त्यांनीं हेंच सांगितलें. ते म्हणाले,

" इतर ठिकाणीहि अशा वाद करण्याजोग्या गोष्टी आहेत त्यांचें काय ? कुचकामी माणसांचें काय ? भरमसाट नोकरवर्गामुळें फुगलेलें सरकार एकाद्या असंख्य पाय असणाऱ्या घोणीप्रमाणें आहे. घोण हवे तितके पाय निर्माण करूं शकते पण हात निर्माण करूं शकत नाहीं. त्याचें काय ?

" ज्याप्रमाणें आपल्याला देशाबाहेर लढावयाचें आहे, त्याचप्रमाणें देशांत कांहीं गोष्टी बाद करण्याचें कार्यहि आपण केलें पाहिजे. विचारसरणींतील मठ्ठपणा, कार्यपद्धतींतील अकार्यक्षमता ह्या गोष्टी बाद करावयाच्या आहेत. आणि कांहीं माणसांमधील कुचकामीपणा देखील बाद केला पाहिजे. हीं माणसें सत्तेवर पाय रोवून आहेत. त्यांच्यांत देशप्रेम आहे आणि देशासाठीं ते मरायला देखील तयार होतील. पण, त्यांच्या कालबाह्य ठरलेल्या आणि म्हणूनच धोक्याच्या बनलेल्या कल्पनांपायीं इतर लोक जेव्हां मरतील तेव्हांच हे लोक मरायला पुढे येतील."

आवाजाला उपरोधाची धार आणीत ते म्हणाले, " आज युद्धोत्तर परिस्थितीचा विचार करण्यासाठीं मध्य सरकारच्या तेहतीस यंत्रणा जुंपलेल्या आहेत – अर्थात् ह्या अॅडॉल्फ हिटलरचें टोळकेंहि – आपण जिंकलों नाहीं तर – त्याच परिस्थितीचा विचार करीत आहे."

लष्करी मनुष्यबळाचा होणारा अपव्यय, युद्धोत्पादक कारखान्यांतील कामगारांच्या गैरहजेरीमुळें होणारा अपव्यय, लष्करी सामग्रीचा अपव्यय, अशा सर्व प्रकारच्या अपव्ययाविरुद्ध त्यांनीं भाषणांत भयंकर झोड उठविण्याचा सपाटा सुरू ठेवला.

नेव्हल अफेअर्स कमिटीनें नेमलेल्या खास चौकशी समितीचे अध्यक्ष म्हणून जॉन्सन ह्यांची नेमणूक करण्यांत आली. सामग्रीबाबत जास्त व्यावहारिक धोरण स्वीकारायला ह्या समितीनें आरमार खात्याला भाग पाडलें. कॅलिफोर्नियांतील एल्क हिल्स फील्ड ह्या पेट्रोल पुरविणाऱ्या संघटनेशीं आरमाराचा झालेला करार रद्द करून नवा करार वरील समितीनें घडवून आणला. ह्या एका कृतीमुळें सरकारचा बराच पैसा वांचला.

वॉशिंग्टन येथील कचेरींतील कामासाठी आरमारांतलीं जीं माणसें नेमीत ती प्रत्यक्ष सागरावर काम करण्यास पात्र अशी माणसें असत. ही पद्धति 'असमर्थनीय आणि अक्षम्य' आहे असा शेरा जॉन्सन ह्यांच्या समितीनें दिला. आरमारांतील मुलकी नोकरवर्गाच्या प्रश्नाबाबत आणि अन्य बाबतींतहि आरमारांत मोठ्या प्रमाणावर गैरकारभाराचे, हलगर्जीपणाचे प्रकार घडत ते जॉन्सन ह्यांनीं उजेडांत आणले.

नेव्हल अफेअर्स कमिटीनें कामगारांच्या गैरहजेरीसंबंधींचा आंकडेवार माहिती देणारा अहवाल सादर केला. त्या अहवालावरून असें दिसून येत

होतें कीं, जहाजबांधणीच्या गोद्यांमध्यें कामगारांच्या गैरहजेरीमुळें एका महिन्यांत १,६७,००,००० कामाचे तास वाया गेले होते. त्या एकूण उद्योगांतील सर्व कामगारांचा विचार करतां हें नुकसान दहा टक्के होतें. जॉन्सन ह्यांनीं युद्धोत्पादक उद्योग, कारखाने ह्यांतील गैरहजेरीला आळा घालण्याच्या कामांत पुढाकार घेतला. त्यांनीं त्या संबंधांत एक विधेयक मांडलें. सर्व आरमारी ठेकेदार आणि पोट-ठेकेदार ह्यांनीं अयोग्य गैरहजेरीबद्दलचे तिमाही अहवाल कामगार भरती मंडळाला सादर केले पाहिजेत अशी तरतूद त्या विधेयकांत होती.

स्मिथ-कोनोली कामगार कलह कायदा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कायद्याच्या विधेयकालाहि जॉन्सन ह्यांनीं पाठिंबा दिला. ह्या कायद्यान्वयें संपाची नोटिस एक महिना आधीं दिली पाहिजे अशी तरतूद असून, बहिष्कार व सहानुभूती दाखल होणारे संप ह्यांना बंदी घातलेली होती. जॉन्सन ह्यांनीं त्या कायद्याला पाठिंबा दिल्यामुळें कांहीं कामगारनेत्यांनीं त्यांच्यावर, "युद्ध-नफेखोरांना त्यांनीं विकून घेतलें" असा आरोप करायला कमी केलें नाहीं.

जॉन्सन ह्यांना कामगारांविषयीं वाटणारी आस्था नष्ट झालेली नव्हती. युद्धकाळांत सरकारशीं व्यवहार करतांना उद्योगधंद्यांच्या पुढें उपस्थित होणाऱ्या समस्यांची त्यांना उमज होती आणि त्याबद्दल सहानुभूतिहि होती. प्रचंड लष्करी कारखाने, छावण्या आदि वेगानें उभारतांना पैसा आणि मनुष्यबळ ह्यांचा कांहीं प्रमाणांत अपव्यय होणें अपरिहार्य असतें ह्याचीहि त्यांना जाणीव होती.

पण. अशी सारी उमज असली तरी त्यांचें ठाम म्हणणें होतें कीं विचारांत, अग्रस्थान, भयंकर शत्रूशीं लढत असणाऱ्या अमेरिकन जवानांना दिलें पाहिजे. ज्या विमानांतून निरीक्षक म्हणून ते गेले होते आणि ज्या विमानावर जपान्यांनीं हल्ला केला होता त्या विमानांतील हवाई लढवय्यांसारख्या लोकांचा विचार सर्वांत आधीं झाला पाहिजे असें ते आग्रहपूर्वक प्रतिपादीत असत.

त्या काळांत केलेल्या एका भाषणांत ते म्हणाले, "तें विमान उड्डाण करीत रहावें म्हणून त्या जवानांची चाललेली धडपड मी जेव्हां बघितली तेव्हां

माझ्या अंतःकरणांत खोलवर कांहीं तरी जळजळीत शिरलें, त्याचा मला विसर पडूं शकत नाहीं. ते तरुण आणि त्यांच्यासारखे अन्य तरुण जेव्हां मायदेशीं परत येतील तेव्हां त्यांच्या मुद्रांवर मला कटुता दिसतां कामा नये. त्यांच्या डोळ्यांत निराशा दिसतां कामा नये. आणि जें मला जास्तींत जास्त करण्यासारखें आहे तें मी न करीन तर त्यांची भावना अशी कडवट आणि नैराश्याची झाल्याशिवाय राहणार नाहीं."

युद्धाचे वारे उलटूं लागले त्याबरोबर युद्धानंतरच्या संभाव्य परिस्थितीच्या विचारांचें चक्र जॉन्सन ह्यांच्या डोक्यांत फिरूं लागलें.

मुख्यतः युद्धोत्तर कालांत आर्थिक मंदीची लाट येईल असा कांहीं लोकांचा कयास होता. ही मंदी टाळण्यासाठीं आतांपासूनच योजना आखाव्यात असें आवाहन समाजाच्या नेत्यांना आणि उद्योगधंद्यांच्या नेत्यांना त्यांनीं केलें. महायुद्ध संपण्याआधीं कित्येक महिने आपल्या मतदार संघांतील वृत्तपत्रांच्या संपादकांना जॉन्सन ह्यांनीं पत्र लिहिलें होतें. त्या पत्रांत त्यांच्या विचारांची दिशा व्यक्त झालेली होती. त्यांनीं कांहीं निश्चित कार्यक्रम सुचविला होता.

त्यांनीं लिहिलें होतें, "माझ्या मतदार संघांतील प्रत्येक शाळेकडून आपल्या गरजांची यादी केली जावी. दुरुस्त्या, सुधारणा आणि आधुनिकी-करण वगैरेबद्दल आवश्यक त्या योजना आखाव्यात. शहरांच्या नगरपालिका आणि परगण्यांच्या स्थानिक स्वराज्य संस्था ह्यांनींहि अशाच योजना आखाव्यात. मला आशा वाटते कीं, खाजगी उद्योगधंद्यांची सुसंघटना करण्यासाठीं कोणी तरी सरसावेल आणि युद्धतहकुबी झाल्यानंतर कार-खान्यांचें पुनः लोकोपयोगी उत्पादनासाठीं रूपांतर करण्याच्या योजना आधींच तयार झालेल्या असतील.

"आपल्यासाठीं एका नव्याच जगाचे दरवाजे खुले होणार आहेत."

युद्धाचा शेवट जसजसा जवळ येऊं लागला तसतशी त्यांना आणखी एक चिंता वाटूं लागली. युनायटेड स्टेट्स्‌नें जी लष्करी यंत्रणा उभारलेली होती तिचें संपूर्ण विघटन केलें जाईल असा धोका त्यांना दिसत होता. युद्धोत्तर लष्करी धोरण ठरविणारी प्रतिनिधिसभेची जी समिति नव्यानें स्थापन झालेली होती, तिचे एक सभासद म्हणून जॉन्सन ह्यांचें नांव

सभापति रेबर्न ह्यांनीं सुचविलें होतें. युद्धोत्तर कालासाठीं सुरक्षितता कायदा अधिक भक्कम बनवावा, सुरक्षिततेविषयींचें धोरण निश्चित करावें हीं कामें ह्या समितीकडे सोंपविण्यांत आलीं होतीं. नंतरच्या काळांत अणु-शक्तिविषयक संयुक्त समितीवरहि जॉन्सन यांची नेमणूक झाली होती.

युद्ध संपलें आणि त्याबरोबर "आमच्या जवानांना अविलंबें देशांत परत आणा ! " ह्या मागणीचें रान देशभर उठलें. ही मागणी समजण्या-सारखी असली तरी वास्तववादी मुळीच नव्हती. अन्य देशांमध्यें हजारों टन लष्करी साहित्य मोडींत काढलें गेलें. विमानें, रणगाडे, तोफा, बंदुका इत्यादि साहित्य जिथल्या तिथें टाकून देण्यांत आलेलें होतें. सार्वत्रिक लष्करी शिक्षण योजनेसाठीं पुरेसा पैसा मंजूर करून घेणाऱ्यांचा मार्ग दुष्कर बनला होता.

अशाहि परिस्थितींत जॉन्सन राष्ट्राला सतत बजावीत होते, " आपण सदैव सामर्थ्यसंपन्न राहिलें पाहिजे—लष्करी दृष्टया, उत्पादन दृष्टया आणि नैतिक दृष्टया सामर्थ्यवान् राहिलें पाहिजे. जगाबद्दलची आपली नैतिक जबाबदारी पार पाडण्यासाठीं आपल्यापाशीं लष्करी सामर्थ्य असलें पाहिजे.

" भविष्याची हमी निर्माण करणें हेंच आजचें आपलें परमोच्च कर्तव्य आहे. गुन्हेगारांपासून आमचें रक्षण करण्यासाठीं भक्कम पोलिस दल पाहिजे. जगांत सुव्यवस्था-शांतता राखण्याकरितां असलेल्या संयुक्त राष्ट्रसंघटनेला साह्य करण्याचें वचन पार पाडण्यासाठीं पुरेसें बलवान् सैन्य आणि आरमार आपल्यापाशीं असणें आवश्यक आहे."

युद्ध आणि युद्धाचा विचार ह्यांच्यापासून दूर पळण्याची तुफान धडपड अमेरिकन जनतेची चाललेली होती. ही धांवपळ थोपवून धरणें अशक्य होतें. पण ह्याहि परिस्थितींत जॉन्सन ह्यांनीं, कृत्रिम रबर कारखाने अवेळीं बंद करण्याचा विचार मोडून काढण्यांत पुढाकार घेतला. कोटयवधि डॉलर किंमतीचे युद्ध-कारखाने मोडीच्या भावांत विकण्याच्या अविचाराला आळा घालण्याचा कसून प्रयत्न केला. आणि जोरदार विरोधाला तोंड देऊन, सत्तर पथकांच्या लष्करी विमानदलाच्या स्थापनेचें कार्य घडवून आणलें.

त्या काळांत वॉशिंग्टनमधील आणि राष्ट्रांतील वातावरणांत गोंधळ आणि अस्वस्थता माजली होती. युद्ध समाप्त झाल्यामुळें आपल्या समस्या आपाततःच सुटतात असें नव्हे, ही जाणीव लोकांना होऊं लागली होती.

त्याच सुमारास रूझवेल्ट निधन पावले होते. त्यामुळें देशाची झालेली विलक्षण हानि जनतेला जाणवत होती. जॉन्सन ह्यांच्या दृष्टीनें तर तें तीव्र वैयक्तिक दुःख होतें.

'दि न्यूयॉर्क टाइम्स'चे विल्यम एस्. व्हाईट ह्यांना रूझवेल्ट ह्यांच्या मृत्यूच्या दुसऱ्याच दिवशीं दिलेल्या मुलाखतींत जॉन्सन ह्यांनीं सद्गद स्वरांत सांगितलें कीं, दिवंगत राष्ट्राध्यक्ष हे मला पित्यासारखे होते. कॉँग्रेस सभासद झाल्यापासून आत्तांपर्यंतच्या दीर्घ कालांत राष्ट्राध्यक्षांनीं आपल्यासाठीं काय काय केलें ह्याचा पाढा त्यांनीं वाचला. रूझवेल्ट ह्यांच्या नेतृत्वाखालीं मानवी हिताच्या दृष्टीनें किती प्रचंड प्रगति झाली ह्याचा आढावा त्यांनीं त्या मुलाखतींत घेतला.

नंतर कांहीं वर्षांनीं, ता. ३० जानेवारी १९५६ रोजीं, रूझवेल्ट ह्यांच्या ७४ व्या जन्मदिनाच्या निमित्तानें सेनेटमध्यें केलेल्या छोट्या भाषणांत जॉन्सन ह्यांनीं 'न्यू डील' च्या प्रणेत्याविषयीं आपल्याला वाटणाऱ्या गौरवभावनेचा पुनरुच्चार केला.

जॉन्सन म्हणाले, "त्यांच्या नांवाशीं निगडित असणारा कालखंड आपल्या स्मरणांत अद्याप ताजा आहे. त्यामुळें ऐतिहासिक दृष्ट्या त्याचें यथार्थ मूल्यमापन करणें शक्य नाहीं. पण अशाहि परिस्थितींत प्रत्येक अमेरिकन व्यक्तीला स्पष्ट जाणीव आहे कीं, जगांत होऊन गेलेल्या महापुरुषांतच रूझवेल्ट ह्यांची गणना होऊं शकते.

"ते एक विवाद्य पुरुष होते—प्रत्येक थोर पुरुष विवाद्यच असतो ह्या अर्थानेंच ते विवाद्य होते. धैर्य आणि श्रद्धा असलेले ते नेते होते. अशा नेत्यांना नेहमींच देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय संघर्षांच्या तुफान लाटांवर पोहत रहावें लागतें.

"आपल्या दिवंगत राष्ट्राध्यक्षांशीं निकट संबंधित असणारा एक ह्या नात्यानें, त्यांच्या नेतृत्वाचें मोल देशाच्या दृष्टीनें किती होतें ह्याचा मला कदापि विसर पडणार नाहीं.

"अमेरिकन जनता निरुत्साही, निराश अवस्थेंत अडचणींतून मार्ग काढण्यासाठीं हताशपणें चांचपडत असतांना, ते राष्ट्राध्यक्षपदावर आले. आणि जगाचा निरोप घेण्यापूर्वीं त्यांनीं आमच्यांत धैर्य बाणविलें, उत्साह बाणविला. हे गुण कोणत्याहि कसोटीच्या क्षणीं आम्हांला उपयोगी पडतील.

"इतिहासाचा निर्णय अजून लिहिला जावयाचा आहे. पण त्या इतिहास ग्रंथाचें शेवटचें प्रकरण कसेंहि समाप्त होवो, इतकें मात्र खास कीं, रूझवेल्ट हे अतिगंभीर परिस्थितींतील अतिगंभीर समस्यांना तोंड देण्यास समर्थ असलेले पुरुष होते अशीच अखेरची ओळ लिहावी लागेल."

रूझवेल्ट ह्यांच्या निधनानें झालेल्या भावनात्मक आघाताची तीव्रता कमी झाल्यानंतरहि रूझवेल्ट ह्यांच्याविषयीचें जॉन्सन ह्यांचें मूल्यमापन वरील प्रकारचें होतें. अशी भावना असूनदेखील, जॉन्सन ह्यांची एक दृढ श्रद्धा होती आणि त्या श्रद्धेला ते चिकटून होते. कितीहि थोर पुरुष असो, पण व्यक्तीपेक्षां राष्ट्र अधिक मोठें आहे ही ती श्रद्धा होय. रूझवेल्ट ह्यांच्या मृत्यूनंतर एक दोन दिवसांनीं आपल्या एका चिटणिसाशीं झालेल्या त्यांच्या संभाषणावरून त्यांच्या वृत्तीची कल्पना येते.

तो चिटणीस सद्गदित स्वरांत म्हणाला होता, "मला सुचेनासें झालें आहे. ह्यापुढें देशाला आधार कोणाचा ?"

"कां ? ट्रुमन आहेत कीं !" जॉन्सन शांतपणें उत्तरले होते.

देश प्रगतीची अखंड वाटचाल करीत राहणारच अशी त्यांची दृढ श्रद्धा होती. व्यक्तीपेक्षां अमेरिकन पद्धतीवरच त्यांची सर्वांत दृढ श्रद्धा होती.

युद्धोत्तर बिकट कालखंडांत रूझवेल्ट ह्यांच्या मागोमाग राष्ट्राध्यक्ष बनलेल्या ट्रुमनना काँग्रेसमध्यें जो हुकुमी पाठिंबा प्रथम होता तो त्यांच्या नंतरच्या राष्ट्राध्यक्षीय कारकीर्दींत त्यांना टिकवून धरतां आला नाहीं. १९४६ च्या निवडणुकींत दोन्ही सभागृहांतील बहुमत रिपब्लिकन पक्षानें जिंकलें होतें. त्या आधीं देखील, पूर्वीं 'न्यू डील'ला पाठिंबा देणाऱ्या अनेक डेमोक्रॅटिक सभासदांनीं, ट्रुमन ह्यांच्या अनेक योजनांना अडसर घालण्याच्या प्रयत्नांत रिपब्लिकन पक्षीयांना हातभार लावलेला होता.

व्हाईट हाउसमध्यें पदस्थ असलेल्या त्या पुरुषाचे पाय ओढण्याच्या उद्योगांत जॉन्सन कधींच सामील झाले नाहींत. ते आपल्या कार्यांत दंग होते — शरीरानें आणि मनानें, ते काँग्रेसमधील आपलें काम करीत होते, पण त्याचबरोबर स्वतःच्या प्रश्नांचाहि शांतपणें विचार करीत होते. स्वतःच्या भवितव्याचा विचार करीत होते.

□ □ □

# ६

१९४८ च्या सेनेटच्या निवडणुकींत जॉन्सन हे उमेदवार म्हणून उभे रहातील असे त्यांचे टेक्ससमधील अनेक मित्र धरूनच चालले होते.

त्या वर्षी जॉन्सन चाळिशी गाठणार होते. जवळ जवळ बारा वर्षांची प्रतिनिधिसभेंतील सेवा त्यांच्या पाठीशीं होती. स्वतःच्या मतदार संघांतील त्यांचें स्थान भक्कम होतें. पुनः वेळोवेळीं निवडून येणें तसें कांहीं कठीण जाणार नाहीं हें त्यांना ठाऊक होतें. पण असंख्य सभासद असलेल्या त्या सभागृहांत वडिलकीचें, वरच्या क्रमांकाचें स्थान मिळविण्यासाठीं आणखी अनेक वर्षे जाणें आवश्यक होतें. इतकीं वर्षे खर्ची घालावींत कीं नाहीं हा प्रश्न होता.

उलट सेनेटची जागा जिंकण्याचा प्रयत्न केला तर तो यशस्वी होईलच अशी कोणत्याहि प्रकारें खात्री वाटत नव्हती. अशा बाबतींत गैर आत्मविश्वास बाळगणारे ते नव्हते. टेक्ससचे युद्धकालांतील लोकप्रिय राज्यपाल कोक स्टीव्हन्सन ह्यांनीं सेनेटच्या त्या जागेसाठीं आपली उमेदवारी जाहीर केली होती. ह्यूस्टनचे वजनदार कायदेपंडित जॉर्ज पेडी ह्यांनींहि उमेदवारी घोषित केली होती. ओ'डॅनिअल हेहि पुनः उभे रहातील असें अपेक्षिलें जात होतें.

ह्या परिस्थितीचा व अन्य गोष्टींचा स्वतः जॉन्सन ह्यांनीं विचार केला. आपल्या पत्नीशीं आणि कांहीं निकटवर्ती मित्रांशीं विचारविनिमय केला. त्यांच्या मनांत राजकारणांतून संपूर्ण निवृत्त होण्याचे विचार घोळत होते. हा विचार अमलांत आणण्यासाठीं कदाचित् हीच योग्य वेळ ठरेल अशी त्यांच्या मनाची धारणा होती.

त्यांचें मन अस्थिर बनलें होतें. त्या जोडप्याला, एक चार वर्षांची आणि एक एक वर्षाची अशा दोन मुली होत्या. आपला जास्तींत जास्त वेळ कुटुंबाला द्यावा असें त्यांना वाटत होतें. त्याचप्रमाणें पैसाहि मिळवायला हवा होता. आणि राजकारणांत राहून धनसंचय कधींच करतां येणार नाहीं हें ते जाणून होते.

थोड्याच वर्षांपूर्वीं त्यांच्या पत्नीनें– लेडी बर्डनें– ऑस्टिन येथील एक नभोवाणी केंद्र खरेदी केलें होतें. आणि आतां त्यांत कमाई होऊं शकत होती. शासनयंत्रणेंतील आपल्या स्थानामुळें होणारी अडचण दूर झाली, आपण त्या यंत्रणेपासून अलग झालों तर त्या नभोवाणी केंद्राचा विकास करायला मोकळे होऊं असें त्यांना वाटत होतें. दूरचित्रवाणी केंद्र काढण्याचा देखील ते विचार करीत होते. युद्ध संपतांच अवतीर्ण होणाऱ्या नव्या जगांत अनेक संधि उपलब्ध होतील असें त्यांचेंच भाकीत होतें. अशा संधींचा लाभ उठविण्यासाठीं आपणहि प्रयत्नरत व्हावें असें त्यांना वाटत होतें.

१९४८ च्या मे मध्यें जॉन्सन ऑस्टिनला गेले ते, सेनेटच्या जागेसाठीं उमेदवार म्हणून उभें न राहण्याची घोषणा करण्याच्या तयारीनेंच.

कालांतरानें, त्या वेळची आठवण सांगतांना, जॉन्सन म्हणाले, "मी विमानांतून उतरतांच माझ्या कांहीं जिवलग मित्रांना बोलावून घेतलें आणि त्यांना माझा बेत सांगितला. माझ्या बोलण्यावर जास्तकमी चर्चा झाली नाहीं की माझ्या निर्णयाबद्दल निराशा व्यक्त केली गेली नाहीं. जणु माझा निर्णय त्यांना मान्य असावा असेंच दिसून आलें.

"नंतर दुपारीं चार वाजतां कांहीं तरुण मंडळी मला भेटायला आली. त्यांच्यापैकीं कांहीं जणांना मी नॅशनल यूथ अॅडमिनिस्ट्रेशनच्या काळापासून ओळखीत होतों. १९४१ च्या सेनेटच्या निवडणुकीच्या वेळीं त्यांनीं मला मदत केलेली होती. त्यांच्यापैकीं कांहीं जण सार्वजनिक क्षेत्रांत चांगली कामगिरी बजावीत होते.

"त्या तरुणांनीं मला बजावलें कीं, तुमच्यामुळेंच सार्वजनिक कार्यांत आणि शासनयंत्रणा उत्कृष्ट बनविण्यासाठीं करावयाच्या प्रयत्नांत रस घ्यायला आम्ही प्रवृत्त झालों. ह्यामुळें आमच्या संबंधांत तुमची कांहीं तरी जबाबदारी आहेच. त्या तरुणांनीं, कोणत्याहि प्रकारें कारणमीमांसा करीत न

१२८०७२ चरित्र. ९२६०

वसतां मला साध्या सरळ शब्दांत सांगितलें कीं, सेनेटच्या निवडणुकीबद्दलचा तुमचा विचार बदला. ''

आपल्या निर्णयाचा फेरविचार करणें जॉन्सन ह्यांना अत्यंत बिकट वाटलें. कारण, खाजगी जीवनाकडे वळण्याचें त्यांनीं ठरविलें होतें आणि त्या-बाबतच्या भावी योजनांच्या विचारांनीं त्यांचें मन संपूर्ण व्यापलेलें होतें. पण अखेर त्यांनीं फेरविचार केला आणि त्याच सायंकाळीं घाईघाईनें पत्रकारांची बैठक घेऊन तींत त्यांनीं आपली उमेदवारी जाहीर करून टाकली.

ही निवडणूक कांहीं 'खास' निवडणूक नव्हती. म्हणजे १९३७ सालीं ते प्रतिनिधिसभेसाठीं उभे राहून निवडून आले होते त्या वेळच्या निवडणुकी-सारखी किंवा १९४१ सालीं सेनेटच्या ज्या निवडणुकींत विजय थोडक्यासाठीं त्यांच्या हातून निसटला त्या निवडणुकीसारखी, एकदम अंतिम मतदान होऊन सर्वाधिक मतें मिळणारा उमेदवार यशस्वी ठरविणारी ही निवडणूक नव्हती. प्रथम डेमोक्रॅटिक पक्षांतर्गत होणाऱ्या प्राथमिक निवडणुकीला ते उभे राहिले.

जुलैमध्यें व्हावयाच्या त्या प्राथमिक निवडणुकींत इतर सर्व उमेदवारांच्या एकूण मतसंख्येपेक्षां अधिक मतें न मिळाल्यास त्या उमेदवारांतील पहिल्या दोन उमेदवारांमध्यें आणखी एक महिन्यानें फेरसामना होणार होता. ह्या दुसऱ्या फेरींत विजयी होणारा उमेदवार डेमोक्रॅटिक पक्षाचा अधिकृत उमेद-वार म्हणून उभा केला जाणार होता. मुख्य निवडणुकींत रिपब्लिकन पक्षा-कडून नाममात्रच विरोध होण्याची अपेक्षा होती.

जर निवडणुकींत जॉन्सन पराभूत झाले असते तर १९४१ सालाप्रमाणें त्यांना आपल्या प्रतिनिधिसभेंतील मूळच्या जागेवर रुजू होतां आलें नसतें. ह्या वेळीं एक तर सेनेटवर निवडून येणें किंवा सार्वजनिक अधिकारपदाच्या कक्षेंतून निवृत्त होणें असाच पर्याय होता.

आपण फेरनिवडणूक लढविणार नाहीं असें जाहीर करून ओ'डॅनियलनीं बहुसंख्य निरीक्षकांना चकित केलें. तरीसुद्धां कोक स्टीव्हन्सन हे जबरदस्त प्रतिस्पर्धी होते हे मवाळ राजकारणी अनेक वर्षे राजकारणांत वावरत होते. राज्यपाल म्हणून त्यांची कारकीर्द चांगली झालेली होती. त्यापूर्वीहि उप-राज्यपाल म्हणून आणि टेक्ससच्या प्रतिनिधिसभेचे सभापति म्हणून त्यांनीं

कामगिरी बजावलेली होती. त्यांची स्वतःची राजकीय प्रचारयंत्रणा नव्हती पण त्यांना मदत करणारे, समाजांत वजन असलेले अनेक मित्र होते. स्वतः त्यांनाहि सर्वसामान्य जनतेंत प्रतिष्ठा होती. राज्यपाल म्हणून झालेल्या त्यांच्या कारकीर्दीच्या अखेरच्या दिवसांत जनमताची चांचणी घेण्यांत आली होती तेव्हां त्यांचा कारभार ७१ टक्के लोकांना पसंत असल्याचें आढळून आलें होतें.

जॉन्सन ह्यांचीहि संघटित प्रचारयंत्रणा नव्हती, पण अशा यंत्रणेसाठीं लागणारा कच्चा माल होता. म्हणजे नॅशनल यूथ ॲडमिनिस्ट्रेशनशीं संलग्न असणारे हजारों तरुण स्त्री-पुरुष राज्यभर विखुरलेले होते. आणि १९४१ च्या निवडणुकीत जें साध्य झालें नाहीं तें साध्य करण्यासाठीं हरप्रकारें प्रयत्न करण्याला ते सज्ज होते. युद्धकाळांत वॉशिंग्टन येथील सरकारी अधिकाऱ्यांशीं व्यवहार करतांना टेक्ससमधील अनेक वजनदार लोकांना जॉन्सन ह्यांची मदत झालेली होती. त्या लोकांना जॉन्सन ह्यांच्याविषयीं कृतज्ञता होती. शिवाय, तुलनेनें जॉन्सन खूपच तरुण होते. त्यांचें वय एकूणचाळीस होतें तर स्टीव्हन्सन ह्यांचें साठ होतें.

ता. २२ मे रोजीं ऑस्टिन येथें प्रचार मोहिमेच्या उद्घाटनाचें भाषण करतांना त्यांनीं 'त्रिसूत्री'ची घोषणा केली. ते म्हणाले, "जास्त चांगल्या भविष्यकालाच्या दिशेनें ज्या मार्गावरून आपण प्रवास केला पाहिजे त्या मार्गावर तीन मार्गदर्शक फलक आहेत. ते फलक म्हणजे शांतता–सज्जता–प्रगति."

औद्योगिक पद्धति भक्कम राखण्याला साह्यभूत होईल असें वातावरण शासनक्षेत्रांत निर्माण झालें पाहिजे; कोणत्याहि परिस्थितीला तोंड देण्यास समर्थ असें साऱ्या जगांत बलवान् विमानदल, लष्कर आणि आरमार युनायटेड स्टेट्स्पाशीं असलें पाहिजे; मध्यवर्ति सरकारनें अखंड शास्त्रीय प्रगतीला चालना दिली पाहिजे. अणुशक्तीचा शांतताकाळांत उपयोग करण्याच्या दृष्टीनें व्हावयाच्या संशोधनालाहि चालना दिली पाहिजे, इत्यादि आवाहनें त्यांनीं आपल्या भाषणांत केलीं.

जागतिक शांततेची हमी निर्माण करण्यासाठीं युनायटेड स्टेट्स् काय करूं शकेल, ह्यासंबंधांत जॉन्सन ह्यांनीं पुढील सूत्रें सांगितलीं :

"आम्ही संयुक्त राष्ट्रसंघटना मजबूत बनवूं शकूं.

" व्यापाराचे मार्ग अनिर्बंध मोकळे ठेवूं शकूं.

" ग्रीस आणि तुर्कस्तान ह्या राष्ट्रांच्या बाबतींत केलें त्याप्रमाणें आम्ही युद्धखोरांना बजावूं शकूं, ' पुढें पाऊल टाकाल तर खबरदार ! '

" मार्शल योजनेच्या द्वारें स्वतंत्र राष्ट्रांना आम्ही मदत करूं शकूं.

" अमेरिकेबद्दल आणि अमेरिकेच्या उद्दिष्टांबद्दल जगाला जागृत करूं शकूं. "

वरील कार्यक्रम निर्दोष होता हें निर्विवाद, पण जॉन्सन ह्यांच्या मित्र-मंडळांतील अनुभवी राजकीय निरीक्षकांनीं त्यांना इशारा दिला कीं, एवढ्या-मुळें मतदारांमध्यें खळबळ माजूं शकणार नाहीं. ज्यामुळें लोकांत चैतन्य संचरेल असा कांहीं तरी प्रश्न शोधून काढला पाहिजे, असें ह्या मित्रांनीं एकमुखानें जॉन्सन ह्यांना सांगितलें.

एकूण प्रचार मोहिमेची सुरुवात कांहींशी मंद वेगानें झालेली होती. स्टीव्हन्सन मोटारीनें टेक्ससचा दौरा करीत होते, छोट्या छोट्या गांवांतील रस्त्यांत थांबून लोकांशीं हस्तांदोलन करीत होते आणि नभोवाणीवरून भाषणें करीत होते. आपल्या विरोधकांच्या वाटेला न जातां स्वतःच्या सार्व-जनिक सेवेकडे लोकांचें लक्ष वेधण्यावर त्या माजी राज्यपालाचा भर होता. मध्य सरकारचा कारभार काटकसरीचा झाला पाहिजे हाहि मुद्दा त्यांच्या प्रचारांत असे. ह्यूस्टनचे कायदेपंडित पेडी ह्यांचा प्रचार तसा सुव्यवस्थित होता पण त्यांत लोकांना चेतवील असें स्फूर्तिदायक कांहींच नव्हतें. मध्य सरकारांतील उधळपट्टी, नोकरशाहीचें वर्चस्व इत्यादि गोष्टींवरील त्यांच्या टीकेंत तसा कांहींच दम नव्हता.

आपल्या प्रचारमोहिमेचा प्रारंभ करणारें भाषण केल्यावर थोड्याच दिवसांत जॉन्सन कांहीं काळ तरी वृत्तपत्रांमध्ये ठळक जागीं झळकले. कारण मूत्रपिंडाच्या विकारानें आजारी पडल्यामुळें त्यांना तांतडीनें विमानानें रॉचेस्टरच्या (मिनेसोटा) मेयो क्लिनिकमध्यें नेण्यांत आलें होतें. तिथें ते दोन आठवडे होते.

परत येतांना एक अत्यंत कल्पकतापूर्ण योजना त्यांनीं मनांत शिजवून आणली होती. त्यांनीं एका हेलिकॉप्टरमध्यें ध्वनिक्षेपक बसवून त्यांत उभे

राहूनच भाषणें करतां येतील अशी व्यवस्था केली. त्यांनीं आपल्या ह्या प्रचारसाधनाचें नामकरण ‘जॉन्सन सिटी विंडमिल’ असें केलें. परत आल्यापासून आठवड्याच्या आंतच त्यांचें हें हेलिकॉप्टर प्रचारदौऱ्यावर निघालें.

त्या दिवसापासून अनेक आठवडे त्यांचें हेलिकॉप्टर त्या विस्तृत राज्यावर सर्वत्र भिरभिरत होतें. गांवांत आणि शहरांत हेलिकॉप्टर उतरत असे. हेलिकॉप्टर उतरलें कीं लक्ष वेधून कांहीं लोक त्याच्याभोंवतीं जमा होत असत. त्यांच्यापुढें छोटेंसें भाषण झाल्यावर हेलिकॉप्टर पुनः हवेंत उड्डाण करी, छोटीं छोटीं खेडीं व रस्त्यांच्या कडेला असलेल्या छोटया छोटया वस्त्या ह्यांच्यावर हेलिकॉप्टर भिरभिरत राही आणि जॉन्सन लोकांना पुकारून सांगत, “मी जॉन्सन सिटीचा लिंडन जॉन्सन आहें! युनायटेड स्टेट्स्च्या सेनेटच्या निवडणुकीसाठीं उमेदवार आहें!”

त्या काळीं, बहुसंख्य लोकांनीं हेलिकॉप्टर पाहिलेलेंच नव्हतें. छोटया छोटया वस्तींतील बहुसंख्य लोकांनीं कधीं सेनेटचा उमेदवारहि पाहिलेला नव्हता. तेव्हां दोन्ही बघण्याची ही संधि ते लोक चुकवीत नसत.

राजकीय प्रचाराची ही नवी क्लृप्ति खूपच यशस्वी ठरली. जॉन्सन ह्यांचा ‘शांतता–सज्जता–प्रगती’चा सिद्धांत असंख्य श्रोत्यांच्या कानांवर पडला. हेलिकॉप्टर-प्रचाराच्या पहिल्याच दिवशीं ते सुमारें सहा हजार लोकां-पुढें बोलले–म्हणजे तेवढ्या लोकांनीं उमेदवारालाहि बघितलें. त्या ‘उडत्या पवनचक्की’मुळें एकेका आठवड्यांत पन्नास ते साठ हजार लोकांशीं संपर्क साधणें जॉन्सन ह्यांना शक्य होत होतें.

तरी पण, प्रचारपद्धति लोकविलक्षण असली तरी लोकांच्या मनाची पकड घेईल असा विषय अद्याप ते वादासाठी उपस्थित करूं शकले नव्हते. तो प्रश्न त्यांना सहजासहजीं गवसला नाहीं पण जूनच्या अखेर अखेर, म्हणजे पहिल्या प्राथमिक निवडणुकीला महिनाभर अवधि असतांना त्यांना एक प्रश्न रान उठवायच्या दृष्टीनें योग्य असा आढळून आला.

अमेरिकन फेडरेशन ऑफ लेबर ह्या कामगार संघटनेच्या राज्य शाखेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक फोर्टवर्थ येथें भरून कोक स्टीव्हन्सन ह्यांच्या उमेदवारीला पाठिंबा देण्यांत आला. कामगार संघटनांनीं प्रत्यक्षतः निवडणूक-

प्रचारांत भाग न घेतां, तटस्थ धोरण राखावयाचें ह्या पन्नास वर्षांच्या परंपरेचा भंग करून वरील ठराव करण्यांत आला होता.

वस्तुतः माजी राज्यपाल स्टीव्हन्सन हे 'कामगारांचे मित्र' म्हणून कधींच प्रसिद्ध नव्हते. उलट 'न्यू डील' आणि नंतरचे 'फेअर डील' ह्या कार्यक्रमांचा पुरस्कार करणारे जॉन्सन भयंकर जहाल विचारसरणीचे प्रतीक आहेत असेंच टेक्ससमधील अनेक लोकांना वाटत होतें. तेव्हां लिंडन जॉन्सन ह्यांना सोडून कामगार संघटनेनें स्थितिवादी स्टीव्हन्सनना पाठिंबा द्यावा ह्याबद्दल राजकीय निरीक्षक आश्चर्य व्यक्त करूं लागले.

पण, ह्यामागील कारण असें होतें कीं कॉंग्रेसमध्यें टॅफ्ट-हार्टले कायद्याच्या बाजूनें जॉन्सन ह्यांनीं मतदान केलें होतें. हा कायदा मंजूर करूं नये असा धुडकावणीचा आदेश राष्ट्राध्यक्ष ट्रुमन ह्यांनीं पाठविलेला असूनहि मंजूर करण्यांत आलेला होता. आणि दक्षिणेंतील राज्यांच्या बहुसंख्य डेमोक्रॅटिक पक्षाच्या सभासदांच्या पाठिंब्यानें तो मंजूर झालेला होता. वॅग्नर कायद्या-खालीं कामगार संघटनांना मिळालेल्या अधिकारांच्या दुरुपयोगाला आळा घालण्याच्या हेतूनें वरील कायदा करण्यांत आलेला होता. त्या कायद्यांत मालक आणि कामगार ह्या दोघांनाहि कांहीं संरक्षणें ठेवण्यांत आलीं होतीं. कामगार संघटनेच्या सभासदाला कारखान्यांत कामावर ठेवावें ह्या बंधनाला दुसऱ्या कांहीं मर्यादा घातल्या होत्या. कामगार संघटनांकडून राजकीय कार्याला वर्गणी देण्यावर कांहीं नियंत्रण-नियमन लादण्यांत आलेलें होतें. कामगार आणि व्यवस्थापक ह्यांच्यांत होणाऱ्या करारांच्या संदर्भात कामगार संघांवर कांहीं अधिक जबाबदाऱ्या टाकण्यांत आलेल्या होत्या.

कामगार संघटनांना असलेल्या प्रचंड सत्तेला आळा घालणारा हा कायदा आवश्यक होता असेंच सर्वसाधारण लोकमत होतें. टेक्ससमध्यें ह्या कायद्याला लोकप्रियताच लाभलेली होती. पण कामगार संघटना मात्र 'प्रतिगामी कायदा' म्हणून त्या कायद्यावर कडक टीका करीत असत. ज्यांनीं कॉंग्रेसमध्यें त्या कायद्याला पाठिंबा दिला त्यांच्यावर सूड उगविण्याचा ह्या संघटनांचा निर्धार होता.

जॉन्सन ह्यांची अशी अपेक्षा होती कीं, काँग्रेस सभासद ह्या नात्यानें झालेल्या आपल्या एकूण कारकीर्दीचा विचार कामगार पुढारी करतील आणि सेनेटच्या निवडणूक प्रचारापासून अलिप्त रहातील. पण तसें घडलें नव्हतें. कामगारनेत्यांच्या या निर्णयावर ते एकदम तुटून पडले. स्टीव्हन्सन ह्यांनीं कामगार संघांशीं 'गुप्त करार' केला आहे असा आरोप त्यांनीं केला. स्टीव्हन्सनना पत्रें पाठवून विचारा कीं टॅफ्ट-हार्टले कायद्याबद्दलची तुमची भूमिका कोणती आहे, असें आवाहन त्यांनीं टेक्ससमधील जनतेला केलें.

एका भाषणांत त्यांनीं बजावलें, "माझ्या प्रतिस्पर्ध्यानें तो कायदा रद्द करवून घेईन असें वचन दिलें असेल तर ती गोष्ट जाणून घेण्याचा जनतेला हक्क आहे. त्यांनीं तसें वचन दिलें नसेल तर ती गोष्टहि जाणून घेण्याचा जनतेला हक्क आहे. त्याचप्रमाणें, मला असें वाटतें कीं कामगारांनीं आपल्या नेत्यांना जाब विचारावा : पन्नास वर्षांची प्रथा त्यांनीं काय म्हणून मोडली? गव्हर्नर असतांना राज्य कायदेमंडळांत आलेला नाठाळ कामगारविरोधी कायदा धुडकावून लावण्याचें किंवा त्यावर शिक्कामोर्तब करण्याचें धैर्य ज्याला झालें नाहीं अशा चंचल उमेदवाराला पाठिंबा देण्यासाठीं कामगार-नेते पुढें कां म्हणून सरसावले ? "

जॉन्सन ह्यांना एक वेधक प्रश्न सापडला होता आणि साऱ्या प्रचारांत त्यांनीं तो हातचा सोडला नाहीं.

एकहि दिवस वाया जाऊं न देतां जॉन्सन रोज पत्रक काढून मागणी करीत कीं, टॅफ्ट–हार्टले कायद्याबद्दलची आपली भूमिका स्टीव्हन्सननीं जाहीर करावी. कदाचित् टेक्ससमधील अनेक लोकांना त्या कायद्यांतील तरतुदींची माहिती नसेल. पण, "टॅफ्ट–हार्टले कायद्यावर स्टीव्हन्सनना काय म्हणायचें आहे ? ते कांहींच बोलत कां नाहींत ? " असे अखंड सवाल जॉन्सन करीत होते, त्यांचा परिणाम झाला.

तथापि, अशा प्रचारामुळेंहि जॉन्सन पहिल्याच फेरींत उमेदवारी मिळवूं शकले नाहींत. त्यांना त्या फेरींत पहिला क्रमांकहि मिळाला नाहीं. जॉन्सन ह्यांना ४०५६१७ मतें मिळालीं, तर स्टीव्हन्सन ह्यांना ४७७०७७ मतें मिळालीं. जॉर्ज पेडीसह इतर नऊ उमेदवारांना मिळून ३२०००० मतें पडलीं. दुसरी फेरी अटळ होती.

पुन: एक आठवड्यानेंच जॉन्सन पुन: तुफान गर्जना करीत प्रचाराच्या आखाड्यांत उतरले. हेलिकॉप्टर पुरेसा वेगवान् नाहीं असें म्हणून त्यांनीं त्या प्रचारवाहनाचा त्याग केला आणि विमानानें ह्या शहरांतून त्या शहरांत जाऊन मतांचा पाठलाग सुरू केला. स्टीव्हन्सन मुख्यत: सर्व प्रमुख शहरांत आघाडीवर होते. तेथील त्यांचीं मतें हिरावून घेण्यांतच आपल्याला आशा आहे हें जॉन्सन ह्यांनीं ओळखलें होतें.

त्यांनीं आपल्या प्रचार संघटनेचें चक्र अहोरात्र चालू ठेवलें. त्यांचें प्रचार कार्यालय जेथें होतें त्या ऑस्टिन येथील घरांतील दिवे रात्रभर जळत असलेले दिसत होते.

जॉन्सन ह्यांनीं आपल्या प्रतिस्पर्ध्याच्या राज्यपाल म्हणून झालेल्या कारकीर्दीवरहि टीकास्त्र सुरूं केलें. परराष्ट्रीय धोरणाच्या संदर्भात ते अलिप्ततावादी आहेत असा जॉन्सननीं आरोप केला. आपली प्रतिनिधिसभें-तील कारकीर्द जबाबदारीच्या वाढत्या जाणिवेची निदर्शक कशी आहे, इकडे ते मतदारांचें लक्ष वेधीत असत आणि आपला अनुभव लक्षांत घेतां सेनेटसाठीं आपणच कसे पात्र आहोंत हें दाखवून देत असत. कॉंग्रेसमध्यें आपण वेळो-वेळीं केलेल्या मतदानाचा आढावा घेऊन आपण अति डावे किंवा अति उजवे कसे नाहीं हें ते दाखवून देत असत.

ह्या धकाधकींत जॉन्सन ह्यांचें शारीरिक वजन खूपच घटलें. त्यांच्या चेहेऱ्यावरील मांस जणुं वितळून गेलें असावें इतका त्यांचा चेहेरा खप्पड दिसूं लागला. निद्रानाशामुळें त्यांचे डोळे अत्यंत खोल गेले. बोलतांना त्यांचा आवाज चिरत असे. पण इतकें झालें तरी त्यांनीं आपली धडपड चालूच ठेवली.

ह्या प्रचार मोहिमेबद्दल बोलतांना स्टीव्हन्सन ह्यांचा एक पुरस्कर्ता म्हणाला, " आमची अडचण अशी होती कीं, आमचा उमेदवार खरोखरच कांहीं बोलण्याचें मनांत आणीत नव्हता. उलट प्रतिस्पर्ध्याचा कांहींतरी बोलत रहाण्याचा निर्धार होता आणि तसें तो सतत बोलत राहिला होता. आणि त्याचें बोलणें आमच्या उमेदवाराला घातक ठरत होतें. "

इतकी तुफान प्रचार मोहीम टेक्सस राज्यानें ह्यापूर्वीं कधीं पाहिली नसेल. पण तिची अखेरची फलश्रुति मात्र अगदींच सपक ठरली.

दुसऱ्या फेरींत जॉन्सन ह्यांना ४९४१९१ आणि स्टीव्हन्सन ह्यांना ४९४१०४ मतें पडलीं. जॉन्सनना फक्त ८७ मतेंच जास्त मिळालीं.

हा निकाल आपण कायदेशीर मानीत नाहीं असें स्टीव्हन्सन ह्यांनीं जाहीर केलें. मागोमाग, परगण्याच्या, राज्याच्या न्यायालयांत आणि संघ-राज्याच्या न्यायालयांत लागोपाठ फिर्यादी, अपिलें, फिर्यादी, पुनः अपिलें अशी साखळी लागली. अखेरचा निर्णय जॉन्सन ह्यांच्या बाजूनें लागला.

जॉन्सन ह्यांना डेमोक्रॅटिक पक्षाच्या राज्य कार्यकारिणीनें अधिकृत उमेदवार म्हणून मान्यता द्यावयाला हवी होती. त्या समितींतहि, मतदारांइतकीच फाटाफूट होती. पण जॉन्सन ह्यांच्या उमेदवारीला अधिकृत मान्यता २९ विरुद्ध २८ मतांनीं मिळाली.

त्यानंतर राज्यांतील रिपब्लिकन पक्ष जागा झाला. जॉन्सन ह्यांना केवळ नाममात्र विरोध न करतां कसून विरोध करण्याचें त्या पक्षानें जाहीर केलें. जॅक पोर्टर ह्या ह्यूस्टन येथील तेल धंद्यांतील उद्योगपतीनें कांहीं वर्षापूर्वीच डेमोक्रॅटिक पक्ष सोडलेला होता. सार्वत्रिक निवडणुकींत रिपब्लिकन पक्षातर्फे विरोधाचा झेंडा फडकवीत हा उद्योगपति स्पर्धेच्या आखाड्यांत उतरला. पोर्टर हे प्रचारांत कमालीचे निष्णात होते. पुढें आयझनहॉवर ह्यांच्या राष्ट्राध्यक्षीय कारकीर्दींत ते टेक्ससचे प्रतिनिधि म्हणून रिपब्लिकन पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीवर निवडून आले होते. अशा ह्या व्यक्तीनें जॉन्सन ह्यांच्याशीं जोरदार लढा दिला. त्यासाठीं त्यांनीं जॉन्सन ह्यांचे प्राथमिक निवडणुकींतील प्रतिस्पर्धी कोक स्टीव्हन्सन ह्यांचें साह्य संपादिलें. स्टीव्हन्सन ह्यांनीं नभोवाणीवरून भाषणें करून, पोर्टर ह्यांना पाठिंबा द्या, असें आवाहन आपल्या अनुयायांना करण्याचा सपाटा सुरू केला.

सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळीं जॉन्सन ह्यांनीं जादा प्रचार केला नाहीं. पण प्रतिस्पर्ध्यापेक्षां दुप्पट मतें मिळून ते विजयी झाले.

आजोबांनीं भाकित केल्यापासून चाळीस वर्षे आणि कांहीं महिने इतक्या कालावधीनंतर जॉन्सन सेनेटर बनले होते.

□ □ □

# ७

युनायटेड स्टेट्स्‌चे टेक्ससतर्फेचे सेनेटर म्हणून १९४९ च्या जानेवारीमध्यें लिंडन जॉन्सन ह्यांनीं शपथ घेतली. अत्यंत अटीतटीच्या आणि कडवट प्रचार मोहिमेच्या परिणामीं ते आतां निवळले होते. जेमतेम बहुमतानें प्राथमिक निवडणुकींत विजय मिळवितां आला ह्याचाहि त्यांच्यावर परिणाम झाला होता. 'लँडस्लाइड लिंडन' ('प्रचंड विजयी लिंडन') असे कुचेष्टेचे उद्‌गार विरोधकांनीं काढलेले त्यांना बोचत होते. पण ते वास्तववादी होते. आणि नेहमींप्रमाणें त्यांची दृष्टि भविष्यकाळाकडे होती.

एका मित्रापाशीं बोलतांना जॉन्सन म्हणाले, "पक्षाच्या प्राथमिक निवडणुकींत बरोबर निम्म्या लोकांनीं माझ्याविरुद्ध मतें नोंदलीं. म्हणजे मी त्यांना त्यांच्यातर्फेचा सेनेटर म्हणून नको होतों. माझें ह्यापुढचें मोठें काम म्हणजे त्या लोकांना स्वतःचें मत बदलायला लावणें, हें होय."

आणि त्यांच्या दृष्टीनें, तसें करण्याचा उत्कृष्ट मार्ग, टेक्ससच्या साऱ्या जनतेच्या हितार्थ सेनेटमध्यें कसून प्रयत्न करणें हा होता. आपल्याला पाठिंबा देणारे आणि विरोध करणारे असा भेद न करतां सर्वांसाठीं काम करायचें त्यांनीं ठरविलें. त्यांना लोकांना आपल्या बाजूला वळवून घ्यायचें होतें.

प्रतिनिधिसभेंत दहाव्या मतदार संघासाठीं त्यांनीं जें केलें तसेंच आतां सर्व राज्यासाठीं करण्याला त्यांनीं जाणीवपूर्वक सुरुवात केली. त्यांनीं आपल्या कचेरींत मोठा नोकरवर्ग नेमला. त्यांच्या आजवरच्या सार्वजनिक कारकीर्दीत सतत त्यांच्या मदतीला असलेलीं माणसें तर ह्या नोकरवर्गांत प्रमुख होतीं. टेक्ससशीं संबंधित असलेल्या प्रत्येक प्रश्नांत ते लक्ष घालूं लागले. टेक्ससमधील सर्व लोकांचें मदतकेंद्र असें आपल्या कचेरीला स्वरूप

यावें म्हणून साऱ्या शक्तीनिशी ते काम करूं लागले. आणि हें कसें घडवून आणावें तें त्यांना माहीत होतें.

नव्या सभासदानें भाषणें करण्यापेक्षां सर्वांच्या नजरेसमोर जास्त राहिलें पाहिजे ही परंपरा ते काटेकोरपणें पाळीत असत. त्यांना हव्या असणाऱ्या समितीवरील सभासदत्व त्यांनीं मिळविलें. प्रतिनिधिसभेंतील त्यांच्या अनुभवामुळे त्यांना योग्य असें सेनेट आर्मड् सर्व्हिसेस कमिटीवरील सभासदत्व त्यांना लाभलें. सेनेटचा इतिहास आणि कार्यपद्धति ह्यांचा त्यांनीं अभ्यास केला. प्रत्येक सेनेटरच्या स्वभाववैशिष्टयाचेंहि त्यांनीं अभ्यासपूर्वक निरीक्षण केलें.

प्रतिनिधिसभेंत ज्यांच्याबरोबर जॉन्सन ह्यांनीं काम केलें होतें असे अनेक मित्र त्यांच्याबरोबरच सेनेटर झालेले होते. त्यांनीं कांहीं नवे मित्रहि जोडले. जॉर्जियाचे रिचर्ड बी. रसेल, कॉलोरॅडोचे एड्विन सी. जॉन्सन, ॲरिझोनाचे अर्नेस्ट मॅक्फर्लंड, केंटकीचे व्हर्जिल चॅपमन असे ते नवे मित्र होत. रसेल हे विद्वान आणि निष्णात गृहस्थ आर्मड् सर्व्हिसेस कमिटीचे अध्यक्ष झाले होते. समितीचे नवे सभासद जॉन्सन ह्यांचा उत्साह आणि जागरुकता ह्या गुणांमुळें रसेल फार खूष झाले. हे दोघे नेते अगदीं जिगर दोस्त बनले.

सेनेटमधील आपल्या कारकीर्दीच्या प्रारंभींच्या काळांतच जॉन्सन यांनीं तज्ज्ञांचा एक जथा स्वत:पाशीं संघटित करायला सुरुवात केली होती. सॅम रेबर्न ह्यांच्याशींहि त्यांनीं पूर्वीचा निकटचा संबंध राखला होता. १९४८ सालीं डेमोक्रॅटिक पक्षाला पुन: बहुमत मिळाल्यावर रेबर्न ह्यांची प्रतिनिधिसभेचे सभापति म्हणून पुन: निवड झालेली होती. रेबर्न, रसेल, जुने दोस्त सरन्यायाधीश फ्रेड व्हिन्सन, स्टुअर्ट सिमिंग्टन, न्यायमूर्ति टॉम क्लार्क ह्यांच्यासारख्या अनेक जुन्याजाणत्या नेत्यांकडून मिळेल तें तें ज्ञान आत्मसात् करण्याचा टेक्ससमधून आलेल्या त्या नव्या सेनेटरचा—जॉन्सन ह्यांचा—अखंड प्रयत्न चालू असे.

कामाच्या वेळांत आणि अनौपचारिक भेटीगांठीच्या काळांत जॉन्सन एकाच ध्यासानें सतत प्रयत्न करीत असत. सेनेटर ह्या नात्यानें जास्तींत जास्त कार्यक्षम बनण्यासाठीं आवश्यक तें तें शिकण्याचा त्यांचा निर्धार होता. वॉशिंग्टनमधील सामाजिक जीवनांत जॉन्सन आणि लेडी बर्ड फार मोठ्या

प्रमाणावर सहभागी होत नसत. आणि जॉन्सन एकाद्या भोजनाच्या वा चहापानाच्या समारंभाला गेलेच, तरी ते एकाद्या कोपऱ्यांत कोणाशीं तरी राजकारणावर चर्चा करीत असलेले दिसत.

जॉन्सन ह्यांनीं एका ठिकाणीं म्हटलें आहे, "आयुष्यांत जेव्हां जेव्हां माझ्यापुढें एकादी समस्या उभी राहिली तेव्हां तेव्हां त्या समस्येची उकल सर्वांपेक्षां जास्त ज्याला माहीत असेल त्याचा शोध घेण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. असा मनुष्य आढळला कीं मी त्याचा सल्ला विचारतों. शक्य तितका उत्कृष्ट सल्ला मिळाला कीं त्या सल्ल्याप्रमाणें मी वागतों."

प्रत्यक्ष युद्ध संपल्यानंतर लागोपाठ एके काळच्या दोस्तांत भयंकर तणातणी सुरू झाली. अशा वातावरणानें भारलेल्या जगांत युनायटेड स्टेट्स्चें स्थान काय असेल ह्या चिंतेनें जॉन्सन ह्यांना सेनेटच्या कारकीर्दीच्या प्रथम वर्षांत अधिकाधिक त्रस्त केलें. राष्ट्राची पुरेपूर सज्जता हा जॉन्सन ह्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय होता. अर्थात्, अमेरिकेची संरक्षण यंत्रणा ढासळू नये म्हणून, ती आपत्ती रोखण्यासाठीं, त्यांनीं कंबर कसली.

अण्वस्त्रांच्या बाबतींत अमेरिकेची प्रारंभीं असलेली मिरासदारी फार काळ टिकली नाहीं. एके काळीं स्वतंत्र असलेल्या युरोपांतील अनेक देशांत कम्युनिझमनें झपाट्यानें हातपाय पसरले होते आणि चीनहि कम्युनिस्ट बनल्यामुळें सोव्हिएट रशियांत प्रवेश करण्याचें मागील दारहि बंद झालें होतें. ह्या गोष्टी जॉन्सनना भयावह वाटत होत्या. युनायटेड स्टेट्स् आणि अटलांटिक करारानें युनायटेड स्टेट्स्शीं जोडलीं गेलेलीं राष्ट्रें वगळल्यास कम्युनिझमनें उरलेल्या जगांत आपलें उद्दिष्ट बहुतांशीं साध्य केलेलें आहे अशीच जॉन्सन ह्यांची धारणा झालेली होती.

जॉन्सन ह्यांच्या दृष्टीनें, युनायटेड स्टेट्स्ची संरक्षण योजना खच्ची करीत करीत इतक्या खालच्या पातळीवर आणली गेली होती कीं ती परिस्थिति धोक्याची होती. विमानोत्पादक कारखाने कार्यक्षम रहावेत म्हणून मंजूर केलेल्या रकमेंत कपात करण्याचें १९४८ सालीं राष्ट्राध्यक्ष आणि बजेट डायरेक्टर ह्यांनीं ठरविलें. त्या वेळीं हा प्रश्न धसास लावण्याचें कॉंग्रेसनें नाकारलें.

सत्तर पथकांचें विमानदल राखण्यासाठीं झालेले प्रयत्न अयशस्वी ठरले होते. लष्करी दलांचें एकत्रीकरण होण्यापूर्वी विमानदल शाखेचे उपयुद्धमंत्री असलेले आणि नंतर नव्या संरक्षण खात्यांत विमानदलाचे मंत्री असलेले स्टुअर्ट सिमिंग्टन आणि जॉन्सन ह्यांनीं सतत प्रयत्न केला नसता तर विमान-दलाची जवळजवळ वाताहतच झाली असती. ह्या दोघांनीं आपल्याकडून होईल तितका कसून प्रयत्न केला. पण हा प्रयत्न पुरेसा नाहीं ह्याची त्या दोघांनाहि जाणीव होती.

त्या काळांत, संरक्षण खर्चात काटकसर, हें शासनाचें मुख्य सूत्र होतें. आर्मड् सर्व्हिसेस कमिटींतील कामाच्या अनुभवावरून जॉन्सन ह्यांना कळून चुकलें होतें कीं, कपात केलेल्या संरक्षण खर्चाचाहि फारच थोडा भाग नव्या शस्त्रास्त्रांच्या संशोधनासाठीं आणि निर्मितीसाठीं राखून ठेवलेला आहे. तिन्ही लढाऊ दलांचें एकत्रीकरण करून त्यांना संरक्षण खात्याच्या एकाच छत्राखालीं आणण्यांत आलेलें असलें तरी आपसांतील हेव्यादाव्यांच्या बुजबुजाटांतून तीं दलें मुक्त झालेलीं नाहींत हेंहि जॉन्सन जाणून होते. आणि विमानदलांतच लागोपाठ कपात होत होती असें नव्हे, तर लष्करांत आणि आरमारांतहि कपात चालू होती.

ही परिस्थिति जॉन्सन ह्यांना अत्यंत धोक्याची वाटत होती. कारण जागतिक अशांत परिस्थितीच्या संदर्भांत ते ह्या परिस्थितीचा विचार करीत होते. अमेरिकेचें परराष्ट्रीय धोरण आणि लष्करविषयक धोरण ह्यांचा कसून फेरविचार झाला पाहिजे असें त्यांना वाटत होतें.

ता. २८ फेब्रुआरी १९५० रोजीं, आपल्या अत्यंत महत्त्वाच्या भाषणां-पैकीं एक भाषण त्यांनीं केलें. ॲटलांटिस सिटी येथें अमेरिकन शाळाचाल-कांच्या संघटनेची बैठक भरली होती. त्या भाषणाचा विषय होता, " आमची राष्ट्रीय सुरक्षितता."

कोणत्याहि क्षणीं प्रत्यक्ष युद्धाचें उग्र रूप धारण करण्याचा धोका असलेल्या जागतिक तणातणीच्या परिस्थितीचें थोडक्यांत चित्र रेखाटून जॉन्सन ह्यांनीं संरक्षण खर्चात काटकसर करूं बघणाऱ्यांच्या दिशेनें भाषणाचा रोख वळविला. त्या लोकांचें म्हणणें असें कीं, संरक्षण खात्यावर अनावश्यक

'चरबी' वाढलेली आहे आणि आपण फक्त ती 'चरबी' काढून टाकूं इच्छितों, 'स्नायू' नव्हे.

जॉन्सन म्हणाले, "संरक्षण यंत्रणा मेदोवृद्धीनें ग्रासलेल्या आहेत हें खरें आहे. शरीराप्रमाणें बुद्धीवरहि मेदाचें पुट चढलेलें आहे. हा बौद्धिक मेद जाळून टाकण्याची मला अधिक तळमळ आहे.

"आपल्या लष्करी यंत्रणेच्या सामर्थ्याचें वस्तुनिष्ठ मूल्यमापन योग्य अधिकारी व्यक्तींनीं करण्याची वेळ आलेली आहे असें मला ठामपणें वाटतें. पण हें पूर्वग्रहदूषित दृष्टीनें किंवा क्षुद्र सूडबुद्धीनें करतां कामा नये. ह्या राष्ट्राच्या वैज्ञानिक आणि तांत्रिक सुप्त सामर्थ्याचा पुरेपूर उपयोग करण्याच्या इच्छेनें हें केलें गेलें पाहिजे.

"त्याशिवाय, अत्यावश्यक साहित्याचा साठा करण्याच्या कार्यक्रमाची देखील तपासणी झाली पाहिजे. म्हणजे ऐन वेळीं अत्यावश्यक सामग्रीची टंचाई आढळून येऊन जी बिकट परिस्थिति समोर उभी राहील ती टाळतां येईल.

"त्याचप्रमाणें सैनिकांच्या घरांची परिस्थिति आणि सैनिकांच्या प्रश्नांशीं संलग्न असणाऱ्या अन्य गोष्टी ह्याहि तपासून पहाण्याची आवश्यकता आहे. तसें करण्याचा उद्देश, सैनिकांच्या नीतिधैर्याची पातळी घसरूं नये, त्यांची कार्यक्षमता कमी होऊं नये हा आहे. आज व्यक्तिशः आणि संघशः जास्तींत जास्त प्रयत्नांची आपणा सर्वांकडून अपेक्षा आहे. अशा काळांत सैनिकांचें नीतिधैर्य आणि कार्यक्षमता कमी होतां कामा नये.

"आपल्याला एक गोष्ट जास्त अनुकूल आहे. आपल्या देशांत दीर्घकालापासून सार्वत्रिक शिक्षणाचा प्रसार झालेला आहे. त्यामुळें सर्व जगांत आपल्यापाशीं सुबुद्ध, जागृत मनुष्यबळ जास्त आहे. आपलें स्वातंत्र्य हीहि एक आणखी अनुकूल परिस्थिति आहे. स्वातंत्र्यामुळें आपण आपल्या नागरिकांच्या बुद्धीचा आणि ज्ञानाचा पुरेपूर उपयोग करून घेण्यास समर्थ आहों.

"हा आपल्या सामर्थ्याचा प्रचंड झरा आहे. शासनाच्या इतर क्षेत्रांत आणि लष्करांत ह्या सामर्थ्याचा उपयोग आपण केला पाहिजे.

"अण्वस्त्रांच्या मिरासदारीच्या संरक्षणाखालीं आपण पांच वर्षें जगापासून अलिप्त असल्यासारखे राहिलों. युद्धाच्या ताणामुळें आपण शिणलों

होतों. संघर्षाचा आपल्याला वीट आला होता. सुरक्षिततेपेक्षां आपल्या सुखसोयींकडे अधिक लक्ष देण्यांत राष्ट्राची शक्ति आणि वृद्धि आपण खर्ची घालीत आलों.

" ही वस्तुस्थिति आपल्या परराष्ट्रीय धोरणाच्या संदर्भांत आहे, देशांतर्गत धोरणें आखण्याच्या बाबतींतहि आहे आणि लष्करी यंत्रणेच्या कारभाराच्या संदर्भांतहि आहे.

" पण आतां ही आपली अलिप्तता संपुष्टांत आलेली आहे.

" आतां गलथानपणा, जडता ह्या गोष्टी परवडणार नाहींत.

" आतां आपण स्वतःलाच आव्हान दिलें पाहिजे – आणि अशा आव्हानांतच आपल्याला जगाच्या विमोचनाचा मार्ग सांपडेल.

" वस्तुस्थिति अत्यंत गंभीर आहे, पण आपण तिला तोंड दिलें पाहिजे. आपण आपलें अस्तित्व करें टिकवावयाचें ह्या समस्येचें उत्तर वस्तुस्थितीला समचित्त वृत्तीनें तोंड दिल्यानेंच सांपडेल.

" हा क्षण कांहीं आपल्या राष्ट्राच्या इतिहासांतील सर्वांत काळाकुट्ट क्षण नव्हे. पण ह्या क्षणाच्या आव्हानानें आमच्या कल्पनाशक्तीला चेतना मिळेल आणि आमच्या संशोधनक्षमतेला प्रेरणा मिळाली तर आम्ही संस्कृतीचा अत्यंत उज्ज्वल काळ बघूं शकूं.

" जोंपर्यंत आम्ही प्रत्यक्ष आशा जिवंत ठेवूं तोंपर्यंत आम्हांला आशा आहे, जगालाहि आशा आहे. "

ह्या भाषणाकडे साऱ्या राष्ट्राचें लक्ष वेधलें गेलें. राष्ट्रीय सुरक्षिततेच्या प्रश्नावरील सेनेटचे मार्गदर्शक हें स्थान जॉन्सन ह्यांना अल्पकाळांत प्राप्त झालें, त्याला हें त्यांचें भाषण पुष्कळच कारणीभूत झालें.

जॉन्सन ह्यांच्या त्या भाषणानंतर चारच महिन्यांनीं उत्तर कोरियांतील कम्युनिस्टांनीं दक्षिणेच्या रोखानें आक्रमण केलें. दक्षिण कोरियांतील संयुक्त राष्ट्रांच्या दलांच्या साह्याला युनायटेड स्टेट्स्चीं लढाऊ दलें रवाना करण्याचा आदेश राष्ट्राध्यक्ष ट्रुमन ह्यांनीं दिला.

'आवश्यक आणि प्रशंसनीय' ह्या शब्दांत जॉन्सन ह्यांनीं राष्ट्राध्यक्षांच्या कृतीचा गौरव केला. ते म्हणाले, " ह्या कृतीमुळें स्वातंत्र्य ह्या शब्दाला

नवा आणि उदात्त अर्थ प्राप्त झालेला आहे. राष्ट्राचा निर्धार आणि निश्चय ह्यांना उद्दिष्टाची जोड मिळाली आहे. जागतिक नेतृत्वाची अमेरिकेची पात्रता निर्विवादपणें सिद्ध झाली आहे."

त्यानंतरच्या काळांत जॉन्सन ह्यांचा लक्षवेधी आवाज सेनेटच्या सभागृहांत वारंवार ऐकूं येऊं लागला.

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या कोरियांतील दलांचें संख्यावल शत्रूच्या मानानें अत्यंत कमी आहे, ह्या गोष्टीकडे त्यांनीं राष्ट्राचें लक्ष वेधलें.

कोरियांतील कामगिरीसाठीं उपलब्ध असणारी अमेरिकन लष्करी सामग्री संख्यात्मक दृष्टीनें अपुरी आहे आणि पाहिजे तशी नाहीं हें त्यांनीं स्पष्ट शब्दांत सांगितलें.

दक्षिण कोरियाला पुरवठा करण्याचा प्रश्न अत्यंत प्रचंड आहे आणि ती परिस्थिति सुधारण्याची आशा अत्यल्प आहे ह्या दुहेरी वस्तुस्थितीकडे त्यांनीं राष्ट्राचें लक्ष वेधलें.

सेनेटमधील एका भाषणांत जॉन्सन ह्यांनीं बजावलें, "आमच्या कृतींत अति धीमेपणा असतां कामा नये, अति सावधगिरी असतां कामा नये, मागें पिछाडीला असणाऱ्यांच्या सुखसोयींचा फार विचार त्या कृतीमागें असतां कामा नये. स्वस्थ बसून, आमचें सामर्थ्य विलंबामुळें, पराभवामुळें, माघारीमुळें, खच्ची होत असलेलें आम्ही ह्यापुढें पाहूं शकत नाहीं."

ताबडतोब करण्यासाठीं तीन उपाययोजना त्यांनीं सुचविल्या : जागतिक स्वरूपाची दूरगामी रणनीति विकसित केली पाहिजे; उपलब्ध मनुष्यबळाची तांतडीनें सुसंघटना केली पाहिजे; अमेरिकन अर्थव्यवस्था तांतडीनें सुसंघटित केली पाहिजे.

कोरियांतील संघर्षाबद्दल सरकारला दोष देण्याचें बंद करा, असेंहि आवाहन त्यांनीं केलें. ते म्हणाले, "कोरियांतील आक्रमणाला जबाबदार कम्युनिस्ट आहेत; राष्ट्राध्यक्ष ट्रूमन नव्हेत. आमच्याच नेत्यांविरुद्ध शरसंधान करण्याचें सोडून आम्ही जितक्या लौकर आमचा मोर्चा शत्रूकडे वळवूं तितक्या लौकर आमचा हेतु फत्ते होईल."

१९५० च्या जुलैच्या उत्तरार्धांत जॉन्सन ह्यांनीं सेनेटमध्यें एक ठराव मांडला. सेनेटनें तो अविलंबें मंजूर केला. त्या ठरावान्वयें सेनेटच्या आर्मड्

सर्व्हिसेस कमिटीची सुसज्जता चौकशी उपसमिती नेमण्यांत आली. ह्या उपसमितीचे अध्यक्ष म्हणून जॉन्सन ह्यांची नेमणूक झाली. त्यांनीं तावडतोब चौकशीच्या कामाला हात घातला. उपसमितीच्या कार्यामुळें त्या आणी-बाणीच्या काळांत लष्करी यंत्रणा भक्कम बनलीच, पण त्याचबरोबर अमेरिकन करदात्यांच्या कित्येक अब्ज डॉलरची बचत झाली.

१९४१ सालीं हॅरी ट्रुमन हे सेनेटर असतांना त्यांच्या अध्यक्षत्वाखालीं संरक्षण चौकशी समिती नेमण्यांत आली होती. वरील उपसमिती तिचीच वारस होती असें म्हणणेंच रास्त होईल. युद्धकाळांत ट्रूमन ह्यांच्या समितीनें संरक्षण खात्यावर देखरेख ठेवण्याचें परिणामकारक काम बजावलें होतें. त्या कामामुळेंच ट्रुमनना उपराष्ट्राध्यक्षपदाचा लाभ झाला असें म्हणायला हरकत नाहीं.

नव्या उपसमितीच्या सभासदांनीं व्हाईट हाऊसमध्यें राष्ट्राध्यक्ष ट्रुमन ह्यांची भेट घेतली. उपसमितीनें योजलेल्या प्रयत्नांना त्यांचा पाठिंवा लाभावा आणि त्यांच्या मागील अनुभवाचा मार्गदर्शक लाभ मिळावा ह्या हेतूनें ही मुलाखत घेण्यांत आलेली होती. ट्रुमननीं उपसमितीच्या सभासदांचें हार्दिक स्वागत केलें आणि अंमलबजावणी खात्याचें संपूर्ण सहकार्य उपसमितीला मिळेल असें आश्वासन दिलें. ही वैठक संपल्यावर त्यांनीं जॉन्सन ह्यांना एकट्याला खास मुलाखतीसाठीं वोलावून घेतलें.

त्यावेळीं ट्रुमन म्हणाले, "सर्वात महत्त्वाची एकच गोष्ट लक्षांत ठेवा. आणि ती म्हणजे, तुमच्या समितीवरील अल्पमतवाल्या पक्षाच्या प्रति-निधींचा तुम्हांला पाठिंबा आहे अशी खात्री करून घ्या. समितीचें काम परिणामकारक व्हावयाचें असेल तर संपूर्ण पक्षातीत किंवा उभयपक्षी एक-मताच्या वातावरणांत तें काम झालें पाहिजे."

त्या उपसमितीचे सभासद जॉन्सन ह्यांच्याखेरीज पुढीलप्रमाणें होते : टेनेसीचे इस्टेस कीफॉवर, केंटकीचे व्हर्जिल चॅपमन व वायोमिंगचे लेस्टर हंट हे तिघे डेमोक्रॅटिक पक्षाचे होते; तर रिपब्लिक पक्षातर्फे न्यू हॅम्प-शायरचे स्टाइल्स ब्रिजेस, ऑरेगॉनचे वायने मोर्स आणि मासाच्युसेट्स्चे लेव्हरेट साल्टनस्टॉल हे तिघे होते.

युनायटेड स्टेट्स्चें सेनेट म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्यवाद्यांचा आखाडा; पण तिथेंहि इतक्या परस्परविरोधी प्रवृत्तींच्या व्यक्तींचा मेळावा दिसणार नाहीं. उपसमितीचे सातहि सभासद आपापल्या परीनें कणखर व्यक्तिमत्त्व असलेले होते. प्रत्येकाचें भिन्नभिन्न राजकीय तत्त्वज्ञान होतें. पण अशा व्यक्तींच्या बनलेल्या त्या उपसमितीनें दोन वर्षांत सादर केलेल्या चव्वेचाळीस अहवालां-पैकीं प्रत्येक अहवाल एकमतानें मंजूर झालेला होता. आणि त्या अहवालां-तील कांहीं प्रश्न तर अत्यंत विवाद्य होते. लोकांबरोबर राहून त्यांच्यांत एकमत कसें घडवून आणावें ही कला लिंडन जॉन्सन ह्यांनीं चांगलीच आत्मसात् केलेली होती.

त्या उपसमितीच्या पहिल्याच बैठकींत अध्यक्षांनीं समितीच्या कामाचीं चार मार्गदर्शक सूत्रें नमूद केलीं.

खळबळजनक बातम्यांत झळकण्याची धडपड सभासदांनीं करावयाची नाहीं—खळबळजनक गोष्टींचा स्वत:च्या प्रसिद्धीसाठीं उपयोग करण्याऐवजीं कांहींतरी विधायक निर्माण करावयाचें.

सभासदांनीं पक्षातीत रहावयाचें. ‘राजकारण समितीच्या बैठकीच्या दरवाजाबाहेर सोडूनच’ आंत यावयाचें.

समितीचें काम, सेनाप्रमुख आणि आरमारप्रमुख व विमानदलप्रमुख ह्यांना लढाई कशी करावी ह्याचें मार्गदर्शन करणें हें नसून, लष्कराच्या प्रमुखांना आणि त्यांच्या नेतृत्वाखालीं लढणाऱ्या सैनिकांना विजयसंपादना-साठीं जें हवें तें उपलब्ध होईल ह्याची हमी निर्माण करणें हें समितीचें काम आहे. म्हणून रणनीतीसंबंधीं रिकामा सल्ला देण्याचें टाळावयाचें.

सर्व प्रकारच्या चौकशीच्या कामांत आणि शिफारशी करण्यांत नि:स्पृह, नि:पक्षपाती आणि सुस्पष्ट मतप्रदर्शन करावयाचें.

अशा उच्च कसोट्या समितीनें आपल्या कार्यासाठीं ठेवल्या आणि त्या कसोट्यांना कांटेकोरपणें उतरेल अशा पद्धतीनें समितीनें काम केलें. ‘सुस्पष्ट पण अन्यायकारक नव्हे, पोटतिडिकेचें पण पिच्छा पुरविण्याच्या वृत्तीचें नव्हे, उपकारक पण दुराग्रही नव्हे’ असें धोरण समितीच्या कामाचें राहील, हा दंडक जॉन्सन ह्यांनीं घालून दिला.

आपल्या उपसमितीवरील सहकाऱ्यांना त्यांनीं सांगितलें, " कल्पनाशक्ति आणि कौशल्य ह्यांच्या रक्तवाहिन्या पोंचट बनण्यापासून संरक्षण प्रयत्नांना मुक्त ठेवणें हें आपलें मोठें काम आहे. "

उपसमितीनें प्रारंभींच सल्लागार म्हणून एका प्रख्यात कायदेपंडिताचें साह्य संपादन करण्यांत यश मिळविलें. प्रतिनिधिसभेच्या नेव्हल अफेअर्स कमिटीनें नेमलेल्या चौकशी समितीचे जॉन्सन अध्यक्ष असतांना मुख्य सल्लागार असणारे डोनाल्ड सी. कूक हे ते कायदेपंडित होत. त्यावेळीं ते सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज कमिशनचे उपाध्यक्ष होते. नंतरच्या काळांत अध्यक्षपदीं त्यांची बढती झाली. कूक ह्यांनीं जॉन्सन ह्यांच्या विनंतीवरून समितीचें काम विनामोबदला करण्याचें मान्य केलें. अर्थात् हें काम ते 'अर्ध-वेळ' तत्त्वावर रात्रीं व सुटीच्या दिवशीं करणार होते. सल्लागार व मार्ग-दर्शक ही त्यांची भूमिका होती. उपसमितीचें कार्य यशस्वी होण्याच्या दृष्टीनें, कूक ह्यांची उत्कृष्ट सल्लामसलत फारच महत्त्वाची ठरली.

जॉन्सन आणि कूक ह्यांनीं चौकशी अधिकारी नेमून त्यांना त्यांचें काम समजावून दिलें.

तें काम म्हणजे दोन अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी होत. प्रथम, मनुष्य-बळाच्या प्रश्नाचा अभ्यास करावयाचा होता. शेतकी आणि उद्योगधंदे ह्यांना हानि न पोहोंचतां प्रचंड सैन्य उभें करण्याच्या दृष्टीनें राष्ट्राची जास्तींत जास्त क्षमता किती आहे हें जोखणें असा ह्या पहिल्या चौकशीचा हेतु होता. लढाऊ दलांना तोफा, रणगाडे आणि इतर साहित्य पुरविण्यासाठीं काँग्रेसनें उद्योगधंद्यांचा जो संघटित कार्यक्रम मंजूर केला होता तो काटेकोरपणें पार पाडला जात आहे कीं नाहीं ह्याची पहाणी करणें हें दुसरें महत्त्वाचें काम होतें.

पहिल्यांदा चौकशी-पाहणीसाठीं कृत्रिम रबर-उत्पादनाच्या कार्यक्रमाकडे नजर वळविण्यांत आली. कृत्रिम रबराच्या उत्पादनाचा हा उद्योग मुख्यत: युद्धकाळांत विकसित झाला आणि त्या काळांत अत्यंत उपयुक्त ठरला होता. पण युद्ध संपतांच त्या उद्योगाची शोचनीय विघटना झालेली होती. कांहीं कारखाने विकून वा मोडून टाकण्यांत आले होते. त्यामुळें देशापुढें रबराच्या टंचाईचें संकट डोकावत होतें व नैसर्गिक रबराचे भाव सतत वाढत होते.

रबराचा सांठा करण्याचें कार्य वेगानें करण्याऐवजीं गोगलगायीच्या गतीनें चालविल्याबद्दल उपसमितीनें आपल्या अहवालांत म्युनिशन बोर्डावर ताशेरे ओढले होते. उपसमितीच्या चौकशी अधिकाऱ्यांशीं बोर्डानें सहकार्य करण्याचें टाळलें अशी टीकाहि अहवालांत होती. उपसमितीनें कांहीं महत्त्वाची आणि निकडीची माहिती मागविली असतां म्युनिशन बोर्डानें तीन आठवडेपर्यंत उत्तरहि पाठविलें नव्हतें.

त्या अहवालांत म्हटलें होतें, " म्युनिशन बोर्डाचा कांहीं कार्यक्रम असायला हवा–किंवा कदाचित् नसलाहि पाहिजे. असेल तर तो सहज सांगतां येऊं शकेल. नसेल तर तशी प्रांजल कबुली दिली जावी. कांहीं असो, पण आमच्या विचारणांची दाद घेण्याच्या बाबतींत म्युनिशन बोर्डानें दाखविलेला तत्परतेचा अभाव हेंच जर त्याच्या अन्य कर्तव्यांच्या बाबतींत गमक असेल तर बोर्डाच्या कार्यक्षमतेंत मोठीच कमतरता आहे असें म्हणावें लागेल. "

उपसमितीच्या ह्या प्राथमिक सुस्पष्ट अहवालाचे ताबडतोब तीन परिणाम दिसून आले :

म्युनिशन बोर्डाचे अध्यक्ष हर्बर्ट बी. हॉवर्ड ह्यांनीं एकाएकीं राजीनामा दिला.

रबर कारखाने जादा मालमत्ता म्हणून विकण्याचें ताबडतोब थांबवावें, सर्व उपलब्ध रबर कारखान्यांत पुन: शक्य तितक्या लौकर पूर्ण उत्पादन सुरू करावें, ह्यापुढें युनायटेड स्टेट्स् भरमसाट भावानें नैसर्गिक रबर न घेतां कृत्रिम रबर-उत्पादनाच्या द्वारें घरच्या घरीं तें मिळवील असें जाहीर करावें, ह्या उपसमितीच्या शिफारशी नॅशनल सिक्युरिटीज रिसोर्सेस बोर्डानें स्वीकारल्या. त्या शिफारशींवर आधारलेला कार्यक्रम अंमलबजावणी शाखेनें मंजूर केला. त्यामुळें अमेरिकन करदात्यांचे पन्नास कोटि डॉलर वांचले.

तिसरा परिणाम हा झाला कीं, उपसमिती आणि तिचे अध्यक्ष ह्यांना साऱ्या देशांतील वृत्तपत्रांमधून पहिल्या पानावरील बातम्यांमध्यें स्थान मिळूं लागलें.

कोरियांतील संयुक्त राष्ट्र संघटनेचें सैन्य म्हणजे बहुतेक अमेरिकन सैन्यच होतें. ह्या सैन्याला पराभव खावे लागत होते. देशांत लोक अस्वस्थ होत होते, लढाईचें वळण बघून प्रक्षुब्ध होत होते. अशा वेळीं त्यांच्याशीं सहमत असणारा युनायटेड स्टेट्स्च्या सेनेटचा हा सभासद

लोकांच्या भावनाच बोलून दाखवीत होता. लोकांना परिस्थितीबद्दलचे असलेले संशय खरे असल्याचें सांगत होता. लढवय्यांना साह्यभूत होण्या-ऐवजीं नोकरशाही त्यांचा मार्ग रोखीत आहे हीच जनतेची तक्रार बोलून दाखवीत होता.

जॉन्सन ह्यांच्या एका अहवालांत वापरलेल्या भाषेसारखी भाषा लोकांना समजत होती, तसल्या भाषेचें ते हार्दिक स्वागत करीत होते. जॉन्सन ह्यांनीं आपल्या एका प्रारंभींच्या अहवालांत म्हटलें होतें, " वॉशिंग्टनच्या बजबज-पुरींत अनेक अधिकाऱ्यांनीं स्वतःचीं साम्राज्यें उभारलीं आहेत. आपल्या साम्राज्याची एवढीशीहि भूमि ते सोडायला तयार नाहींत. परिणामीं नुकसान होत आहे करदात्या जनतेचें. एका माणसाच्या कामासाठीं दोन माणसांना पगार मोजावा लागत आहे तो करदात्याला. ह्यापेक्षांहि शोचनीय गोष्ट अशी कीं जें काम करण्याची मुळींच जरुरी नाहीं त्या कामासाठींहि आपण दोन माणसांना पगार मोजतों, हा साक्षात्कार करदात्याला घडत आहे. "

जॉन्सन ह्यांनीं जाहीर केलें होतें कीं, आपली उपसमिती झगमगीत प्रसिद्धीच्या मागें धांवणार नाहीं. पण तसें धांवण्याची आवश्यकताच नव्हती. त्या उपसमितीच्या चौकशी-पाहणी अधिकाऱ्यांनीं उजेडांत आणलेली माहिती, जाहीर चौकशीच्या वेळीं उपसमितीच्या अध्यक्षांनीं साक्षीदारांवर केलेला खोंचक सवालांचा अखंड मारा ह्या गोष्टीच मुळीं वृत्तपत्रांतील ठळक बातम्यांचा कच्चा मसाला होता.

तथापि उपसमितीच्या कार्यक्रमाची दृश्य फलश्रुति एवढीच नव्हती. सर्वांत महत्त्वाची गोष्ट ही कीं, तिच्या कामाचें जें उद्दिष्ट होतें तें साध्य होत होतें.

उपसमितीच्या एका अहवालांत असें दाखवून देण्यांत आलें होतें कीं, जस्ताच्या व्यापाऱ्यांनीं किंमतीसंबंधांत ठकबाजी चालविलेली असल्यामुळें संरक्षण कार्यक्रमाचा खर्च प्रचंड प्रमाणांत वाढत आहे. हा प्रकार थांबवितांच पन्नास कोटि डॉलरची बचत झाली.

दुसऱ्या एका चौकशींत उघडकीस आलें कीं, महत्त्वाच्या मनुष्यबळाचा विमानदलांत अपव्यय चालू आहे. कांहीं तळांवर जास्तींत जास्त लोक

विनाकारण अडकवून ठेवण्याच्या वृत्तीचा हा परिणाम होता. अहवालांतील शिफारशींना अनुसरून, कोणत्याहि तळावर जादा गर्दी होणार नाहीं अशी समतोल वांटणीची व्यवस्था विमानदलानें तावडतोब केली.

गोल्फ खेळण्याचें साहित्य देण्याच्या कामावर लष्करांत स्टाफ सार्जंट नेमले जातात, तरबेज वैमानिकांना डाक कचेऱ्यांत कामें करावीं लागतात, निष्णात अशा रणगाड्यांच्या यंत्रज्ञांना राखीव रणगाडा पथकांत नेमलें जातें, पण त्या पथकांत रणगाडेच नसतात. अशा अनेक गोष्टी जॉन्सन ह्यांच्या नजरेस आल्या. ह्या अपव्ययाकडे उपसमितीनें लक्ष वेधल्यानंतर लष्कराच्या चीफ ऑफ स्टाफला असें आढळून आलें कीं, जादा मनुष्यबळ भरती न करतां दोन जादा लढाऊ सैन्यविभाग सहज उभारतां येतील.

लष्करांतील सैनिकांच्या कुटुंबियांना राहण्यासाठीं चांगलीं घरें नसल्यामुळें त्यांना कशा शोचनीय अवस्थेंत राहावें लागतें ह्या गोष्टीवर दोन अहवालांमध्यें प्रकाश पाडलेला होता. आर्थिक परिस्थितीमुळें अनेकांना प्रचंड खोक्यांचा उपयोग घर म्हणून करावा लागत होता. कांहीं कुटुंबें खेचरांसाठीं असलेल्या गोठ्यांमध्यें, हत्यारांसाठीं असलेल्या वळदांमध्यें राहात असत. एक ' घर ' तर व्हिस्कीच्या रिकाम्या बाटल्या आणि रिकामे जुने डबे ह्यांच्या साह्यानें उभारण्यांत आलेलें होतें. अहवाल जाहीर होतांच लष्करानें चांगलीं घरें उपलब्ध करून देण्याचा कार्यक्रम हातीं घेतला.

एका विमानदलाच्या तळानजीक जुगारी अड्डे चालू होते. दलांतील लोकांना हे जुगारी अड्डे मोठ्या प्रमाणावर लुबाडीत होते. एका अहवालांत ही गोष्ट उघडकीस आणण्यांत येतांच स्थानिक अधिकाऱ्यांनीं हे अड्डे बंद पाडले.

खुद्द जॉन्सन ह्यांच्या टेक्सस राज्यांत चौकशी अधिकाऱ्यांना असें आढळून आलें कीं, १२०००० डॉलर किंमतीचे विमानांचे सुटे भाग एका शेतकऱ्यानें केवळ ६.८९ डॉलरला खरेदी करून नंतर तोच माल सरकारला ६३००० डॉलरला विकला होता. हा सारा व्यवहार बेकायदा मुळींच नव्हता. जॉन्सन ह्यांच्या शब्दांत सांगायचें म्हणजे हा, " दूरदृष्टीच्या अभावाचा थक्क करून सोडणारा प्रकार " होता. कोरियांतील संघर्ष सुरू झाल्यानंतरहि संरक्षण खात्याच्या अधिकाऱ्यांनीं विमानाचीं इंजिनेंच काय पण

युद्धोत्पादक कारखान्यांची यंत्रसामग्रीहि 'जादा' सामग्री म्हणून विकली असा जो आरोप जॉन्सन करीत असत त्याचाच पुरावा म्हणजे वरील प्रकार होय. जॉन्सन ह्यांच्या उपसमितीची चौकशी सुरू झाल्यानंतर असले प्रकार थांबले.

उपसमितीच्या कामाबद्दल 'पेंटॅगॉन'† मधील वरिष्ठ अधिकारी कांहीं वेळां टीका करीत असत. पण जॉन्सन ह्यांना एकंदरींत असें आढळून आलें कीं, वस्तुस्थितीवर आधारलेल्या शिफारशींचा स्वीकार करून उणीवा दूर करण्याला लष्करी दलें खुषीनें तयार असत. चोख, न्याय्य कारभार आणि ज्या उद्देशानें उपसमितीची स्थापना करण्यांत आली त्या उद्देशाचें काटेकोर पालन ह्या गोष्टींमुळें उपसमितीनें सर्वांचा आदरच संपादिला.

अनेकदां, उपसमिती चौकशी करणार असें दिसतांच सदोष परिस्थितींत तांतडीनें सुधारणा होऊं शकत असत. उदाहरणार्थ, जॉन्सन ह्यांचा विमान-दलांतील हातमोज्यांच्या पुरवठ्याच्या प्रश्नाची चौकशी करण्याचा विचार आहे–फक्त, विचार आहे, अशी बातमी प्रसृत होतांच विमानदलानें नोंदविलेली १६५०००० डॉलर किंमतीच्या पांढऱ्या हातमोज्यांची मागणी एकाएकीं रद्द करण्यांत आली.

आर्थिक दृष्ट्या बघितल्यास सरकारनें ह्या उपसमितीवर केलेला खर्च किफायतशीरच ठरला. त्या उपसमितीच्या कार्यामुळें कराच्या उत्पन्नापैकीं तीन ते पांच अब्ज डॉलर वांचले असें विविध अंदाजांवरून दिसून येतें. आणि समितीचें काम जुलै १९५० ते फेब्रुआरी १९५३ पर्यंत चाललें त्या अवधींत पगार आणि अन्य खर्च २७५००० डॉलरपेक्षां कमीच झाला.

ही कर्तबगारी, जॉन्सन ह्यांच्या दृष्टीनें समाधानकारक होती.

उपसमितीचे अध्यक्ष ह्या नात्यानें आणि सेनेटर ह्या नात्यानें 'सुखासीन स्वास्थ्यवादी मनोवृत्ती' विरुद्ध जॉन्सन ह्यांचें शरसंधान ह्या कालावधींत चालूच होतें, एकूण जागतिक परिस्थितीच्या आणि विशेषतः कोरियांतील युद्धाच्या संदर्भात त्यांची टीका अखंड चालूच होती.

कोरियाच्या पठारावर चाललेल्या युद्धांत चीन उतरल्यानंतर, १९५० च्या डिसेंबरमध्यें केलेल्या एका भाषणांत ते म्हणाले, "युद्ध सुरू झाल्या-पासूनच्या सहा महिन्यांच्या कालावधींत मोठा भुर्दंड आपल्याला द्यावा

---

† अमेरिकन लढाऊ दलांची वॉशिंग्टन येथील मुख्य कचेरी

लागलेला आहे. पण त्या कालावधींत सरकारचें नियोजन आणि कृति, 'आजचा दिवस पार पडला, उद्याचें बघूं !' ह्याच पायावर आधारल्याचें दिसून येत होतें. स्वतःला वचनबद्ध होऊं द्यावयाचेंच नाहीं ह्याच धोरणाला जणुं आम्ही वचनबद्ध आहोंत. ह्याचा परिणाम काय झाला ? आम्ही बचावा-साठीं लष्करी भिंत उभी करण्याऐवजीं बारीक तारांचें कुंपण उभारलें आहे."

सेनेटच्या सभागृहांतील आपल्या मेजामागें ताठ उभे राहात त्यांनीं सवाल केला, " हा आमचा अखेरचा क्षण आहे काय ?

" हा क्षण आमच्या राष्ट्राच्या संधिकालाचा आहे काय ? प्रकाश जाण्यापूर्वीची ही शेवटची घटका आहे काय ? त्यानंतर आम्हांला आणि साऱ्या पश्चिम युरोपला कधींहि न संपणारी रात्र ग्रासणार काय ?

" ह्या प्रश्नांचें होकारार्थी वा नकारार्थी उत्तर आम्ही अजून देऊं शकतों.

" आम्ही आणखी विलंब करणार असूं तर अंधकार, पराभव आणि दैन्य ह्यापेक्षां निराळ्या कशाचीहि अपेक्षा करूं शकत नाहीं."

ज्याला सरकारी नांव 'पोलिस कृति' असें देण्यांत आलें होतें त्या कोरियांतील युद्धाच्या अत्यंत निराशेच्या काळांत जॉन्सन कडक शब्दांत सतत इशारा देत होते कीं, पडखाऊ तडजोड-वृत्ति आणि भ्याडपणा, चंचलता आणि तात्पुरती सोय बघण्याची वृत्ति ह्याचा परिणाम पराजय, अवहेलना आणि विनाश ह्यांतच होणार.

विजयासाठीं राष्ट्राचा निर्धार पाहिजे, असें सतत आवाहन ते युनायटेड स्टेट्स्चे सेनेटर ह्या नात्यानें करीत होते.

सज्जता चौकशी-पाहणी उपसमितीचे अध्यक्ष ह्या नात्यानें, त्यांनीं, अपव्ययाविरुद्ध झगडून आणि राष्ट्राचें मनुष्यबळ व औद्योगिक सामर्थ्य ह्यांचा पुरेपूर उपयोग व्हावा म्हणून कसून प्रयत्न करून, विजयाचा मार्ग मोकळा होण्याला हातभार लावला.

त्या तीन वर्षांत लिंडन जॉन्सन ह्यांनीं केलेलें कार्य युनायटेड स्टेट्स्च्या दृष्टीनें आत्यंतिक मोलाचें होतें. ज्या लाखों अमेरिकनांना त्यांचें नांवहि ठाऊक नव्हतें त्यांच्यापर्यंत त्यांचें नांव जाऊन पोहोंचलें. आणि त्यापेक्षांहि फार महत्त्वाची गोष्ट ही कीं, सेनेटच्या अत्यंत वजनदार सभासदांपैकीं कांहीं जणांची चिर-मैत्री आणि चिर-आदर त्यांनीं संपादन केला.

# ८

टेक्ससचें प्रतिनिधित्व करणाऱ्या त्या सेनेटरचें महत्त्व आणि वजन राष्ट्रीय राजकारणांत वाढत होतें त्याच कालावधींत, जॉन्सन हे डेमोक्रॅटिक पक्षासाठींहि एक अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण भूमिका वजावीत होते. कांग्रेसच्या १९५१ सालच्या अधिवेशनाच्या सुरुवातीलाच सेनेटमधील डेमोक्रॅटिक पक्षाच्या सभासदांनीं त्यांची आपल्या बहुमतवाल्या पक्षाचा प्रतोद म्हणून निवड केली होती.

सेनेटमधील पक्षप्रतोदाचें काम जितकें महत्त्वाचें तितकेंच कष्टाचें असतें. मतदानाची वेळ येईल त्यावेळीं पक्षाचे सभासद मतें नोंदण्यासाठीं चटकन् हाताशीं असतील अशी दक्षता ठेवणें ही त्याची मुख्य जबाबदारी असते. सेनेटच्या सभागृहांतील कामाव्यतिरिक्त सेनेटरांना इतर अनेक कामें करावीं लागतात. त्यामुळें एकाद्या विधेयकावर मतदान होण्याची वेळ जवळ येत आहे असें दिसतांच त्यांना असतील तिथून धुंडाळून काढून सभागृहांत उपस्थिति आवश्यक असल्याची वर्दी त्यांना द्यावी लागते.

पक्षाचा प्रतोद तरुण, कार्योत्साही, सभासदप्रिय असावा लागतो. तारुण्य आणि कार्योत्साह आवश्यक असण्याचें कारण असें कीं, प्रतोदाचें काम शारीरिक कष्टाचेंहि असतें. आपल्या जागेवर त्याला नेहमीं दक्ष राहावें लागतें, मग सेनेटची बैठक रात्रीं कितीहि उशीरापर्यंत चालो. त्याला केवळ धांवाधावच किती तरी करावी लागते. आणि तो सभासदांत लोकप्रिय असणें ही मुख्य कसोटी असण्याचें कारण असें कीं, त्यानें सांगतांच सभासदांना सभागृहांत उपस्थित राहावेंसें वाटलें पाहिजे. अनेकदां हातचें काम टाकून सभागृहांत मतदानाला जाण्यासाठीं सभासद नाखुष असतात.

१००७२ चरित्र
९२६० २८।१४५५

जॉन्सनपाशीं वरील तीनहि गोष्टी होत्या. ट्रुमन ह्यांचें सरकार खुद्द पक्ष-सभासदांचा पाठिंबा गमावीत होतें आणि सर्वसाधारण अमेरिकन जनतेंतहि अप्रिय होत होतें अशा काळांत डेमोक्रॅटिक पक्षाचे प्रतोद म्हणून जॉन्सन ह्यांनीं डोळ्यांत भरण्यासारखी कामगिरी करून दाखविली.

ह्या कामामुळें सेनेटमधील डेमोक्रॅटिक पक्षांतील अत्यंत महत्त्वाच्या नेत्यांशीं त्यांचा दैनंदिन संपर्क साधत असे.

मतदानासाठीं सभासदांना सभागृहांत आणण्याच्या कामाव्यतिरिक्त प्रतोदाला पक्षनेत्याशीं सतत संबंध ठेवणें आवश्यक असतें. आवश्यक तेव्हां पक्षनेत्याची जबाबदारीहि पार पाडावी लागते. जॉन्सन ह्यांची प्रतोद म्हणून निवड झाली त्यावेळीं बहुमतवाल्या डेमोक्रॅटिक पक्षाचे नेते ॲरिझोनाचे अर्नेस्ट मॅक्फर्लंड हे होते. मॅक्फर्लंड ह्यांच्याबरोबर जॉन्सन गुण्यागोविंदानें काम करूं शकत असत. आणि कामहि चोखपणें होत असे. दोन्ही माणसें पक्षीय प्रश्नावर मध्यममार्गी होतीं. दुसऱ्याला आपलेसें करणारें व्यक्तित्व दोघांपाशींहि होतें.

प्रतोद होतांच, जॉन्सन आपोआप डेमोक्रॅटिक पक्षाच्या मार्गदर्शक समितीचे आणि धोरण समितीचे सदस्य बनले. सेनेटमधील स्थायी समित्यांना पक्षाचें कार्य नेमून देणें हें मार्गदर्शक समितीचें काम असतें. धोरण समिती, नांवाप्रमाणेंच सेनेटपुढें येणाऱ्या महत्त्वाच्या प्रश्नांबाबत पक्षाचें धोरण निश्चित करते.

मॅक्फर्लंड आणि जॉन्सन ह्यांच्याखेरीज धोरण समितीवर पुढील सभासद होते : रसेल, चॅपमन, ऱ्होड आयलंडचे थिओडॉर फ्रान्सिस ग्रीन, ॲलबॅमाचे लिस्टर हिल, कानेटिकटचे ब्रायन मॅकमोहन; वायोमिंगचे जोसेफ सी. ओ'माहोनी आणि ओल्काहोमाचे रॉबर्ट कार. रॉबर्ट कार हे १९४९ सालींच सेनेटवर निवडून आलेले होते. ते वगळतां इतर सर्व सभासद वयानें आणि कार्यानें जॉन्सनपेक्षां जुने-जाणते होते. त्यांच्यापासून जॉन्सन ह्यांना शिकण्यासारखें खूप होतें.

जॉन्सन ह्यांनीं प्रतोद ह्या नात्यानें ज्या प्रकारें कामगिरी बजावली त्याबद्दल, त्यावेळीं सेनेटमधील बहुमतवाल्या पक्षाचे चिटणीस असलेले

आणि नंतर सेनेटचे चिटणीस झालेले फेल्टन 'स्कीटर' जॉन्स्टन ह्यांनीं अत्यंत प्रशंसेचे उद्गार काढलेले आहेत.

सेनेटचे एक नोकर ह्या नात्यानें १९२९ सालापासून सेनेटच्या कामाचा अनुभव जॉन्स्टन ह्यांना होता. एक संस्था म्हणून सेनेटबद्दल भरपूर ज्ञान त्यांना होतें. त्या ज्ञानाच्या आधारावरच त्यांनीं प्रशंसोद्गार काढले आहेत. जॉन्स्टन ह्यांनीं म्हटलें आहे, "जॉन्सन ह्यांच्याबरोबरचे सभासद त्यांच्याकडे, सदैव तत्परतेनें आघाडीवर राहणारा माणूस, ह्या दृष्टीनें पाहात असत. तसें असणें चांगलें, पण तें कधीं कधीं धोक्याचेंहि ठरतें. कांहीं झालें तरी सेनेटमध्यें येऊन त्यांचें नुकतेंच कुठें तिसरें वर्ष चालू होतें. तेवढ्या अल्पावधींत प्रतोद म्हणून त्यांची निवड झाली, ही प्रगति खूपच वेगवान् होती. अनेक सभासद त्यांच्यापेक्षां पांच-सहा पट काळ सेनेटमध्यें होते.

"जॉन्सन प्रत्येक पाऊल सावधगिरीनें टाकीत असत. स्वतःला पुढें रेटण्याचा प्रयत्न ते कधीं करीत नसत. ते पक्षनेत्याला पुढाकार घेऊं देत असत. आणि तेंच योग्य होतें. पण आवश्यकता असेल त्या त्यावेळीं ते पुढें हजर असत. आणि त्यावेळींहि लोकांशीं जमवून घेण्याची आणि लोकांना आपसांत जमवून घेण्याला लावण्याची अपूर्व कला त्यांच्यांत दिसून येत होती."

तो काळ जॉन्सन ह्यांची प्रतिष्ठा वाढत जाण्याचा होता, त्याचप्रमाणें त्या काळांत त्यांची बुद्धीहि परिपक्व बनली. घटनात्मक दृष्ट्या काँग्रेसच्या दोन्ही सभागृहांचा दर्जा सारखाच असला तरी ४३५ प्रतिनिधींपैकीं एक असणें आणि ९६ सेनेटरांपैकीं एक असणें ह्यांत फार मोठा फरक आहे. (सेनेटची सभासद संख्या त्यावेळीं ९६ होती) आणि जॉन्सन हे कांहीं केवळ ९६ पैकीं एक नव्हते. सेनेटमधील वरच्या पातळीवरील पक्षपुढाऱ्यांच्या बरोबरीचा दर्जा जवळ जवळ त्यांना लाभलेला होता.

प्रतिनिधिसभेंत प्रविष्ट झाल्यापासूनच जॉन्सन कोणत्याहि प्रश्नाचा धर्मयुद्ध करण्याच्या भावनेनें हिरीरीनें पाठपुरावा करीत असत. सेनेटमध्येंहि त्यांची श्रद्धा असणाऱ्या गोष्टींचा पुरस्कार ते हिरीरीनें आणि कसून करीत होतेच. पण त्यांच्यांत स्थित्यंतर होत होतें. कट्टर विरोधकांनाहि स्वतःजवळ बसून खेळीमेळीची चर्चा करण्याला प्रवृत्त करण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत बाणत होतें. अशा चर्चेंत मतभेद कमी करण्याचा त्यांचा प्रयत्न असे.

बहुमतवाल्या पक्षाचे प्रतोद म्हणून काम करतांना जॉन्सन ह्यांना लाभलेलें हें शिक्षण त्यांच्या स्वतःच्या दृष्टीनें मोलाचें ठरलें. त्यांचा स्वतःचा जसा लाभ झाला तसा त्यांनीं राजकारणालाहि लाभ मिळवून दिला. त्यांच्या ह्या कर्तृत्वाचें मोल दुर्लक्षिलें गेलें नाहीं.

काँग्रेसच्या १९५२ सालच्या अधिवेशनाच्या अखेरीला उपराष्ट्राध्यक्ष ऑल्बन डब्ल्यू. बार्कली ह्यांनीं उद्‌गार काढले, "सेनेट आणि प्रतिनिधि-सभा ह्यांच्यांतील मतभेद मिटविण्यासाठीं, त्याचप्रमाणें सेनेटरांमधील मत-भेद मिटविण्यासाठीं ह्या पुरुषानें पडद्यामागें कशा हालचाली केल्या हें सेनेटला नजीकच्या काळांत कळणार नाहीं आणि देशांतील लोकांना बहुधा कधींच कळणार नाहीं."

उपराष्ट्राध्यक्ष होण्यापूर्वीं बार्कली हे स्वतः बारा वर्षे सेनेटमधील डेमो-क्रॅटिक पक्षाचे नेते होते. त्यांनीं जॉन्सन ह्यांच्याविषयीं विचारपूर्वक बनविलेलें आपलें मत व्यक्त करतांना म्हटलें, "जॉन्सन ह्यांनीं जेवढ्या काळांत इतका लौकिक आणि प्रतिष्ठा संपादन केली तेवढ्या काळांत एवढी प्रतिष्ठा आणि लौकिक संपादन करणारा सेनेटचा एकहि सभासद होऊन गेलेला नाहीं."

उपराष्ट्राध्यक्षांच्या ह्या गौरवोद्‌गारांना न्यूयॉर्कचे हर्बर्ट एच्. लीमॅन ह्यांनींहि साथ दिली. ह्या उदारमतवादी गृहस्थांचीं मतें आणि जॉन्सन ह्यांचीं मतें ह्यांत महदंतर आहे. तरीहि त्यांनीं जॉन्सन आणि मॅक्फर्लंड ह्या दोघांचें अभिनंदन करतांना म्हटलें, "त्यांच्या नेतृत्वाखालीं त्यांनीं एकतेची भावना निर्माण करण्याचें प्रशंसनीय कार्य केलें आहे."

जॉन्सन ह्यांची डेमोक्रॅटिक पक्षांतील प्रतिष्ठा वाढत होती, पण त्याच काळांत खुद्द पक्षाची परिस्थिति घसरगुंडीची झालेली होती.

१९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीच्या तयारीला डेमोक्रॅटिक पक्ष लागला तेव्हां फार मोठ्या दडपणाखालीं त्याला कार्य करावें लागत होतें. वॉशिंग्टन-मधील गोंधळ नाहींसा केला पाहिजे अशा आरोळ्यांचें रान उठलें होतें. जनरल ड्वाइट डी. आयझनहॉवर ह्यांच्यासाठीं 'महान् धर्मयुद्ध' सुरू झालें होतें. त्या निवडणूक मोहिमेमध्यें डेमोक्रॅटिक पक्षाला सदैव बचावाचाच पवित्रा घ्यावा लागत होता.

जॉर्जियाचे डिक रसेल ह्यांनीं डेमोक्रॅटिक पक्षातर्फे राष्ट्राध्यक्षपदाची उमेदवारी मिळविण्याचे प्रयत्न चालविले. जॉन्सन ह्यांनीं त्यांना पाठिंबा दिला. पण जेव्हां इलिनॉयचे राज्यपाल ॲडलाय स्टीव्हन्सन ह्यांची उमेदवार म्हणून निवड झाली तेव्हां जॉन्सन ह्यांनीं तावडतोब त्यांना आपला पाठिंबा घोषित केला.

तो काळ, निवडणुकीशीं संबंधित असलेले प्रश्न, उमेदवारांचें व्यक्तिमत्त्व, आणि ह्या सर्वापेक्षां महत्त्वाची गोष्ट म्हणजे जॉन्सन सेनेटमध्यें प्रतिनिधि म्हणून ज्या राज्यांतून निवडून आले होते त्या टेक्ससमधील परिस्थिति, ह्या सर्व गोष्टींचा विचार करतां जॉन्सन ह्यांचा वरील निर्णय धाडसाचा होता.

टेक्सस हें परंपरेनें हमखास डेमोक्रॅटिक पक्षाच्या मुठींतलें राज्य, ही गोष्ट सत्य असली तरी ह्या वेळीं टेक्ससमधील बहुसंख्य प्रमुख वृत्तपत्रांनीं आयझनहॉवरना पाठिंबा व्यक्त केलेला होता. डेमोक्रॅटिक पक्षातर्फे झालेल्या प्राथमिक निवडणुकींत दुसऱ्या खेपेसाठीं राज्यपालपदाचे उमेदवार म्हणून ज्यांची निवड झाली होती ते ॲलन शिव्हर्स आयझनहॉवरना निवडून द्या असें आवाहन करीत होते, टॉम कोनोली निवृत्त झाल्यामुळें त्यांच्या जागीं सेनेटचे डेमोक्रॅटिक पक्षाचे उमेदवार म्हणून ज्यांची निवड झालेली होती ते प्राईस डॅनिअल आयझनहॉवरनाच पाठिंबा देत होते. व्यक्तिशः जॉन्सन ह्यांचे पाठीराखे असणारे कांहीं प्रमुख लोकहि आयझनहॉवरना अनुकूल होते.

जॉन्सन ह्यांच्या कांहीं जुन्या मित्रांनीं त्यांच्यावर भयंकर दडपण आणायला सुरुवात केली. रिपब्लिकन पक्षाच्या उमेदवाराला तुम्ही पाठिंबा देणार नसाल तर देऊं नका, पण डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवाराच्या प्रचार मोहिमेंत सक्रिय भाग तरी घेऊं नका अशी गळ त्यांना मित्रांनीं घातली. त्यांची इच्छा असली तर त्यांनीं स्टिव्हन्सनना मत द्यावें, पण ह्या गोष्टीचा फार गवगवा करूं नये असा जॉन्सन ह्यांना मित्रांचा सल्ला होता.

ज्यांच्या निर्णयक्षमतेवर जॉन्सन ह्यांचा विश्वास होता त्या राजकीय निरीक्षकांनीं खात्री दिली कीं, टेक्ससमधील बहुमत बहुधा आयझनहॉवर ह्यांनाच मिळेल. दोन वर्षांनीं तुम्हांला पुनः निवडणुकीसाठीं उभें राहावयाचें आहे हें लक्षांत ठेवा असें त्या लोकांनी त्यांना बजावलें. राष्ट्राध्यक्षपदाच्या

निवडणुकींत जी आघाडी निश्चितपणें कोसळणार होती त्या आघाडीवर जाणूनबुजून लढा द्यायला उभे राहण्यापेक्षां त्यांनीं स्वतःचें राजकारणांतील स्थान बळकट करण्यांत वेळेचा उपयोग करावा हीच गोष्ट समंजमपणाची ठरेल असें सर्वांचें मत होतें.

नेहमींप्रमाणें मित्रांचा सल्ला जॉन्सन ह्यांनीं ऐकून घेतला पण त्यांच्या सल्ल्याला ते बळी पडले नाहींत. सेनेटसाठीं जॉन्सन ह्यांनीं केलेल्या अयशस्वी आणि यशस्वी अशा दोन्ही लढयांच्या वेळीं त्यांना पाठिंबा देणाऱ्या एका अत्यंत वजनदार माणसाशीं बोलतांना जॉन्सन म्हणाले, " तुम्ही सांगतां तसें मी करूंच शकत नाहीं. तें योग्य होणार नाहीं. तसें करणें शहाणपणाचें आहे असेंहि मला वाटत नाहीं. टेक्ससच्या दृष्टीनें, दक्षिणेंतील सर्व राज्यांच्या दृष्टीनें आणि राष्ट्राच्या दृष्टीनेंहि डेमोक्रॅटिक पक्ष हाच उत्तम पक्ष आहे अशी माझी श्रद्धा आहे. दृढ श्रद्धा आहे. मी माझ्या श्रद्धेविरुद्ध वागूं शकत नाहीं. "

ह्यामुळें त्या गृहस्थाचा पाठिंबा जॉन्सन ह्यांनीं गमावला, पण त्यांची मैत्रीहि संपुष्टांत आली. ह्या दुहेरी हानीबद्दल त्यांना दुःख वाटलें. आणि तो गृहस्थ आपल्याला कृतघ्न म्हणून आपली नालस्ती करीत आहे असें कळलें तेव्हां तर त्यांच्या अंतःकरणाला तीव्र वेदना झाल्या. पण त्यांनीं निश्चित केलेल्या मार्गाबद्दल त्यांच्या मनांत शंकेला जागा नव्हती.

राज्यांतील डेमोक्रॅटिक पक्षाची अधिकृत संघटनाहि आयझनहॉवर ह्यांचा पाठपुरावा करीत होती. स्टीव्हन्सन आणि स्पार्कमन ह्यांच्यातर्फे प्रचारासाठीं रेबर्न ह्यांनीं खास प्रचार समिती स्थापून तिची मुख्य कचेरी डलासला ठेवली. डेमोक्रॅटिक पक्षाचे अनेक प्रमुख पदाधिकारी सभापति रेबर्न आणि त्यांची समिती ह्यांचें तोंडहि बघायला येईनासे झाले. पण अशा लोकांमध्यें जॉन्सन ह्यांचा अंतर्भाव होत नव्हता. रेबर्न ह्यांच्या खांद्याला खांदा लावून ते काम करूं लागले. १९५२ च्या शरद् ऋतूंत त्यांनीं जितक्या एकदिलानें काम केलें तसें पूर्वीं कधींच केलें नव्हतें.

ह्या संदर्भांत बोलतांना रेबर्ननी उद्गार काढले, " त्या प्रचार मोहिमेच्या वेळीं मी जें जें सांगितलें तें तें सर्व कांहीं लिंडननीं केलें. "

डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवारांच्या वतीनें जॉन्सन ह्यांनीं असंख्य भाषणें केलीं. एकदां तर तीन दिवसांच्या अवधींत त्यांनीं वीसपेक्षां जास्त भाषणें केलीं.

अडलाय स्टीव्हन्सन हे टेक्ससच्या दौऱ्यासाठीं आले तेव्हां पहिल्या जाहीर सभेच्या वेळीं त्यांची ओळख करून देणारें भाषण जॉन्सन ह्यांनींच केलें; आणि त्यानंतर खास आगगाडीनें झालेल्या त्यांच्या दौऱ्यांत जॉन्सन अखेरपर्यंत त्यांच्याबरोबर होते.

टेक्ससमधील जनतेनें डेमोक्रॅटिक पक्षालाच चिकटून राहावें असें आवाहन करण्यासाठीं उपराष्ट्राध्यक्ष बार्कली ऑस्टिनला आले होते. त्यावेळींहि प्रास्ताविक भाषण जॉन्सन ह्यांनींच केलें.

जॉन्सन ह्यांनीं नभोवाणीवर भाषण करून आपण डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवारालाच पाठिंबा कां देत आहों, ह्याचें स्पष्टीकरण केलें. ते म्हणाले, " ह्या प्रचार मोहिमेपुढें दोन प्रश्न आहेत. एक आमच्या जनतेला समृद्धि मिळवून देण्याचा आणि दुसरा जगाला शांतता मिळवून देण्याचा."

रिपब्लिकन पक्ष, अमेरिकन जनतेनें हे दोन्ही प्रश्न दुर्लक्षावेत असें इच्छितो, असा आरोप करून त्यांनीं घोषणा केली, " मी त्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करूं इच्छीत नाहीं. "

नंतर त्यांनीं सुस्पष्टपणें त्या प्रश्नांचीं स्पष्टीकरणें भाषणांत मांडलीं. आपण जें बोलतों त्यावर नितांत श्रद्धा असणाऱ्या माणसाचे ते उत्कट बोल होते. आपण जें बोलतों त्याचे परिणाम आपल्याला हिताचे होवोत कीं अहिताचे, ह्याची पर्वा न करतां तें बोलून दाखविण्याचा ज्याचा ठाम निर्धार आहे अशा माणसाच्या हृदयाचे ते उद्‌गार होते.

निवडणुकींत आयझनहॉवरना बहुमत मिळवून देण्याच्या कामीं सर्व राष्ट्राबरोबर टेक्ससनें आपला वांटा उचलला. आयझनहॉवर निवडून आले. ह्या निवडीबद्दल बोलतांना जॉन्सन म्हणाले, " ते आमचे नवे नेते आहेत. ह्या निवडींत समंजसपणा किती आहे, काय आहे ह्याची चर्चा मी करीत नाहीं. कांहीं असो, ते आमचे नेते आहेत. कांहीं लोक कोपऱ्यांत जाऊन फुरंगटून बसले आहेत. कांहीं जणांना विघटना हवी आहे. पण कोठाराचा

डोलारा लाथा झाडून जमीनदोस्त करणें कोणाहि गाडवाला शक्य असतें. कोठाराची उभारणी करायला चांगला सुतार हवा असतो. आम्हांला उभारणी करावयाची आहे.''

अरिझोनामध्यें, सेनेटच्या डेमोक्रॅटिक पक्षाचे नेते मॅक्‌फर्लंड हे पराभूत झाले होते. पहिल्या अधिवेशनाआधीं, १९५३ च्या जानेवारींत डेमोक्रॅटिक पक्षाच्या सेनेटरांची बैठक झाली. आतां हा पक्ष, मतांचा फरक मामुली असला तरी, सेनेटमधला अल्पमतवाला पक्ष झालेला होता. वरील बैठकींत जॉन्सन ह्यांची एकमतानें पक्षनेते म्हणून निवड करण्यांत आली.

ह्या वेळीं जॉन्सन ह्यांचें वय चव्वेचाळीस होतें. सेनेटमधल्या कोणत्याहि पक्षानें आजवर पक्षनेता म्हणून इतक्या कमी वयाच्या व्यक्तीची नवड केलेली नव्हती. पण, जॉन्सन ह्यांना तें स्थान त्यांच्या कार्यामुळें लाभलें असें देशांतील सारे राजकीय निरीक्षक एकमुखानें म्हणत होते.

□ □ □

# ९

८३ व्या काँग्रेसमध्यें सेनेटमधील अल्पमतवाल्या पक्षाच्या नेत्याला फक्त 'राजकीय दिवाळखोराच्या मालमत्तेची व्यवस्था बघणाऱ्या वहिवाटदारा'ची भूमिका वजावणें एवढेंच काम करावें लागेल, असें भाकित राजकारणांत मुरलेल्या अनेक निरीक्षकांनीं वर्तविलें होतें.

निरीक्षकांना असें खात्रीनें वाटण्याजोगीं कारणेंहि होतीं. डेमोक्रॅटिक पक्ष विस्कळीत झालेला होता, कर्जात बुडालेला होता. त्याला कार्यक्षम नेतृत्वाची वाण होती. पक्षाच्या दक्षिणेकडील आणि उत्तरेकडील अशा दोन्ही पातींमध्यें दीर्घकालापासून फूट होती. सार्वत्रिक निवडणुकीच्या अयशस्वी ठरलेल्या मोहिमेच्या पद्धतीबद्दल सुरू झालेले आरोप-प्रत्यारोप अजून चालूच होते.

" मी कोणत्याहि सुसंघटित पक्षाचा सभासद नाहीं. मी डेमोक्रॅट आहें. " हे विल् रॉजर्सचे थट्टेचे उद्‌गार अनेकांनीं अनेकदां उद्‌धृत केलेले आहेत. हे उद्‌गार १९५३ च्या प्रारंभींच्या परिस्थितीला जितके तंतोतंत लागू पडत होते तितके पूर्वीं कधींच लागू पडले नसतील. तज्ज्ञांनीं कुंडल्या मांडून भविष्य काढलें होतें कीं, पुढील दोन वर्षें त्या पराभूत पक्षाचें नियंत्रण मिळविण्यासाठीं उत्तर आणि दक्षिण ह्यांच्यामध्यें रस्सीखेंच चालणार आहे.

सेनेटमधील अल्पमतवाल्या पक्षाचे नेते म्हणून जॉन्सन ह्यांची एकमतानें निवड झालेली असली तरी सेनेटमधील पक्षांतील एकतृतीयांश सभासदांचा तरी त्यांना हार्दिक पाठिंबा नव्हता. 'उदारमतवादी गटा'चे सभासद आपल्याविषयीं साशंक आहेत ह्याची जॉन्सन ह्यांना जाणीव होती. टेक्ससमधील अनेक लोक आपल्याला कम्युनिस्ट समजतात आणि वॉशिंग्टनमधील अनेक लोक ' डिक्सिक्रॅट ' मानतात ह्याचीहि त्यांना जाणीव होती. ह्या परिस्थितीवर अनेकदां ते वक्रोक्तिपूर्ण भाष्यहि करीत असत.

आपल्यापुढील अडचणींबाबत ते भ्रमांत नव्हते. पण 'दिवाळखोरांचा वहिवाटदार' म्हणून भूमिका बजावण्याचाहि त्यांचा विचार नव्हता!

आयझनहॉवर ह्यांच्या धडाकेबाज विजयांत काँग्रेसमधील जागांसाठीं उभ्या असलेल्या रिपब्लिकन पक्षाच्या उमेदवारांना पूर्ण वाटा मिळाला नव्हता. ८३ व्या काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनाच्या सुरुवातीस सेनेटमध्यें रिपब्लिकन पक्षाचे अठ्ठेचाळीस सभासद होते. एक स्वतंत्र म्हणजे ऑरेगॉनचे वायने मोर्स. त्यांनीं रिपब्लिकन पक्ष सोडला असला तरी सेनेटमध्यें त्या पक्षाच्या बाजूनें मतदान करण्याची घोषणा केली होती. डेमोक्रॅटिक पक्षाचे सत्तेचाळीस सभासद होते.

दोन्ही पक्ष वरकरणीं तुल्यबल असल्यासारखे दिसले तरी तसे ते मानण्यांत हंशील नव्हतें. राष्ट्रीय प्रश्नांविषयीं मतें आणि दृष्टिकोन, ह्याबाबत डेमोक्रॅटिक पक्षामध्यें फार सखोल मतभेद होते. कदाचित् लिंडन जॉन्सन ह्यांचा अपवाद करतां कोणालाहि अशी आशा वाटत नव्हती कीं, पक्षाच्या सत्तेचाळीस सभासदांनीं एकजुटीनें मतदान करण्याचे प्रसंग वारंवार घडतील.

'केवळ विरोध करायचा म्हणूनच सरकारच्या ठरावांना विरोध करण्याचें डेमोक्रॅटिक पक्षाचें धोरण राहणार नाहीं हें मी माझ्यापुरतें स्पष्ट करतों' असें जॉन्सन ह्यांनीं घोषित केलें तेव्हां डेमोक्रॅटिक पक्षांतील कांहीं जणांना आपली भीति खरी ठरणार अशी खात्री वाटू लागली. नव्या काँग्रेसमधील सेनेटच्या बहुमतवाल्या पक्षाचे नेते रॉबर्ट ए. टॅफ्ट ह्यांच्या म्हणण्याप्रमाणें, "विरोधी पक्षाचें काम विरोध करणें" असें जॉन्सन ह्यांचें मत नव्हतें. जॉन्सन ह्यांनीं स्पष्ट बजावलें कीं, "तसें नाहीं. विरोधी पक्षाचें काम अमेरिकेच्या समस्या सोडवू शकेल असा कार्यक्रम पुनःपुन्हां मांडणें हें आहे; बहुमतवाल्या पक्षाच्या कार्यात अडसर घालणें हें नव्हे. आपण सर्वजण आधीं अमेरिकन आहोंत, नंतर कोणत्या ना कोणत्या राजकीय संघटनेचे सभासद आहोंत. सेनेटमधील अल्पमतवाला पक्ष ह्या नात्यानें आम्ही पक्षीय विचारापेक्षां राष्ट्रहिताला अग्रस्थान देऊं. जेव्हां आमच्या श्रद्धांसाठीं आम्हांला सरकारी ठरावांना विरोध करावा लागेल तेव्हां तो विरोध तात्त्विक असेल आणि तत्त्वसुसंगत अशा पद्धतीनेंच तो विरोध व्यक्त केला जाईल."

अल्पमतवाल्या राजकीय पक्षाच्या योग्य भूमिकेबाबतची आपली कल्पना जास्त सविस्तरपणानें त्यांनीं न्यूयॉर्क येथें जेफर्सन-जॅक्सन दिनानिमित्त झालेल्या खान्याच्या वेळीं केलेल्या भाषणांत विशद केली.

ते म्हणाले, "प्रतिपक्षाला सळो कीं पळो करण्याच्या तंत्रावर माझा विश्वास नाहीं. माझें आवाहन सुबुद्ध मनाला आहे, विकारवशतेनें पिळवटणाऱ्या आंतड्याला नाहीं. अल्पमतवाल्या पक्षापुढें दोन पर्याय आहेत. पहिला पक्षीय राजकारण खेळणें आणि दुसरा जबाबदार राजकारणाला चिकटून राहणें.

"पहिल्या मार्गाचा मोह दुबळ्यांना होतो. पण अंतिमतः अमेरिकन जनता ह्या मार्गाचा धिक्कारच करील. दुसरा मार्ग विकट आहे, पण त्या मार्गानें जाऊनच आपण अमेरिकन जनतेला नेतृत्व देऊं शकतों—जनता ज्याचा स्वीकार करील असें नेतृत्व देऊं शकतों.

"जबाबदारीची जाणीव असणाऱ्या राजकारणावर आपली निष्ठा असली पाहिजे. देश जगेल तरच आपण जगूं ही जाणीव ज्याच्या मुळाशीं आहे अशा राजकारणावर आपली निष्ठा पाहिजे.

"हा विचार आपला मार्गदर्शक ध्रुवतारा असेल तरच आपण यशाचा मुक्काम गाठूं शकूं."

सेनेटमधील डेमोक्रॅटिक पक्षाला एकत्र आणण्याचे जॉन्सन ह्यांचे प्रयत्न चालूच होते. "संकटकालीं कुटुंबांतील माणसें जास्त जवळ जवळ येतात" अशा अर्थाची म्हण त्यांनीं आपल्या वडिलांच्या तोंडून अनेकदां ऐकली होती. ह्या म्हणीमागील तत्त्व सभासदांनीं स्वीकारावें असा त्यांचा प्रयत्न होता. दोन्ही परस्परविरोधी गटांच्या मध्यें उभें असण्यासारखी त्यांची भूमिका असल्यामुळें त्या दोन्ही गटांच्या भावना ते समजूं शकत होते. आणि ह्या जाणिवेचा उपयोग करून त्यांना एकत्र आणण्यांत आणि एकत्र राखण्यांत कांहीं वेळां तरी ते यशस्वी होत होते.

आपल्याला परंपरेबद्दल योग्य आदर असला तरी सेनेटच्या कार्यपद्धतींतील रुळलेल्या मार्गाचा त्याग करण्याला आपण कचरत नाहीं असें धडाडीनें दाखवून देणारा एक नवा पवित्रा त्यांनीं टाकला. महत्त्वाच्या समित्यांवरील नेमणुका वडीलकीच्या तत्त्वावर करण्याची प्रथा होती. पण अधिवेशनाच्या

सुरुवातीला ह्या नेमणुका करतांना त्यांनीं कांहीं जुन्या सेनेटरांना निवडक समित्यांवरचा त्यांचा हक्क सोडण्याला राजी केलें. त्यामुळें, पक्षाचा सार्वत्रिक पराभव झालेला असतांनाहि जे नवे सेनेटर निवडून आले होते त्यांना समित्यांवर काम करण्याची संधि मिळूं शकली.

कांहीं जुन्या सेनेटरांनीं ह्याबद्दल तीव्र नापसंती व्यक्त केली तेव्हां टेक्ससमधील आपल्या बालपणीं ऐकलेला एक चुटका त्यांनीं त्या सभासदांना ऐकविला.

ते म्हणाले, " माझ्या माहितीच्या एका छोट्या पोराला जवळच्या शहरांत जायची इच्छा होती, पण वडील माणसांनीं नकार दिला. तेव्हां तो पोरगा तोंड वाईट करून कुरकुरला, ' माझा भाऊ मात्र दोन दोन ठिकाणीं, मी मात्र कुठेंच नाहीं ! ' . . . मला हें कळत नाहीं कीं जुन्या सेनेटरांना ' दोन दोन ठिकाणें ' कां ? जुने सभासद दोन दोन, तीन तीन समित्यांवर जागा अडवूं शकतात; नव्या सभासदाला मात्र खालच्या पायरीवर पिचत ठेवायचें. ह्या प्रकाराचा अर्थच मला कळत नाहीं. "

जॉन्सन ह्यांच्या नव्या पवित्र्यामुळें डेमोक्रॅटिक पक्षाच्या प्रत्येक सभासदाला ह्या ना त्या समितीवर स्थान लाभलें. एक दोन अपवाद वगळतां सर्वजण खुष झाले. विशेषत: नवे सभासद जास्त खुष होते. ही घटना, डेमोक्रॅटिक पक्षाच्या लोकांना एकत्र आणण्याच्या जॉन्सन ह्यांच्या प्रयत्नांना उपकारक ठरली.

जॉन्सन ह्यांनीं प्रथा मोडली म्हणून प्रारंभीं कुरकुर करणाऱ्या जुन्या सभासदांनाहि समित्यांवरील नेमणुकीच्या जॉन्सन ह्यांच्या धोरणामागील समंजसपणा लौकरच उमजला. आणि ते जॉन्सन ह्यांना धन्यवाद देऊं लागले. शिवाय, जॉन्सन ह्यांच्या कुशल मार्गदर्शनाखालीं ते जसे एकत्र येऊन काम करूं लागले तसे पूर्वग्रहहि मावळूं लागले. उदारमतवादी डोक्याला शिंगें लावून येत नाहींत आणि त्यांच्या डोळ्यांत आततायी माथेफिरू चमक नसते हें मवाळ मताच्या सेनेटरांना दिसून आलें. उलट आपण मवाळांना जितके बुरसट समजतों तितके ते नाहींत, त्यांच्या तत्त्वज्ञानांतहि कांहीं शहाणपणाचा अंश आहे असा साक्षात्कार उदारमतवाद्यांनाहि झाला.

भिन्न प्रवृत्तीच्या लोकांना एकत्र आणून काम करायला लावण्याच्या जॉन्सन ह्यांच्या पद्धतीचा परिणाम किती चांगला झाला ह्याचें एकच उदाहरण देण्यासारखें आहे. एका कट्टर स्थितिवादी सेनेटरला एका लढाऊ वृत्तीच्या तरुण उदारमतवाद्यावरोबर एकाच समितीवर काम करावें लागत होतें. कांहीं दिवसांनीं तो कट्टर स्थितिवादी गमतीनें जॉन्सन ह्यांच्याजवळ तक्रार करूं लागला, "लिंडन, तो तरुण मला इतका आवडूं लागावा ह्यासाठीं तूं काय किमया केलीस ?"

दीर्घ काल एकमेकांविरुद्ध ठाकलेल्या डेमोक्रॅटिक पक्षाच्या सभासदांना सहकारी प्रयत्नांचे फायदे उमगूं लागले. निदान सेनेटमध्यें तरी, मतभेदांच्या मुद्द्यांवरच घासाघीस करीत बसण्याचें सोडून ते कोणत्या मुद्द्यावर पटूं शकतें ह्याचाच अधिक शोध घेऊं लागले.

अल्पमतवाल्या पक्षाचा नेता आपल्या अनुयायांमध्यें एकतेची भावना बाणविण्याचा प्रयत्न यशस्वीपणें करीत असतांनाच बहुमतवाल्या पक्षांत मात्र फाटाफूट, दुफळी ह्या समस्या डोकें वर काढूं लागल्या.

८३ व्या कॉंग्रेसच्या पहिल्या अधिवेशनाच्या प्रारंभींच दिसून आलें कीं, अनेक रिपब्लिकन पक्षाच्या लोकांना त्यांची जन्मजात वृत्ति सोडतां येत नव्हती किंवा ती वृत्ति सोडून द्यायला ते नाखुष होते. कारभार शाखेकडून येणाऱ्या कोणत्याहि सूचनेला विरोध करायचाच ही ती जन्मजात वृत्ति होय. व्हाईट हाउसमधील नवा नेता रिपब्लिकन पक्षाचा होता ह्या वस्तुस्थितीमुळें कांहींच फरक पडला नव्हता. राष्ट्राध्यक्ष जिथें 'होय' म्हणतील तिथें आपण 'नाहीं' म्हणायचें आणि ते जिथें 'कृपा करून होय म्हणा' असें म्हणतील तिथेंहि 'नाहीं' म्हणायचें ही संवय त्या लोकांच्या अंगीं भिनली होती. संवय बदलणें कठीण होतें.

त्यामुळें, एक अगदीं विलक्षण स्वरूपाची पक्षीय विभागणी दिसून येऊं लागली. अत्यंत मूलभूत महत्वाच्या प्रश्नावर राष्ट्राध्यक्ष, त्यांच्या पक्षांतील कांहीं लोक आणि बहुसंख्य डेमोक्रॅटिक पक्षाचे सभासद असे एका बाजूला, तर बहुसंख्य रिपब्लिकन पक्षाचे लोक कडव्या विरोधाला उभे ठाकलेले असें दृश्य अनेकदां दिसूं लागलें.

कारभारशाखेला, सरकारी यंत्रणेंत पुनर्घटना-फेरसंघटना करण्याची जी सत्ता दिलेली होती तिची मुदतवाढ करण्याची आयझनहॉवरनीं मागणी केली तेव्हां वरीलप्रमाणेंच मतविभागणी झाली. आंतरराष्ट्रीय कराराबाबत कम्युनिस्टांनीं केलेल्या विश्वासघाताच्या निषेधार्थ त्यांनीं मांडलेल्या ठरावावर असेंच झालें. परस्पर-व्यापार करार कायद्याला मुदतवाढ देण्याची मागणी, परस्पर-सुरक्षा विधेयक, ह्यांच्या बाबतींतहि बहुसंख्य रिपब्लिकन पक्षीयांनीं कडवा विरोधच केला.

वरील आणि त्यासारख्या प्रश्नांवर सरकारला पाठिंबा देऊन जॉन्सन ह्यांनीं निर्विवादपणें दाखवून दिलें कीं, ते जेव्हां 'जबाबदार राजकारण' हे शब्द उच्चारतात तेव्हां ते नुसते शब्द नसतात, त्याप्रमाणें कृति करण्याचीहि त्यांची तयारी असते.

ह्या संदर्भांत जॉन्सन एकदां उपरोधानें म्हणाले, "रिपब्लिकन पक्षाचें लोढणें गळ्यांत नसेल तर आपण देशासाठीं अधिक चांगलें काम करूं शकूं असा विचार कधीं कधीं राष्ट्राध्यक्षांच्या मनाला चाटून जात असेल!"

प्रतिनिधिसभेंत रेबर्न हे पुन: डेमोक्रॅटिक पक्षाचे नेते झालेले होते, त्यांनीं उद्गार काढले, "आत्तांपर्यंतच्या कोणत्याहि सरकारपेक्षां ह्या सरकारला अपक्षीय पाठिंब्याची नितांत आवश्यकता आहे."

जेव्हां जेव्हां सदसद्विवेकबुद्धीला पटेल तेव्हां तेव्हां रेबर्न आणि जॉन्सन आयझनहॉवर सरकारच्या साह्याला सरसावत असत. जेव्हां विरोध करणें आवश्यक वाटे तेव्हां तो करायला कचरत नसत. आणि आपला विरोध शक्य होईल तितक्या परिणामकारकपणें ते व्यक्त करीत असत.

सेनेटमधील डेमोक्रॅटिक पक्षाच्या कार्याचें मार्गदर्शन करतांना जॉन्सन विचारपूर्वक बनविलेले कांहीं नियम पाळीत असत. कोणत्याहि प्रश्नाचा, त्याच्या राजकीय पार्श्वभूमीचा विचार न करतां त्याचें यथार्थ मूल्यमापन करण्याचें लवचिक धोरण अवलंबिणें हा त्यांतला मुख्य नियम. दुसरा नियम हा कीं, कोणत्याहि चर्चेंत व्यक्तीला ओढण्याचें आणि वैयक्तिक टीका करण्याचें टाळायचें. राष्ट्रीय सुरक्षिततेचा प्रश्न निगडित असलेल्या कोणत्याहि प्रश्नाबाबत डेमोक्रॅटिक पक्षानें तत्परतेनें सहकार्य करावयाचें हा तिसरा नियम होय.

हे नियम उपयुक्त ठरले. त्यामुळें जबाबदार राजकारणाच्या तत्त्वावर पक्ष प्रत्यक्ष कार्य करतो हें दाखवून देतां आलें. एकादा विवाद्य प्रश्न आला कीं, एकमेकांपासून दूर धांवण्याऐवजीं एकत्र राहून परिणामकारक कार्य करण्याचा अनुभव पक्षाच्या सभासदांना मिळाला.

आयझनहॉवर ह्यांच्यासारखा लोकप्रिय पुरुष राष्ट्राध्यक्ष असतांना, वरील नियमांप्रमाणें कार्य करणें राजकीय धोरण म्हणून देखील उपयुक्त होतें. पण ह्या धोरणाचें महत्त्व एवढेंच नव्हतें. सरकारांत अतिरिक्त पक्षाभिनिवेश असणें अमेरिकन जनतेची उत्कृष्ट सेवा बजावण्याच्या दृष्टीनें इष्ट नव्हे हें जें जॉन्सन ह्यांचें ठाम मत होतें त्याचा प्रत्यक्ष आविष्कार कृतींत उतरविणारें तें धोरण होतें ही गोष्ट महत्त्वाची आहे.

राष्ट्राध्यक्षांच्या ठरावांशीं जॉन्सन नेहमींच सहमत होत असत असें नव्हे. स्वतःच्या पक्षाच्या राष्ट्राध्यक्षांचा 'रबरी शिक्का' बनण्याला ज्यानें नकार दिला तो पुरुष रिपब्लिकन पक्षीय राष्ट्राध्यक्षांच्या प्रत्येक सूचनेला वा विनंतीला आंधळेपणानें मान तुकविणें अगदीं अशक्य होतें.

विमानदलांत कपात करण्याच्या सरकारच्या प्रयत्नाला जॉन्सन ह्यांनीं विरोध केला. ह्या प्रश्नावर त्यांना पूर्वींहि झगडावें लागलें होतें. जमिनीची धूप थांबविण्याच्या कामासाठीं असलेल्या यंत्रणेचा कार्यव्याप कमी करण्याबाबतच्या राष्ट्राध्यक्षांनीं पुरस्कारिलेल्या योजनेलाहि त्यांनीं विरोध केला. शेतकी खात्याची पुनर्रचना करण्याबाबत शेतीमंत्र्यांना अमर्याद अधिकार देणाऱ्या योजनेवरहि त्यांनीं कठोर टीकास्त्र सोडलें.

राष्ट्राध्यक्षांना विरोध करण्याचा प्रश्न असो कीं पाठिंबा देण्याचा प्रश्न असो प्रत्येक वेळीं डेमोक्रॅटिक पक्षाच्या जास्तींत जास्त सभासदांचा पाठिंबा ते मिळवूं शकले.

प्रत्येक सेनेटरबरोबर व्यक्तिशः काम करण्याची तत्परता, हेंच अल्पमतवाल्या पक्षाचे नेते जॉन्सन ह्यांचें सर्वांत मोठें सामर्थ्य होतें. सेनेटच्या सभागृहांत शब्दबाण सोडण्याचा खेळ ते खेळत नसत. त्यांच्याशीं सहमत नसणाऱ्यांना जाहीररीत्या किंवा खाजगीरीत्या दहशत बसविण्याचा प्रयत्न ते कधीं करीत नसत. दुसऱ्या सेनेटरचें मत कितीहि अयोग्य वाटलें तरी जॉन्सन त्याच्यावर कधींच हेत्वारोप करीत नसत. सर्वांत महत्त्वाची गोष्ट

म्हणजे माणसांना एकत्र आणण्याची जी कला अनेक वर्षांपासून त्यांनीं आत्मसात् केलेली होती तिचा उपयोग करण्यांत दिवसाचे अनेक तास ते खर्चीं घालीत असत.

जॉन्सन ह्यांच्या गुणांचें मोजकें आणि वास्तवदर्शी सार त्यांचे मित्र डिक रसेल ह्यांनीं पुढील शब्दांत सांगितलें आहे : " सेनेटमधील डेमोक्रॅटिक पक्षांतील ते उत्कृष्ट विचारवंत नाहींत, उत्कृष्ट वक्ते नाहींत, उत्कृष्ट राजकारणपटु नाहींत. पण त्या तिन्ही गुणांचें उत्कृष्ट मिश्रण त्यांच्यांत आहे. "

रिपब्लिकन पक्षाच्या बहुसंख्य सेनेटरांशीं त्यांचे उत्कृष्ट वैयक्तिक संबंध होते. त्यांना जॉन्सन आवडत असत आणि जॉन्सन मित्रभावाला उत्स्फूर्तपणें साद नेहमींच देत असत. पक्षाच्या दृष्टीनें, जॉन्सन आणि बहुमतवाल्या पक्षाचे नेते टॅफ्ट हे शत्रू, पण दोघांतहि परस्परांबद्दल आदर आणि मित्रभाव होता.

ह्या मैत्रीचें खास वैशिष्टच होतें. बाह्यतः दोघांत असलेला फरक दोन माणसांत क्वचित्‌च असूं शकेल. जॉन्सन हे संगतिप्रिय, भावनाप्रधान, मनमिळाऊ, दांडगा उत्साह आणि उद्योगशीलता असलेले गृहस्थ होते. उलट, टॅफ्ट हे तसे एकलकोंडे होते. सगळ्यांचीं मनें राजी राखून परिस्थिति हाताळण्याचें कौशल्य त्यांच्यांत नव्हतें. त्यांची काम करण्याची पद्धति, " धसमुसळेपणानें आणि विशेष विचार न करतां फळींत खिळा ठोकणाऱ्या माणसासारखी " होती, असें वर्णन विल्यम एस्. व्हाईट ह्यांनीं लिहिलेल्या चरित्रांत केलेलें आहे. यथार्थदर्शन घडविणाऱ्या या चरित्रांत व्हाईट ह्यांनीं अचूकपणें दाखवून दिलें आहे कीं, सर्वसामान्य माणसांना आपलेसें करण्याचा जो गुण जॉन्सन ह्यांच्यांत अमाप होता त्याचा टॅफ्ट ह्यांच्या ठिकाणीं संपूर्ण अभाव होता.

इतकें असूनहि सेनेटच्या कामांत त्या दोघांचें उत्तम जुळलें, इतकेंच नव्हे तर दोघांत वैयक्तिक जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले. आपापल्या पक्षांचें सेनेटमधील नेतृत्व स्वीकारल्यानंतरच त्या दोघांची दोस्ती झाली. तत्पूर्वी दोघे जवळ जवळ एकमेकांना ओळखीतहि नव्हते.

१९५३ च्या अधिवेशनाच्या प्रारंभकाळांत ते दोघे एकमेकांशीं जपून संबंध ठेवीत. पण एकमेकांना हेरण्याचा हा काळ लौकर संपला. नंतर त्यांचे संबंध इतके घनिष्ठ झाले कीं इतकें घनिष्ठ नातें सेनेटच्या अन्य दोन

सभासदांमध्यें क्वचित्‌च निर्माण झालें असेल. टॅफ्ट ह्यांच्या चरित्रांत व्हाईट म्हणतात, " टॅफ्ट ह्यांना छेडूं शकतील, पण ज्यांच्यावर टॅफ्ट ह्यांचे डोळे वटारले जाणार नाहींत अशा मोजक्या माणसांपैकीं जॉन्सन एक होते. दोघांच्या जागांमध्यें फक्त तीन फुटांचेंच अंतर होतें आणि जॉन्सन आपल्या टेबलाशीं बसून हळूच पुटपुटून टॅफ्टना खिजवीत असत."

परस्परांना एकमेकांविषयीं वाटणारा आदर हें त्यांच्या परस्परांविषयींच्या भावनांचें मूळ होतें. एकानें दुसऱ्याच्या सचोटीबद्दल अत्यल्पहि शंका कधीं मनांत डोकावूं दिली नाहीं. दोघांचेंहि सेनेटवर अक्षरश: प्रेम होतें. दोघांनाहि लायक विरोधकाचें मोल वाटे. दोघांनाहि निरुद्देश, वेळखाऊ गप्पाष्टकांची चीड होती. जॉन्सन अशा गप्पाष्टकांची 'सहज भेटगांठ' हे शब्द उपरोधानें उच्चारून कुचेष्टा करीत; टॅफ्ट रोकड्या भाषेंत 'मूर्खपणाची वडबड' असें संबोधून तिटकारा व्यक्त करीत.

सेनेटचें कामकाज योग्य प्रकारें चालावयाचें असेल तर दोन्ही पक्षांच्या नेत्यांनीं एकत्र येऊन काम करणें अत्यावश्यक असतें. टॅफ्ट आणि जॉन्सन ह्यांच्याविषयीं बोलायचें तर त्यांनीं सहकार्य कर्तव्य म्हणून केलेंच, पण तें सहकार्य त्यांना आनंददायीहि वाटलें.

१९५३ च्या उन्हाळ्यांत टॅफ्ट ह्यांचें शोचनीय निधन झालें तेव्हां सेनेटमध्ये श्रद्धांजलि वाहण्यासाठीं बोलायला उभे राहिलेल्या जॉन्सनच्या डोळ्यांत अश्रु दाटले. शब्द गळा दाटून बाहेर पडले. ते म्हणाले, " सेनेट-मध्यें कोणत्याहि पक्षाचा नेता म्हणून त्यांच्याइतका सन्मान्य पुरुष आजवर होऊन गेलेला नाहीं. मी तर माझा एक जिवलग मित्र गमावला आहे."

सेनेटमधील डेमोक्रॅटिक पक्षाच्या सभासदांना बरोबर घेऊन काम करीत असतांना, त्या सर्व काळांत, जॉन्सन ह्यांना आपल्या टेक्ससमधील मतदार-संघाचा कधींहि विसर पडला नाहीं. सभागृहांतील पक्षनेता होणें आणि सेनेटमधील डेमोक्रॅटिक पक्षाच्या धोरण समितीचे पदसिद्ध अध्यक्ष होणें ह्या गोष्टी आपल्या परीनें ठीक आहेत. पण, जॉन्सन आपल्या राज्यांतील लोकांना चांगले ओळखत होते. सेनेटमध्यें आपला प्रतिनिधि ह्या नात्यानें जॉन्सन ह्यांनीं आपल्यासाठीं काय केलें ह्या गोष्टीला त्यांच्या दृष्टीनें महत्त्व होतें. त्यांना सेनेटमध्यें राहूं द्यावयाचें कीं नाहीं हें ठरविण्याची सत्ता त्याच

ग्रं. क्र. १०४८५

लोकांच्या हातांत होती. ह्या लोकांकडून जॉन्सन ह्यांना येणाऱ्या पत्रांची दैनिक संख्या चारशें ते पांचशें होती. बहुतेक पत्रांमध्यें जॉन्सन ह्यांना कांहीं ना कांहीं करण्याची विनंती केलेली असे.

शक्य होईल तेव्हां जॉन्सन त्या लोकांनीं अपेक्षिलेलीं कामें करीत. अशक्य असेल त्यावेळीं, कां शक्य नाहीं ह्याचा आर्जवी खुलासा करीत. किंवा त्या-ऐवजीं दुसरें जें करणें शक्य असेल तें करण्याची तयारी दाखवीत. सर्व पत्रांना ताबडतोब उत्तरें जातील अशी खबरदारी ते घेत असत.

आपल्या वॉशिंग्टन येथील कचेरींतून टेक्ससमधील वृत्तपत्रांच्या तेथील प्रतिनिधींना सतत कांहीं ना कांहीं वातमी मिळत राहील अशी त्यांनीं व्यवस्था केलेली होती. राज्यांतील शेंकडों साप्ताहिकांसाठीं नियमित वार्तापत्र ते रवाना करीत. टेक्ससमधील नभोवाणी केंद्रांवरून ध्वनिक्षेपित करण्यासाठीं दर आठवड्याला "जनतेला सादर केलेला अहवाल" ह्या नांवाचा एक कार्यक्रम त्यांना ध्वनिमुद्रित करावा लागत असे.

अवर्षणग्रस्त विभागांना मदतीची तरतूद करणारें विधेयक, त्याचप्रमाणें कापसाखालील क्षेत्र ठरवून देण्याच्या पद्धतींत सुधारणा सुचविणारें विधेयक, ग्रामीण वीजपुरवठा खात्याच्या कार्यक्रमांत ग्रामीण भागांना टेलिफोन देण्याच्या योजनेचा अंतर्भाव करणारें विधेयक, सैनिक आणि माजी सैनिक ह्यांना मदत करण्याबावतच्या योजना, टेक्ससचा पाणीपुरवठ्याचा प्रश्न सोडविण्यासाठीं मध्यवर्ति सरकारकडून निधि मंजूर होण्याचा प्रश्न, इत्यादि अनेक प्रश्नांवरील विधेयकांना जॉन्सन ह्यांनीं पाठिंबा दिलेला आहे किंवा स्वत: तशीं विधेयकें सादर केलेलीं आहेत.

टेक्ससमधील जनतेला कोणत्या प्रकारचे कायदे हवे आहेत आणि आवश्यक आहेत ह्याची त्यांना जाणीव होती आणि तसे कायदे करून घेण्यासाठीं त्यांचा सतत प्रयत्न चालू असे. डेमोक्रॅटिक पक्षांत वेगानें उच्चपदाकडे धांव घेत असतांना, टेक्ससचे सेनेटर ह्या नात्यानें उत्कृष्ट कामगिरी बजाविण्याचा त्यांचा निर्धार तिळमात्रहि कमी झाला नव्हता.

ह्यापूर्वीं कधीं केली नसेल इतकी कसून मेहनत ते त्या काळांत करीत असत. इकडून तिकडे येतांजातांनाहि अनेकदां त्यांचें काम चालूच असे. त्यांच्या कचेरींतील एका कर्मचाऱ्यानें त्यांच्या ह्या धावपळीच्या जीवनाबद्दलची

एक आठवण सांगितली आहे. एकदां हा कर्मचारी आणि जॉन्सन नभोवाणी-साठीं कार्यक्रम ध्वनिमुद्रित करण्यासाठीं जाण्याकरितां कचेरीबाहेर पडले. जॉन्सन ह्यांची गाडी दरवाजापासून कांहीं पावलांवरच उभी होती. पण तेवढेंहि अंतर जॉन्सन अक्षरशः दौडत गेले.

"लिंडन ह्यांची घाईच अशी कीं जणुं उद्यांचा दिवस उगवणारच नाहीं असें त्यांना वाटत असावें," असे उद्गार त्यांच्या पत्नीनें तक्रारीच्या सुरांत काढलेले आहेत.

टेक्ससमधील अनेक वृत्तपत्रांची वॉशिंग्टन येथील प्रतिनिधि असलेली एलिझाबेथ कार्पेंटर हिनें त्या काळच्या जॉन्सन ह्यांच्या दिनचर्येचें शब्दचित्र पुढीलप्रमाणें रेखाटलें आहे :

"जॉन्सन ह्यांचा दिवस सकाळीं ६ वाजतां वृत्तपत्र-वाचनानें आणि काँग्रेसच्या आदल्या दिवशींच्या कामकाजाच्या अहवालांच्या वाचनानें सुरू होतो. नंतर दाढी-आंघोळ झाली कीं ते आपल्या कचेरींत टेलिफोन करून, अगदीं सकाळींच कामावर येणाऱ्या कर्मचाऱ्यांकडे कांहीं विशेष पत्रव्यवहार आहे कीं काय ह्याची चौकशी करतात. जॉन्सन ह्यांचा टेलिफोन येण्यापूर्वींच कर्मचाऱ्यांनीं पत्रें खोलून कामाला सुरुवातहि केलेली असते. नंतर ते एकाद्या दुसऱ्या सेनेटरला टेलिफोन करून त्याच्याशीं बातचीत करतात. नंतर न्याहारी करतात.

"न्याहारी संपतांच दरवाजासमोर उभी असलेली गाडी पकडतात. सेनेट-मधील डेमोक्रॅटिक पक्षाच्या नेत्यासाठीं काँग्रेसनें दिमतीला दिलेली ती गाडी असते. बरोबर नऊ वाजतां ते गाडींत येऊन बसतात. ड्रायव्हरनें नेहमीं-प्रमाणें 'न्यू यॉर्क टाइम्स' आणूनच ठेवलेला असतो. लगेच जॉन्सन ह्यांचें वाचन सुरू होतें.

"साडेनऊआधीं कांहीं मिनिटें गाडी त्यांच्या कचेरीपर्यंत येऊन पोहों-चते. मधल्या काळांत वाचन संपविलेलें असतें. कचेरींत पाऊल ठेवतांच प्रमुख कर्मचाऱ्यांबरोबर थोडा वेळ चर्चा होते. ९॥ ते ११॥ ही वेळ टेक्सस-मधून भेटायला आलेल्या लोकांसाठीं ठेवलेली असते. साडेनऊपासूनच ते लोक यायला सुरुवात होते. ह्या भेटीगांठी संपतांच जॉन्सन सेनेटच्या सभा-गृहाकडे तांतडीनें रवाना होतात.

"एकाद्या वेळीं जेवणापुरता वेळ ते काढतात, पण बहुधा तसा वेळ मिळतच नाहीं. कॉंग्रेसच्या इमारतींतील आपल्या कचेरींतच जेवण घेणें त्यांना आवडतें. त्यामुळें जेवतां जेवतां पक्षाच्या कांहीं सेनेटरांशीं विचार-विनिमय करायला मिळतो. वेळ जरासाहि फुकट जाणें जॉन्सन ह्यांना सहन होत नाहीं. तेव्हां शेतीविषयक प्रश्न मनांत घोळत असला तर सेनेटर रसेल, लुइझियानाचे ॲलन जे. इलेंडर, न्यू मेक्सिकोचे क्लिटन पी. ॲन्डरसन ह्या शेतीच्या प्रश्नांतील तज्ज्ञ सेनेटरांना जॉन्सन जेवण्याचें निमंत्रण देतील. प्रश्न घरबांधणीचा असेल तर दक्षिण कॅरोलायचे बर्नेट मेब्रॅंक व इलिनॉयचे पॉल डग्लस ह्या सेनेटरांना निमंत्रण देतील. प्रश्न आर्थिक असेल तर व्हर्जिनियाचे हॅरी एफ्. बर्ड किंवा जॉर्जियाचे वॉल्टर जॉर्ज ह्या सेनेटरांना निमंत्रण दिलें जाईल. संरक्षणविषयक प्रश्न असेल तर रसेल आणि मिझूरीचे स्टुअर्ट सिमिंग्टन ....

"जीं पत्रें जॉन्सन ह्यांनीं वाचणें आवश्यक असतें आणि ज्यांना स्वत: त्यांनींच उत्तरें सांगितलीं पाहिजेत अशीं पत्रें सेक्रेटरी सेनेटमध्यें घेऊन येतात. शिवाय, सकाळीं ज्या टेक्ससमधील लोकांना भेटी देणें शक्य झालें नसेल त्यांना सेनेटमधील कचेरींत भेटी देण्यांत येतात. फावल्या वेळांत आपल्या पक्षाच्या इतर सेनेटरांप्रमाणेंच दुसऱ्या पक्षाच्या सेनेटरांशींहि ते बातचीत करण्याची संधि साधतात. कारण, स्वत:च्या पक्षाच्या सभासदांप्रमाणेंच बहु-मतवाल्या पक्षाच्या सभासदांच्या आदरास आणि विश्वासास पात्र ठरल्या-शिवाय अल्पमतवाल्या पक्षाच्या नेत्याला यशस्वीपणें काम करतां येणार नाहीं असें जॉन्सन ह्यांचें ठाम मत आहे.

"सेनेटची बैठक बहुधा सायंकाळीं ६ वाजेपर्यंत चालते. बैठक संपतांच जॉन्सन आपल्या कचेरीकडे रवाना होतात. तिथें उरलेल्या पत्रांचीं उत्तरें ते सांगतात. टेक्ससमधील वृत्तपत्रांचें वाचन करतात. दिवसभरांत अनेक लोकांनीं टेलिफोन केलेले असतात. त्या सर्वांना शक्य तों टेलिफोन करणें हें नंतरचें काम असतें. तें झाल्यावर, सकाळीं नेमून दिलेल्या कामांपैकीं किती झालीं, किती अर्धवट वा संपूर्ण राहिलीं ह्यांबद्दल कर्मचाऱ्यांना विचारणा करून पुन: कांहीं सेनेटरांशीं ते टेलिफोनवरून विचारविनिमय करतात. घरीं परतण्यापूर्वीं पुन: कॉंग्रेसच्या इमारतीकडे रवाना होतात. तिथें सॅम रेबर्न ह्यांच्याबरोबर

विचारविनिमय करून बिऱ्हाडीं परततात. डेमोक्रॅटिक पक्षाच्या दोन्ही सभागृहांतील कामांची योग्य सांगड घालण्याच्या दृष्टीनें वरील विचार-विनिमय असतो.

" घरीं परतण्याला आठ वाजतात. भोजन झाल्यावर बिछान्यावर पडून सायंपत्रांचें वाचन सुरू होतें. शिवाय, दिवसभरांत वाचून उरलेलीं वृत्त-पत्रेंहि वाचलीं जातात. अंथरुणावर पडल्यापडल्या वाचन चालू असतें. तें वाचन संपलें कीं झोप....पुन: सकाळीं...."

८३ व्या काँग्रेसचें पहिलें अधिवेशन संपेपर्यंत अविरत फिरणाऱ्या चक्रा-सारखा हा दैनंदिन कार्यक्रम अखंड चालू असे. त्यांच्या ह्या अखंड कामा-बद्दल त्यांना, अधिवेशनाच्या अखेर, योग्य पारितोषिक मिळालें. अनेक सेनेटरांनीं त्यांच्या नेतृत्वाच्या सात महिन्यांचा प्रशस्तिपर आढावा घेणारीं भाषणें केलीं.

सुरुवात टेनेसीचे अल्बर्ट गोअर ह्यांनीं केली. गोअर हे जॉन्सन ह्यांच्या-बरोबर प्रतिनिधिसभेंतहि होते. नव्या सभासदांनाहि समित्यांवर नेमण्याच्या जॉन्सन ह्यांच्या धोरणामुळें ज्यांचा फायदा झाला त्या नव्या सेनेटरांपैकीं ते एक होते. गोअर ह्यांनीं आपल्या भाषणांत कृतज्ञता व्यक्त केली. मग जॉन्सन ह्यांच्याबद्दल बोलतांना ते म्हणाले,

" त्यांना पक्षाबद्दल ठाम निष्ठा आहे, पण पक्षनिष्ठेपेक्षां देशभक्तीला वरचें स्थान ते देऊं शकतील आणि देतात देखील. पात्रता आणि सचोटी ह्यांच्या बळावर त्यांनीं पक्षनेता म्हणून अपूर्व यश मिळविलें. त्यांच्या पक्षाचा एक सभासद ह्या नात्यानें, मी अनुभवानें सांगूं शकतों कीं, ऐक्य घडवून आणणारी शक्ति ह्या दृष्टीनें त्यांना दुसरी तोड नाहीं. ह्या अधिवेशनाच्या सुरुवातीला सेनेटमधील डेमोक्रॅटिक पक्षांत दुफळी होती. पण पक्षांतील एक-जुटीनें अधिवेशनाची समाप्ति होत आहे. "

गोअर हे सेनेटमधील सर्वांत तरुण सभासद होते. त्यांच्या मागून सर्वांत वृद्ध सभासद ऱ्होड आयलंडचे ग्रीन हे बोलायला उठले. तरुण सेनेटरांविषयीं जॉन्सनना वाटणारा जिव्हाळा, आस्था ह्यांचा उल्लेख करून ते म्हणाले, " वृद्ध सेनेटरांविषयीं त्यांनीं दाखविलेल्या आस्थेबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतों. दुसऱ्याबद्दल दूषित ग्रह करून न घेतां, त्याला समजून घेण्याच्या त्यांच्या

बुद्धीलाहि मी धन्यवाद देतों. त्यांचें नेतृत्व नव्या-जुन्या अशा दोन्ही प्रकारच्या सभासदांनीं खुषीनें मान्य केलें आहे."

जॉन्सन ह्यांचे प्रतिनिधिसभेंतील सहकारी आणि नव्यानेंच सेनेटवर निवडून आलेले मॉन्टॅनाचे माईक मॅन्सफील्ड म्हणाले, "काँग्रेसमध्यें अकरा वर्षें सेवा बजावल्यानंतर आज प्रथमच मला वाटत आहे कीं मी सुसंघटित पक्षाचा सभासद आहें."

जॉर्जियाचे रसेल म्हणाले, "डेमोक्रॅटिक पक्षाचा सदस्य ह्या नात्यानें मला त्यांनीं बजावलेल्या कामगिरीचा अभिमान वाटतो. अमेरिकन ह्या नात्यानें हा अभिमान दुप्पट वाटतो."

वरील भावनांनाच साद देतांना अॅलाबॅमाचे लिस्टर हिल म्हणाले, "ह्या सभागृहांत, ह्या अधिवेशनांत वारंवार आमच्या नेत्याची असामान्य पात्रता, धैर्य आणि सर्वाधिक म्हणजे, आपल्या देशाविषयीं आणि त्याच्या कल्याणाविषयीं त्यांना असलेली निष्ठा ह्यांचाच आविष्कार झालेला आहे."

न्यूयॉर्कचे लीमॅन म्हणाले, "डेमोक्रॅटिक पक्षाच्या सभासदांत मतभेद आहेत हें सत्य, पण आज आमच्यांत निर्माण झालेलें मतैक्य, त्या मतभेदांपेक्षां खूपच जास्त आहे."

मॅसाच्युसेट्स्चे जॉन फिट्झेराल्ड केनेडी म्हणाले, "वर्षाच्या प्रारंभीं लिंडन जॉन्सन ह्यांनीं जी जबाबदारी स्वीकारली होती तितकी बिकट जबाबदारी स्वीकारण्याचा प्रसंग इतर कोणाहि पुरुषावर आलेला नसेल. आज डेमोक्रॅटिक पक्ष सुसंघटित झालेला आहे, देशांत तो पुन: एकदां पाय रोवूं शकला आहे. ह्याचें श्रेय दुसऱ्या कोणत्याहि पुरुषाला नाहीं असें मला वाटतें."

रिपब्लिकन पक्षाच्या कांहीं सभासदांनींहि जॉन्सन ह्यांच्या सहकारवृत्तीचा आणि पक्षातीत दृष्टिकोनाचा गौरव केला. टॅफ्ट ह्यांच्या निधनानंतर त्या पक्षाचे नेते बनलेले कॅलिफॉर्नियाचे विल्यम एफ्. नोलंड ह्यांनींहि चाललेल्या प्रशस्तींत आपला वांटा उचलला.

मिझूरीचे स्टुअर्ट सिमिंग्टन, कॉलोराडोचे एड्विन सी. जॉन्सन, नॉर्थ कॅरोलायनाचे क्लाईड आर. होवे हे तिघे तर एकदां एकदमच उभे राहून सभाध्यक्षांकडे जॉन्सन ह्यांच्या गौरवांत सहभागी होण्याची संधि मागूं

लागले. त्यांनीं आणि इतरांनींहि डेमोक्रॅटिक पक्षांत नव्यानें वसत असलेल्या एकतेवरच भर दिला आणि त्याचें श्रेय जॉन्सन ह्यांनाच असल्याचें सांगितलें.

सेनेटरांनीं आपल्याच 'मित्रमंडळां'तील इतरांविषयीं गौरवानें बोलावें ह्यांत जगावेगळें असें कांहीं नाहीं. सेनेट ही एक भावनाधिष्ठित संस्था आहे. आणि तसाच कांहीं प्रसंग असला तर जिवंत वा मृत व्यक्तीच्या गौरवाला उधाण येतें. पण वरील प्रसंगीं व्यक्त केल्या गेलेल्या भावना केवळ कर्तव्य-बुद्धीनें बोलायचें म्हणून केल्या गेलेल्या नव्हत्या ह्याची साक्ष त्या प्रसंगीं हजर असलेले जुने जाणते निरीक्षक देतात. जॉन्सन ह्यांचा झालेला हा गौरव त्यांनीं आपल्या कार्यानेंच संपादिलेला होता अशीच सर्वांची भावना होती.

'टाईम' नियतकालिकांतील एका लेखकानें म्हटलें आहे, "डेमोक्रॅटिक पक्षाच्या दृष्टीनें, योग्य काळाला, योग्य स्थानीं लाभलेला योग्य पुरुष म्हणजे लिंडन जॉन्सन."

त्या अधिवेशनांतील घटना हाच वरील विधानाचा पुरावा आहे.

□ □ □

# १०

अगदीं भावनारहित वस्तुनिष्ठ दृष्टीनें बघितल्यास, १९५३ च्या अधिवेशनाच्या अखेरीस सेनेटमधील डेमोक्रॅटिक पक्षांत जॉन्सन ह्यांना जें स्थान होतें, तितकें एकूण राजकारणांतील त्यांचें स्थान निश्चित नव्हतें. अशा परिस्थितींत ते पुन: एकदां १९५४ च्या निवडणुकींत उभे राहावयाचे होते.

एकच वर्षापूर्वीं राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकींत ज्या उमेदवाराला त्यांच्या टेक्ससमधील मतदारांनीं बहुमतानें झिडकारलें होतें त्या उमेदवारासाठीं जॉन्सन ह्यांनीं जोरदार प्रचार केला होता. त्यानंतर नव्या सरकारशीं कांहीं प्रश्नांवर त्यांनीं कितीहि सहकार्य केलेलें असो, सेनेटमधील विरोधी पक्षाचे क्रियावान् नेते म्हणूनच ते लोकांच्या डोळ्यांपुढें होते.

शिवाय, १९४८ च्या सेनेटच्या निवडणुकीच्या वेळीं जो कडवटपणा निर्माण झालेला होता तो जॉन्सनना विरोध करणारांच्या मनांत अद्याप तसाच आहे कीं कमी झालेला आहे हें निश्चितपणें सांगतां येणें शक्य नव्हतें. त्यावेळीं मध्यवर्ति न्यायालयाच्या एका न्यायाधीशानें व्यक्त केलेला अभिप्राय जॉन्सन ह्यांना अजून आठवत होता. पक्षाच्या प्राथमिक निवडणुकींत जॉन्सन अगदीं कांठावर बहुमत मिळून विजयी झाल्यानंतर निवडणुकीचें प्रकरण न्यायालयांत गेलें होतें. त्या वेळीं वरील न्यायाधीशानें म्हटलें होतें, "विजयी उमेदवार जॉन्सन ठरोत कीं कोक स्टीव्हनसन ठरोत, पण त्या विजयी उमेदवारानें पुन: निवडणूक जिंकण्याची आशा धरूं नये."

तें कांहीं असो, आपण आपलें काम करून केलें आहे असें जॉन्सन ह्यांना वाटत होतें. १९४८ नंतरच्या कालखंडांत टेक्ससच्या जनतेसाठीं अनेक हिताचीं कामें त्यांनीं पार पाडलीं होतीं. त्या निवडणुकींतील आपल्या

विरोधकांपैकीं अनेकांना त्यांनीं मित्र बनविलें होतें. राज्यांतील आपली प्रचार संघटना त्यांनीं अद्याप शाबूत आणि मजबूत राखलेली होती.

ह्या गोष्टींचा विचार करतां पुनः दुसऱ्यांदा आपल्याला निवडून येण्याची चांगलीच आशा आहे असें जॉन्सन ह्यांना वाटत होतें. पण तसें निश्चित धरून चालण्याला अर्थात्च ते तयार नव्हते. काँग्रेसचें अधिवेशन संपल्यानंतर कांहीं थोड्या तासांच्या आंतच जॉन्सन विमानानें टेक्ससकडे रवाना झाले.

ह्या प्रयाणामागें त्यांचा हेतु एकच होता. त्या वर्षाच्या उरलेल्या पांच महिन्यांच्या कालावधींत टेक्ससमधील जितक्या जास्त लोकांना भेटतां येईल आणि त्यांच्याशीं बोलतां येईल तितक्या लोकांच्या भेटीगांठी घेण्याचा त्यांचा विचार होता.

काँग्रेसमध्यें प्रविष्ट झाल्यानंतर एका अनुभवी सहकाऱ्यानें दिलेल्या सल्ल्याचें जॉन्सन ह्यांना विस्मरण झालें नव्हतें. तो सहकारी म्हणाला होता, "आपलें स्थान टिकविण्याचा उत्कृष्ट मार्ग म्हणजे वॉशिंग्टन येथें असतांना विनाहंशील पत्रें पाठविण्याच्या सवलतीचा भरपूर फायदा घेणें आणि मतदार-संघांत असतांना पायांचीं कातडीं जास्तींत जास्त झिजविणें, हा आहे." तेव्हां टेक्ससमध्यें येतांच, पायांचीं कातडीं झिजविण्याला– टेक्ससमध्यें सर्वत्र भटकण्याला त्यांनीं जोरांत सुरुवात केली.

सर्व प्रकारच्या कार्यक्रमांना आणि समारंभांना आपण उपस्थित राहूं शकूं असें त्यांनीं वृत्तपत्रांच्या द्वारें लोकांच्या कानांवर घातलें. निमंत्रणांचा पाऊस पडूं लागला. जाहीर भाषणें, मेजवान्यांच्या वेळीं किंवा संस्थांच्या समारंभांच्या वेळीं भाषणें करणें; जत्रा, इमारती इत्यादींचें उद्घाटन करणें, शाळांतील संमेलनांना उपस्थित राहणें, अशा ज्या ज्या कारणांसाठीं निमंत्रणें येत त्यांतील स्वीकारतां येतील तितकीं स्वीकारण्याला जॉन्सन ह्यांनीं सुरुवात केली.

टेक्ससमध्यें आल्यानंतर थोड्याच दिवसांनीं पत्रकारांना दिलेल्या मुलाखतींत त्यांनीं म्हटलें कीं, एका शहाण्यासुरत्या माणसानें राजकारणांतील तीन उत्तम नियम मला सांगितले आहेत. त्या शहाण्या माणसाचा सल्ला मी अनुसरणार आहें. योग्य तेंच करा, शक्य तितकें लोकांत मिसळा आणि आपल्या 'माला'ची जाहिरात करा हे ते तीन नियम होत.

जॉन्सन म्हणाले, " कॉंग्रेस, विशेषतः सेनेट काय कामगिरी बजावते हें राज्यांतील लोकांना समजावून देण्याचा माझा प्रयत्न आहे. ह्या माणसाला आम्ही निवडून दिल्यानंतर पुनः त्याचें नांवहि आम्हांला ऐकायला मिळत नाहीं अशी तक्रार लोकांना करतां येऊं नये म्हणून मी त्यांच्याशीं लिंडन जॉन्सन ह्या व्यक्तीची जानपछान करून देऊं इच्छितों. त्यांच्या समस्यांच्या संदर्भांत त्यांना मला जें जें विचारावेंसें वाटतें तें तें विचारण्याची संधि देण्याची माझी इच्छा आहे. आणि अर्थात्‌च सेनेटर ह्या नात्यानें त्यांना जी जी मदत करतां येईल ती ती मी करूं इच्छितों. "

त्यांनीं टेक्ससच्या विस्तृत प्रदेशांत भ्रमंति केली. प्रत्येक विभाग पाया-खालीं तुडवला. निरनिराळ्या प्रकारच्या श्रोत्यांपुढें दोनशेंपेक्षां जास्त भाषणें केलीं. आपलीं भाषणें ' राजकारण-निरपेक्ष ' आहेत असें ते सांगत आणि अचूक सांगायचें तर त्यांच्या भाषणांचें स्वरूप तसेंच होतें. तरी पण आपण कोणता ' माल ' खपवूं इच्छितों हें श्रोत्यांच्या लक्षांत आणून देण्याकडे ते दुर्लक्ष करीत नसत.

मतदारांमध्यें जॉन्सन ह्यांनीं चालविलेलें हें कार्य त्यांच्या वॉशिंग्टनच्या कचेरींतील एका कर्मचाऱ्यानें प्रत्यक्ष पाहिलें होतें. कारण तो त्या वेळीं त्यांच्याबरोबर होता. आपल्या वरिष्ठाची ती कामाची धमाल बघून तो थक्कच झाला. परत आल्यानंतर आपल्या सहकाऱ्यांना जॉन्सन किती लोक-प्रिय आहेत हें सांगतांना तो म्हणाला,

" लोकांत त्यांना आवडत्या वीरासारखेंच स्थान आहे. एकाद्या गांवांत आम्ही प्रवेश करतांच, गाडी नीट थांबण्यापूर्वींच ते बाहेर उडी घेत असत. लगेच रस्त्याच्या कडेला जाऊन भेटलेल्या प्रत्येकाशीं हस्तांदोलन करीत असत. थोड्याच वेळांत त्यांच्याभोंवती गर्दी जमे. मुलें स्वाक्षऱ्या मागत असत. वृद्ध स्त्रिया, ' बालपणीं किती छान पोरगा होतास रे ! ' असें म्हणून जुन्या आठवणी आळवीत असत. शेतकरी त्यांचा हात पकडून म्हणत, ' तुम्ही आमच्या हितावर लक्ष ठेवाल हें जाणून आहोंत आम्ही. ' असें दृश्य मी कधींच बघितलें नव्हतें. "

जाहीर भाषणांत जॉन्सन अमेरिकेचें परराष्ट्रीय धोरण आणि शेतीचे प्रश्न ह्या विषयांची चर्चा करीत असत. कॉंग्रेसमध्यें डेमोक्रॅटिक पक्षानें

राष्ट्राध्यक्षांना अनेकदां कशी मदत केली हें विशद करून सांगत असत. राष्ट्राच्या भविष्याविषयींची आपली श्रद्धा व्यक्त करीत असत. आणि स्वतः सामर्थ्यवान् राहून जागतिक शांततेसाठीं प्रयत्न करण्याचें महत्त्व आहे, ह्या मुद्द्यावर भर देत असत.

जानेवारींत ते वॉशिंग्टनला परत आले. पुनः जॉन्सन ह्यांना बिनविरोध सेनेटसाठीं निवडून दिलें पाहिजे असें अग्रलेखांतून प्रतिपादण्याला वृत्तपत्रांनीं पुढें सरसावावें इतका प्रभाव जॉन्सन ह्यांनीं त्या महिन्यांत पाडला.

अर्थात् बिनविरोध निवडून येण्याइतकें त्यांचें भाग्य नव्हतें. तेलधंद्यांतील एक श्रीमंत तरुण आणि टेक्ससमधील कोणाहि श्रीमंतापेक्षां जास्त स्थितिवादी असणारे डडले डोहर्टी ह्यांनीं पक्षाच्या प्राथमिक निवडणुकीसाठीं जॉन्सन ह्यांचे प्रतिस्पर्धी म्हणून आपली उमेदवारी जाहीर केली. पण ह्या प्रतिस्पर्ध्याकडे लक्ष न देतां जॉन्सन आपली वॉशिंग्टनमधील कामगिरी बजावीत राहिले.

१९५४ च्या जुलैमध्यें डेमोक्रॅटिक पक्षातर्फे झालेल्या प्राथमिक निवडणुकींत प्रतिस्पर्ध्याच्या तिप्पट मतें मिळवून जॉन्सन निवडून आले. १९४८ च्या निवडणुकींत त्यांना अगदीं कांठावर बहुमत मिळून विजय पदरांत पडला होता. शिवाय, ती निवडणूक कमालीच्या संघर्षांत पार पडली होती. त्या पार्श्वभूमीवर ह्या वेळच्या यशाकडे बघून व्यक्तिशः जॉन्सनना गाढ समाधान वाटलें.

मध्यंतरींच्या काळांत, सेनेटमध्यें, अल्पमतवाल्या पक्षाचा नेता ह्या नात्यानें पहिल्या वर्षांत अनुसरलेली कार्यपद्धतीच जॉन्सन अनुसरत होते. जो मॅकार्थीच्या उपद्व्यापामुळें रिपब्लिकन पक्षांत पूर्वींपेक्षां जास्तच दुफळी माजली होती. जॉन्सन ह्यांच्या राजकीय तत्त्वज्ञानाच्या अगदीं विरुद्ध टोकाला मॅकार्थीचें राजकीय धोरण होतें. मॅकार्थीच्या धोरणामुळें त्याच्याच पक्षांत माजणाऱ्या भांडणांचा योग्य फायदा घेण्याइतके जॉन्सन मुत्सद्दी होते.

रिपब्लिकन पक्षांतील दुफळीची प्रतिक्रिया डेमोक्रॅटिक पक्षावर उलट होत होती. त्या संधीचा फायदा घेऊन स्वपक्षाचें ऐक्य अधिक दृढ करण्याकडे तिचा उपयोग जॉन्सन ह्यांनीं केला. आणखी एक वस्तुस्थिति अशी कीं,

महत्त्वाच्या राष्ट्रीय प्रश्नांच्या बाबतींत आयझनहॉवर ह्यांना स्वतःच्या रिपब्लिकन पक्षाच्या सेनेटरांपेक्षां डेमोक्रॅटिक पक्षाच्या सेनेटरांचा जोरदार पाठिंबा मिळण्याचीच खात्री असे. जॉन्सन ह्यांची कार्यपद्धति नेहमींप्रमाणेंच परिणामकारक ठरत होती. इतकेंच नव्हे तर पहिल्या अधिवेशनापेक्षां ह्या अधिवेशनांत ती अधिक परिणामकारक ठरली. ह्या खेपेस नेतेपणाची आपली पात्रता सिद्ध करून दाखविण्याची त्यांना आवश्यकता नव्हती. डेमोक्रॅटिक पक्षाच्या 'राजकीय दिवाळखोरी'ची भाषा आतां कोणीच बोलत नव्हतें.

नोव्हेंवरमध्यें होणाऱ्या काँग्रेसच्या निवडणुकांचा जॉन्सन ह्यांना अर्थात्‌च विसर पडलेला नव्हता. त्या निवडणुकींत डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवारांच्या विजयाची हमी देणारी पार्श्वभूमि म्हणून पक्षाच्या काँग्रेसमधील कामगिरीचें ठळक चित्र रेखाटण्याचे प्रयत्न सेनेटमधील अल्पमतवाल्या पक्षाचे नेते ह्या नात्यानें जॉन्सन करीतच होते.

पक्षाच्या नेतेपणाच्या स्थानावरून काम करतांना त्यांची ठामपणें खात्री पटली होती कीं, आपल्या पक्षाला मध्यम मार्गानें नेऊनच आपण त्या पक्षाची सर्वांत जास्त सेवा बजावूं शकूं. बेजबाबदार पक्ष ह्या आरोपामुळें डेमोक्रॅटिक पक्षानें जनतेचा गमावलेला आदर परत मिळविण्याच्या दृष्टीनें खूपच मोठी प्रगति झालेली आहे अशी जॉन्सन ह्यांची धारणा होती. हा आदर टिकविण्याचा व वाढविण्याचा प्रयत्न त्यांना करावयाचा होता.

ह्या संदर्भांत ते म्हणत असत, "अतिरिक्त कडव्या लोकांच्या–मग ते डावे असोत कीं उजवे–हातीं पक्षाचीं सूत्रें असतील तर त्या पक्षाकडे जनता अखेर पाठ फिरविते. डेमोक्रॅटिक पक्षावर कांहीं ठसा उमटविणें मला शक्य होणार असेल तर त्या पक्षाला अतिरिक्त जहालांचा पक्ष नव्हे तर मध्यममार्गी पक्ष बनविण्याची माझी इच्छा आहे."

डेमोक्रॅटिक पक्षाचें, 'जबाबदारीच्या राजकारणाचें' कार्य हें १९५४ च्या निवडणुकींतील प्रचाराचें अस्त्र बनविण्यांत जॉन्सन यशस्वी झाले होते.

प्रचारांत हिरीरीनें भाग घेण्यांत जॉन्सनना तोड नव्हती. कॅलोराडो, वॉशिंग्टन, माँटॅना, वायोमिंग, युटा, नेवाडा, ॲरिझोना, न्यू मेक्सिको आणि मिनेसोटा एवढ्या राज्यांमध्यें त्यांनीं तुफान प्रचारदौरे काढले. पक्षापेक्षां,

अमेरिकेच्या हितसंबंधांना पोषक असा राष्ट्रीय कार्यक्रम आवश्यक आहे हें त्यांच्या प्रचाराचें मुख्य सूत्र होतें.

ते सांगत, "डेमोक्रॅटिक पक्षाच्या हातीं कॉंग्रेसचीं सूत्रें गेलीं तर वैधानिक क्षेत्रांत तणातणी माजेल, वैधानिक कार्याला खीळ बसेल, अशा स्वकपोल-कल्पित भीतीचा रिपब्लिकन पक्ष बाऊ करीत आहे. पण अशी तणातणी माजली–शीतयुद्ध सुरू झालेंच तर तें रिपब्लिकन पक्षच सुरू करील. राष्ट्राचें कार्य करण्यांत डेमोक्रॅटिक पक्ष इतका गुंतलेला असेल कीं असले उपद्व्याप करण्याला त्याला उसंतच मिळणार नाहीं. पण अमेरिकन राज-कारणांत शीतयुद्ध निर्माण होणार ही कल्पना रिपब्लिकन पक्षाला कां आव-डली हें मला माहीत आहे; कारण खुद्द स्वपक्षांत त्यांच्या अनुयायांनीं गेलीं दोन वर्षें शीतयुद्ध चालविलें आहे. तेव्हां तसेंच शीतयुद्ध डेमोक्रॅटिक पक्षा-बरोबरहि चालू ठेवलें पाहिजे असें त्यांना वाटत असावें."

प्रचारदौऱ्याच्या अखेरीस जॉन्सन टेक्ससमध्यें आले तेव्हांच त्यांनीं आशा व्यक्त केली कीं, कॉंग्रेसच्या दोन्ही सभागृहांत डेमोक्रॅटिक पक्ष बहुमत मिळवूं शकेल. आणि ह्या परिणामाबद्दल दुसऱ्या कोणाला दोष देण्यापेक्षां स्वतः रिपब्लिकन पक्षच ह्या परिस्थितीला जबाबदार असेल.

ते म्हणाले, "अमेरिकन जनतेला मुख्यतः ही जाणीव झालेली आहे कीं, रिपब्लिकन पक्षाचे कॉंग्रेसमधील सभासद राष्ट्राध्यक्षांशीं सहकार्य करण्याच्या बाबतींत अपात्र ठरले आहेत. अमेरिकन जनतेशीं किंवा कुणाशींच सहकार्य करण्यास ते अपात्र ठरलेले आहेत. फारसा देखावा न करतां जास्तींत जास्त कार्यक्षमतेनें जनतेचें कार्य करूं शकेल अशी जबाबदारीची जाणीव असणारी कॉंग्रेसच पाहिजे ही जनतेची उत्कट इच्छा आहे."

सेनेटमध्यें फक्त एकच जागा जास्त मिळाली तरी दोन्ही सभागृहांत डेमोक्रॅटिक पक्षाला बहुमत मिळालें. निवडणूक संपल्यावर जॉन्सन वॉशिंग्टनला गेले. जो मॅकार्थीवर अविश्वास व्यक्त करणारा ठराव विचारांत घेण्यासाठीं सेनेटची बैठक भरावयाची होती. वॉशिंग्टनला येतांच जॉन्सन ह्यांनीं पत्रकारांची बैठक बोलावली. नव्या कॉंग्रेसमध्यें डेमोक्रॅटिक पक्ष काय धोरण ठेवणार ह्याबद्दलचें त्यांचें स्पष्टीकरण ऐकण्यासाठीं त्यांच्या कचेरींत वृत्त-पत्रें, नभोवाणी आणि दूरचित्रवाणी ह्यांच्या प्रतिनिधींची गर्दी झाली होती.

आपल्या 'औपचारिक' परंतु उत्स्फूर्त भाषणांत त्यांनीं आपली भूमिका विशद केली. पत्रकारांच्या प्रश्नांनाहि उत्तरें दिलीं. ह्या दोन्हींच्या साह्यानें त्यांनीं चित्र उभें केलें तें असें :

त्यांनीं प्रथमच एक गोष्ट स्पष्ट केली कीं, येत्या अधिवेशनाला डेमोक्रॅटिक पक्ष उपस्थित राहील तो लढाऊ वृत्तीनें नव्हे. ते म्हणाले, "उलट आमच्या बाजूनें सहकार्याचें वचन आणि दुसऱ्या बाजूनेंहि सहकार्याचें वचन ह्या तत्त्वावरच नव्या अधिवेशनाचा प्रारंभ व्हावा अशी डेमोक्रॅटिक पक्षाची तळमळीची इच्छा आहे. आम्ही राष्ट्राध्यक्षांशीं सहकार्य करतांना तडजोडीची वृत्ति ठेवूं. कायदेमंडळाच्या क्षेत्रांत निष्क्रियतेचें वातावरण निर्माण होण्याचें कांहींच कारण नाहीं. केवळ पक्षीय भांडणांचीहि आवश्यकता नाहीं. निवडणुकीच्या निकालांवरून सिद्ध झालें आहे कीं, अतिरिक्त पक्षीय आवाहनांचा अमेरिकन जनतेनें धिक्कारच केला आहे आणि उच्च कसोटी लावूनच मतदान केलेलें आहे.

"जे सभासद राष्ट्राच्या कल्याणाला अग्रस्थान देतील आणि पक्षीय गोष्टींना अगदीं कमी महत्त्व देतील असे सभासद अमेरिकन जनतेला पाहिजेत—मग ते कोणत्याहि पक्षाचे असोत—हें जनतेनें ह्या निवडणुकींत दाखवून दिलें. डेमोक्रॅटिक पक्ष जनतेच्या ह्या अपेक्षेला अनुसरून शक्य होईल तें तें करील."

दोन्ही पक्षांतील 'शीतयुद्धा'ची कल्पना डेमोक्रॅटिक पक्षाला मान्य नाहीं हें त्यांनीं स्पष्ट केलें.

लौकरच सेनेटमधील डेमोक्रॅटिक पक्षाच्या धोरण समितीची आणि नव्या कॉंग्रेसमधील विविध समित्यांच्या अध्यक्षांची बैठक भरणार आहे असें सांगून, अधिवेशनें सुरू होण्याच्या वेळेपर्यंत डेमोक्रॅटिक पक्षाचा तपशीलवार कार्यक्रम तयार होईल, असें ते म्हणाले.

जॉन्सन म्हणाले, "हा कायदेविषयक कार्यक्रम विधायक स्वरूपाचा असेल; राष्ट्राच्या विद्यमान गरजांचा कांटेकोर विचार करून अगदीं हवा तसा तयार केलेला असेल. युनायटेड स्टेट्स्‌ची सुरक्षितता आणि प्रगति निर्वेध व्हावी ह्या दृष्टीनें आवश्यक असणाऱ्या महत्त्वाच्या प्रश्नांचा अंतर्भाव त्या

कार्यक्रमांत असेल. सुबुद्ध परराष्ट्रीय धोरण, पुरेशी संरक्षणविषयक योजना, अमेरिकन जनतेचें जास्तींत जास्त कल्याण ही कसोटी लावून योग्य ठरलेलीं धोरणें इत्यादि महत्त्वाच्या प्रश्नांचा त्या कार्यक्रमांत समावेश केलेला असेल.

"सर्व अमेरिकन जनतेचा राष्ट्राध्यक्ष म्हणून काम करण्याचा निर्धार राष्ट्राध्यक्ष आयझनहॉवर ह्यांनीं व्यक्त केला आहे. राष्ट्राध्यक्षांच्या हेतू-सारखाच हेतु डेमोक्रॅटिक पक्षानेंहि पुढें ठेवलेला आहे. तेव्हां एकच हेतु असणाऱ्या राष्ट्राध्यक्षांना आणि पक्षाला मी उल्लेखिलेल्या महत्त्वाच्या प्रश्नावर हार्दिक सहकार्य करण्याला कांहींच अडचण नाहीं."

आपल्या पक्षाचे सेनेटमधील नेते आणि प्रतिनिधिसभेंतील नेते निकट सहकार्यानें कार्य करतात असें सांगून जॉन्सन म्हणाले, "वॉशिंग्टनला येतांना मी बॉनहॅम (टेक्सस) येथें उतरून रेबर्न ह्यांची भेट घेतली व त्यांच्याशीं विचारविनिमय केला. तेच पुन: प्रतिनिधिसभेचें सभापतिपद विभूषित करतील.

"सेनेटमधील डेमोक्रॅटिक पक्षाची धोरण समिती आणि प्रतिनिधिसभेंतील पक्षाचे नेते ह्यांच्या संयुक्त विचारविनिमयानेंच आमचा कार्यक्रम ठरविला जाईल. राष्ट्राध्यक्षांचा मान राखण्याच्या दृष्टीनें, हा कार्यक्रम, त्यांचें राष्ट्राला संदेश देणारें भाषण झाल्यावरच जाहीर केला जाईल. त्यांच्या भाषणांत आणि आमच्या कार्यक्रमांत मतभेदाचे मुद्दे अगदीं थोडेच असतील अशी माझी आशा आहे."

सर्वांगीण विचार करून, पाऊल टाकण्याचेंच धोरण जॉन्सन पुढें चालवीत होते. वर्षाचे उरलेले दिवस विविध बैठकी, ८४ व्या काँग्रेसमध्यें पक्षनेता ह्या दृष्टीनें घ्यावयाच्या भूमिकेचा विचार इत्यादि गोष्टींनीं गजबजलेले होते.

# ११

आतां जॉन्सन ह्यांचें वय शेहेचाळीस होतें. आजवर सेनेटच्या बहुमतवाल्या पक्षांच्या होऊन गेलेल्या सर्व नेत्यांमध्यें ते तरुण होते. पण, शासनयंत्राचा त्यांचा अनुभव बावीस वर्षांचा होता. काँग्रेसमधील सेवेंतच त्यांनीं अठरा वर्षें व्यतीत केलेलीं होतीं. आतां त्यांच्या केंसावर करडा रंग चढूं लागला होता. कपाळावर पुढच्या बाजूला थोडेंसें टक्कल दिसूं लागलें होतें. त्यांच्या उत्साही मुद्रेवर थोड्याशा रेषा उमटलेल्या दिसूं लागल्या होत्या. प्रौढ-पणाच्या ह्या बाह्य खुणा झाल्या. पण सेनेटमध्यें कार्य घडवून कसें आणावें ह्याचें त्यांचें ज्ञान आतां अधिक परिपक्व झालेलें होतें.

त्यांनीं आपली पुढील कामगिरी अत्यंत आवडीनें हातीं घेतली. आपली ही कामगिरी, मोठ्या कारखान्याच्या मुख्य व्यवस्थापकासारखी आहे अशी त्यांची धारणा होती. खरोखरच काँग्रेसच्या प्रारंभींच्या काळांत पक्षनेत्यांचा अधिकृत हुद्दा व्यवस्थापकाचाच मानला जात असे. आणि त्या काळाप्रमाणेंच आजहि बहुमतवाल्या पक्षाचें सेनेटमधील नेतृत्व करणाऱ्याला कामकाजाची व्यवस्था लावणें, कायदेमंडळांतील कार्य अखंडपणें सुरळीत चालू ठेवण्याची व्यवस्था करणें, ह्याच जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. अर्थात् ही जबाबदारी एकाकीपणें कधींच पार पाडणें शक्य नसतें. पण जॉन्सन एकटे कधींच नव्हते आणि नव्या काँग्रेसमध्यें सहकारी प्रयत्नांना चालना देण्याच्या दृष्टीनें त्यांनीं पूर्वीपेक्षां कसून प्रयत्न सुरू केले.

१९५५ च्या पहिल्या सहामाहींत सेनेटच्या सभागृहांतील त्यांचें मेज तेथील कार्याचें केंद्रस्थानच बनलें होतें. सर्व सूत्रें तेथूनच हालविलीं जात असत.

युनायटेड स्टेट्स्चे सेनेटर असणें ह्या एकाच समान वैशिष्ट्याखेरीज दुसरें कसलेंहि साम्य नसलेले भिन्नभिन्न प्रवृत्तीचे आणि मतांचे सभासद वारंवार जॉन्सन ह्यांच्या मेजापाशीं येत असत. ज्यांचा जन्मजात पिंड स्थितिवादी होता आणि आपल्या राज्यांतील उमरावांचे जणुं खरेखुरे प्रतिनिधि म्हणतां येतील असे जॉर्जियाचे वर्ड, जन्मजात बंडखोर आणि तिखट जिभेचे म्हणून ख्यातनाम असणारे ऑरिगॉनचे वायने मोर्स; आग्रही पण विश्वासू असे, अल्पमतवाल्या पक्षाचे नेते नोलंड; सर्व प्रश्नांवर मतें असणारे आणि तीं मतें सुस्पष्टपणें विशद करण्याची पात्रता असणारे द्रुतगति वक्ते ह्यूबर्ट हम्फ्रे, ज्यांच्या शब्द उच्चारण्याच्या पद्धतीवरूनच ते मॅसॅच्युसेट्स्चे आहेत हें सिद्ध होई ते लेव्हरेट साल्टनस्टॉल; ही मंडळी आणि अन्य सभासद जॉन्सन ह्यांच्या मेजापाशीं येत असत.

आणि जॉन्सन त्यांना म्हणत, "या, या! आपण सर्व मिळून विचार करूं या!"

जॉन्सन हे 'व्यवस्थापक' होतेच, पण ते वरिष्ठाची हुकमत चालविण्याच्या वृत्तीनें वागत नसत. कोणतें विधेयक मांडण्यांत कोणी पुढाकार घ्यावा ह्याचा विचार सर्वांच्या मतांची सांगड घालून ते करीत असत. सर्व माणसांना एकत्र आणून त्यांच्या कल्पनांची सांगड घालणें ही त्यांच्या व्यवस्थापकीय कार्यपद्धतीची रीत होती.

एकमत घडवून आणण्यासाठीं स्वतःच्या भूमिकेला मुरड घालण्याचा आरोप कोणी केल्यास ते तावडतोब उत्तर देत, "अमेरिकन लोकशाहीचा इतिहासच तडजोडीतून निर्माण झाला आहे. एकमेकांच्या सचोटीबद्दल आदर बाळगणाऱ्या, एकमेकांवर हेत्वारोप करण्याचें टाळणाऱ्या, स्नेहभाव राखणाऱ्या माणसांच्या देवाणघेवाण वृत्तीवरच लोकशाही सुरळीत चालणें अवलंबून आहे."

संघर्ष हेंच ज्यांचें खाद्य असे वृत्तपत्र टीकाकार कुरकुर करीत कीं सेनेटचें कामकाज फारच मिळमिळितपणानें चालतें. त्यावर जॉन्सन उत्तर देत, "आरडाओरड न करतां कार्यक्षमतेनें मुकाट्यानें सरकारचें कामकाज चालावें हीच लोकांची इच्छा आहे असें मला ठामपणें वाटतें. केवळ गंमत म्हणून कोणीहि होडी कलंडवावी असें अमेरिकन जनतेला वाटत असेल असें मला वाटत नाहीं."

छोटे छोटे गट जॉन्सन ह्यांच्यावर तत्त्वाला हरताळ फासण्याचा आणि सच्च्या डेमोक्रॅटिक पक्षीयांना दुर्लक्षिल्याचा आरोप करूं लागले तर जॉन्सन त्यांना प्रत्युत्तर देण्याच्या फंदांत पडत नसत. कारण, ज्या डेमोक्रॅटिक पक्षाच्या सभासदाला दुर्लक्षिल्याचा आरोप हे लोक करीत तोच सभासद जॉन्सन ह्यांच्या नेतृत्वाचा पाठपुरावा करणारें भाषण कधींमधीं सेनेटमध्यें करीत असे. वरील लोकांना उत्तर देण्यापेक्षां जॉन्सन त्या सभासदाचें भाषण ऐकण्यासाठीं मुद्दाम सेनेटच्या सभागृहांत उपस्थित असत.

सेनेटचें कामकाज निर्वेध चालविण्यासाठीं जॉन्सन नोलंड ह्यांच्याशीं घनिष्ठ सहकार्य करीत असत. कोणत्या दिवशीं कोणतें विधेयक विचारासाठीं घ्यावें, कोणतें लांबणीवर टाकावें ह्याबाबत उभय पक्षांच्या नेत्यांचें एकमत होणें अगत्याचें असतें.

त्या अधिवेशनाच्या समाप्तीनंतर झालेल्या कामकाजाचें सिंहावलोकन करतांना जॉन्सन ह्यांनीं सांगितलें, " विधेयक विचारार्थ घ्यावें असें सुचविणाऱ्या ठरावावर, बिल नोलंड ह्यांची स्वाक्षरी झालेली नाहीं असा एकहि ठराव कधींच मांडला गेला नाहीं. धक्के देण्याचें तंत्र, लपंडाव, ताबातावानें बोलणें ह्यांचा त्या अधिवेशनांत पूर्ण अभावच होता. "

एकादें विधेयक सेनेटपुढें प्रत्यक्ष मांडलें जाण्यापूर्वींच त्यांतील खटकणाऱ्या गोष्टींना मुरड घालण्याची जॉन्सन ह्यांची पद्धति होती. हें काम समित्यांतील विचारविनिमयापासूनच सुरू होत असे. समित्यांच्या अध्यक्षांनीं आणि सभासदांनीं त्यांच्याकडे सोंपविलेल्या विधेयकाचा अभ्यास बैठकीच्या वेळेव्यतिरिक्त असलेल्या अवधींत पूर्णपणें केला पाहिजे असा जॉन्सन ह्यांचा आग्रह असे. सेनेटपुढें तें विधेयक येण्यापूर्वी त्यासंबंधींचा सर्वांगीण विचार आधीं झाला पाहिजे असें त्यांचें म्हणणें होतें.

एकाद्या विवाद्य विधेयकाबद्दल डेमोक्रॅटिक सेनेटरांच्या भावना काय आहेत याची चांचपणी सतत चालू असे. त्यामुळें मतदानाची प्रत्यक्ष वेळ येई तेव्हां विधेयक मंजूर होणार कीं नामंजूर ह्याचा बरोबर कयास त्यांना असे. आणि विधेयकाचें संभाव्य भवितव्य आपल्याला हवें तसें ठरणार नाहीं असें जर त्यांना वाटलें तर, सभासदांचें मन वळविण्याचा कटोकटीचा प्रयत्न करून

होईपर्यंत त्या विधेयकावर मतदान होण्याची वेळच येणार नाहीं अशी तरतूद ते करीत असत.

अनेकदां मन वळविण्याच्या तंत्राव्यतिरिक्त अन्य मार्गहि ते चोखाळीत असत. एकदां एका विधेयकावर अगदीं समसमान मतदान होणार असा त्यांचा कयास होता. त्यांनीं मतदान लांबणीवर टाकलें. बाहेरगांवीं गेलेला डेमोक्रॅटिक पक्षाचा एक सभासद परत येतांच त्याला विमानतळावरून मोटारसायकलवरून घाईनें सभागृहांत आणल्यावरच त्या विधेयकावर मतदान झालें. अर्थात् मतांचा अंदाज त्यांनीं निराशावादी दृष्टीनें घेतला होता हें मतदानांत सिद्ध झालें. विधेयक मंजूर होण्यासाठीं आवश्यक असणाऱ्या मतांपेक्षां वरींच जास्त मतें विधेयकाच्या बाजूनें पडलेलीं होतीं.

अंमलबजावणी शाखेकडून मांडण्यांत येणाऱ्या ठरावाबाबतची डेमोक्रॅटिक पक्षाची भूमिका ठरलेलीच होती. अल्पमतवाला पक्ष म्हणून असतांना अवलंबिलेलें जबाबदार राजकारणाचें तत्त्व ह्या पक्षानें बहुमतांत आल्यावरहि सोडलें नव्हतें. फोर्मोसा बेटावरील राष्ट्रवाद्यांविरुद्ध आक्रमण करूं नका अशी चिनी कम्युनिस्टांना ताकीद देणारा ठराव राष्ट्राध्यक्षांनीं सादर केला तेव्हां तो ठराव मंजूर करावा असें आग्रहपूर्वक प्रतिपादन करण्यांत जॉन्सन ह्यांनींच पुढाकार घेतला होता.

राष्ट्राध्यक्ष जिनेव्हा परिषदेला जावयाचे होते तेव्हां त्या परिषदेंत त्यांनीं रशियन नेत्यांशीं वाटाघाटी करतांना अवलंबावयाच्या धोरणावर बंधनें घालणारा ठराव जो मॅकार्थी ह्यांनीं मांडला तेव्हां जॉन्सन त्या ठरावावर तुटून पडले. रिपब्लिकन पक्षाचे नेते नोलंड, आयोवाचे हिकेनलूपर आणि मॅकार्थींना पूर्वीं अनेकदां पाठिंबा देणारे इतर सेनेटर ह्यांना ठरावाविरुद्ध धोरण स्वीकारायला भाग पाडून जॉन्सन ह्यांनीं त्या ठरावाची तिरडी बांधली. मॅकार्थींच्या बाजूनें त्यांचें स्वतःचें आणि इतर तीन इतकींच मतें पडलीं.

जागतिक व्यापार कार्यक्रमासंबंधीचें आयझनहॉवर ह्यांचें विधेयक स्वीकारार्ह स्वरूपांत मंजूर होण्याच्या कामीं इतर कोणापेक्षांहि जॉन्सन ह्यांचेच प्रयत्न कारणीभूत झाले. सेनेटच्या फायनान्स कमिटींतील चर्चेचें मार्गदर्शन त्या समितीचे अध्यक्ष ह्या नात्यानें करून त्यांनीं तें विधेयक सेनेटमध्यें मंजूर होईल अशा स्वरूपाचें बनविलें.

डेमोक्रॅटिक पक्षाच्या हातीं काँग्रेस गेल्यास अंमलबजावणी शाखा आणि कायदेमंडळ शाखा ह्यांच्यांत तणातणी माजेल असा जो प्रचार १९५४ च्या निवडणुकींत केला गेला होता तें भाकीत खरें होण्यासारखे कांहींच घडत नव्हतें.

उलट राष्ट्राध्यक्षांशीं डेमोक्रॅटिक पक्षानें जें सहकार्य केलें त्याचा आढावा घेतांना राष्ट्राध्यक्षांचे कट्टर चहाते असलेले प्रख्यात पत्रकार वॉल्टर लिपमन ह्यांनीं म्हटलें आहे, " राष्ट्राध्यक्ष ह्या नात्यानें आयझनहॉवर ह्यांची कारकीर्द यशस्वी होण्याला सुरुवात, रिपब्लिकन पक्षाच्या हातून काँग्रेसचीं आणि स्थायी समितीचीं सूत्रें गेल्यानंतरच झाली असें म्हणणें मुळींच अतिशयोक्तीचें होणार नाहीं. पहिल्या दोन वर्षांत राष्ट्राध्यक्षांना जुन्या जाणत्या रिपब्लिकन नेत्यां-कडून सतत निराशा आणि दडपण ह्याखेरीज दुसरा कसलाच लाभ झाला नाहीं. विशेषत: सेनेटमधील समित्यांच्या रिपब्लिकन पक्षीय अध्यक्षांचा ह्यांत मोठा भाग आहे."

उदारमतवादी सेनेटर ह्यूबर्ट हम्फ्रे ह्यांनीं सेनेटमधील भाषणांत जॉन्सन ह्यांचा असाच गौरव केला, ते म्हणाले, "टेक्ससतर्फेचे हे सेनेटर कायदेमंडळ-विषयक कामकाजाच्या कलेंतील प्रतिभावान् कलाकार आहेत. त्यांच्या नेतृत्वाचा आणि कौशल्याचा जो आविष्कार दिसला त्याचा मला अभिमान वाटतो, असें म्हणतांना मला मुळींच संकोच वाटत नाहीं."

सेनेटमधील उदारमतवादी गटाचे नवे सदस्य आणि ज्यांच्यासाठीं १९५४ च्या निवडणुकींत जॉन्सन ह्यांनीं प्रचार केला होता ते सेनेटर रिचर्ड न्यू बर्जर (ओरेगॉन) ह्यांनीं स्पष्ट शब्दांत घोषित केलें, " बहुमतवाल्या पक्षाच्या नेत्यांवर होणाऱ्या टीकेशीं मी मुळींच सहमत नाहीं. ते जास्तींत जास्त उदार-मतवादीच आहेत आणि डेमोक्रॅटिक पक्षाचे कार्यक्षम नेते हें त्यांचें स्थान आजहि अढळ आहे."

डेमोक्रॅटिक पक्षाच्या परंपरागत ध्येय-धोरणांचा जॉन्सन ह्यांनीं मुळींच त्याग केला नव्हता. राष्ट्राध्यक्षांकडून मांडल्या गेलेल्या कोणत्याहि ठरावाला सेनेटमधील डेमोक्रॅटिक पक्षीयांची संमति सहजासहजीं मिळत नसे. आधीं त्या प्रत्येक ठरावाची कसून छाननी होत असे.

अशा छाननीमध्यें, आपल्याला नापसंत असें कांहीं डेमोक्रेटिक सभासदांना आढळून आलें तर तो ठराव नामंजूर होईल असा प्रयत्न ते करीत किंवा

आपल्याला हव्या असलेल्या दुरुस्त्या करवून घेण्याचा त्यांचा प्रयत्न असे. अशा बहुतेक प्रयत्नांत ते यशस्वी होत असत.

किमान वेतनाचा दर ७५ सेंटवरून ९० सेंटवर न्यावा अशी मागणी राष्ट्राध्यक्षांनीं केली. डेमोक्रॅटिक पक्षानें तो एक डॉलर करून घेतला.

राजरस्ते सुधारण्यासाठीं मदत करण्यासंबंधीचें राष्ट्राध्यक्षांचें विधेयक जॉन्सन ह्यांच्या आदेशानुसार सेनेटनें फेटाळून स्वत: निराळें विधेयक मंजूर केलें.

डाक कामगारांच्या वेतनांत सहा टक्के वाढ करण्याची राष्ट्राध्यक्षांची योजना होती. सेनेटनें त्यापेक्षां जास्त वाढ मंजूर केली. राष्ट्राध्यक्षांनीं धुडकावणीचा अधिकार वापरला. नंतर सेनेटनें आठ टक्के वाढ मंजूर केली. ह्या ठरावावर राष्ट्राध्यक्षांनीं शिक्कामोर्तब केलें.

आयझनहॉवर ह्यांच्या पसंतीचें घरबांधणी-विधेयक गलिच्छ वस्त्यांच्या उच्चाटणाच्या दृष्टीनें अपुरें आहे असें डेमोक्रॅटिक पक्षाचें मत होतें. गलिच्छ वस्त्यांच्या उच्चाटणाची अधिक तरतूद करणारें विधेयक पक्षाचेच एक सभासद अॅलाबॅमाचे जॉन स्पार्कमन ह्यांनीं मांडलें आणि तेंच अखेर सेनेटमध्यें मंजूर झालें.

"तुम्ही जें जें कराल, त्यापेक्षां जास्त चांगलें करून दाखवूं" हाच मंत्र जणुं डेमोक्रॅटिक पक्षाचा होता असें भाष्य कांहीं निरीक्षकांनीं केलें आहे.

आपल्या पक्षाला अगदीं काठावर लाभलेल्या बहुमताला सदासर्वदा अंजारून गोंजारून टिकविण्याचा जॉन्सन ह्यांचा अहर्निश प्रयत्न चालू असे. अल्पमतवाल्या पक्षाचे नेते ह्या नात्यानें पहिल्या दोन वर्षांत त्यांनीं केलेल्या अविरत प्रयत्नांचें फळ आतां त्यांच्या पदरांत पडत होतें. जॉन्सन ह्यांच्या मार्गदर्शनाखालीं कामकाज करणारें सेनेट एकखांबी तंबूसारखें खासच नव्हतें; पण त्या तंबूचा मुख्य आधारस्तंभ जॉन्सनच होते ह्याबद्दल शंकेला तिळमात्र जागा नव्हती.

जॉन्सन ह्यांनीं जाणीवपूर्वक पुढें ठेवलेला उद्देश, 'दि न्यूयॉर्क टाइम्स'चे आर्थर क्रॉक ह्यांच्या शब्दांत सांगावयाचा म्हणजे, "कायदेविषयक कामावरच सभासदांचें लक्ष केंद्रित रहावें" हा होता. ह्या उद्देशामुळें देशाची आणि पक्षाचीहि सेवा एकाच वेळीं घडते असें जॉन्सन ह्यांचें मत होतें.

त्या वर्षीच्या वसंत ऋतूंत केलेल्या एका भाषणांत जॉन्सन म्हणाले, "अमेरिकेच्या दृष्टीनें सर्वोत्तम असें जें कांहीं करण्याची कुणाला इच्छा असेल त्या सर्व लोकांचा समावेश करण्याइतका डेमोक्रॅटिक पक्ष विशाल आहे. हें अमेरिकेचें कल्याण साधण्याचा उत्कृष्ट मार्ग कोणता ह्याबद्दल अनेक भिन्न मतें आहेत.

"माझें ठाम मत आहे कीं डेमोक्रॅटिक पक्षाच्या सच्च्या अनुयायांनीं मतैक्यावरच नेहमीं भर द्यावा. कारण मतभेदाच्या गोष्टींपेक्षां मतैक्य होऊं शकेल अशाच गोष्टी जास्त आहेत. मतभेद होण्याचे प्रसंग येणारच; पण अशा वेळीं मतभेदांचा पाया तत्त्व हाच असावा, व्यक्ति नव्हे.

"डेमोक्रॅटिक पक्षाच्या नांवानें अनेक गोष्टी सांगितल्या जातात. त्या मला मान्य नसतात आणि मी त्या स्वीकारीतहि नाहीं. पण देशाप्रमाणेंच पक्षालाहि बहुमताचा अंमल हाच न्याय लागू असतो.

"पक्षाच्या कांहीं नेत्यांचीं मतें मला मान्य होणारीं नाहींत असें आढळून आलें तर मी माझा मतभेद, आदरपूर्वक पण परिणामकारक रीतीनें व्यक्त करतों.

"मला वाटेल त्या प्रत्येक गोष्टी स्वीकारा असें मी पक्षाच्या अनुयायांना सांगत नाहीं. पण दुसऱ्या कोणाचा भलता सल्ला न ऐकण्याचा माझा अधिकार मी बजावतों.

"पण मी एवढें सांगेन कीं डेमोक्रॅटिक पक्ष त्याच्या अगदीं कनिष्ठ स्वरूपांतदेखील, उत्तम स्वरूपांतल्या रिपब्लिकन पक्षापेक्षां सरसच आहे."

वरील भाषणानें जॉन्सन ह्यांनीं दोन्ही पक्षांना बजावून सांगितलें कीं निकड असेल तेव्हां पक्षनिष्ठा दुय्यम मानायला मी तयार असलों तरी माझी दृढ पक्षनिष्ठा अचलच आहे. आपल्या पक्षनिष्ठेचा इन्कार त्यांनीं कधींच केलेला नाहीं.

वरील भाषण किंवा अशीं भाषणें म्हणजे जॉन्सन हे विशिष्ट उद्देशाला वाहून घेतलेले पुरुष आहेत ह्याचाच पुरावा होय. राष्ट्रहिताला चालना देण्यासाठीं सहकार्य करण्यासाठीं प्रयत्न करण्याकरतां पक्षाच्या आणि शक्य तर सर्वच सेनेटरांना प्रवृत्त करण्यांत कसलीहि कसूर करावयाची नाहीं हा त्यांचा निर्धार होता. आणि कॉंग्रेसमधील आपल्या बहुमतवाल्या पक्षाची

प्रतिष्ठा यथायोग्य आहे हें सिद्ध व्हावें ह्या दृष्टीनें आवश्यक ते कायदे मंजूर करवून घेणें हें त्यांचें तात्कालिक उद्दिष्ट होतें.

आवश्यक असेल तेव्हां जॉन्सन ह्यांना सेनेटमधील डेमोक्रॅटिक पक्षांतील सर्व सभासदांचीं किंवा जास्तींत जास्त सभासदांचीं मतें विशिष्ट विधेयकावर अनुकूल वा प्रतिकूल नोंदवून घेण्यांत बहुधा यश येत असे. अगदीं थोडासाच विरोध असणाऱ्यांना आपल्या बाजूनें वळविण्यांत त्यांचा हातखंडा होता. अधिवेशनाचे दिवस जसजसे जात होते आणि राष्ट्राध्यक्षांच्या अंमलबजावणी शाखेशीं डेमोक्रॅटिक पक्षाचें होणारें वर्तन जसजसें डोळ्यांत भरण्याजोगें दिसूं लागलें, तसतसे वृत्तपत्र-प्रतिनिधि जॉन्सन ह्यांना विचारूं लागले, "इतक्या विभिन्न प्रवृत्तीच्या पक्षाला तुम्ही न चुकतां सतत आपल्यामागें कसें नेऊं शकतां?"

जॉन्सन उत्तर देत, "नाहीं, मी माझ्यामागें नेत नाहीं त्यांना. जेव्हां डेमोक्रॅटिक सभासद एकजुटीनें मतदान करतात तेव्हां त्यांच्यांतील प्रत्येकाची खात्री पटलेली असते कीं, आपण तसेंच मतदान केलें पाहिजे.

"ही खात्री पटविण्याचें सर्वांत जास्त श्रेय समित्यांच्या डेमोक्रॅटिकपक्षीय अध्यक्षांना असतें. त्या समित्यांवर अत्यंत तरबेज माणसेंच अध्यक्षपदीं असतात. समित्यांमध्येंच विधेयकांसंबंधींचें सर्वांत जास्त महत्त्वाचें काम होत असतें. आणि सध्याच्या सेनेटमध्यें आपापल्या विषयांत जास्त अनुभवी अशीं माणसें जितकीं आहेत तितकीं ह्यापूर्वीं कधींच नसतील.

"समित्यांचे अध्यक्ष हे अत्यंत जुनेजाणते लोक आहेत. कांहीं जणांनीं पंधरा, अठरा, फार काय पंचवीस वर्षें सेनेटमध्यें सेवा बजावलेली आहे. अगदीं नव्या सभासदांच्या पाठीशींहि सार्वजनिक सेवेंतील भरीव कर्तबगारी आहे. त्या सर्वांना आपापल्या विषयांचें ज्ञान आहे. मग तो विषय संरक्षण असो, जमाबंदी असो, घरबांधणी असो, शेतकी असो, परराष्ट्रीय धोरण असो, जागतिक व्यापार असो, किंवा कामगारांचा प्रश्न असो. शासनाच्या कोणत्याहि क्षेत्रांत कांहीं समस्या निर्माण झाली कीं, त्यांतून मार्ग कसा काढावयाचा हें त्यांना माहीत असतें."

सेनेट इतकें कार्यक्षम कां? — ह्या प्रश्नाचें जॉन्सन ह्यांचें वरीलप्रमाणें उत्तर होतें. आणि प्रत्यक्ष घटनांनींच ह्या उत्तराचा अचूकपणा सिद्ध झालेला

आहे. तथापि स्टुअर्ट अॅल्सॉप ह्यांनीं अनेक वृत्तपत्रांत प्रसिद्ध होणाऱ्या आपल्या ' स्तंभांत ' म्हटल्याप्रमाणें स्वत: जॉन्सन हे एक जुनेजाणते होतेच. अॅल्सॉप ह्यांनीं लिहिलें आहे :

" अस्सल व्यावसायिकांची कामगिरी बघणें विशेष संतोषकारक असतेंच. मग तो क्रीडांगणावरचा खेळाडू असो कीं युनायटेड स्टेट्स्च्या सेनेटच्या सभागृहांतला सभासद असो. ज्याला आपल्या विद्यमान काळांतील असा सर्वांत तरबेज पक्षनेता कशी करामत दाखवतो हें बघायचें असेल त्यानें एकाद्या विधेयकावरील चर्चेच्या महत्त्वाच्या क्षणीं सेनेटच्या प्रेक्षकांच्या सज्जांत जाऊन बसावें आणि बहुमतवाल्या पक्षाच्या नेत्याची उंच, सड-पातळ, सावकाश चालणारी मूर्ति कशा हालचाली करते तें बघावें.

" एकाद्या धंदेवाईक कसरतपटूप्रमाणेंच टेक्ससचे लिंडन जॉन्सन एकहि निरर्थक हालचाल करीत नाहींत. कुणाशीं एकाददुसरा शब्द बोलतील, हट्टी सभासदाच्या खांद्यावर हात ठेवून त्याला कांहीं सांगतील, विरोधी पक्षनेते कॅलिफोर्नियाचे विल्यम नोलंड ह्यांच्याशीं मोजकें संभाषण करतील, आणि मग सभागृहापुढें असलेलें विधेयक फारशी चर्चा न होतां झटकन् मंजूर केलें जाईल."

अगदीं असेंच अनेक वेळां, ८४ व्या कॉंग्रेसच्या पहिल्या अधिवेशनांत घडलेलें आहे. जॉन्सन ह्यांच्या मार्गदर्शनाखालीं सेनेटला नवी प्रतिष्ठा मिळाली. सभासदांचे संबंध सुधारले. कामाचा उरकहि वाढला. समित्यां-मध्यें विधेयकें कधींच कुजत पडलीं नाहींत. अखंड भाषणें करीत राहून विधेयकावरील मतदान लांबविण्याचें तंत्र वापरलें गेलें नाहीं. रात्रींच्या बैठकांची आवश्यकता वाटली नाहीं. आणि कामाच्या तासांचा विचार करतां ८३ व्या कॉंग्रेसच्या अधिवेशनाशीं तुलनेनें ह्या अधिवेशनानें दोन तृतीयांश वेळच काम केलें. पण काम झालें तें मात्र डोळयांत भरण्याइतकें विपुल. सामोपचाराचें वातावरण, देवाण-घेवाण करण्याची वृत्ति ह्यांचा प्रादुर्भाव सभागृहांत करून जॉन्सन ह्यांनीं सभागृहाला असामान्य कामगिरी बजावायला लावली.

जें झालें त्याबद्दलचा अभिमान जॉन्सन लपवून ठेवीत नसत. डेमोक्रॅटिक बहुमतापुढें मार्गदर्शक म्हणून जें धोरण आपण ठेवलें होतें तें कल्पनातीत योग्य ठरविणारीच कामगिरी बजावली गली असें त्यांना वाटत होतें.

जूनची अखेर जशी जवळ आली तसें सर्वांना वाटूं लागलें कीं काँग्रेसची बैठक तीस दिवसांची सुटी विनाअडचण घेऊं शकेल. अधिवेशनाच्या अखेरच्या दिवसांत जॉन्सन दर आठवड्याला पत्रक काढून अधिवेशनाच्या महत्त्वाच्या कार्याची यादी सादर करीत असत. अधिवेशन तहकूब झाल्यावर सहा आठवड्यांनीं, जॉन्सन ह्यांच्या कचेरीनें अधिवेशनाच्या कार्याचा तयार केलेला सारभूत आढावा, जॉन्सन ह्यांच्या निवेदनासह प्रकाशित केला.

बहुमतवाल्या पक्षाचा नेता ह्या नात्यानें त्यांनीं केलेल्या मार्गदर्शनाखालीं झालेल्या कार्याचें मूल्यमापन करणारा हा आढावा अत्यंत महत्त्वाचा होता. कारण, आयझनहॉवर ह्यांच्या कारकीर्दीच्या तिसऱ्या वर्षांतील, डेमोक्रॅटिक पक्षाचें बहुमत असलेल्या काँग्रेसच्या कार्याचा तो आढावा होता. आणि जॉन्सन ह्यांचें शासनविषयक तत्त्वज्ञानहि थोडक्यांत नमूद करणारा तो आढावा होता.

त्यांत म्हटलें होतें :

"८४ व्या काँग्रेसचें पहिलें अधिवेशन अनेक प्रकारच्या महत्त्वाच्या कामगिरीचें श्रेय रास्तपणें घेऊं शकेल.

"अधिवेशनांतील चर्चा दूरदर्शी कायदेमंडळाला शोभेशा कार्यक्षमतेनें, मेहनतीनें करण्यांत आली.

"कामगार, शेतकरी आणि धंदेवाले ह्या सर्वांच्या समृद्धींत भर घालूं शकतील आणि त्यांच्या हितसंबंधाचें रक्षण करतील असे अनेक कायदे ह्या अधिवेशनानें मंजूर केले.

"पण, सर्वांत मोठी कामगिरी म्हणजे ह्या अधिवेशनानें आपल्या स्वातंत्र्याचें रक्षण करणाऱ्या आणि शांतता टिकविणाऱ्या धोरणाच्या पाठीशीं उभे रहाण्याकरितां राष्ट्राची एकजूट घडवून आणली. विसंवादी आवाज शक्य तितके कमी झाले. अमेरिकेचें जतन हें, क्षुल्लक पक्षवादापेक्षां महत्त्वाचें ठरलें.

"आंकडेवार माहितीच्या दृष्टीनें सुद्धां कामगिरी डोळ्यांत भरण्यासारखी आहे. सर्व रात्रभर चालणारी एकहि बैठक झाली नाहीं. चर्चा लांबून त्यासाठीं जादा वेळ द्यावा लागला नाहीं. भावना भडकविणारा प्रक्षुब्ध

वादविवाद झाला नाहीं. तरीसुद्धां अनेक वर्षांत झालें नाहीं इतकें जबाबदारीचें आणि चोख काम झालें आहे.

" ह्या अधिवेशनाची ८३ व्या काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनाशीं तुलना करतां एक मुद्दा स्पष्ट होतो. तीस टक्के कमी वेळांत तीस टक्के जास्त विधेयकें ह्या अधिवेशनानें मंजूर केलीं. कार्यक्रमपत्रिकेंत असलेलीं पण रेंगाळत राहिलेलीं विधेयकें अत्यल्प आहेत. समित्यांच्या फायलींमध्यें कुजत पडलेलीं विधेयकेंहि अत्यल्प आहेत. राष्ट्राध्यक्षांनीं केलेल्या चाळीस हजार नेमणुका ह्या अधिवेशनानें संमत केल्या. ८३ व्या काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनांत ह्याच नेमणुका फक्त २३५०० झाल्या होत्या.

" त्याशिवाय, किमान वेतनाचा प्रश्न, सरकारी घरबांधणी, कोलोरॅडो नदीच्या वरच्या पात्राच्या विकासाची योजना, दीर्घ मुदतीचा व्यापारविषयक कार्यक्रम इत्यादि विवाद्य विधेयकेंहि ह्या अधिवेशनापुढें आलीं होतीं. पण त्यांपैकीं कोणतेंहि मंजूर होण्याला तीन दिवसांपेक्षां जास्त अवधि लागला नाहीं.

" पण केवळ कायदे मंजूर करणें एवढी एकच गोष्ट घेतली तर ती कामगिरीच्या मूल्यमापनाला पुरेशी नाहीं. मंजूर झालेल्या किंवा न झालेल्या विधेयकांचाहि अभ्यास उद्‍बोधक असतो. पण काँग्रेसनें जनतेपुढील समस्यांचा विचार दूरदर्शीपणानें आणि देशप्रेमाच्या भावनेनें केला कीं नाहीं ही खरीखुरी कसोटी आहे.

" ह्या कसोटीला लावूनहि, ८४ वी काँग्रेस आपली कामगिरी निःसंकोचपणानें जनतेपुढें ठेवूं शकते.

" पक्षाच्या हितसंबंधांपेक्षां राष्ट्राच्या हितसंबंधांना जेव्हां अग्रस्थान दिलें जातें तेव्हां परराष्ट्रीय धोरणाच्या बाबतींत राष्ट्रीय ऐक्य घडवून आणतां येतें हें ह्या अधिवेशनानें सिद्ध करून दाखविलें.

" युनायटेड स्टेट्स्‌ची सुरक्षितता आणि एकजिनसीपणा ह्यांना चालना देणें त्या गोष्टी जतन करणें हेंच परराष्ट्रीय धोरणाचें उद्दिष्ट असायला पाहिजे. हें उद्दिष्ट साधण्याच्या कोणत्याहि प्रयत्नांत डेमोक्रॅटिक पक्ष राष्ट्राध्यक्षांना मदत करील, असें जाहीर आश्वासन ह्या अधिवेशनाच्या प्रारंभींच देण्यांत आलें होतें.

“ हें वचन पाळण्यांत आलें आहे.

“ चिनी आक्रमणाला पायबंद घालण्यासाठीं राष्ट्राध्यक्षांनीं फोर्मोसा-संबंधींचा ठराव आणला तेव्हां हें वचन पाळण्यांत आलें.

“ कम्युनिझमविरुद्ध युरोपचा बचावाचा पाया घालणारा पॅरिस करार मंजूर केला तेव्हां वरील वचन पाळण्यांत आलें.

“ वडया चौघांच्या परिषदेचा मार्ग खुला करणाऱ्या ऑस्ट्रियन तहावर शिक्कामोर्तब करून हें वचन पुरें करण्यांत आलें.

“ वडया चौघांची परिषद चालू असतांना राष्ट्राध्यक्षांनी शस्त्रकपातीच्या बावतींतली तपासणीची जी योजना मांडली तिला डेमोक्रॅटिक पक्षानें न कचरतां पाठिंबा देऊन तें वचन पार पाडलें आहे.

“ राष्ट्राचें भवितव्य संकटांत होतें. ह्या काँग्रेसनें पूर्वींच्या कांहीं काँग्रेस-प्रमाणें धोरण न स्वीकारतां, संकटाच्या काळीं देशांत दुफळी असण्याऐवजीं ऐक्य वसलें पाहिजे असाच विचार केला.

“ राष्ट्राध्यक्ष परराष्ट्रांच्या प्रमुखांच्या परिषदेला जावयास निघत असतांना त्यांची अडचणींनीं गांजवणूक करण्याचा पक्षीय आखाडा सेनेटला बनविण्याचें ह्या अधिवेशनानें कटाक्षानें टाळलें. हा पायंडा इतरांनींहि अभ्यासावा इतका चांगला आहे.

“ गुणवत्तेच्या दृष्टीनें सुद्धां, ह्या अधिवेशनानें उच्च वैधानिक पातळी राखली. व्यापारविषयक कार्यक्रम, रिझर्व बिल, घरबांधणी विधेयक, किमान वेतन विधेयक, मध्यवर्ति नोकरांच्या वेतनासंबंधींचें विधेयक अशा कांहीं विधेयकांना खूपच ठळक प्रसिद्धी लाभली. इतर कांहीं महत्त्वाच्या विधेयकां-कडे तितकें लक्ष दिलें गेलें नाहीं. पण अशा सर्वच विधेयकांमुळें ही काँग्रेस वैशिष्टयपूर्ण ठरली.

“ शेतकऱ्यांच्या कर्जावरील व्याजाचे दर कमी करण्यांत आले. नैसर्गिक आपत्तीनें शेतकऱ्यांची होणारी हानि त्यांना कमी जाणवावी म्हणून उपाय-योजना करणारे कार्यक्रम मंजूर करण्यांत आले. ट्रस्टविरोधी कायद्याचा भंग करणाऱ्यांना करण्यांत येणाऱ्या दंडाचें प्रमाण वाढविण्यांत आलें. सट्टेबाजी-विरुद्ध मालाच्या वायदेबाजारांना जास्त संरक्षण देण्यांत आलें.

“ मध्यवर्ति सुरक्षा कार्यक्रमाची आमूलाग्र सुधारणा करण्याची दीर्घ-कालीन गरज होती. त्यासाठीं एक महामंडळ नेमण्यांत आलें.

" करविषयक कायद्यांतील कांहीं उणीवांमुळें किमान एक अब्ज डॉलरचें उत्पन्न बुडालें असतें. त्या उणीवा दूर करण्यांत आल्या.

" अधिवेशनानें अमेरिकन नागरिकांना आणि एकूण जनतेला हितकारक अशा केलेल्या कांहीं कायद्यांचा उल्लेख वर केला आहे.

" जबाबदार कायदेमंडळ ह्या नात्यानें उत्कृष्ट परंपरा राखून ह्या अधिवेशनानें कार्य केलें. राष्ट्राध्यक्षांकडून केल्या गेलेल्या शिफारशींचा अगदीं सर्वांगीण विचार झाला. देशाच्या गरजांच्या दृष्टीनें त्या योग्य आहेत कीं नाहींत ह्याची सर्व बाजूंनीं चांचणी घेतली गेली. कांहीं वेळां त्यांत सुधारणा करण्यांत आल्या. कांहीं शिफारशी जशाच्या तशा मंजूर केल्या. कांहींच्या बाबतींत निर्णय घेतले गेले नाहींत. सारांश, कॉंग्रेसनें रबरी शिक्क्याची भूमिका केली नाहीं. तर अमेरिकन जनतेची प्रतिनिधि ह्या नात्यानें असलेली घटनात्मक जबाबदारी पार पाडली.

" कोणत्याहि प्रसंगीं सेनेटला राजकीय पक्षाच्या बैठकीचें वा जाहीर सभेचें स्वरूप, विधेयकाची चर्चा करतांना, येऊं दिलें गेलें नाहीं.

" सेनेटनें अमुक विधेयक मंजूर करायला नको होतें किंवा करायला पाहिजे असें अमुक विधेयक मंजूर केलें नाहीं, अशी उलटसुलट टीका, अर्थातच होईल, पण ही टीका ज्याच्या त्याच्या मताचा भाग आहे. सेनेट देशांतील जनतेला जबाबदार अशी संस्था आहे आणि केवळ जनतेलाच जबाबदार आहे. अंमलबजावणी शाखेची पोटशाखा नाहीं, कीं न्यायखात्याची पोटशाखा नाहीं; जनतेच्या आकांक्षांचें प्रतिनिधित्व करण्यासाठीं निवडून दिलेल्या सभासदांची बनलेली स्वतंत्र संस्था आहे.

" ही संस्था यशस्वी झाली कीं अपेशी ठरली ह्याचा निर्णय देणारा न्यायाधीश एकच आहे आणि तो म्हणजे स्वतः जनता होय. "

वरील पत्रक सप्टेंबरच्या मध्यास प्रसिद्ध झालें. पण मध्यंतरींच्या काळांत कांहीं दिवस आधीं जॉन्सन ह्यांना हृदयविकाराचा झटका आला. त्यामुळें कॉंग्रेसच्या अधिवेशनाच्या अखेरच्या महिन्यांत ते आपल्या कार्यक्षेत्राच्या बाहेर राहणें अपरिहार्यच होतें. तथापि सेनेटपुरतें बोलायचें, तर त्या संस्थेनें बजावलेल्या कामगिरीबद्दल जॉन्सन ह्यांना सखोल वैयक्तिक असा अभिमान वाटत होता—सेनेटचें तें अधिवेशन ही त्यांची स्वतःचीच कर्तबगारी होती.

□ □ □

# १२

युनायटेड स्टेट्स्‌च्या सेनेटची रोजची बैठक प्रार्थनेनें सुरू होते. ही प्रार्थना स्थानिक उपाध्याय (चॅप्लेन) किंवा बाहेरून आलेला धर्मोपदेशक म्हणतो. मंगळवार ता. ५ जुलै १९५५ रोजीं सेनेटची अधिवेशन बैठक सुरू झाली. त्या दिवशीं चॅप्लेन फ्रेडरिक ब्राऊन हॅरिस ह्यांनीं प्रार्थना म्हटली. प्रार्थनेची समाप्ति त्यांनीं पुढील शब्दांत केली :

“आजच्या दिवशीं आपल्या मनांत ह्या सभागृहांतील खंबीर नेत्या-विषयींची चिंता वसत आहे. नुकतेंच त्यांनीं आपल्या अत्यंत जबाबदारीच्या स्थानावरून, अनिर्णीत राहिलेल्या सार्वजनिक प्रश्नांच्या संदर्भांत भावनापूर्ण आणि गाढ जिव्हाळयानें ओतप्रोत भरलेलें भाषण केलें होतें. त्यांना एकाएकीं आजारानें गाठलें आहे. अशा चिंतेच्या क्षणीं आपण, त्यांच्या रुग्णशय्येसन्निध असलेल्या त्यांच्या कुटुंबियांसाठीं ईश्वराची करुणा भाकू या.

“ईश्वराला आमची अशी प्रार्थना आहे कीं वैद्यकीय तज्ज्ञांचें कौशल्य आणि परिचारिकांची सेवा कारणीं लागून ते परत आपल्या प्रिय माणसांत येवोत; आजच्या विकट काळांत पुन: आपल्या कार्यस्थानावर रुजू होवोत. त्यांच्या कार्याची जबाबदारी आज ज्यांच्यावर आहे त्यांना ईश्वर मार्ग-दर्शक होवो.

“आपलें कर्तव्य करून संपतें तेव्हांच रात्र येते हें जाणून उजाडणाऱ्या प्रत्येक दिवशीं, आपल्यापैकीं प्रत्येक जण आपापलें कर्तव्य करण्यास उद्युक्त होवो ! तथास्तु.”

जॉन्सन ह्यांना आलेला हृदयविकाराचा झटका आणि त्यांच्या प्रकृतीची हालहवाल याबाबत वृत्तपत्रांतून बातम्या प्रसिद्ध होत होत्या आणि नभोवाणी-वरून सांगितल्या जात होत्या. पण त्यांना आलेला झटका ‘थोडासा तीव्र’

होता हें सांगण्यापलिकडे, त्यांना उपचार करणाऱ्या वैद्यकीय तज्ज्ञांनीं अधिकृत निवेदन कांहींच केलें नव्हतें. आतां, जॉन्सन ह्यांच्या जागीं पक्षनेते म्हणून काम पाहणारे अर्ल सी. क्लेमेंट्स् ह्यांनीं सेनेटच्या अध्यक्षांच्या संमतीनें निवेदन सादर करीत असल्याचें घोषित केलें. त्याबरोबर सभागृहांतील सारे सेनेटर त्यांच्याकडे माना वळवून आणि कान देऊन अत्यंत लक्षपूर्वक ऐकूं लागले.

आठवड्याच्या सुटीच्या सुमारास जॉन्सन ह्यांना हृदयविकाराचा झटका कसा आला ही माहिती त्यांनीं सांगितली. नंतर त्यांनीं डॉ. जेम्स सी. केन ह्यांचें पत्रक वाचून दाखविलें. मेयो ब्रदर्स रुग्णालयाचे हे वैद्यकीय तज्ज्ञ जॉन्सन कुटुंबाच्या अनेक वर्षांच्या घरोब्याचे गृहस्थ होते. स्थानिक वैद्यकीय तज्ज्ञांशीं सल्लामसलत करण्यासाठीं विमानानें ते वॉशिंग्टनला आलेले होते.

त्यांचे पत्रक छोटें आणि मुद्द्याला धरून होतें आणि कांहीं प्रमाणांत दिलासा देणारें होतें. तें पत्रक असें :

"सेनेटर लिंडन बी. जॉन्सन ह्यांना मर्यादित तीव्रतेचा मायो कार्डियल इन्फार्कशनचा† त्रास झाला होता. झटका आला त्यावेळीं त्यांची प्रकृति खूपच चिंताजनक होती, पण प्रकृतींतील सुधारणा समाधानकारक आहे.

"त्यांच्या वैद्यकीय तज्ज्ञांचें एकमुखी मत आहे कीं, चालू अधिवेशनाच्या काळांत ते आपल्या कामावर कोणत्याहि परिस्थितींत रुजू होऊं शकणार नाहींत. कांहीं महिने त्यांना कोणत्याहि प्रकारचें काम हातीं घेतां येणार नाहीं.

"तथापि ह्यापुढें तीव्र स्वरूपाचा झटका न आल्यास आणि प्रकृतींतील सध्यांची सुधारणा अशीच समाधानकारक रीतीनें चालू राहिली तर जानेवारींत त्यांना सेनेटमधील आपल्या कामावर परत येणें शक्य व्हायला हरकत नसावी."

ह्या पत्रकावर क्लेमेंट्स् ह्यांनीं कांहींच भाष्य केलें नाहीं. पत्रक वाचून झाल्यावर त्यांनीं जॉन्सन ह्यांच्या आजारासंबंधांतला त्यांना माहीत असलेला तपशील सांगितला. जॉन्सन ह्यांना भेटण्याची त्यांच्या पत्नीखेरीज कोणालाहि

---

† हृदयाच्या स्नायूंमध्यें कांहीं दोष निर्माण होणें.

परवानगी नव्हती. त्यांची पत्नी पतीच्या सन्निध राहतां यावें म्हणून रुग्णालयांतच मुक्कामाला होती. जॉन्सन ह्यांच्या मातोश्रींना विमानानें वॉशिंग्टनला आणण्यांत आलें होतें. ह्या महिलेनें आयुष्यांत केलेला तो पहिलाच विमान-प्रवास होता. जॉन्सन विनासायास विश्रांती घेऊं शकत होते. तथापि अद्याप त्यांना प्राणवायु द्यावा लागत होता.

इतकी माहिती सांगून केंटकीतर्फेचे ते सेनेटर पुढें म्हणाले, " अशा परिस्थितींत, बहुमतवाल्या पक्षाचा हंगामी नेता ह्या नात्यानें त्यांच्या जबाबदाऱ्या पार पाडणें हें माझें कर्तव्य आहे. मी निःसंकोचपणें कबूल करतों कीं, हंगामी स्वरूपाचें असलें तरीसुद्धां त्यांच्यासारख्या पुरुषाचें काम शिरावर घेण्याची कल्पना अस्वस्थ करणारी आहे आणि ती जबाबदारी विकट आहे.

" चालू अधिवेशनांत लिंडन जॉन्सन ह्यांनीं नेतृत्वाचे जे मानदंड घालून दिले आहेत त्यामुळें लोकशाही शासनावर निष्ठा ठेवणाऱ्या सर्वांच्या प्रशंसेला ते पात्र ठरले आहेत. त्यांनीं कष्टपूर्वक बजावलेली कामगिरी आणि योग्य काळीं केलेले प्रयत्न ह्यामुळें व्यक्तिशः केवळ त्यांचीच प्रतिष्ठा वाढली असें नव्हे, तर संपूर्ण सेनेटची प्रतिष्ठा वाढली आहे.

" त्यांचा एक निकटवर्ति मित्र ह्या नात्यानें माझी लिंडन जॉन्सन ह्यांच्यावर गाढ निष्ठा आहे. एक अमेरिकन नागरिक ह्या दृष्टीनें त्यांच्याबरोबर कोणत्याहि नात्यानें सहभागी होण्याचा मला अभिमान वाटतो.

" सेनेटच्या दोन्ही पक्षांत, लिंडन जॉन्सन ह्यांना मित्र न मानणारा एक तरी सभासद असेल कीं काय ह्याबद्दल मला शंका आहे "

त्यानंतर झालेलीं भाषणें म्हणजे जॉन्सन ह्यांचें क्लेमेंट्स्नीं जें मूल्यमापन केलें होतें तें अचूक असल्याचें सिद्ध करणारा पुरावाच. क्लेमेंट्स्नीं सुरुवात केल्यावर भाषणांची साखळीच सुरू झाली. डेमोक्रॅटिक आणि रिपब्लिकन ह्या दोन्ही पक्षांच्या सेनेटरांनीं त्या नेत्याबद्दलच्या आपल्या गाढ वैयक्तिक भावनांना शब्दता द्यावयास सुरुवात केली.

पक्षाच्या धोरणाविषयीं जॉन्सन ह्यांच्याशीं ज्यांच्या वारंवार चकमकी झडत त्या न्यूयॉर्कच्या लीमॅननीं ठरावच मांडला, " बहुमतवाल्या पक्षाच्या नेत्याला, आम्हांला प्रिय असलेल्या टेक्ससतर्फेच्या सेनेटराला लौकर आणि संपूर्ण आराम पडो अशी प्रार्थना सेनेट परमेश्वराला करीत आहे. " असा

तो ठराव होता. आणि मग सर्व सभासद आणि सभागृहांत असणारे अन्य लोक शांतपणें उभे राहिले आणि प्रत्येकानें प्रार्थना केली. ही घटना केवळ अभूतपूर्व होती.

त्या दिवशीं ज्यांनीं ज्यांनीं भाषणें केलीं त्या सर्व सेनेटरांच्या भाषणाचा सूर वारंवार एकच येत होता. सेनेटच्या कामांत मैत्रीचें वातावरण आणि निष्ठेनें प्रयत्न करण्याची वृत्ति जॉन्सन ह्यांनीं बाणविली ह्यावरच भर दिला जात होता. ही वृत्ति राखण्याचा तनमनानें प्रयत्न करण्याचें अभिवचन क्लेमेंट्स् ह्यांनीं दिलें. अल्पमतवाल्या पक्षाचे नेते नोलंड ह्यांनीं क्लेमेंट्स्ना त्यांच्या प्रयत्नांत संपूर्ण सहकार्य करण्याचें आश्वासन दिलें.

चाव्हेस, सिमिंग्टन, हम्फ्रे, मॅन्स्फील्ड, हिल, गोअर आणि मॉन्रोनी ह्या डेमोक्रॅटिक सेनेटरांप्रमाणेंच साऊथ डॅकोटाचे कार्ल ई. मुंट्, मेनच्या मार्गारेट चेस स्मिथ, कॅलिफॉर्नियाचे टॉमस के. क्यूचेल ह्यांनींहि, त्या साऱ्या अधिवेशनावर प्रभाव प्रस्थापित करणाऱ्या त्या पुरुषाची नेतृत्वक्षमता आणि गुणवत्ता ह्यांचें गुणगान केलें. कांहीं वेळां तिखट जिभेनें विदारक टीका करणारे वायने मोर्स ह्यांनीं जॉन्सन ह्यांचा निःस्वार्थीपणा आणि त्यांचें आपल्यावर असणारें ऋण ह्यांचा भावनापूर्ण उल्लेख केला. ते म्हणाले, "गेल्या वर्षभरांत, लिंडन जॉन्सन ह्यांच्याकडून होणाऱ्या प्रेमळपणाच्या सतत वर्षावाचें भाग्य मला लाभलें आहे. माझ्या दृष्टीनें ते थोर राजकारणी पुरुषच केवळ नाहींत तर एक सज्जन गृहस्थहि आहेत."

ह्या जॉन्सनप्रशस्तींत औपचारिकपणाचा कांहींच भाग नव्हता. बोलणाऱ्यांच्या हृदयांतून उत्स्फूर्तपणें उमटलेले ते बोल होते.

आल्बन बार्कली म्हणाले, "आपण सर्वजण त्यांना सर्वांत मोठी आदरांजलि एक गोष्ट करूनच वाहूं शकतों. अधिवेशनाच्या उरलेल्या काळांत महत्त्वाचें कामकाज सहकार्यानें पार पाडणें आणि कोणत्याहि प्रकारें त्या कामीं मागें न राहाणें हाच तो मार्ग होय."

अनेक सेनेटरांनीं बार्कली ह्यांच्याशीं सहमत व्यक्त केलें. जॉन्सन ह्यांचें व्यक्तिमत्त्व आणि सेनेटमधील कामाबद्दलची त्यांची भावना ह्याबद्दल सखोल उमज असल्यामुळेंच वक्त्यांच्या तोंडून असे उद्‌गार निघत होते.

ज्यांनीं जॉन्सन ह्यांच्याबरोबर काम केलें होतें, त्यांचें कार्य रोज जवळून बघितलें होतें त्या सेनेटरांनीं अत्यंत आदरास पात्र असा नेता ही जाणीव त्यांच्याबद्दल ठेवावी ह्यांत आश्चर्य नव्हतें. पण, जॉन्सन ह्यांना जवळून ओळखणाऱ्या लोकांनाहि आश्चर्य वाटावें अशी एक घटना खरोखरच घडली होती. जॉन्सन ह्यांनीं बजावलेल्या नेतृत्वाचें मोल साऱ्या राष्ट्रानें मान्य केलें होतें. रोजरोज ह्या वस्तुस्थितीची सत्यता पटविणारा पुरावा उपलब्ध होत होता.

प्रथमत: जॉन्सन आजारी पडले त्याच्यानंतर थोड्याच दिवसांत वृत्तपत्रांत अग्रलेख प्रसिद्ध होऊं लागले. जॉन्सन ह्यांच्या कचेरींतील नोकरवर्गाला रोजरोज अनुभव येत होता कीं, देशाच्या कानाकोपऱ्यांतून येणारें जें जें वर्तमानपत्र उघडावें त्यांत जॉन्सन ह्यांच्यावर अग्रलेख आहेच! ह्यावरून स्पष्ट दिसत होतें कीं, सेनेटमधील डेमोक्रॅटिक पक्षाच्या ह्या नेत्याकडे देशांतील प्रत्येक संपादकाचें लक्ष होतें–त्यांचें कार्य ह्या संपादकांनीं जोखलेलें होतें. आणि आतां आपल्या वाचकांना त्या पुरुषाबद्दल आणि त्यानें बजावलेल्या कामगिरीबद्दल माहिती करून देण्यासाठीं हे संपादक पुढें सरसावले होते.

शेकडों अग्रलेख लिहिले गेले. प्रत्येक राज्यांतील, कॅनडामधील, फार काय ब्रिटनमधील वृत्तपत्रांत सुद्धां जॉन्सन ह्यांच्यावर लेख प्रकाशित झाले. ह्या सर्व लेखांचा साकल्यानें विचार केला तर एक गोष्ट निर्विवादपणें सिद्ध होत होती. 'एकता–सुवर्णमध्य–सहकार्य' ह्या त्रयीवर आधारलेल्या धोरणाला राष्ट्राची एकमुखी संमति होती; अमेरिकन जनतेच्या भावनेचें तें धोरण प्रतीक होतें. खुद्द जॉन्सन ह्यांना कल्पना नसेल इतक्या मोठ्या प्रमाणांत त्या धोरणांत जनतेच्या आकांक्षा प्रतिबिंबित झालेल्या होत्या ह्याचा निर्विवाद पुरावा म्हणजेच वृत्तपत्रांतील तें लिखाण होय.

एका अमेरिकन वृत्तपत्रानें सर्व प्रातिनिधिक वृत्तपत्रांतील अग्रलेखांतलें एकेक वाक्य घेऊन तयार केलेल्या लेखावरून वरील विधानाचा प्रत्यय येईल. तो लेख पुढें देत आहें. (कंसांत त्या त्या वृत्तपत्राचें नांव आहे.)

"सेनेटमधील बहुमतवाल्या पक्षाचे नेते लिंडन जॉन्सन ह्यांनीं सिद्ध करून दाखविलें आहे कीं, आपण एक जन्मजात नेते आहोंत. (कॅन्टन, ओहायो

रिपॉझिटोरी). डेमोक्रॅटिक पक्षाचें वहुमत असणारी काँग्रेस आणि रिपब्लिकन पक्षाच्या हातीं सूत्रें असलेलें सरकार ह्यांच्यांतील मतभेद मिटविण्याच्या कलेंत तरवेज असलेला आणि त्यासाठीं धर्मबुद्धीनें प्रयत्नरत असणारा पुरुष म्हणजे शेचाळीस वर्षांचा तो टेक्ससनिवासी नेता होय. आपल्या पक्षांतील दुफळीहि मिटविण्याचें कौशल्य त्यांनीं दाखविलें. (पोर्टलंड ऑरेगॉनियन). वहुमतवाल्या पक्षाचें नेतृत्व करतांना त्यांच्या अभिजात प्रतिभेचा आविष्कार दिसून आला. (लुइव्हिल टाइम्स).

" डेमोक्रॅटिक पक्षाच्या हातीं सूत्र असलेल्या, पण मतभेदहि असलेल्या सेनेटचें, रिपब्लिकन पक्षाच्या हातीं कारभारयंत्रणा असतांना, सेनेटर जॉन्सन ह्यांनीं नेतृत्व केलें. त्यांच्या नेतृत्वामुळें सेनेटचा कारभार सुरळीत चालत राहिला. अडवणुकीचे डावपेंच आणि वृथा दोपारोप ह्यांचा मागमूस दिसला नाहीं. परंपरागत दुफळी असणाऱ्या त्यांच्या स्वतःच्या पक्षांतहि त्यांनीं सुसंवाद निर्माण केला. (कोलंबस, ओहायो स्टेट जर्नल). डेमोक्रॅटिक पक्षांतील उदारमतवादी आणि स्थितिवादी ह्यांच्यांत ऐक्य घडविण्याची त्यांची कामगिरी डोळ्यांत भरण्यासारखी आहे. (लेबर, वॉशिंग्टन, डी. सी.).

" डावपेचांतील कुशलता आणि प्रत्येक प्रसंगीं डेमोक्रॅटिक पक्षांत ऐक्य राखण्यांत यश, ह्या गोष्टींचा विचार करतां जॉन्सन ह्यांच्या नेतृत्वाला तुलनाच नाहीं असें म्हणतां येईल. (न्यूयॉर्क टाइम्स). काँग्रेसमधील एक कार्यक्षम आणि निष्ठावान् पदाधिकारी म्हणून दोन्ही पक्षांच्या सभासदांचा आदर जॉन्सन ह्यांनीं संपादिला. (न्यूयॉर्क हेरल्ड ट्रिब्यून). दोन्ही पक्षांतील सभासदांत सर्वांत कार्यक्षम असलेल्या ह्या टेक्ससनिवासी पुरुषाकडेच ८४ व्या काँग्रेसच्या कार्याचें मोठें श्रेय आहे. (सेंट लुई पोस्ट-डिस्पॅच). एकाच पक्षाच्या हितापेक्षां राष्ट्राच्या हितावर नजर ठेवून त्यांनीं आवश्यक त्या कायद्यांना चालना दिली. (स्टॅम्फर्ड, कॉनेक्टिकट अॅडव्होकेट).

" लिंडन जॉन्सन हे आपल्या पक्षाप्रमाणेंच रिपब्लिकन पक्षाचेहि नेते ठरले, असें सहज म्हणतां येईल. (न्यूयॉर्क मिरर) कायदे करण्याच्या वाबतींत आयझनहॉवर ह्यांच्यापेक्षांहि त्यांनींच जास्त राष्ट्राध्यक्षीय जबाबदारी पार पाडली असें म्हणतां येईल. ( सेंट पिटर्सबर्ग, फ्लॉरिडा टाइम्स).

राष्ट्राच्या राजकीय जीवनांतील सर्वांत वजनदार पुरुष हें स्थान त्यांना प्राप्त झालेलें आहे. (डलास न्यूज).

" शक्य तितक्या सद्भावनेच्या सुशांत जलावर राष्ट्राची नौका आज प्रवास करीत असेल तर त्याच्या श्रेयाचा फार मोठा वांटा सेनेटर जॉन्सन ह्यांचा आहे. (प्रॉव्हिडन्स बुलेटिन). कौशल्य, सदिच्छा आणि समतोल वृत्ति ह्या गुणांमुळें ते रिपब्लिकन राष्ट्राध्यक्षांशीं सहकार्य करूं शकले आणि पक्षाकडूनहि त्यांनीं उत्तम कामगिरी बजावून घेतलेली आहे (वॉशिंग्टन स्टार).

" कॅपिटॉल हिलवरील सर्वांत दमछाट करणारें काम असें ज्याचें वर्णन निर्विवादपणें करतां येईल, ती भूमिका बजावतांना त्यांनीं जें वैधानिक नैपुण्य दाखविलें तें पक्षांतील मतभेद मिटविण्यांत प्रतिबिंबित झालें. तद्वतच सेनेटच्या कामाचा उरक करण्यांतहि हें नैपुण्य दिसून आलें. गेल्या कित्येक वर्षांच्या इतिहासांत ह्या कौशल्याला तोड नाहीं. (बफॅलो न्यूज). डेमोक्रॅटिक पक्षाच्या नियंत्रणाखालील ८४ व्या कॉंग्रेसचें अधिवेशन म्हणजे जॉन्सन ह्यांचें अधिवेशन. (लाइफ मॅगेझिन).

" राष्ट्राला लिंडन जॉन्सन ह्यांची जरुरी आहे. (ॲमरिलो, टेक्सस न्यूज). राजकारणपटूचे गुण त्यांच्यांत आहेत. (ग्रीनव्हिल, साऊथ कॅरोलायना पीड-मॉंट) आपल्या कायदेमंडळांत असाच नेता हवा—देशाची ही निकड आहे. आणि म्हणून देश आशा करीत आहे कीं राजकीय आखाड्यांत त्यांनीं मनाचा जो खंबीरपणा दाखविला, त्याच्या जोरावरच जीवनांतल्या ह्या संकटांतून ते पार होतील आणि पुनः त्यांचा पूर्वोत्साह त्यांच्यांत संचरेल (वोमॉन्ट, टेक्सस एन्टरप्राइज).

" जॉन्सन ह्यांना लौकर आणि संपूर्ण आराम पडो ह्या राष्ट्राध्यक्षांच्या आणि सेनेटच्या भावनेला आम्ही साथ देतों. (फिनिक्स, ॲरिझोना रिपब्लिक.)"

सेनेटरांना जॉन्सन ह्यांच्या पात्रतेबद्दल आदर होता आणि व्यक्तिशः त्यांचें जॉन्सन ह्यांच्यावर प्रेमहि होतें. वृत्तपत्रांना त्यांचीं धोरणें मान्य होतीं आणि ज्या पद्धतीनें तीं धोरणें जॉन्सन कार्यान्वित करीत त्या पद्धतीची वाहवा वृत्तपत्रें करीत होतीं.

आणि जनतेच्या बाबतींत मात्र सिद्ध झालें कीं जनतेचें लिंडन जॉन्सन ह्यांच्यावर केवळ नितांत प्रेमच होतें.

जॉन्सन ह्यांना हृदयविकाराचा झटका आल्याची बातमी प्रथम प्रसिद्ध होतांच कांहीं तासांतच त्यांना अभीष्ट चिंतन करणाऱ्या संदेशांचा पाऊस रुग्णालयांत पडूं लागला. प्रथम टेलिफोन येऊं लागले, मग तारा आणि मग एकदोन दिवसांत पत्रांवर पत्रें येऊं लागलीं. हे संदेश केवळ मित्रांचे आणि टेक्ससमधील त्यांच्या पुरस्कर्त्यांचेच नव्हते. शासनांत, उद्योगधंद्यांत उच्चपदीं असणाऱ्या व्यक्तींचेहि संदेश होते. ज्यांचें नांवहि जॉन्सन ह्यांनीं कधीं ऐकलें नव्हतें आणि कधीं पुढेंमागें ऐकण्याची शक्यताहि कमी होती अशा लोकांचेहि संदेश येत होते.

त्या संदेशांचा सूर एकच होता : " लौकर बरे व्हा ! राष्ट्राला तुम्हीं हवे आहांत ! "

" मलाहि हृदयविकाराचा झटका आलेला होता. मी सांगतों ती ती काळजी घ्याल तर अगदीं नवजीवन लाभेल. " असें म्हणून कांहीं संदेशांत सल्ला दिलेला होता.

कांहीं संदेशांत म्हटलें होतें, " साऱ्या देशासाठीं तुम्ही केलेल्या कार्याची माहिती आम्ही वृत्तपत्रांत वाचली. असें कार्यच आम्हांला हवें आहे. बरे व्हा आणि तें कार्य पुन: करायला लागा. "

" आम्ही तुम्हांला आरोग्य लाभावें म्हणून प्रार्थना करीत आहोंत. " असें हजारों संदेशांत म्हटलें होतें.

टेलिफोनवरून आस्थेनें चौकशी केल्यानंतर मागोमाग पत्रेहि आलीं. त्यांत पुढील विशेष व्यक्ति होत्या : राष्ट्राध्यक्ष, त्यांच्या मंत्रिमंडळांतील सर्व मंत्री, उपराष्ट्राध्यक्ष, सर्व सेनेटर, प्रतिनिधिसभेचे अनेक सभासद, राज्यांचे राज्यपाल, परदेशांचे वकील, बर्नार्ड बारूक ह्यांनीं सदिच्छा संदेश पाठविला. ऑडी मर्फी, वॉल्टर विंचेल, अडलाय स्टीव्हन्सन, जिमी बर्न्स, हर्बर्ट बायर्ड स्वोप, न्यूयॉर्कचे राज्यपाल अॅव्हरेल हॅरिमन, टेक्ससचे राज्यपाल अॅलन शिव्हर्स.

लेडी बर्डचें बालपण जेथें गेलें त्या टेक्ससमधील मार्शल येथें असलेल्या निग्रोंच्या वायली कॉलेजच्या अध्यक्षांनीं लिहिलें होतें कीं, जॉन्सन ह्यांना आरोग्य लाभावें म्हणून कॉलेजांतील विद्यार्थी प्रार्थना करीत आहेत.

त्यावेळीं इटलींत अमेरिकेच्या वकील असलेल्या आणि तत्पूर्वी प्रतिनिधि-सभेंत जॉन्सन ह्यांच्या काळांत सभासद असलेल्या क्लेअरबूथ ल्यूस ह्यांनीं दोन पत्रें पाठवून जॉन्सन ह्यांच्याविषयींची आपली आस्था व्यक्त केली.

जॉन्सन ह्यांच्या कॉंग्रेसमधील कार्यामुळें ज्यांना मदत झाली, अशा असंख्य लोकांपैकीं आपण एक आहों असें म्हणणाऱ्या, निवृत्तिवेतनावर गुजराण करणाऱ्या एका वृद्ध स्त्रीनें पत्रासोबत एक डॉलर पाठविला होता. "पत्रासोबत एक डॉलर आलेला अनपेक्षितपणें आढळण्याचें महत्त्व मी जाणतें. रुग्णालयांत आवश्यक असें कांहीं त्यांच्यासाठीं खरेदी करण्याकरितां हा डॉलर उपयोगी पडेल" असें त्या वृद्धेनें लिहिलें होतें.

थोड्याच दिवसांपूर्वीं सेनेटमध्यें जें विधेयक धुडकावून लावण्यांत जॉन्सन ह्यांनीं पुढाकार घेतला होता तें, राष्ट्राध्यक्षांचें, रस्तेबांधणी-विषयक विधेयक तयार करण्यांत मोठा वांटा असलेले जनरल ल्युशियस क्ले ह्यांनीं स्वतःच्या हस्ताक्षरांत प्रदीर्घ पत्र लिहून जॉन्सनविषयींचा प्रेमादर व्यक्त केला होता.

कांहीं कॅथॉलिक सिस्टर्सनीं पत्र लिहून जॉन्सन ह्यांना कळविलें होतें कीं, आम्ही तुम्हांला आमचे सेनेटर म्हणून मानलें आहे आणि तुमच्यासाठीं रोज प्रार्थना करीत आहोंत.

एका जर्मन वकिलानें जर्मन भाषेंत पत्र लिहून कळविलें होतें, "मलाहि असाच हृदयविकाराचा झटका आला होता. लौकर बरें होण्यासाठीं काय करावें हें मला माहीत आहे. मी तें तंत्र तुम्हांला शिकविण्यासाठीं स्वखर्चानें युनायटेड स्टेट्स्मध्यें यावयास तयार आहें. कारण स्वतःच्या देशाचे एक पुढारी ह्या नात्यानें तुम्ही माझ्याहि देशावर केलेल्या उपकारांची मला जाणीव आहे."

इंडियानामधील एक शेतकरी जोडपें रोज निरनिराळ्या प्रकारचीं शुभचिंतनपर कार्डें पाठवीत असे. प्रत्येक कार्डावर बायबलमधील योग्य अशा पंक्ति हातानें लिहिलेल्या असत. त्या जोडप्याचा हा उपक्रम तीन आठवडे-पर्यंत चालू होता.

टंकलिखित, पेन्सिलीनें हस्ताक्षरांत लिहिलेलीं पत्रें, कार्डें, शुभचिंतन पत्र-कार्डें ह्यांच्याबरोबरच पुस्तकें, फुलें, खास खाद्यपदार्थ, एक छोटा रेडिओ, हातानें विणलेला प्रार्थनेच्या वेळीं परिधान करावयाचा रुमाल इत्यादि अनेक देणग्याहि देशांतील निरनिराळ्या राज्यांतील निरनिराळ्या लोकांकडून

आल्या होत्या. त्या लोकांमध्यें गरीब, मध्यमवर्गीय व श्रीमंत लोक होते· गृहिणी होत्या. शेतकरी होते. कामगार होते. सराफी व्यवसाय करणारे होते. उद्योगपेढ्यांचे प्रमुख होते. सेवानिवृत्ति वेतनावर गुजराण करणारे वृद्ध होते•

जॉन्सन हे, स्वतःला नकळत, एक लोकप्रिय राष्ट्रीय पुरुष बनले होते. त्यांना हृदयविकाराचा झटका अशा काळांत झाला कीं, देशाला त्यांच्या कार्याची जाणीव होऊं लागली होती. बहुमतवाल्या पक्षाचा नेता ह्या नात्यानें त्यांनीं बजावलेली असामान्य कामगिरी, ती कामगिरी बजावण्यामागील त्यांचीं धोरणें ह्यांची ओळख देशाला नुकतीच होऊं लागली होती. आतां वृत्तपत्रें, नभोवाणी, दूरचित्रवाणी हीं प्रसिद्धीचीं साधनें त्यांच्याबद्दल अखंडपणें कांहीं ना कांहीं माहिती जनतेला पुरवीत असल्यामुळें जनतेला जॉन्सन ह्यांची अधिकाधिक ओळख होऊं लागली होती. आणि मिळालेली माहिती ऐकून वाचून लोक खूष होत होते.

वॉशिंग्टन येथील एका वृत्तपत्राच्या लेखकानें आपल्या लेखाला ‘प्रत्येकाच्या प्रेमाला पात्र झालेले लिंडन’ असा मथळा दिला होता. तें शीर्षक त्यावेळच्या लोकभावनेचें द्योतक होतें.

□ □ □

त्यावेळीं इटलींत अमेरिकेच्या वकील असलेल्या आणि तत्पूर्वीं प्रतिनिधि-सभेंत जॉन्सन ह्यांच्या काळांत सभासद असलेल्या क्लेअरबूथ ल्यूस ह्यांनीं दोन पत्रें पाठवून जॉन्सन ह्यांच्याविषयींची आपली आस्था व्यक्त केली.

जॉन्सन ह्यांच्या काँग्रेसमधील कार्यामुळें ज्यांना मदत झाली, अशा असंख्य लोकांपैकीं आपण एक आहों असें म्हणणाऱ्या, निवृत्तिवेतनावर गुजराण करणाऱ्या एका वृद्ध स्त्रीनें पत्रासोबत एक डॉलर पाठविला होता. "पत्रासोबत एक डॉलर आलेला अनपेक्षितपणें आढळण्याचें महत्त्व मी जाणतें. रुग्णालयांत आवश्यक असें कांहीं त्यांच्यासाठीं खरेदी करण्याकरितां हा डॉलर उपयोगी पडेल" असें त्या वृद्धेनें लिहिलें होतें.

थोड्याच दिवसांपूर्वी सेनेटमध्यें जें विधेयक धुडकावून लावण्यांत जॉन्सन ह्यांनीं पुढाकार घेतला होता तें, राष्ट्राध्यक्षांचें, रस्तेबांधणी-विषयक विधेयक तयार करण्यांत मोठा वांटा असलेले जनरल ल्युशियस क्ले ह्यांनीं स्वतःच्या हस्ताक्षरांत प्रदीर्घ पत्र लिहून जॉन्सनविषयींचा प्रेमादर व्यक्त केला होता.

कांहीं कॅथॉलिक सिस्टर्सनीं पत्र लिहून जॉन्सन ह्यांना कळविलें होतें कीं, आम्ही तुम्हांला आमचे सेनेटर म्हणून मानलें आहे आणि तुमच्यासाठीं रोज प्रार्थना करीत आहोंत.

एका जर्मन वकिलानें जर्मन भाषेंत पत्र लिहून कळविलें होतें, "मलाहि असाच हृदयविकाराचा झटका आला होता. लौकर बरें होण्यासाठीं काय करावें हें मला माहीत आहे. मी तें तंत्र तुम्हांला शिकविण्यासाठीं स्वखर्चानें युनायटेड स्टेट्स्मध्यें यावयास तयार आहें. कारण स्वतःच्या देशाचे एक पुढारी ह्या नात्यानें तुम्ही माझ्याहि देशावर केलेल्या उपकारांची मला जाणीव आहे."

इंडियानामधील एक शेतकरी जोडपें रोज निरनिराळ्या प्रकारचीं शुभचिंतनपर कार्डें पाठवीत असे. प्रत्येक कार्डावर बायबलमधील योग्य अशा पंक्ति हातानें लिहिलेल्या असत. त्या जोडप्याचा हा उपक्रम तीन आठवडे-पर्यंत चालू होता.

टंकलिखित, पेन्सिलीनें हस्ताक्षरांत लिहिलेलीं पत्रें, कार्डें, शुभचिंतन पत्र-कार्डें ह्यांच्याबरोबरच पुस्तकें, फुलें, खास खाद्यपदार्थ, एक छोटा रेडिओ, हातानें विणलेला प्रार्थनेच्या वेळीं परिधान करावयाचा रुमाल इत्यादि अनेक देणग्याहि देशांतील निरनिराळ्या राज्यांतील निरनिराळ्या लोकांकडून

आल्या होत्या. त्या लोकांमध्यें गरीब, मध्यमवर्गीय व श्रीमंत लोक होते. गृहिणी होत्या. शेतकरी होते. कामगार होते. सराफी व्यवसाय करणारे होते. उद्योगपेढ्यांचे प्रमुख होते. सेवानिवृत्ति वेतनावर गुजराण करणारे वृद्ध होते.

जॉन्सन हे, स्वतःला नकळत, एक लोकप्रिय राष्ट्रीय पुरुष बनले होते. त्यांना हृदयविकाराचा झटका अशा काळांत झाला कीं, देशाला त्यांच्या कार्याची जाणीव होऊं लागली होती. बहुमतवाल्या पक्षाचा नेता ह्या नात्यानें त्यांनीं बजावलेली असामान्य कामगिरी, ती कामगिरी बजावण्यामागील त्यांचीं धोरणें ह्यांची ओळख देशाला नुकतीच होऊं लागली होती. आतां वृत्तपत्रें, नभोवाणी, दूरचित्रवाणी हीं प्रसिद्धीचीं साधनें त्यांच्याबद्दल अखंड-पणें कांहीं ना कांहीं माहिती जनतेला पुरवीत असल्यामुळें जनतेला जॉन्सन ह्यांची अधिकाधिक ओळख होऊं लागली होती. आणि मिळालेली माहिती ऐकून वाचून लोक खूष होत होते.

वॉशिंग्टन येथील एका वृत्तपत्राच्या लेखकानें आपल्या लेखाला 'प्रत्येकाच्या प्रेमाला पात्र झालेले लिंडन' असा मथळा दिला होता. तें शीर्षक त्यावेळच्या लोकभावनेचें द्योतक होतें.

□ □ □

# १३

हृदयविकाराचा झटका आल्यानंतर दोनच आठवड्यांच्या आंत जॉन्सन ह्यांनीं आरोग्य परत मिळविण्याचा जणूं पद्धतशीर कार्यक्रमच आंखला. आपल्या राजकीय प्रचार मोहिमेसारखाच कार्यक्रम. आणि त्या मोहिमेंत जसे ते तनमनानें उडी घेत त्याचप्रमाणें आरोग्यसंपादनाचे प्रयत्नहि त्यांनीं कसून करायला सुरुवात केली.

वैद्यकीय तज्ज्ञांनीं जें जें सांगावें तें तें जॉन्सन काटेकोरपणें पाळीत असत. उत्कृष्ट सल्लामसलत संपादन करायची आणि त्याप्रमाणें वागायचें हें त्यांचं पूर्वापार धोरणच ते ह्या बाबतींत अवलंबीत होते. राजकारणांत तें धोरण फलदायी ठरलें होतें. आतां चाललेल्या जीवनमरणाच्या झगड्यांतहि तेंच धोरण यशस्वी ठरणार ह्याबद्दल जॉन्सन ह्यांना शंका नव्हती. इतकेंच नव्हे तर डॉक्टरांच्या सूचनांपेक्षांहि जास्त काळजी ते घेऊं लागले. डॉक्टरांनीं दिलेल्या सूचनांत त्यांनीं आपल्या कांहीं कल्पनांची भर घातली.

तळलेल्या बटाट्याचे पदार्थ, शिजविलेलें मांस, असा नित्याचा आहार असणाऱ्या जॉन्सनना डॉक्टरांनीं आहाराची मर्यादा फक्त १५०० उष्णांक अशी घालून दिली होती. जॉन्सन ह्यांनीं ही मर्यादा स्वतःहून १२०० उष्णांक अशी ठरविली. डॉक्टरांच्या मतें, त्यांचें वजन दोनशें पौंडांवरून एकशें ऐंशी पौंडांवर येणें आवश्यक होतें. जॉन्सन ह्यांनीं त्यापेक्षांहि दहा पौंड वजन आणखी खालीं आणण्याचा निर्धार जाहीर केला.

पूर्वीं अखंड धूम्रपान करणाऱ्या ह्या पुरुषानें सिगारेट अजिबात वर्ज्य केली. पण आपल्या निर्धाराची कसोटी पाहाण्यासाठीं पलंगाजवळच्या मेजावर नित्य एक सिगारेटचें पाकीट ते ठेवीत असत.

पूर्वी किरकोळ गोष्टींवरून एकदम भडकण्याचा त्यांचा स्वभाव होता; पण आतां कांहीं चुकलें तरी अगदीं शांत राहण्याचा त्यांचा प्रयत्न होता. मध्यंतरीं दोन वेळां भयंकर थकवा आला होता, पण आरोग्यसंपादनाच्या लढ्यांत त्यांनी अशक्तपणाने झालेली माघार पुन: भरून काढली. जास्त प्रसन्नता त्यांनीं संपादन केली. प्रत्येक उद्दिष्ट म्हणजे एक लढाच लढायचा हा जॉन्सन ह्यांचा मूळचाच पिंड होता.

रोज दुपारीं ते वामकुक्षी घेऊं लागले. अन्य परिस्थितींत वामकुक्षी ह्या गोष्टीला त्यांच्या जीवनांत स्थान मिळणें अगदीं अशक्य होतें, ही गोष्ट त्यांना ओळखणाऱ्या कोणालाहि माहीत होती.

शुश्रूषाहि त्यांना चांगली लाभत होती. पतीला रुग्णालयांत हलविण्यांत आलें त्या रात्रीपासूनच लेडी बर्ड रुग्णालयांतच राहायला गेल्या होत्या. पांच आठवड्यांनीं त्यांनीं रुग्णालयाचा निरोप घेतला तोंवर लेडी बर्डचा मुक्काम रुग्णालयांतच होता. जॉन्सन ह्यांच्या खोलीशेजारचीच खोली लेडी बर्ड ह्यांना देण्यांत आली होती. जॉन्सन ह्यांच्या आजाराच्या पहिल्या गंभीर काळांत लेडी बर्ड पतीपासून चार पावलांपलिकडे दूर जात नसत. जरूर लागेल तेव्हां त्यांच्यापाशीं जातां यावें म्हणून त्यांच्या रुग्णशय्येच्या आसपास राहण्याची काळजी लेडी बर्ड प्रारंभीं घेत असत.

नंतर कांहीं दिवसांनीं ह्याबद्दल कृतज्ञतापूर्वक उद्गार काढतांना जॉन्सन म्हणाले, " मी नुसता हात उचलला कीं प्रत्येक वेळीं माझी पत्नी क्षणांत हजर व्हायचीच. "

जॉन्सन ह्यांच्या आहाराची व्यवस्था लेडी बर्ड ह्यांनीं आपल्याकडे घेतली होती. ठरलेल्या उष्णांकाच्या मर्यादेंत, प्रत्येक पदार्थाचे उष्णांक किती ?—पोषणमूल्यें किती ?—जीवनसत्त्वें कोणतीं आणि किती ?—ह्या सर्व गोष्टी त्या अगदीं जोखून बघत असत. जॉन्सन ह्यांना जसजसा आराम पडूं लागला तसतशी कांहीं थोड्या प्रमाणांत भेटायला येणाऱ्यांना परवानगी देण्यांत येऊं लागली. किती लोकांनीं भेटायचें आणि किती वेळ बसायचें हें ठरवून त्याप्रमाणें नियंत्रण ठेवण्याची कामगिरी लेडी बर्डच पार पाडीत असत. दिलासा देणारे हजारों संदेश येत. ते पतीला वाचून दाखविण्याचें काम त्याच करीत आणि त्या सर्व पत्रांना त्याच उत्तरें देत. जॉन्सन सकाळीं उठण्यापूर्वीं दोन

एक तास त्या पत्रांचा मजकूर लेखिकेला सांगत. आणि जॉन्सन ह्यांना रात्रीं झोप लागल्यानंतर पत्रांवर स्वाक्षऱ्या करण्यांत दोन एक तास घालविल्या-नंतरच अंथरुणावर अंग टाकीत असत.

आणि ह्या सर्व काळांत, परिस्थितीत, बाह्यतः अगदीं शांत आणि प्रसन्न राहण्याची त्या काळजी घेत असत. त्यांनी कधींच धीर सोडला नाहीं. एकदां आपल्या पतीशीं सहज बोलतांना मात्र त्यांनीं आपल्याला जाणवणाऱ्या ताणाची कल्पना दिली होती. त्या सहज बोलावें अशा सुरांत म्हणाल्या होत्या, "तुम्ही बरे झाल्यावर मी एकीकडे जाऊन तास दोन तास खूप रडून घेणार आहें."

जॉन्सन कुटुंबाशीं घनिष्ठ घरोबा असणाऱ्या लोकांचें मत असें आहे कीं, जॉन्सन हे जसे त्यांच्या पद्धतीनें वैशिष्ट्यपूर्ण आहेत तशाच लेडी बर्डहि आपल्या परीनें वैशिष्ट्यपूर्ण व्यक्ति आहेत. ह्या म्हणण्याला कांहीं पुरावा हवाच होता तर तो जॉन्सन ह्यांच्या आजारीपणाच्या काळांत पुरेपूर मिळाला. लेडी बर्डच्या वरकरणी दिसणाऱ्या मुलायम व्यक्तित्वाखालीं अगदीं तावून सुलाखून निघालेलें पोलाद आहे हें त्या काळांत दिसून आलें.

आजाराविरुद्ध जॉन्सन ह्यांनीं चालविलेल्या झगड्याच्या पहिल्या कांहीं दिवसांत त्यांची माता त्यांच्यापाशींच होती. प्रथमपासूनच करारी असलेली रिबेका बेन्स जॉन्सन ही स्त्री आतां चौऱ्याहत्तर वर्षांची वृद्धा होती. पण आपल्या मानसिक शिस्तीचा आणि व्यवहारचातुर्याचा ठेवा अद्याप तिनें गमावला नव्हता. ह्या तिच्या गुणांचा त्या काळांत फारच चांगला उपयोग झाला. त्या रुग्णपुरुषाच्या भोंवतीचें वातावरण त्या गुणांच्या दरवळानें तिनें भारून टाकलें होतें. तिनें जॉन्सन ह्यांच्या बालपणीच्या सांगितलेल्या गोष्टी पत्रप्रति-निधि आणि भेटायला येणारे लोक मन लावून ऐकत असत. आपल्या पुत्रा-कडून नियतीला अधिक कामगिरी बजावून घ्यावयाची आहे अशी त्या वृद्धेची श्रद्धा होती आणि ती बजावण्यासाठीं तो पुनः तन्दुरुस्त होईलच होईल असा विश्वास त्या माउलीला वाटत होता.

जॉन्सन ह्यांच्या दोन कन्याहि आसपास असत आणि त्यांच्या सान्निध्यांत जॉन्सनना खूपच आराम वाटे. समाचारासाठीं येणाऱ्यांना परवानगी देण्यांत येतांच अनेक लोक येऊं लागले. सर्वांत वारंवार येणारे गृहस्थ होमर थॉर्नबेरी हे होत. प्रतिनिधिसभेंत जॉन्सन ज्या मतदारसंघांतून निवडून येत असत

त्या मतदारसंघाचें प्रतिनिधित्व थॉर्नबेरी सध्यां करीत होते. ते जॉन्सन ह्यांचे निकटवर्ति मित्र होते. आणि दोघे तास न् तास 'डॉमिनो'चा खेळ खेळत तेव्हां ते जॉन्सनचे प्रतिस्पर्धी असत. त्या वेळच्या आठवणी सांगतांना थॉर्नबेरी ह्यांनीं लेडी बर्डला सांगितलें कीं, एकादा डाव जिंकल्याच्या आनंदाप्रीत्यर्थ त्यांचा जोराचा आरडाओरडा सुरू झाला तेव्हां मी उमजलों कीं त्यांची प्रकृति सुधारत आहे.

जॉन्सन विनोदहि करीत असत. अर्थात् तो विनोद त्यांच्या प्रस्तुत प्रकृतीच्या संदर्भात असल्यामुळें त्याला रौद्रतेची झांक असे. आजारी पडल्यानंतर बारा-चवदा दिवसांनीं लेडी बर्ड जॉन्सन ह्यांच्या खोलींत येऊन सांगूं लागल्या कीं, "दोन सूट शिवण्यासाठीं ज्या शिप्याला सांगण्यांत आलें होतें तो शिंपी आला आहे–तो विचारतोय कीं त्या कपड्यांच्या बाबतींत काय करायचें ?"

"त्याला सांग कीं निळा सूट शिवायला घे. असं नाही तसं कांहींहि घडलं, तरी तो वापरतां येईल." जॉन्सन उत्तरले.

जॉन्सन ह्यांच्या प्रकृतींत अधिकाधिक सुधारणा होऊं लागली. कुटुंबियांच्या आणि मित्रांच्या भेटीगांठी, डोमिनो, वाचन एवढ्याच गोष्टी वेळ घालवायला अपुऱ्या आहेत असें दिसून आलें. मग त्यांच्या कचेरींतल्या दोन चिटणिसांना इस्पितळांतच कचेरी थाटावी लागली. कितीहि वेळां टेलिफोन घ्यावा लागला तरी जे कधीं चिडचिडायचे नाहींत असेच ते कर्मचारी होते. कारण टेलिफोन सततच खणखणत असे. त्यांनीं आपले टाइपरायटर्स आणले होते. वॉल्टर जेन्किन्स हे जॉन्सन ह्यांचे अत्यंत विश्वासू आणि कार्यक्षम चिटणीस. साऱ्या कचेरीचीं सूत्रें त्यांच्याकडे असत. जेन्किन्स ह्यांनीं जॉन्सन ह्यांच्याखेरीज आयुष्यांत दुसऱ्या कोणाकडेच नोकरी केलेली नाहीं. जेन्किन्स दिवसांतून दोन तीन वेळां येत असत. कचेरींत येणारीं पत्रें, वृत्तपत्रें वगैरे ते बरोबर आणीत असत. सेनेटमधील कामकाजाची खबर आपल्या वरिष्ठांना देत असत. जॉन्सन ह्यांचे बंधु सॅम ह्यूस्टन जॉन्सन हे, आपल्या भावाला आनंदांत ठेवण्यासाठीं निरनिराळ्या प्रकारें प्रयत्न करीत असत.

रुग्णालयाचा संपूर्ण सतरावा मजला जॉन्सन आणि मंडळींनीं व्यापला होता. त्या इस्पितळांतील लोक उद्गार काढीत कीं, असलें दृश्य इस्पितळांत ह्यापूर्वी आम्हीं कधींच बघितलेलें नाहीं. ती लोकांची सारखी ये–जा, टेलिफोनचा

अखंड खणखणाट, टाइपरायटरांची कट्कट् आणि एकूण सारी धमाल, हा प्रकारच रुग्णालयाच्या पार्श्वभूमीवर अपूर्व होता.

जॉन्सन ह्यांना त्रास होऊं नये इतक्या दूरच्या खोल्यांत ही कामाची धांवपळ चालू असे. पण, कामें काय चाललीं आहेत हें त्यांना पूर्णपणें माहीत असे. खरें म्हणजे कामकाजाचें बरेंचसें नियमन तेच करीत असत. हीहि एक मोहीमच होती त्यांच्या दृष्टीनें! आणि दुरून का होईना मोहिमेचीं सूत्रें तेच हलवीत होते. हळूहळू प्रकृतींत सुधारणा चालूच होती. उपचारांच्या बाबतींत अत्यंत सहकार्य करणारा हा रुग्ण आहे असें डॉक्टरांना आढळून आलें.

सेनेटचें अधिवेशन अजून चालूच होतें. अर्थात् सेनेटपुढें असलेल्या विधेयकांबद्दल चर्चा करण्याला डॉक्टरांनीं जॉन्सन ह्यांना मनाई केली होती. काँग्रेसच्या कामकाजाचे दैनिक अहवाल जॉन्सन वाचीत असत आणि काय चाललें आहे ह्याची अद्ययावत् माहिती मिळवीत असत. त्यांनीं डॉक्टरांना सांगितलें, " हें बघा, माझ्या आहारांत राजकारण हा पदार्थ पुष्कळसा असतो! माझ्या ताटांत रोज तो पदार्थ हवाच. त्याशिवाय जेवणच जायचें नाहीं मला!"

जिनेव्हा परिषदेला जाण्यापूर्वीं राष्ट्राध्यक्ष आयझनहॉवर त्यांना भेटायला आले होते. त्यावेळीं ते म्हणाले, " माझें हृदय इथें तुमच्यापाशींच असेल." ह्या उद्गारांनीं जॉन्सन आणि लेडी बर्ड ह्यांचीं अंतःकरणें हेलावून गेलीं. उपराष्ट्राध्यक्ष निक्सन हेहि बातचीत करायला येऊन गेले. रेबर्न ह्यांना तर पहिले दोन आठवडे केव्हां जातात असें झालें होतें. कारण, त्या काळांत वैद्यकीय तज्ज्ञांनीं कोणालाहि भेटायला यावयास बंदीच केलेली होती. संधि मिळतांच त्यांनीं जॉन्सन ह्यांना भेटून, प्रसंगाला समचित्तानें तोंड द्यायचेंय् हें लक्षांत ठेव असा प्रेमाचा दम भरला. दोन्ही पक्षांचे सेनेटर, मंत्री, वरिष्ठ न्यायालयाचे न्यायाधीश, टेक्ससमधील जुने मित्र असे अनेक लोक त्यांच्या समाचाराला येऊन गेले.

इतक्या असंख्य लोकांनीं जॉन्सन ह्यांच्या प्रकृतीबद्दल आस्था दाखविली, त्यांना दिलासा दिला, त्यामुळें आजाराविरुद्ध यशस्वी लढा देण्याला हातभारच लागला. रुग्णालयांतून बाहेर पडल्यानंतर, कॅपिटॉल हिलच्या नोकरवर्गासाठीं असलेल्या 'रोलकॉल' ह्या पत्रांत प्रसिद्ध केलेल्या निवेदनांत,

आलेले शुभेच्छा-संदेश आणि भेटून लोकांनीं व्यक्त केलेली शुभेच्छा ह्या गोष्टी आपल्याला किती उपकारक ठरल्या हें सांगतांना जॉन्सन ह्यांनीं म्हटलें होतें,

" जगांत पुष्कळ सज्जन आहेत असें म्हणणें हें एक रूढ सुभाषित आहे, असें मी समजतों. पण बेथेस्डा नेव्हल हॉस्पिटलमध्यें रुग्णशय्येवर पडून पुनरारोग्य मिळविण्यासाठीं झगडत असतांना नेमका हा विचार वारंवार माझ्या मनांत येत होता.

" अनेक जण माझ्या आजारांतून मी बरें व्हावें म्हणून प्रयत्न करीत आहेत, प्रार्थना करीत आहेत ही जाणीव माझ्या आजाराच्या पहिल्या कांहीं विकट दिवसांत कमालीची उपकारक ठरली आहे.

" माझी पत्नी लेडी बर्ड हिनें एकूण एक सर्व शुभेच्छा-संदेश मला वाचून दाखविले. त्या संदेशांनीं मला काय दिलें हें शब्दांत कधींच सांगतां येणार नाहीं. त्यांच्यामुळें मला धैर्य आणि सामर्थ्य लाभलें हा माझा प्रत्यक्ष अनुभव आहे.

" मला करण्यांत आलेल्या प्रत्येक उपचारांना माझ्याकडून चांगली साद मिळाली असें मला उपचार करणाऱ्या वैद्यकीय तज्ज्ञांनीं मी इस्पितळाचा निरोप घेत असतांना सांगितलें. त्याचें बरेंचसें श्रेय मला संदेश पाठविणाऱ्या लोकांना आहे. त्यांनीं तारा पाठवून आणि पत्रें पाठवून मला जाणीव दिली कीं त्यांच्या मनांत माझ्याविषयीं आस्था आहे. 'बरे व्हा' अशी शुभेच्छा व्यक्त करणारीं कार्डे पाठविणाऱ्या हजारों लोकांना बरेंचसें श्रेय आहे.

" मानवाच्या जन्मजात चांगुलपणावर श्रद्धा असणारा माणूस मी प्रथम-पासूनच आहे असें मला वाटतें. पण तो चांगुलपणा किती आहे ह्याची मला पुरेशी जाणीव नव्हती असें आतां अनुभवास आलें आहे.

" अमेरिकन जनतेची माणुसकी आणि चांगुलपणा कमी लेखण्याची चूक ह्यापुढें हातून घडू न देण्याचा मी सदैव प्रयत्न करीन. आपल्या स्वभावांतील उत्स्फूर्त चांगुलपणाचा आविष्कार जनतेनें जो दाखविला त्याचें कृतज्ञतापूर्ण स्मरण जन्मभर मी ठेवीन. कदापि मला त्याचा विसर पडूं देणार नाहीं. कारण त्या चांगुलपणाची जेव्हां मला अत्यंत गरज होती तेव्हां मला त्याचा लाभ झालेला आहे.

" शब्दांनीं सांगतां येणार नाहीं इतकी गरज मला असतांना दिलासा देणारे ज्ञात अज्ञात मित्र पुढें सरसावले. ह्यामुळेंच मी टिकाव धरूं शकलों. म्हणूनच मला वाटतें कीं जेव्हां मी म्हणतों, ' जग सज्जनांनीं भरलेलें आहे ' तेव्हां मी एक नितांत सत्यच सांगत आहें असें मला वाटतें."

रुग्णालयांत, नंतर वॉशिंग्टन येथील विन्हाडीं आणि त्यानंतरहि टेक्सस-मधील त्यांच्या वाडीवरील घरीं, ज्यांनीं ज्यांनीं त्यांची भेट घेतली त्यांना त्यांना आढळून आलें कीं कांहीं विशेष बाबतींत जॉन्सन ह्यांच्यामध्यें स्थित्यंतर घडून आलें आहे.

एका मित्राशीं बोलतांना जॉन्सन म्हणाले, " मी हातांतील आसूड टाकून दिला आहे. कामांत गर्क असणाऱ्या माणसाला ज्या कांहीं गोष्टींचा अगदीं विसर पडतो त्या गोष्टी हृदयविकाराच्या झटक्यानें मला शिकविल्या आहेत. माझ्या मुलींशीं ' डोमिनो ' खेळण्यांत गंमत आहे हें मला आढळून आलें आहे. मला हेंहि ज्ञान झालें आहे कीं, बायकोशीं आणि शेजाऱ्याशीं इकडच्या तिकडच्या गप्पागोष्टी करण्यांतहि आनंद असतो. सारांश, खरें म्हणजे, कसें जगावें हें मी पुन: एकदां शिकत आहें."

कांहीं बाबतींत हें स्थित्यंतर ह्यापेक्षांहि सखोल होतें. राजकीय शिडीवर भराभर चढून जात असतांना टेक्ससमधील ह्या पुरुषाला गंभीर वाचनाला आणि सिंहावलोकनात्मक चिंतनाला फुरसत मिळालीच नाहीं किंवा त्यानें तशी फुरसत मिळविली नाहीं. महाविद्यालयीन शिक्षण संपल्यानंतरच्या प्रदीर्घ कालांत आपण सहा तरी पुस्तकें वाचलीं असतील कीं नाहीं ह्याबद्दल ते साशंक होते. कारण ' तेव्हां ' ह्या शब्दाशीं त्यांचा संबंधच आला नव्हता, त्यांना सतत डोळ्यांपुढें ठेवावा लागत होता तो शब्द म्हणजे ' आतां '. वृत्तपत्रांचीं ठळक शीर्षकें वाचून म्हणजेच महत्त्वाच्या बातम्या वाचून किंवा ज्यांची निर्णयक्षमता त्यांना विश्वसनीय वाटे त्या व्यक्तींनीं तयार केलेलीं निवेदनें–टाचणें वाचून त्यांनीं विद्यमान समस्यांचें ज्ञान मिळविलेलें होतें.

साऱ्या जीवनभर त्यांची तुफान धावपळ चालू होती. तत्त्वचिंतनांत, तात्त्विक बैठकीचा विचार करण्यांत रमण्याला त्यांना कधींच वेळ मिळाला नव्हता. त्यांचें सर्वच प्रौढ जीवन राजकारणांत व्यतीत झालें. राजकारणांतील त्यांच्या कृतीमागें उत्स्फूर्त विचार असे. अर्थात् अशा विचारांनीं त्यांना कधीं

गैरमार्गाला नेलें नाहीं हेंहि खरें. तरी पण भरीव राजकीय तत्त्वज्ञानाची जोड आपल्या कार्याला देण्याची गरज त्यांना कधीं विशेष वाटली नाहीं. असें तत्त्वज्ञान असण्यासाठीं भूतकालाचें सर्वांगीण ज्ञान आणि विद्यमान काला-विषयींची तीक्ष्ण जाणीव ह्यांचा पाया असावा लागतो.

पाव शतकाइतका काळ, घाईगर्दीत, धकाधकींत व्यतीत केल्यानंतर जॉन्सन ह्यांना स्वास्थ्य लाभलें होतें. त्याचा उपयोग वाचन-चिंतनासाठीं करतां आला. आणि त्यावरून त्यांना असा निष्कर्ष काढावा लागला कीं, व्यावहारिक बाजूबरोबर तात्त्विक बाजू, अशीच निसर्गाची घडण एकूण असते. स्वास्थ्य लाभलें, म्हणजे तें त्यांच्यावर लादलें गेलें होतें. आजारानंतरची विश्रांति आवश्यक होती. आणि ह्या विश्रांतीच्या, स्वास्थ्याच्या अवधींतच त्यांना वाटूं लागलें कीं, माणसाच्या दैनंदिन गरजांकडेच केवळ लक्ष देऊन भागत नाहीं; त्याच्या भवितव्याचा विचार करणेंहि निकडीचें आहे.

आणि म्हणूनच जॉन्सन ह्यांना भेटायला येणाऱ्या लोकांना दिसून आलें कीं, ते अधिक चिंतनशील, अधिक समतोल वृत्तीचे आणि अधिक शांत वृत्तीचे गृहस्थ बनले आहेत. पूर्वीच्या जॉन्सनपेक्षां हे जॉन्सन निराळे आहेत हें भेटणारांना दिसत होतें. 'दि न्यूयॉर्क टाइम्स' आणि काँग्रेसचे अहवाल ह्यांच्या-बरोबरच प्लेटो, अमेरिकेचा प्रारंभकालीन इतिहास ह्यांचेंहि वाचन करणारे जॉन्सन लोकांना दिसत होते. सारांश, पूर्वी ज्याप्रमाणें जीवनांतील प्रत्येक अनुभवापासून ते शिकत आले होते त्याचप्रमाणें ह्यादेखील अनुभवापासून आतां ते शिकतच होते.

१९५५ च्या शरद्ऋतूंत त्यांच्या टेक्ससमधील निवासस्थानीं डेमोक्रॅटिक पक्षाचे अग्रेसर नेते सतत त्यांच्या भेटीसाठीं येत होते. आपल्या पक्षाच्या धोरणाला जॉन्सन काय आणि कसा आकार देत आहेत ह्यासंबंधीं आपले तर्कवितर्क वृत्तपत्रांत राजकीय लिखाण करणारे लेखक व्यक्त करीत होते. अशा लिखणाला उधाण आलें होतें. अशा बातम्यांचा त्यांनीं स्वतः इन्कार केला. पण, 'एकत्र बसून सारे जण विचार करूं या' ह्या सूत्रावर आधारलेल्या त्यांच्या पद्धतीनें डेमोक्रॅटिक पक्षाचा पुढील मार्ग निश्चित करण्याचा विचार चालू होता एवढें खास.

आणि हें ठरविण्याला जॉन्सन हेच योग्य पुरुष होते. एक आदरणीय पुरुष रोस्को ड्रमंड ह्यांनीं 'न्यूयॉर्क हेरल्ड ट्रिब्यून'मध्यें लिहिल्याप्रमाणें, जॉन्सन स्वतःच्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षेसाठीं धडपडणारे नव्हते. म्हणूनच त्यांच्या शब्दाला डेमोक्रॅटिक पक्षाच्या प्रश्नांच्या बाबतींत मान होता.

विश्रांतीच्या काळांत जॉन्सन आपल्या स्वतःच्या जीवनाला जें समतोल वळण लावीत होते, तसेंच समतोल स्वरूप डेमोक्रॅटिक पक्षाच्या धोरणाला असावें असेंच प्रतिपादीत होते. वृत्तपत्रांतील बातम्यांकडे बोट दाखवून एका मित्रानें त्यांना विचारलें, "कांहीं विशेष विचार आहे का ?"

जॉन्सन ठामपणें उत्तरले, "नाहीं. अॅडलाय स्टीव्हन्सन, सभापति, बॉब कार, ह्यूबर्ट हम्फ्रे इत्यादि लोकांच्या भेटीगाठींबद्दल वृत्तपत्रांचे हे बातमीदार खूप लिहितात. पण मी रोज दुपारीं वामकुक्षी घेतों आणि संध्याकाळ लेडी बर्ड नि मुलींच्या संगतींत मजेंत घालवितों ह्याबद्दल कांहींच लिहीत नाहींत."

लिंडा बर्ड आणि ल्यूसी बेन्स ह्या आपल्या दोन कन्यांची खरीखुरी 'ओळख' ह्या विश्रांतीच्या काळांतच जॉन्सन ह्यांना होत होती आणि त्यांना जाणून घेण्याचा अमूप आनंद त्यांना लाभत होता. लिंडा आतां अकरा वर्षांची होती आणि ल्यूसी आठ वर्षांची. आपल्या मित्रमैत्रिणींबद्दल, वॉशिंग्टनला पुनः शाळेंत जाऊं लागल्यावर पार पाडावयाच्या बेतांबद्दल त्या गंभीरपणें बोलत. पित्याच्या सहवासांत केवढा आनंद वाटतो तेंहि सांगत. त्यांच्या बालिश बोलण्यांतला गोडवा जॉन्सन ह्यांना मोहून टाकीत असे.

ह्याबद्दल बोलतांना एकदां जॉन्सन म्हणाले, "मोठ्या आजारांतून उठून बरें होण्याच्या मार्गावर असणाऱ्या माणसाला लहान लहान गोष्टींतहि फार गंमत वाटते. १९५५ च्या त्या शरदृतूंत मी माझ्या दोघी कन्यांकडून जें शिकलों तें मला इतर कोणाकडून कधींच शिकतां आलें नसतें.

"फार काय, आमचा कुत्रा लिट्ल बीगल ह्याच्याकडूनहि कांहीं तरी शिकलों आहें मी.

"एक दिवस मी घराच्या ओटीवर बसलों होतों. एकटाच होतों. मन कांहीसें उदास होतें. मी हांक मारली नाहीं कीं हात जोरानें हलवून बोलावलेंहि नाहीं. फक्त त्याचें लक्ष वेधण्यासाठीं हळूच खूण केली. पण लिट्ल

बीगल जिथें बसला होता तिथून चटकन् उठला आणि माझ्यापाशीं आला. डोकें माझ्या मांडीवर ठेवून माझ्याकडे बघत अगदीं शांत उभा राहिला. मी म्हणालों, 'ठीक आहे लिट्ल बीगल, ह्यापुढें मी परिस्थिति येईल तशी स्वीकारीन.' आश्चर्याची गोष्ट अशी कीं, कसें कोण जाणें तेवढ्यानें माझा निरुत्साह पळाला. मला बरें वाटूं लागलें."

राजकारणाशीं ज्यांचा कसलाहि संबंध नाहीं असे लोकहि जॉन्सन ह्यांना भेटायला येत असत. एका आठवड्याच्या अखेर, जॉन्सन ह्यांचा एक चहाता आर्थर गॉडफ्री हा विमानांत वसूं शकतील इतक्या मित्रांना बरोबर घेऊन विमानानें जॉन्सन ह्यांच्या रँचवर येऊन दाखल झाला. त्याच दिवशीं वॉशिंग्टनहून कांहीं पत्रकार आले होते. टेक्ससमधील कांहीं शहरांतील बातमीदारहि होते. जॉन्सन ह्यांच्या बहिणी सहपरिवार आलेल्या होत्या. भाऊ सॅम ह्यूस्टन जॉन्सन होता. जॉन्सन सिटीचे सरकारी वकील व जॉन्सन यांचे एक निकटवर्ति मित्र ए. डब्ल्यू. मूर्संड हेहि 'डोमिनो' खेळण्यासाठीं आले होते.

इतक्या लोकांची येजा चालू असूनहि जॉन्सन अगदीं शांतपणें दिवस व्यतीत करीत होते. पेडरनेल्स नदीच्या तीरावरील त्यांचें घर म्हणजे हृदयविकाराच्या झटक्यांतून उठलेल्या माणसाला पुनः पूर्ण आरोग्य मिळविण्याच्या दृष्टीनें अगदी आदर्श जागा होती. आसपासच्या अफाट उंचसखल भूमींत शांततेचें साम्राज्य होतें. ज्यांना भेटणें आवश्यकच असे त्यांच्याच भेटी जॉन्सन घेत असत. कांहीं कामासाठीं आलेल्या लोकांशीं लेडी बर्ड स्वतः बोलून त्यांना वाटेला लावीत असत.

सध्यांचें जीवन काटेकोर कार्यक्रमाच्या चाकोरींतून जात होतें. सकाळीं रँचमध्यें चक्कर मारून फिरण्याचा कार्यक्रम, रोज दुपारीं वामकुक्षी. आरामखुर्चीवर प्रदीर्घ काळ पडून वाचन किंवा संगीताच्या ध्वनिमुद्रिका ऐकणें.

अजूनहि तन्दुरुस्त होण्याचे प्रयत्न कसून चालू होते. ते म्हणत, "हे प्रयत्न, निवडणूक प्रचारमोहिमेसारखे मानले तर डिसेंबरपर्यंत मी निवडणुकीला उभा आहें असें समजा. आणि ही निवडणूक मला जिंकलीच पाहिजे."

डिसेंबरमध्यें, त्यांच्या प्रकृतीची तपासणी कसून घेतली गेली. सहा वैद्यकीय तज्ज्ञ तपासायला होते. त्यांचीं नांवें पुढीलप्रमाणें : जे. विलिस हर्स्ट.

जॉर्जियांतील अॅटलांटा येथील एमोरी युनिव्हर्सिटींत ते होते. जॉन्सन बेथेस्डा रुग्णालयांत असतांना हे तज्ज्ञ तेथें आरमारी राखीव अधिकारी ह्या नात्यानें कामावर होते. मेयो क्लिनिकचे डॉ. हॉवर्ड बर्चेल आणि जेम्स सी. केन. टेंपल ( टेक्सस ) येथील स्कॉट अँड व्हाईट क्लिनिकचे ऑलिन ग्रोव्हर. नॅशनल कॅपिटॉल फिजिशिअन्स स्टाफचे आर. डब्ल्यू. जिफोर्ड आणि जॉन्सन सिटीचे जे. बी. व्हेली.

ह्या वैद्यकीय तज्ज्ञांनीं जॉन्सन ह्यांना तपासल्यानंतर पुढील पत्रक काढलें :--

"ता. २ जुलैला सेनेटर लिंडन बी. जॉन्सन ह्यांना हृदयविकाराचा झटका आला, त्याला सुमारें सहा महिने झाले आहेत. आम्ही सेनेटर जॉन्सन ह्यांची प्रकृति सर्व प्रकारें तपासली. आमचे एकमताचे निष्कर्ष पुढीलप्रमाणें आहेत :

"( १ ) त्यांच्या प्रकृतींत झालेली वेगाची प्रगति आम्हांला समाधानकारक वाटते. प्रकृतींत बिघाड असा झाला नाहीं. कामांत, हालचालींत हळूहळू वाढ करण्यांत येते त्याची प्रतिक्रिया अनुकूल दिसते. रक्तदाब योग्य आहे. हृदयाची स्थितिहि योग्य आहे. 'इलेक्ट्रो कार्डिओग्राम' निरोगी माणसासारखाच आहे.

"( २ ) पुढील काळांत कांहीं अकल्पित बिघाड होण्याचा प्रश्न सोडला तर, त्यांनीं पुन: आपल्या कामावर रुजू होऊन महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडूं लागण्याला कांहींच हरकत दिसत नाहीं.

"( ३ ) जॉन्सन ह्यांनीं वागतांना कोणतीं पथ्यें पाळायचीं आहेत ह्याची माहिती त्यांच्या कुटुंबियांना, नोकरचाकरांना, निकटवर्ति मित्रांना देण्यांत आलेली आहे. त्यांच्या कचेरींतील नोकरवर्ग जें काम परस्पर करूं शकेल त्याचा बोजा जॉन्सन ह्यांच्यावर मुळींच पडतां कामा नये. कामाच्या वेळा आणि विश्रांतीच्या वेळा काळजीपूर्वक नियमित केलेल्या असल्या पाहिजेत. वर्षांतून वारंवार छोट्या छोट्या सुट्या घेतल्या पाहिजेत.

"( ४ ) सेनेटर जॉन्सन सर्वसाधारणत: चांगले तन्दुरुस्त आहेत आणि काम करण्यास पूर्णपणें समर्थ आहेत. जबाबदारीच्या पदावरील माणसाला

मानसिक ताण अपरिहार्य असतो. तेव्हां त्यानें प्रकृतीची जपणूक काळजीपूर्वक केली पाहिजे. ही वस्तुस्थिति लक्षांत घेऊनच आम्ही योग्य तीं पथ्यें सांगितलीं आहेत."

१९५६ च्या काँग्रेस अधिवेशनांत पुन: कामावर रुजूं होण्याची परवानगी अधिकृतपणें मिळाल्यामुळें जॉन्सन फार खूष झाले. खूष झाले पण आश्चर्यचकित मात्र झाले नाहींत. आपल्या तन्दुरुस्तीबद्दलची मनोमन खात्री त्यांना ह्यापूर्वींपासूनच वाटत होती.

त्यांच्या हालचालींवर डॉक्टरांनीं घातलेल्या मर्यादा पाळण्याला ते राजी होते. पण ते बहुमतवाल्या पक्षाचे नेते होते. नेतृत्व ही दुसऱ्याकडे सोंपवितां यावी अशी चीज नव्हे हें त्यांना ठाऊक होतें. नेतृत्वाच्या जबाबदाऱ्या स्वीकारण्याला ते नेहमींप्रमाणेंच तयार होते.

युनायटेड स्टेट्स्च्या सेनेटमधील बहुमतवाल्या पक्षाचे कार्यक्षम नेते अद्याप टेक्ससचे प्रतिनिधि सेनेटर जॉन्सन हेच होते.

□ □ □

# १४

सेनेटमधील डेमोक्रॅटिक पक्षाचे नेते म्हणून जॉन्सन ह्यांनीं जीं आठ वर्षें काम केलें त्यांतील सहा वर्षें द्विदल शासनाचीं होतीं. म्हणजे, व्हाईट हाऊसमध्यें राष्ट्राध्यक्ष रिपब्लिकन पक्षाचे, तर काँग्रेसमध्यें सूत्रें डेमोक्रॅटिक पक्षाच्या हातीं. फक्त पहिलीं दोनच वर्षें काँग्रेसमध्यें रिपब्लिकन पक्षाचें मताधिक्य होतें. सरकारचें पाऊल पुढें पडायचें असेल तर डेमोक्रॅटिक पक्षानेंच हालचाल केली पाहिजे अशी नंतरच्या सहा वर्षांतील परिस्थिति होती. आणि तशी हालचाल व्हावी याबद्दल दक्षता घ्यायला जॉन्सन हीच लायक व्यक्ति होती.

पुष्कळशीं विधेयकें विवाद्य असत. तेव्हां प्रक्षुब्ध भावनांचा आविष्कार न होतां तीं विधेयकें मंजूर होतील ह्याची काळजी घेण्याचें प्रचंड काम बहुमतवाल्या पक्षाचे द्रुतभाषी, द्रुतवेगी नेते जॉन्सन ह्यांनाच करावें लागे. तें काम करायला लायक पुरुषहि जॉन्सनच होते.

अर्थात् नागरिक हक्कांचा प्रश्न सर्व प्रश्नांत विवाद्य प्रश्न होता. आणि टेक्ससचे रहिवाशी असणारे जॉन्सन ह्या क्षेत्रांत कांहीं हालचाल करूं शकतील कीं काय ह्याबद्दल कांहीं लोकांना संशय होता. पण हे लोक त्या पुरुषाला ओळखीत नव्हते आणि त्यांनीं त्याचें कर्तृत्व नीट पारखलें नव्हतें.

सेनेटमध्यें प्रथम आल्यानंतर कांहीं थोड्याच अठवड्यांनीं केलेल्या भाषणांत जॉन्सन म्हणाले होते, " आपल्या राष्ट्रांतील एकाद्या गटाला बंधनांत ठेवण्याचा प्रयत्न कोणी केला तर त्या लोकांविषयीं माझ्या ठायीं सहिष्णुता नाहीं आणि सहानुभूति नाहीं. घर, शिक्षण, रोजगार ह्या गोष्टी मिळण्याचा प्रत्येक अमेरिकन नागरिकाला हक्क आहे. तो हक्क एकाद्यादुसऱ्या वर्गाला मिळू नये असें ज्यांना वाटतें असे कांहीं लोक असतील; पण मी त्या लोकांपैकीं नाहीं. माझ्या देशबांधवांविषयीं माझी श्रद्धा इतकी गाढ आहे कीं,

एकाद्या वर्गाविषयीं द्वेषानें जळत राहण्यांत जीवनाचा अपव्यय करणें मला शक्य नाहीं. सर्व गटांना, वर्गांना एकत्र येऊन जास्त चांगल्या जीवनाचा लाभ करून घेण्याचा प्रयत्न करतां यावा इतकी आमची प्रातिनिधिक शासनपद्धति मजबूत आणि लवचिक आहे असें मला ठामपणें वाटतें. माझी ती प्रामाणिक श्रद्धा आहे."

नवीन सभासद म्हणून सेनेटमध्यें त्यांनीं जी भावना व्यक्त केली तिच्याशीं जॉन्सन ह्यांनीं बहुमतवाल्या पक्षाचा नेता ह्या भूमिकेवरूनहि इमान राखलें. १९५७ चा नागरिक हक्क कायदा मंजूर करून घेण्यांत त्यांचाच पुढाकार होता. ८२ वर्षांत मंजूर झालेला नागरिक हक्काविषयींचा तो पहिलाच कायदा होता. त्याचप्रमाणें १९६० चा नागरिक हक्क कायदा काँग्रेसमध्यें मंजूर करून घेण्यांतहि ते यशस्वी झाले. ह्या कायद्यान्वयें, निग्रोंना मतदानाच्या हक्काची हमी लाभावी ह्या दृष्टीनें नोंदणीपद्धति नव्या धर्तीची करण्याची तरतूद केलेली होती.

ह्या दोन्ही विधेयकांना सेनेटमध्यें बराच विरोध झाला. विरोधकांत, इतर बाबतींत "आम्हीं लिंडनचे अनुचर" असें म्हणणारे व बहुधा त्यांना पाठिंबा देणारे दक्षिणी राज्यांतील वजनदार नेते होते. अशा परिस्थितींत ह्या विधेयकांना मंजुरी मिळविण्याचा जॉन्सन ह्यांना जास्त अभिमान वाटत होता. सेनेटमधील नेतृत्वाच्या कालखंडांत कर्तृत्वाचा जो प्रचंड पर्वत त्यांनीं उभारला त्याच्या शिखराप्रमाणें त्यांना त्या विधेयकांबाबतची आपली कामगिरी वाटणें स्वाभाविकच होतें.

'रिपोर्टर' मासिकांतील आपल्या लेखांत डेव्हिड डेमारेस्ट लॉइड ह्यांनीं नागरिक हक्क कायद्याला मिळालेल्या मंजुरीचें वर्णन 'मनुष्यकृत चमत्कार' असें केलें आहे. "आपल्या युगांतील, काँग्रेसमधील अत्यंत असामान्य नेते" असें जॉन्सन ह्यांचें वर्णन करून लॉइड ह्यांनीं आपल्या लेखांत म्हटलें आहे, "सेनेटमध्यें मतैक्य आणि सहकार्य घडवून आणणारा निष्णात पुरुष म्हणून त्यांचें यश इतकें प्रचंड आहे कीं त्यामुळें त्यांची बुद्धिमत्ता आणि व्यक्तिमत्त्व हे गुण जनतेच्या नजरेंत भरत नाहींत. आपल्या सहकाऱ्यांवर ते आपल्या श्रेष्ठतर व्यवहारज्ञानानेंच प्रभाव पाडतात असें नव्हे तर सुस्पष्ट

दृष्टिकोन आणि विशाल ग्रहणशील मन ह्या गोष्टींमुळेंहि त्यांचे सहकारी प्रभावित होतात."

सार्वत्रिक निवडणुकींत मतदानाचा हक्क बजावण्यासाठीं पोल टॅक्स नांवाचा कर भरण्याचें बंधन असणारी तरतूद रद्द करणारी घटनादुरुस्ती विधेयकाच्या रूपानें सेनेटपुढें आली तेव्हांहि त्यांनीं त्या विधेयकाला पाठिंबा दिला. अलास्का आणि हवाई बेटें युनायटेड स्टेट्स्मध्यें सामील करून घेण्याच्या प्रयत्नांना त्यांनीं हातभार लावला.

टेक्ससमध्यें असलेल्या अल्पसंख्य वर्गासाठीं त्यांनीं केलेल्या कार्याची ज्यांना माहिती होती त्यांना, जॉन्सन ह्यांनीं मानवी हक्काबद्दलच्या विधेयकांना पाठिंबा द्यावा ह्याचें आश्चर्य वाटण्याचें कारण नव्हतें. "त्यांनीं टेक्ससमधील मेक्सिकन, निग्रो, ज्यू, पोलिश, झेक, जर्मन, इटालियन इत्यादि अल्पसंख्याकांविषयीं जिव्हाळा व्यक्त करणारीं अनेक कार्यें केलीं आहेत. त्यामुळेंच ह्या वर्गाचीं मतें त्यांना मिळतात." असें 'लुक' मासिकानें १९५९ मध्यें प्रसिद्ध केलेल्या लेखांत म्हटलें होतें.

अमेरिकन तरुणांना शिक्षणाच्या अधिक चांगल्या संधि उपलब्ध व्हाव्यात म्हणून ते कसून प्रयत्न करीत असत. राष्ट्राच्या स्वातंत्र्याची सीमा, युद्ध-क्षेत्रावर मोर्चे किंवा खंदक, ही नसून शाळेंतील वर्ग ही आहे असें त्यांचें म्हणणें असे. १९५८ सालीं सेनेटमध्यें केलेल्या एका भाषणांत ते म्हणाले, "आमच्या मुलांचें शिक्षण आणि त्यांना आधुनिक जगांत जगण्यासाठीं सुसज्ज बनविणें ह्यापेक्षां अग्रस्थान देण्याजोगा महत्त्वाचा दुसरा कार्यक्रम मी जाणत नाहीं." अशी धारणा असल्यामुळें १९५८ आणि १९६० सालीं त्यांनीं शिक्षणसाह्यविषयक विधेयकांना मंजुरी मिळावी म्हणून पुढाकार घ्यावा हें स्वाभाविकच होतें. एक विचारवंत स्तंभलेखक मार्क्विस चाइल्ड्स् ह्यांनीं म्हटलें आहे, "शाळांना मदत करण्यासंबंधींचें विधेयक मंजूर करून घेण्यांत पक्षनेता ह्या नात्यानें त्यांच्या प्रतिभेचा जो आविष्कार दिसला तसा इतर वेळीं क्वचित्च दिसला असेल.

युनायटेड स्टेट्स्चा अंतराळयुगांत प्रवेश झाला त्याबाबतींत खरोखर पुढाकार घेतला तो पक्षनेते जॉन्सन ह्यांनीं.

१९५७ च्या शरद् ऋतूंत सोविएत रशियाचा स्पुटनिक अंतराळांत उडाला, त्याबरोबर जॉन्सन ह्यांच्या सज्जता चौकशी उपसमितीनें कसून चौकशीला हात घातला : ह्या क्षेत्रांत युनायटेड स्टेट्स् मागें कां ? चौकशी संपल्यानंतर उपसमितीनें तांतडीच्या कांहीं शिफारशी केल्या. व्यूहरचनेच्या दृष्टीनें उभारलेल्या (स्ट्रॅटेजिक) विमानदलाचें आधुनिकीकरण करावें आणि तें अधिक मजबूत बनवावें· सैन्यदलें आणि आरमारी दलें ह्यांचेंहि आधुनिकीकरण करावें आणि तीं मजबूत बनवावींत; क्षेपणास्त्रांच्या उत्पादनाला अधिक चालना द्यावी; एक लक्ष पौंड वजनाचा रेटा असणारी 'रॉकेट मोटर' तयार करण्याच्या दृष्टीनें ताबडतोब कामाला सुरुवात व्हावी; अशा कांहीं शिफारशी होत्या.

अंतराळविषयक प्रयत्नांची ही लष्करी बाजू होती. ह्या प्रयत्नांना दुसरीहि बाजू होती.

पृथ्वीच्या कक्षेबाहेरील अवकाशाच्या संशोधनाशीं संबंधित असणारे प्रश्न आणि आनुषंगिक सर्व प्रश्न ह्यांचा अधिक अभ्यास करण्यासाठीं सेनेटची खास समिती नेमावी अशी जॉन्सन ह्यांनीं मागणी केली आणि तशी समिती नेमून घेतली. तेच त्या समितीचे अध्यक्ष होते. नंतर, त्यांच्याच मागणीमुळें स्थायी स्वरूपाची 'एरोनॉटिकल अँड स्पेस सायन्सेस कमिटी' स्थापन झाली. सेनेटचे सभासद असेपर्यंत तेच ह्या समितीचे अध्यक्ष होते.

अंतराळसंशोधनाच्या कार्यांत आंतरराष्ट्रीय सहकार्याचें महत्त्व ते प्रारंभापासून अगदीं ठासून प्रतिपादीत असत. राष्ट्राध्यक्ष आणि परराष्ट्रमंत्री ह्यांच्या विनंतीवरून त्या प्रश्नासंबंधींची अमेरिकेची भूमिका त्यांनीं संयुक्त राष्ट्र संघटनेंत मांडण्याचें कार्य केलें. अमेरिकेच्या धोरणाचें जोरदार समर्थन केल्याबद्दल 'न्यूयॉर्क हेरल्ड ट्रिब्यून'नें संपादकीय लिहून त्यांना धन्यवाद दिले. त्या लेखांत म्हटलें होतें, "जॉन्सन ह्यांच्या अस्खलित वक्तव्याचा प्रभाव कोणत्याहि बाजूला बांधलेल्या नसलेल्या राष्ट्रांवर चांगलाच पडला."

युनायटेड स्टेट्स्ला जगांत एकाकी राहणें अशक्य आहे ह्याची विचारपूर्वक तीव्र जाणीव जॉन्सन ह्यांना कधींपासूनच झालेली होती. आपल्या भाषणांत ते म्हणाले, "माणसाच्या जीवनाप्रमाणेंच राष्ट्राच्या जीवनांतहि अशी एक वेळ येते कीं, स्वतःपासून आणि जगापासून पळ काढणें बंद करावेंच

लागतें. अमेरिकनांच्या जीवनांत अशी वेळ आलेली आहे." युनायटेड स्टेट्स् आणि अन्य राष्ट्रें ह्यांच्या संबंधाचा त्यांनीं कसून सखोल अभ्यास केलेला होता. काँग्रेसमधील कार्याच्या द्वारें, परराष्ट्रीय धोरण साकार करण्यांतहि त्यांचा सहभाग होताच. आणि वैयक्तिक पातळीवरूनहि मुत्सद्देगिरीच्या कलेंत अत्यंत निष्णात असल्याचें त्यांनीं दाखवून दिलें. आणि त्यांत आश्चर्य नव्हतेंच. सेनेटच्या बैठकींत आणि बैठकीबाहेर सभासदांशीं व्यवहार करतांना हीच मुत्सद्देगिरीची कला ते पूर्वीपासून उपयोगांत आणीत आलेले होते.

जॉन्सन बहुमतवाल्या पक्षाचे नेते असतांना, त्या कालावधींत परराष्ट्रांच्या अनेक नेत्यांनीं अमेरिकेला भेटी दिल्या. ह्या नेत्यांबरोबर होणाऱ्या चर्चेत भाग घेण्यासाठीं त्यांना व्हाईट हाऊसमध्यें वारंवार पाचारण केलें जात असे. जर्मनीचे अध्यक्ष कोनरॅड ॲडेनॉर, इस्राएलचे पंतप्रधान बेन-गुरियन, ग्रेट ब्रिटनचे पंतप्रधान हॅरोल्ड मॅकमिलन, सर विन्स्टन चर्चिल अशा व्यक्तींच्या भेटींच्या वेळीं जॉन्सन ह्यांना वेळोवेळीं व्हाईट हाऊसमध्यें पाचारण करण्यांत आलेलें होतें.

इतर देशांविषयींहि त्यांना आस्था असे. ही आस्था कांही वेळां वैयक्तिक मैत्रींतहि परिणत होत असे. मेक्सिकोच्या राष्ट्राध्यक्षांशीं त्यांचा असा स्नेह-संबंध जुळला. राष्ट्राध्यक्ष आयझनहॉवर ह्यांच्या विनंतीवरून जॉन्सन ह्यांनीं मेक्सिकोंत जाऊन त्या देशाच्या राष्ट्राध्यक्षांची भेट घेतली होती, नंतर आपल्या टेक्ससमधील निवासस्थानीं त्यांचा पाहुणचार केला होता.

आशियाई देशांतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय करण्याकरितां हवाई विद्यापीठांत 'पूर्व-पश्चिम केंद्र' स्थापन करण्यासंबंधीचें विधेयक तयार करण्यांत आणि मंजूर करून घेण्यांत त्यांचा पुढाकार होता.

परराष्ट्रीय धोरणाच्या क्षेत्रांतल्या त्यांच्या नेतृत्वाचें आणखी एक उदा-हरण म्हणजे त्यांची 'खुल्या पडद्या'ची सूचना. निकिता क्रुश्चेव ह्यांची अमेरिकन दूरचित्रवाणीवरील मुलाखत झाल्यावर मागोमाग जॉन्सन ह्यांनीं वरील सूचना मांडली होती. पोलादी पडदा दूर करा आणि उभय देशांत परस्परविचारविनिमयाचा मार्ग खुला करा असें आव्हानच त्यांनीं स्पष्टपणें आणि जोरदारपणें कम्युनिस्टांना दिलें होतें. "निर्भय मानसिक स्वातंत्र्याचा जेफर्सनसदृश आविष्कार" ह्या शब्दांत 'ख्रिश्चन सायन्स

मॉनिटर'नें जॉन्सन ह्यांच्या सूचनेची वाहवा केली होती. "परराष्ट्रीय धोरणांत कल्पकता दाखवण्याचें आवाहन" असेंहि वर्णन त्या पत्रानें केलें होतें. कांहीं महिन्यांनंतर युनायटेड स्टेट्स् आणि सोविएत रशिया ह्यांच्यांत परस्परविनिमयाचा करार झाला. त्याला चालना जॉन्सन ह्यांच्या सूचने-मुळेंच मिळाली होती.

देवाण-घेवाण तत्त्वावर आधारलेल्या व्यापारी कार्यक्रमाचा जोरदार पुरस्कार जॉन्सन नेहमींच करीत असत. १९३०-४० च्या कालावधींत प्रथम कॉर्डेल हल ह्यांनीं तो कार्यक्रम सादर केला होता. 'रेसिप्रोकल ट्रेड ॲक्ट'ची मुदत पूर्वीच्या मानानें जास्तींत जास्त वाढविण्याच्या प्रयत्नांत (१९५८) त्यांचाच पुढाकार होता. अनेक वृत्तपत्रांत एकाच वेळीं प्रसिद्ध होणाऱ्या आपल्या स्तंभांत त्यावर भाष्य करतांना श्रीमती एलिनॉर रुझवेल्ट ह्यांनीं म्हटलें होतें, "देवाण-घेवाण तत्त्वावर परराष्ट्रांशीं व्यापारी करार करण्याची खरीखुरी निकड ओळखल्याबद्दल सेनेटमधील बहुमतवाल्या पक्षाचे नेते लिंडन जॉन्सन आणि त्यांचे सहकारी ह्यांचें आपण सर्वांनीं अभिनंदन केलें पाहिजे."

अगदीं दारिद्र्यांत नाहीं, पण गरिबीच्या स्थितींत जॉन्सन ह्यांचा जन्म झालेला होता. ह्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांत जन्मलेल्या अनेक अमेरिकनांच्या वांट्यास अशीच गरिबी आलेली होती. त्यामुळें प्रौढ वयांत जॉन्सन ह्यांचा सदैव प्रयत्न, नागरिकांच्या कल्याणाला हातभार लावणाऱ्या कायद्यांना चालना देण्याचा असे. असे कायदे करून घेण्यांत त्यांचा खूपच मोठा वांटा असे. ते म्हणत असत, "आधीं जनतेच्या सुरक्षिततेचा ताळेबंद जमविला पाहिजे आणि त्याच्या आधारें अर्थसंकल्पाचा ताळेबंद जमविला पाहिजे. कोणतेंहि जबाबदार राष्ट्र असेंच करतें."

१९५९ च्या वसंत ऋतूत एएफ्एल्-सीआय्ओ† ह्या संयुक्त कामगार संघटनेच्या विद्यमानें बेकारीच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं वॉशिंग्टन येथें परिषद भरली होती. सर्वांना रोजगार पुरविण्यासंबंधींचा कायदा झाला पाहिजे ही मागणी मांडणारें भाषण करतांना जॉन्सन म्हणाले,

† अमेरिकन फेडरेशन ऑफ लेबर–काँग्रेस ऑफ इंडस्ट्रियल ऑर्गनायझेशन्स.

"रोजगार पुरविण्याचा प्रश्न दानवृत्तीनें हाताळावा असा दृष्टिकोन असणारे कांहीं लोक आहेत. इतर कांहीं लोकांची आवडती कल्पना ही आहे कीं, कांहीं प्रमाणांत बेकारी असणें स्वाभाविक आहे आणि उत्तमहि आहे. पण आपल्या नागरिकांच्या उत्पादनक्षमतेचा पुरेपूर उपयोग जें राष्ट्र करून घेतें तेंच निरोगी, अविकृत आणि सुस्थिर राष्ट्र होय. कामगार स्त्री-पुरुषांचीं नांवें ज्या राष्ट्रांत बेकार भत्त्याच्या यादीवर नसून वेतनपत्रकावर असतात तें राष्ट्र सुस्थिर आणि संपन्न होय."

"आपण नेतृत्व कसें करतों हें स्वतः नेत्याला समजणें विकट असतें." असे उद्गार सॅम रेबर्न ह्यांनीं एकदां काढलेले आहेत. पण सेनेटच्या कामकाजाचें निरीक्षण करणाऱ्या अनेक जणांची धारणा होती कीं, जॉन्सन ह्यांच्या नेतृत्वाचें रहस्य थोडें तरी आपण ओळखलें आहे. वैधानिक डावपेचांत ते निष्णात होते आणि त्यांचें हें कौशल्य सभागृहांत फारच मोलाचें ठरत असे हें खरें; पण जॉन्सन ह्यांचें खरें परिणामकारक कार्य सभागृहाबाहेर, कपडे, छत्र्या वगैरे ठेवण्याच्या खोलींत (क्लोकरूम) सभासदांशीं जातां जातां बातचीत करणें आणि स्वतःच्या कचेरींत मोजक्या सभासदांशीं बोलणें हेंच होतें. व्यक्तीला आवाहन करण्याची कला म्हणजे त्यांच्या हातचा मळ होता.

'वॉशिंग्टन स्टार'च्या मेरी मॅकग्रोरी ह्यांनीं एकदां लिहिलें होतें, "जॉन्सन ह्यांच्याकडून मन वळविलें जाणें हा एक भारावून टाकणारा अनुभव असतो, त्यांची औषधी उपाययोजना म्हणजे अनेक औषधांचें विलक्षण प्रभावी मिश्रण असतें. गळ घालणें, छेडणें, स्तुति करणें, धाक दाखवणें, पूर्वीं केलेल्या मेहरबानीची आठवण देणें, पुढील फायद्याची आशा दाखविणें अशीं तीं औषधें असतात. लहानशा खोलींत, मोजक्या लोकांशीं बोलतांना त्यांचा प्रचंड प्रभाव पडतो ह्याचें कारण हें आहे."

अर्थात् ह्या कारणांशिवाय अन्य कारणेंहि होतीं. जॉन्सन जेव्हां एखाद्या विधेयकासंबंधांत दुसऱ्या सेनेटरशीं बोलायला जात असत तेव्हां सारी संबंधित माहिती खिशांत घेऊनच जात असत. प्रश्नांचा विचार असो किंवा व्यक्तीला हाताळण्याचा प्रश्न असो, पूर्वतयारीकडे ते कधींच दुर्लक्ष करीत नसत. सर्व जीवनभर प्रश्न विचारून आणि त्यांचीं उत्तरें ऐकून त्यांनीं ज्ञान मिळविलें

होतें. सर्व संबंधित माहिती हातीं आली कीं आपल्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाचा पुरेपूर उपयोग करून ते ती माहिती सामनेवाल्याला सादर करीत असत.

वृत्तपत्रें, नभोवाणी, दूरचित्रवाणी ह्यांचे कॅपिटॉल हिलवरील प्रतिनिधि रोजच्या रोज देशाला ऐकवीत होते कीं, इतिहासांत कधीं लाभला नाहीं असा मेहनती पक्षनेता सेनेटला लाभलेला आहे. वॉशिंग्टनचे एक अनुभवी राजकीय लेखक गोल्ड लिंकन ह्यांनीं आपल्या एका लेखाचें शीर्षकच दिलें होतें : ' पर्वत हलविणारे लिंडन जॉन्सन ' डोरिस फ्लॅसिन ह्यांनीं जॉन्सन ह्यांच्यावर अनेकदां कठोर टीका केलेली होती. पण त्यांच्या नेतृत्वाचा एक आविष्कार बघितल्यावर त्यांनीं लिहिलें कीं, सेनेटमधील जॉन्सन ह्यांनीं पुढच्या विजयाच्या वेळीं साऱ्या कार्यक्रमाला संगीताची जोड देणें एवढेंच उरलें आहे !

वृत्तपत्रांतील स्वत:संबंधींच्या बातम्या, अग्रलेख इत्यादि वाचून जॉन्सन अनेकदां वैतागत असत. कारण त्यांच्या कुशल कामगिरीची त्यांत प्रशंसा असली तरी ' हा पुरुष म्हणजे कायदेमंडळाला पिठाची गिरणी मानून ती जोरांत चालविणारा तिचा मालक आहे; हा पुरुष रुक्ष आहे; अमानवी आहे. साधारण माणसाला आनंद देणाऱ्या गोष्टी करण्याचा ह्याचा पिंडच नाहीं.' असें चित्र त्या लिखाणांत रेखाटलें जात असे.

ह्याबद्दल एकदां बोलतांना जॉन्सन म्हणाले होते, " वेळ मजेंत कसा घालवावा हें मला कळत नाहीं असें लोक म्हणतात. पण त्यांना माहीत नाहीं—उमज नाहीं—मी एके काळीं बर्निंग ट्रीला जाऊन गोल्फ खेळत असें. आणि मला गोल्फ आवडतो देखील. पण ह्या लोकांच्या लक्षांत येत नाहीं कीं, देशासाठीं जें काम मी करायला हवें आहे त्या कामाचीच हानि होईल मी जर गोल्फच्या मैदानावर वेळ घालवला तर."

आपल्या कामाकडे विलक्षण गांभीर्यानें बघण्याची त्यांची दृष्टि होती ह्याबद्दल वादच नाहीं. कांहीं थोडे अपवाद वगळले तर सेनेटच्या कामाकडे कर्तव्यबुद्धीनें पाहणारे सदस्यहि सामाजिक जीवनाची मौज लुटण्यासाठीं, कांहीं वेळ कामांतून सुटका करून घेत असत. जॉन्सन तसें फारसें कधींच करीत नसत. असल्या मौजमजेकडे किंचित् तिरस्कारानें बघत असत. आणि

बहुमतवाल्या पक्षाचें नेतृत्व स्वीकारल्यानंतर तर असल्या गोष्टींना त्यांनीं रामरामच ठोकलेला होता.

रात्रीं उशिरापर्यंत चाललेली सेनेटची बैठक संपवून एका मध्यरात्रीं जॉन्सन अगदीं दमूनभागून घरीं आले होते. त्यांची पत्नीहि नुकतीच एका नृत्यसमारंभाहून आली होती. त्या रात्रीच्या मौजमजेची माहिती अगदीं रंगूनखुलवून सांगून लेडी बर्ड म्हणाल्या, "मला कळतच नाहीं कीं, तुम्ही थोडा वेळ करमणुकीसाठीं कां काढूं नये? बाकीचे सेनेटर तसा वेळ काढतात. आजच सेनेटर ग्रीन आले होते. तुमच्यापेक्षां ते वयानें मोठे आहेत. पण आले होते आणि मजेंत होते. मी दोनदां नृत्य केलें त्यांच्याबरोबर."

"कोण? सेनेटर ग्रीन! छान! त्यांच्याच एका आवडत्या विधेयकाला सेनेटची मंजुरी मिळविण्यापायीं उशीर लागला मला!" जॉन्सन मोठ्यानें हंसत उद्गारले.

त्यांना पूर्णपणें जाणीव होती कीं हें विशिष्ट विधेयक नसलें तरी दुसरें कांहीं काम होतेंच.

त्यांचे एक मित्र विल्यम एस्. व्हाईट ह्यांनीं 'दि न्यूयॉर्क टाइम्स मॅगेझिन'मध्यें लिहिलें आहे, "जॉन्सन तरुण नाहींत कीं वृद्ध नाहींत. तर अत्यंत नेटानें काम करणारी एकखांबी राजकीय संस्थाच आहेत ते. येथें वय, आरोग्य आणि अन्य स्वाभाविक गोष्टी इतक्या उपऱ्या, गैरलागू आहेत, की प्रत्यक्ष पाहिल्यावर तो उपरेपणा पटूं शकतो."

अर्थात् १९५५ सालीं आलेल्या हृदयविकाराच्या झटक्यानंतर मात्र आरोग्याचा प्रश्न जॉन्सन ह्यांच्या खिजगणतींत नव्हता असें म्हणतां यावयाचें नाहीं. ते संपूर्ण बरे झाले आहेत, तन्दुरुस्त झालेले आहेत, हा वैद्यकीय तज्ज्ञाचा अभिप्राय सत्यच होता. त्यांनीं जादा काम करायला सुरुवात केली होती हें खरें, पण आहाराचें पथ्य ते अद्याप पाळीत होते. पुन: सिगारेट ओढायला त्यांनीं सुरुवात केली नव्हती. आपला ताजा इलेक्ट्रो कार्डिओग्राम जवळ बाळगून तो ते आपल्या मित्रांना दाखवीत असत. ते मोठ्या अभिमानानें सांगत असत कीं, जादा हप्ता भरावा न लागतां मी विमा उतरवूं शकलों आहें.

त्यांच्या तन्दुरुस्तीचें महत्त्व होतेंच. कारण १९६० च्या राष्ट्रीय निवडणुकीची वेळ जवळ येऊं लागली होती. आणि डेमोक्रॅटिक पक्षातर्फे राष्ट्राध्यक्षपदाचे उमेदवार म्हणून जॉन्सन उभें राहण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं होतीं.

जॉन्सन ह्यांना पाठिंबा देणारा भरीव गट होता आणि हा गट केवळ दक्षिणेंतील राज्यांपुरताच मर्यादित नव्हता. 'दि न्यूयॉर्क टाइम्स'नें लिहिलें होतें, "त्यांचे राजकीय प्रतिस्पर्धीसुद्धां मान्य करतात कीं ते वर्णभेदवादी नाहींत, तोळामासा प्रकृतीचे नाहींत, राष्ट्राध्यक्ष झाल्यास टेक्ससमधील तेलधंद्याच्या हितसंबंधांना जास्त अनुकूल असें धोरण ठेवणार नाहींत. आणि जागतिक राजकारणाच्या दृष्टीनें पाहिल्यास ते वाटाघाटी करण्याच्या कलेंत पारंगत आहेत. क्रुश्चेव, मॅकमिलन, द गॉल ह्यांच्यासारख्यांशीं वाटाघाटी करतांना हा गुण उपयुक्त ठरेल. ह्या गुणामुळेंच इतर कोणत्याहि उमेदवारापेक्षां ते जास्त चांगले उमेदवार कदाचित् ठरूं शकतील."

'वॉशिंग्टन स्टार'चा सूर असाच होता. त्या पत्रानें म्हटलें होतें, "ते एक खंबीर आणि कार्यक्षम राष्ट्राध्यक्ष ठरतील हें सर्वसाधारणतः मान्य केलें जात आहे– त्यांचे विरोधकहि तें मान्य करतात."

जॉन एफ्. केनेडी ह्यांनीं एका वृत्तपत्रांतील स्तंभलेखकापाशीं उद्गार काढले होते, "इतर कोणाहि उमेदवारापेक्षां मी स्वतःला जास्त पात्र समजतों राष्ट्राध्यक्षपदाचा उमेदवार म्हणून– अर्थात् ह्याला अपवाद लिंडन जॉन्सन !"

पण जॉन्सन ह्यांना वॉशिंग्टनमध्यें काम होतें. त्यांना पूर्ण जाणीव होती कीं सेनेटमधील बहुमतवाल्या पक्षाचा नेता म्हणून जी उत्कृष्ट कामगिरी आपण करूं तिचाच पायाभूत आधार आपल्या उमेदवारीला असला पाहिजे. अशा परिस्थितींत अधिवेशन चालू असतांना आपली जागा सोडून, डेमोक्रॅटिक पक्षाच्या राष्ट्रीय परिषदेंत पाठिंबा मिळविण्यासाठीं प्रचार करीत देशभर फिरणें आपल्याला शक्य नाहीं अशी त्यांची धारणा होती. म्हणून ते वॉशिंग्टनमधील आपली कामगिरी बजावीत राहिले.

सॅम रेबर्न आणि जॉन कोनॅली [ हे केनेडी ह्यांच्यावरील हल्ल्याच्या वेळीं त्यांच्या मोटारींत होते आणि जखमी झाले होते. त्यावेळीं ते टेक्ससचे

राज्यपाल होते. ] ह्यांच्या पुढाकाराखालीं जॉन्सन ह्यांच्या उमेदवारीला पाठिंबा देणारी 'सिटिझन-फॉर जॉन्सन कमिटी' कांहीं मित्रांनीं स्थापन केली. ह्या जॉन्सन-पुरस्कार-समितीची मुख्य कचेरी २ जुलै १९६० रोजीं वॉशिंग्टनला सुरू झाली. पण आपलें नांव उमेदवारीसाठीं परिषदेपुढें सादर करण्याला आपली संमति आहे हें जॉन्सन ह्यांनीं ५ जुलैला जाहीर केलें. प्राथमिक निवडणुकीसाठीं त्यांनीं आपलें नांव सादर केलें नाहीं.

परिषदेच्या वेळीं त्यांनीं परिषदेच्या प्रतिनिधींपुढें आपली बाजू मांडण्याचा कसून प्रयत्न केला. पक्षाच्या विविध मंडळांच्या प्रतिनिधींच्या भेटी घेतल्या. वरिष्ठ राजकीय नेत्यांना आपल्या मुक्कामीं भेटीला बोलावून त्यांच्या पाठिंब्याची अपेक्षा व्यक्त केली. सर्व देशभर दाखविल्या आणि ऐकविल्या जाणाऱ्या दूरचित्रवाणीच्या कार्यक्रमांत जॉन एफ्. केनेडी ह्यांच्याशीं वाद-संवाद केला. केनेडी हे आघाडीवरचे उमेदवार आहेत असें अनेक दिवसांपासून मानलें जात होतें.

उमेदवारीच्या स्पर्धेत पहिल्याच मतमोजणींत केनेडी यशस्वी ठरले तेव्हां त्यांना जॉन्सन ह्यांनीं अभिनंदनपर संदेश पाठविला आणि राष्ट्राध्यक्षीय-उपराष्ट्राध्यक्षीय निवडणुकीच्या मोहिमेंत डेमोक्रॅटिक पक्षानें निवडलेल्या उमेदवारांनाच सक्रिय पाठिंबा देण्याचें अभिवचन देणारें पत्रक प्रसिद्धी-साठीं काढलें.

□ □ □

# १५

१९६० मध्यें डेमोक्रॅटिक पक्षाचे उपराष्ट्राध्यक्षपदाचे उमेदवार म्हणून लिंडन जॉन्सन ह्यांची निवड कशी झाली ह्याची कहाणी अनेकदां सांगितली गेली आहे आणि निरनिराळ्या प्रकारच्या कहाण्या सांगितल्या गेलेल्या आहेत. जॉन्सन ह्यांची ही निवड जाहीर होतांच, दूरचित्रवाणीवरील भाष्यकारांनीं ऐकणारांना गोंधळांत टाकणारे तर्कवितर्क करायला सुरुवात केली होती. लॉस एन्जेलिस येथील परिषदेला आलेल्या पत्रकारांनीं भराभर बातम्या पाठविल्या, त्या बातम्यांच्या आधारें कचेरींत बसलेल्या संपादकांनीं आपले विचार वेतले आणि हें सारें साहित्य घाईघाईनें प्रसिद्ध करण्यांत आलें. साप्ताहिकांनींहि ह्याच मार्गाचा अवलंब केला. थिओडॉर एच्. व्हाईट ह्यांचें 'दि मेकिंग ऑफ दि प्रेसिडेंट १९६०' आणि सी. ड्वाइट डोरो ह्यांनीं सॅम रेबर्न ह्यांचें लिहिलेलें चरित्र 'मि. सॅम' ह्या दोन पुस्तकांत वरील निवडीपूर्वींच्या घटनांचे वृत्तांत आले आहेत. सर्वच तपशिलाबाबत ही माहिती सारखी नाहीं.

मुळांत, जॉन्सन ह्यांची ही निवड कां झाली ह्या प्रश्नाचें उत्तर अत्यंत साधें आहे. राष्ट्राध्यक्षपदाची उमेदवारी मिळाल्यानंतर जॉन फिट्झेराल्ड केनेडी ह्यांनींच इच्छा व्यक्त केली कीं, आपल्याबरोबर उपराष्ट्राध्यक्षपदाचे उमेदवार लिंडन बेन्स जॉन्सन हेच असावेत. आणि डेमोक्रॅटिक पक्षाच्या हितासाठीं त्यांनीं ती उमेदवारी स्वीकारावी अशी विनंती करण्यांत आली असतां जॉन्सन ह्यांनीं उपराष्ट्राध्यक्षपदाची उमेदवारी पत्करण्याला संमति दिली.

ह्या साध्या घटनेमागें कांहीं फारच गुंतागुंतीच्या गोष्टी होत्या हें मात्र खरें.

कांहीं राजकीय भाष्यकार अस्वस्थ झाले, प्रक्षुब्धहि झाले. उपराष्ट्राध्यक्ष-पदाविषयीं बेफिकिरी दर्शविणारे उद्‌गार जॉन्सन ह्यांनीं अनेकदां काढले होते. त्याचा अर्थ ह्या भाष्यकारांनीं असा लावला कीं दुय्यम जागा आपण स्वीकारणार नाहीं असें निश्चित विधान जॉन्सन ह्यांनीं केलें आहे. वस्तुतः असें विधान त्यांनीं कधींच केलेलें नव्हतें. तसें विधान करणें त्यांच्या शीलाच्या विरुद्ध होतें. ते डेमोक्रॅटिक पक्षाचे निष्ठावान् अनुयायी होते. पक्षानें नेमून दिलेलें काम स्वीकारणार नाहीं असें आधींच ते कसें म्हणतील?

राष्ट्राध्यक्षपदाच्या उमेदवाराविषयीं बोलायचें तर त्यांनीं निदान खाजगी संभाषणांत तरी, अमेरिकन राजकारणांतला सर्वात कार्यक्षम पुरुष असें जॉन्सन ह्यांचें वर्णन केलें होतें. स्तंभलेखक जोसेफ अलसॉप ह्यांना केनेडींनीं सांगितलें होतें, "राष्ट्राध्यक्षाला देशाविषयीं जशी कळकळ असावी असें मला वाटतें तशी कळकळ त्यांना आहे."

ह्या दोघां पुरुषांमध्यें फार फरक आहे असें त्यावेळीं बोललें जात असे. आणि अर्थात्‌च बाह्यतः खूपच फरक सुस्पष्टच दिसत होता. बोस्टनचे केनेडी हे श्रीमंत घराण्यांत जन्मले होते. चांगले सुशिक्षित होते. वक्तृत्वांत पारंगत होते. दांडगे वाचक होते. स्वतः समर्थ लेखक होते. विचारवंत म्हणून त्यांना मान होता. नर्म विनोद व विदग्ध शैली हे त्यांचे विशेष होते. असा हा पुरुष सरळसोट टेक्सनचा नमुना शोभणाऱ्या लिंडन जॉन्सनपेक्षां किती तरी निराळा होता. जॉन्सन ह्यांचा जन्म शेतीवाडीवर झालेला होता. ते फक्त शिक्षक महाविद्यालयाचे पदवीधर होते. वृत्तपत्रें, कचेरींतील चिटणीस आणि सल्लागार ह्यांनीं निरनिराळ्या विषयांवर तयार केलेलीं टांचणें हेंच त्यांचें वाचन होतें. ते भावनाप्रधान होते. त्यांची राहणी साधीसुधी होती. जनतेंत मिसळण्याची, लोकांशीं अगदीं सलगीनें वागण्याची आपली आवड ते लपवून ठेवीत नसत.

केनेडी आणि जॉन्सन ह्यांच्यांतील असल्या भिन्नतेकडे बोट दाखविणाऱ्यांना एका गोष्टीचा मात्र विसर पडला होता. त्या दोघांत कांहीं साम्यहि होतें आणि तें साम्य महत्त्वाच्या बाबतींत होतें. दोघेहि अनुभवी आणि व्यवहारी

राजकारणी पुरुष होते. खंबीरपणा, निर्धार हे गुण त्यांच्यांत होते. दोघेहि स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असलेले अभिमानी पुरुष होते. सत्ता हातीं असणें म्हणजे काय आणि देशाच्या कल्याणाला चालना देण्यासाठीं तिचा वापर कसा करावा, ह्याची दोघांनाहि उमज होती. दोघांचें व्यक्तिमत्त्व अनेकांगी होतें आणि दोघांनाहि परस्परांविषयीं सहानुभाव होता.

कांहीं असो, राष्ट्राध्यक्षपदाच्या उमेदवारीच्या स्पर्धेत प्रचंड विजय मिळविणाऱ्या केनेडींनीं दुसऱ्याच दिवशीं सकाळीं, जॉन्सन ह्यांनीं उपराष्ट्राध्यक्षपदासाठीं उमेदवारी स्वीकारावी अशी इच्छा प्रगट केली. त्यांचे कांहीं मदतनीस आणि पुरस्कर्ते तें ऐकून थक्कच झाले. पण ज्या अनेक प्रश्नांच्या बाबतींत केनेडींनीं ठाम निर्णय घेऊन टाकले होते' त्यांपैकींच ही एक बाब होती.

वस्तुस्थिति अशी होती कीं, जॉन्सन हे आपले जोडीदार असावेत ही कल्पना केनेडींना नव्यानें सुचलेली नव्हती. राष्ट्राध्यक्षपदाचे उमेदवार म्हणून त्यांची स्वतःची निवड होण्यापूर्वी, खरें म्हणजे परिषदेला प्रारंभ होण्यापूर्वीच बोलतां बोलतां त्यांनीं ती कल्पना फिलिप ग्रॅहॅम ह्यांच्यापाशीं बोलून दाखविली होती. ग्रॅहॅम हे जॉन्सन ह्यांचे एक विश्वासू मित्र होते. केनेडींचे उद्गार त्यांनीं जॉन्सन ह्यांच्या कानावर घातले. स्वतः जॉन्सन राष्ट्राध्यक्षपदाची उमेदवारी मिळविण्याचा कसून प्रयत्न करीत असल्यामुळें त्यांनीं त्या प्रश्नावर मुग्धता पाळली होती.

पण, जॉन्सन हेच आपले जोडीदार असावेत असें केनेडींना वाटत होतें. त्यांनाहि इतरांप्रमाणें मतांचा अंदाज घेतां येत होता; अनेक जणांपेक्षां जास्त चांगला अंदाज घेतां येत होता. आणि त्यांच्या अंदाजाप्रमाणें, नोव्हेंबरमधील निवडणुकींत दक्षिणेंतल्या मतदारांचा पाठिंबा मिळण्याची हमी आवश्यक होती. अशी निश्चित हमी म्हणजे जॉन्सन जोडीदार असणें. शिवाय, दक्षिणेतील राज्यांबाहेरहि जॉन्सन ह्यांना पुष्कळ पाठिंबा होता.

केनेडींना इतिहासाचें आकलन होतें. भविष्याचा निर्लेपपणें वेध ते घेऊं शकत असत. त्यामुळें अशा प्रश्नांकडे ते आणखी निराळ्या दृष्टीनें पाहत होते. राष्ट्राध्यक्ष होण्याची पात्रता असणारा माणूसच उपराष्ट्राध्यक्ष असला

पाहिजे अशी त्यांची धारणा होती. जोसेफ अल्सॉप ह्या पत्रकाराशीं बोलतांना केनेडी म्हणाले होते, "पुढें काय होऊं शकेल ह्याचा विचार केलाच पाहिजे."

त्या सुप्रभातीं केनेडींचा टेलिफोन येईपर्यंत, उपराष्ट्राध्यक्षपदाची उमेदवारी स्वीकारावी कीं नाहीं, ह्या प्रश्नाचा विचार जॉन्सन ह्यांच्या मनाला शिवला-सुद्धां नसावा असें दिसतें. परिषदेचें कामकाज दूरचित्रवाणीवरून अवलोकन करीत जॉन्सन बसलेले होते. केनेडींची निवड होणार हें निश्चित झालेलें दिसतांच आपल्या पत्नीकडे वळून जॉन्सन म्हणाले, "चला ! उद्यां मुलींना घेऊन हवें तें करायला मोकळे झालों आपण–डिस्नेलँड बघायलाहि जाऊं, किंवा आणखी कांहीं करतां येईल."

पण, तसें घडलें नाहीं.

उमेदवारी कशी स्वीकारली ह्याची माहिती जॉन्सन ह्यांनीं स्वतःच दूरचित्रवाणीवर २६ मार्च १९६३ रोजीं दिलेल्या मुलाखतींत सांगितली आहे.

दूरचित्रवाणीवर मुलाखत घेणारे विल्यम लॉरेन्स ह्यांनीं सरळ सरळ प्रश्न विचारला होता, " उपराष्ट्राध्यक्ष महाराज, उपराष्ट्राध्यक्षपदासाठीं तुम्ही निवडणुकीला कसे उभे राहिलांत ? "

त्याला उपराष्ट्राध्यक्ष जॉन्सन ह्यांनीं उत्तर दिलें होतें, " राष्ट्राध्यक्ष-पदाच्या उमेदवारीच्या स्पर्धेत मी अयशस्वी झाल्यानंतर त्या रात्रीं गाढ झोप घेतली. कित्येक आठवड्यांत तशी झोप मला मिळालेली नव्हती. आणि मग, दुसऱ्या दिवशीं राष्ट्राध्यक्षपदाचे उमेदवार श्री. केनेडी ह्यांनीं मला बोला-वलें. आमची मुलाखत झाली. त्यांचा जोडीदार बनण्याची त्यांनीं मला विनंती केली.

" मी त्या विनंतीचा विचार केला. मित्रांशीं विचारविनिमय केला. ह्या देशांत निवड करण्याच्या दृष्टीनें सर्व लोकांसाठीं फक्त दोनच उच्च पदें आहेत. आणि मला वाटलें कीं, ही चांगली संधि आहे. तें एक आव्हान आहे. तें पद स्वीकारण्यांत पक्षाच्या आणि देशाच्या हिताला हातभार लावण्या-सारखेंहि आहे. म्हणून उमेदवारी स्वीकारण्याला मी संमति दिली आणि परिषदेनें माझी उमेदवारी मंजूर केली."

जॉन्सन ह्यांनीं उपराष्ट्राध्यक्षपदाची उमेदवारी स्वीकारण्याला सॅम रेबर्न आणि जॉन्सन ह्यांचे दुसरे कांहीं मित्र ह्यांचा प्रारंभीं विरोध होता.

केनेडींनीं जॉन्सन ह्यांना तशी विनंती करावी ह्याला त्यांच्याहि कांहीं सल्लागारांचा विरोध होता. जॉन्सन ह्यांना रेबर्न ह्यांच्याविषयीं केवढी निष्ठा वाटते त्याची जाणीव केनेडींना होती. म्हणून ते रेबर्न ह्यांना भेटले. आपली कल्पना मान्य करण्याचा सल्ला जॉन्सन ह्यांना द्या, अशी केनेडींनीं रेबर्न ह्यांना विनंती केली.

डोरो ह्यांच्या 'मि. सॅम' ह्या पुस्तकांत सभापति रेबर्न ह्यांनीं केनेडीं-पाशीं काढलेले उद्‌गार उद्‌धृत केले आहेत. हें पुस्तक लिहिण्याच्या कामांत डोरो ह्यांना रेबर्न ह्यांचें पूर्ण सहकार्य लाभलें होतें. केनेडींशीं बोलतांना अखेर रेबर्न म्हणाले, "अर्ध्या तासापूर्वीं मी ह्या कल्पनेच्या विरुद्ध होतों. तुझ्या मनाचा पूर्ण थांग लागेपर्यंत अंतिम निर्णय घेण्याचें मी टाळलें होतें. जॅक, तुला माहीतच आहे कीं मी आतां फार म्हातारा झालोंय, आणि मला वाटतें कांहीं वेळां मी स्वार्थीपणानें विचार करतों. माझ्या जीवनाची संध्या-काळ सुरू झाली आहे, उतरणीचा प्रवास सुरू झाला आहे, माझें कर्तृत्व संपलें आहे पण जॉन्सन आपल्या कर्तृत्वाच्या शिखरावर आहे. मला वाटतें, मला जिथें त्याची मदत होईल तिथें, कायदेमंडळाच्या क्षेत्रांतच त्याला डांबून ठेवण्याचा माझा प्रयत्न होता. आतां तूं ज्या पद्धतीनें मला तुझा दृष्टिकोन समजून सांगितलास त्यावरुन मी उमजूं शकतों कीं, तुलाच जॉन्सनची जास्त जरुरी आहे. तूं सर्व बाजूंनीं विचार केला आहेस."

त्यानंतर थोड्याच वेळांत केनेडींनीं जॉन्सन ह्यांना टेलिफोन केला आणि उमेदवारी स्वीकारण्याची पुनः गळ घातली. जॉन्सन ह्यांची उपराष्ट्राध्यक्ष-पदाची उमेदवारी घोषित करणाऱ्या पत्रकाचा मसुदाहि केनेडींनीं वाचून दाखविला. जॉन्सन ह्यांनीं विचारलें, "मी तुम्हांला खरोखरच—अगदीं खरोखरच हवा आहे का?" ... "होय, खरोखरच हवे आहांत." केनेडी उत्तरले. मग, जॉन्सन ह्यांनीं संमती दिली. लगेच औपचारिक घोषणा करण्यांत आली. नंतर पत्रकारांना केनेडींनीं मुलाखत दिली.

उपराष्ट्राध्यक्षपदासाठीं जॉन्सन ह्यांची उमेदवारी घोषित करणाऱ्या पत्रकांत केनेडी ह्यांनीं म्हटलें होतें,

" फ्रँकलिन रूझवेल्ट ह्यांच्या सरकारच्या वेळेपासूनचा त्यांना प्रदीर्घ अनुभव आहे . . . सेनेटमधील आपल्या खंबीर आणि विधायक नेतृत्वानें त्यांनीं पन्नासहि राज्यांकडून स्वतःला मान्यता मिळविलेली आहे.

" मी अनेक वेळां माझें मत व्यक्त केलें आहे कीं प्रचंड आव्हानाच्या ह्या काळांत, ह्या राष्ट्रापुढें आणि स्वतंत्र जगापुढें असणाऱ्या गंभीर समस्या हाताळण्यास समर्थ असणारा उपराष्ट्राध्यक्षच अमेरिकन जनतेला पाहिजे आहे. राष्ट्राला बलशाली राहायचें असेल आणि स्वातंत्र्याच्या मार्गावर जगाचें नेतृत्व करायचें असेल तर आम्हांला खंबीर पुरुषांची आवश्यकता आहे. आम्हांला आवश्यक असणाऱ्या नेतृत्वाच्या उत्कृष्ट गुणांचा आविष्कार जॉन्सन ह्यांनीं अनेकदां दाखविलेला आहे. "

पेन्सिल्व्हेनियाचे राज्यपाल डेव्हिड एल्. लॉरेन्स ह्यांनाहि केनेडींप्रमाणेंच जॉन्सन हे उपराष्ट्राध्यक्षपदासाठीं उत्कष्ट व्यक्ति वाटत होते. ता. १४ च्या परिषदेच्या बैठकीपुढें लॉरेन्स ह्यांनीं जॉन्सन ह्यांच्या उमेदवारीची सूचना मांडली. प्रतिनिधिसभेंतील बहुमतवाल्या पक्षाचे नेते मॅसाच्युसेट्स्चे जॉन डब्ल्यू. मॅकॉर्मिक ह्यांनीं सूचना मांडली कीं नेहमींचा नियम बाजूला सारून 'आवाजी मतदान' घ्यावें. त्याप्रमाणें पक्षाच्या स्थायी अध्यक्षांनीं तसें मतदान घेऊन आवश्यक तीं दोनतृतीयांश मतें मिळालीं असल्याचें जाहीर केलें. आणि टाळ्यांच्या गजरांत जॉन्सन ह्यांची उमेदवारी घोषित झाली.

उमेदवारीचा स्वीकार करणारें भाषण करतांना जॉन्सन ह्यांनीं, द्विदल शासनाच्या सहा वर्षांत सेनेटमधील बहुमतवाल्या पक्षाचा नेता ह्या नात्यानें केलेल्या कामगिरीचा आढावा घेतला. ते म्हणाले, " मोठ्या प्रयत्नपूर्वक, मोठ्या चिकाटीनें, राष्ट्राविषयींच्या प्रचंड जबाबदारीची जाणीव ठेवून डेमोक्रॅटिक पक्षानें द्विदल शासनाला कारभारक्षम ठेवण्यांत यश मिळविलें. तथापि द्विदल शासन ह्यापुढें बंद झालें पाहिजे.

" आतांपर्यंत सेनेट ही द्विदल शासनाची आघाडी होती. आतां पुढची आघाडी एकरूप शासनाची असेल. कोणत्या अधिकाराचा गणवेश अंगावर चढवावयाचा किंवा कोणतें काम करायचें ह्याची निवड सैनिकानें करायची नसते. त्याला फक्त कर्तव्याची जाणीव ठेवायची असते. पक्ष सांगेल त्या जागीं,

माझ्या देशबांधवांची इच्छा असेल तेथें, कर्तव्य बजावण्याची माझी तयारी आहे. आणि म्हणूनच मी काल होकार दिला."

आपल्या जबाबदारीच्या राजकारणाच्या सिद्धांताकडे वळून जॉन्सन म्हणाले, "जबाबदार माणसें म्हणूनच आपण जगलें पाहिजे, काम केलें पाहिजे.

"तरुण, वृद्ध, रुग्ण; जीवनाच्या सर्व क्षेत्रांतील, सर्व दर्जाच्या आबालवृद्ध स्त्रीपुरुषांसाठीं–सर्वच दलितांसाठीं, त्यांना जीवनांतील गरजा पुरविण्याच्या कामीं आम्ही सहानुभूतीनें हातभार लावला पाहिजे.

"त्याचबरोबर स्वातंत्र्याच्या ठेव्याचेंहि आपल्याला रक्षण करावयाचें आहे. अमेरिकेच्या दंडाचे स्नायू आम्ही मजबूत राखले पाहिजेत. आपल्याला आव्हान देणाऱ्या अशुभ आक्रमक शक्तींना आपण मजबूत हातांनीं आणि दृढ निर्धारानें थोपवून धरलें पाहिजे.

"मानवाचें स्वातंत्र्य आणि शांतता ह्यांना ग्रासूं बघणाऱ्यांना अमेरिकेनें निर्णायक भाषेंत बजावलें पाहिजे. एका आवाजांत, पूर्ण एकजूट असलेल्या राष्ट्राच्या एकरूप शासनाच्या मुखानें बजावलें पाहिजे.

"आपण अस्थिर, चंचल असूं, आपल्यांत ऐक्याचा अभाव असेल तर मोठीं राष्ट्रेंच काय, पण छोटीं राष्ट्रेंहि आपल्याला आव्हान देऊं शकतील. पण निर्धारानें, स्वतःच्या सामर्थ्याच्या विश्वासानें, आत्मविश्वासानें, एकजुटीनें खड्या ठाकलेल्या अमेरिकेविरुद्ध जगांतील कोणत्याहि शक्तीचें कांहींही चालणार नाहीं.

"अशी अमेरिका आम्हांला हवी आहे–अशी अमेरिका आम्ही निर्माण करूं."

राष्ट्राध्यक्षपदाच्या उमेदवारानें–केनेडी ह्यांनीं आपल्यावर व्यक्त केलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त करून जॉन्सन ह्यांनीं आश्वासन दिलें, "ते सांगतील तिथें मी जाईन. मग, तें पक्षासाठीं असो कीं राष्ट्रासाठीं असो. मी त्यांची आज्ञा पाळीन. कारण, अमेरिकेला थोरपणाकडे नेणाऱ्या मार्गाबाबत आम्हां दोघांचें एकमत आहे."

आणि हें वचन जॉन्सन ह्यांनीं पाळलें. शरद्ऋतूंत झालेल्या निवडणुकींत ते सर्वत्र हिंडले. सर्व प्रकारच्या लोकांशीं त्यांनीं संपर्क साधला. जनतेंत मिसळणें जॉन्सन ह्यांना आवडतच होतें.

विसाव्या शतकांत झालेल्या कोणत्याहि राष्ट्राध्यक्षीय निवडणुकीपेक्षां अत्यंत कटोकटीच्या निवडणुकीला तोंड देऊनच केनेडी-जॉन्सन ह्या जोडीला विजय मिळाला. जॉन्सन ह्यांनीं प्रचार-मोहिमेचें क्षेत्र दक्षिणेपुरतेंच मर्यादित ठेवलें नव्हतें, पण त्यांनीं त्या भागावर जास्त लक्ष केंद्रित केलें होतें. जॉन्सन ह्यांचेच प्रयत्न आपल्या उमेदवारांच्या पराभवाला जास्तींत जास्त कारणीभूत झाले असें मत रिपब्लिकन नेत्यांनींहि व्यक्त केलें.

जॉन्सन ह्यांना अत्यंत समाधान देणारी गोष्ट ही कीं १९५२ आणि १९५६ ह्या दोन्ही निवडणुकींमध्यें आयझनहॉवरना पाठिंबा देणारें त्यांचें राज्य पुन: डेमोक्रॅटिक पक्षाच्या छत्राखालीं आलें होतें. अनेक अडचणी पार करून हा विजय मिळविला गेला होता. टेक्ससमधील अनेक वजनदार वृत्तपत्रांनीं केनेडी-जॉन्सन ह्या जोडीला विरोध केला होता. पण सारें होऊनहि अखेर विजय पदरांत पडला होता. दक्षिणेंतील फक्त तीन राज्यांचाच रिपब्लिकन पक्षाला पाठिंबा मिळाला होता.

जॉन्सन हे युनायटेड स्टेट्स्च्या सेनेटवरहि पुन: निवडून आले होते. टेक्सस राज्याच्या कायद्याप्रमाणें सेनेटसाठीं आणि उपराष्ट्राध्यक्षपदासाठीं अशा दोन्ही निवडणुकांना उभे राहण्याची मुभा होती. सेनेटच्या सभासदत्वाची शपथ ता. ५ जानेवारी १९६१ रोजीं घेऊन त्यांनीं लगेच त्या जागेचा राजीनामा दिला.

ता. २० जानेवारी रोजीं सभापति सॅम रेबर्न ह्यांनीं जॉन्सन ह्यांच्याकडून युनायटेड स्टेट्स्च्या उपराष्ट्राध्यक्षपदाची शपथ घेवविली.

□ □ □

८००६२
७२६०
२८।१२।६४

१६

निवडणूक प्रचारांत जॉन्सन वारंवार भर देऊन सांगत असत कीं, केनेडी हे माझे नेते आहेत. " ते नेतील तिकडे मी जाईन " ह्या आपल्या उद्गारांचाहि ते वारंवार पुनरुच्चार करीत असत. आणि त्यांनीं उपराष्ट्राध्यक्षपदाचा स्वीकार केला तो हीच भावना सतत बाळगून.

जॉन्सन नेहमीं म्हणत असत, " मी सेनेटमधील नेता असतांना राष्ट्राध्यक्ष मला अनुसरत असत. आतां मी त्यांना अनुसरत आहें. वैमानिक असणें आणि दुय्यम वैमानिक असणें असा हा फरक आहे. "

राष्ट्राध्यक्ष एकच असू शकतो, ' दुय्यम राष्ट्राध्यक्ष ' नांवाचें अधिकारपद असू शकत नाहीं ह्याची जॉन्सन ह्यांना जाणीव होती. राष्ट्राध्यक्ष हेच वरिष्ठ असतात, उपराष्ट्राध्यक्ष तो त्यांचा अधिकार कधींच अमान्य करीत नाहींत. राष्ट्राध्यक्षांच्या भूमिकेच्या विरुद्ध भूमिका घ्यायला पत्रकार प्रश्नांचा व्यूह रचून भाग पाडतील, अशा पत्रकार बैठका ते कधीहि घेत नसत. कारभार शाखेचींच धोरणें आपल्या भाषणांतून व्यक्त व्हावीं ह्याची खात्री करून घेण्यासाठीं तीं भाषणें अधिकृत चाळणींतून गेलीं पाहिजेत असा त्यांचा कटाक्ष असे.

उलट, जॉन्सन ह्यांच्या पात्रतेबद्दल राष्ट्राध्यक्षांना नेहमींच आदर वाटत आलेला असल्यामुळें ते जॉन्सन ह्यांच्या गुणांचा पूर्ण उपयोग करून घेण्याविषयीं नेहमींच तत्पर असत–सेनेटमध्यें पक्षाचें नेतृत्व करतांना कोणतीहि बाजू समतोल आणि आर्जवी पद्धतीनें मांडण्याचा जो गुण जॉन्सन ह्यांच्या ठिकाणीं व्यक्त होई त्याचा फायदा राष्ट्राध्यक्ष घेत असत. देशांत ठिकठिकाणीं त्यांनीं उपराष्ट्राध्यक्षांना सरकारचे प्रवक्ते ह्या नात्यानें दौरे

काढायला लावले. उपराष्ट्राध्यक्षपदाच्या तीन वर्षांपेक्षां कमी असलेल्या कारकीर्दींत जॉन्सन ह्यांनीं तीस राज्यांत दौरे काढून जवळ जवळ ४०० भाषणें केलीं. नागरिक हक्कांच्या प्रश्नांपासून तों बर्लिनच्या भिंतीच्या प्रश्नापर्यंत; आशियांतील कम्युनिस्टांच्या हालचालींच्या प्रश्नांपासून तों अंतराळ-विज्ञान-विकासापर्यंत; शिक्षणाला मध्यवर्ति सरकारनें मदत देण्याच्या प्रश्नापासून तों नवजात राष्ट्रांना मदत करण्याच्या प्रश्नापर्यंत; विविध प्रकारच्या प्रश्नांवरील सरकारची भूमिका जॉन्सन ह्यांनीं आपल्या भाषणांतून वेळोवेळीं मांडली.

जॉन्सन ह्यांचीं हीं भाषणें म्हणजे केवळ वक्तृत्वाची कसरत नव्हती. किंवा उत्साह उतू जाणाऱ्या माणसाला कांहीं तरी कामांत गुंतवावयाचें म्हणून कांहीं त्यांना हीं भाषणें करायला लावलेलीं नव्हतीं. "तुम्ही राजकारणांत असाल तर एकाद्या खोलींत शिरतांच तिथल्या माणसांपैकीं आपल्याला अनुकूल कोण आणि प्रतिकूल कोण हें ओळखतां आलें पाहिजे. तसें येत नसेल तर तुमची कार्यपद्धति चुकीची आहे असें समजावें." असे उद्गार जॉन्सन ह्यांनीं एकदां काढलेले आहेत. लोकमताचें वारें हेरण्याची कला त्यांना चांगलीच अवगत होती. व्याख्यानांच्या दौऱ्यावरून परत येतांच ते राष्ट्राध्यक्षांना अहवाल सादर करीत असत. ह्या माहितीचा उपयोग करून राष्ट्राध्यक्ष कार्यक्रम आणि धोरणें ह्यांना मुरड घालीत किंवा तीं अधिक भक्कम बनवीत.

सरकारचे प्रतिनिधि आणि प्रवक्ते ही भूमिका जॉन्सन ह्यांना बजावण्याला राष्ट्राध्यक्ष सांगत असत तें केवळ देशापुरतेंच नव्हे. परदेशांतहि त्यांना पाठविण्यांत येई. परदेशांत इतका प्रदीर्घ प्रवास करणारे जॉन्सन हे पहिलेच उपराष्ट्राध्यक्ष होत. त्यांनीं तेहतीस देशांना भेटी दिल्या. त्या देशांमध्यें दीडशेंपेक्षां जास्त भाषणें केलीं.

केनेडीचें सरकार अधिकारावर येऊन पुरते तीन महिने होण्यापूर्वींच परराष्ट्रीय राजकारणांतील जॉन्सन ह्यांचें कार्य सुरू झालें होतें. ता. ३ एप्रिल १९६१ रोजीं सेनिगॉलच्या प्रजासत्ताकाचा पहिला वर्धापनदिन साजरा झाला. त्यावेळीं राष्ट्राध्यक्षांचे प्रतिनिधि म्हणून जॉन्सन डाकार येथें हजर राहिले होते. दुसऱ्या एकाद्या व्यक्तीकडे हें काम सुपूर्द केलें असतें

तर त्या भेटीला केवळ औपचारिक स्वरूप येण्याचीच शक्यता होती. औपचारिक सदिच्छा भेटच ठरली असती ती. पण, जॉन्सन सेनेगलमधील जनतेंत हिरीरीनें मिसळले. भेटेल त्याच्याशीं त्यांनीं हस्तांदोलन केलें. मुलांचीं मस्तकें कुरवाळलीं. वृद्ध स्त्रियांशीं हंसून बातचीत केली. वैयक्तिक स्नेहभावाच्या त्यांच्या ह्या वागणुकीनें तेथील लोक भारून गेले.

त्यानंतर कांहीं आठवड्यांनींच राष्ट्राध्यक्षांनीं जॉन्सन ह्यांना अतिपूर्व आणि दक्षिण आशियाच्या दौऱ्यावर पाठविलें. ह्या दौऱ्यांत त्यांनीं व्हिएतनाम, फिलिपाइन्स, चिनी प्रजासत्ताक, थायलंड, भारत आणि पाकिस्तान ह्या राष्ट्रांच्या प्रमुखांशीं आर्थिक, सामाजिक आणि लष्करी प्रश्नांवर विचारविनिमय केला.

त्याच वर्षीं ऑगस्टमध्यें कम्युनिस्टांनीं पूर्व आणि पश्चिम बर्लिनला अलग करणारी भिंत उभारली. कम्युनिस्टांच्या दडपणाला प्रतिरोध करण्याचा अमेरिकेचा निर्धार व्यक्त करण्यासाठीं राष्ट्राध्यक्षांनीं जॉन्सन ह्यांना बर्लिनला भेट देण्यासाठीं पाठविलें.

ह्या महत्त्वाच्या भेटीचें इतिवृत्त सादर करतांना जॉन्सन म्हणाले, "आम्ही जें बघितलें तें बघून, पश्चिम जर्मनीच्या जनतेच्या बाबतींत आणि मानवतेच्या बाबतींत असलेल्या अमेरिकेच्या प्रचंड जबाबदारीची तीव्र जाणीव आम्हांला झाली. कोणाहि माणसाला अशी जाणीव झाल्यावांचून राहिली नसती. ती जनता तुमच्याकडे प्रोत्साहनासाठीं, दिलासा मिळावा म्हणून आणि नेतृत्वासाठीं बघत आहे आणि जगांत स्वातंत्र्य चिरस्थायी होईपर्यंत ती जनता आणि आम्ही खांद्याला खांदा लावून मार्गक्रमण करणार आहोंत."

पुढील महिन्यांतच उपराष्ट्राध्यक्षांना पॅरिस येथें, नाटोचे सरसेनानी जनरल लॉरिस नारस्टँड, नाटोमधील अमेरिकेचे वकील टॉमस के. फिन्लेटर आणि फ्रान्समधील अमेरिकन वकील जेम्स पी. गॅव्हिन ह्यांच्याशीं वाटाघाटी करण्यासाठीं पाठविण्यांत आलें. समान संस्था असलेल्या अटलांटिक परिसरांतील राष्ट्रांचें कुटुंब हा उद्देश असलेल्या नाटोला सर्वतोपरी साह्य करण्याचा युनायटेड स्टेट्स्‌चा निर्धार आहे, हा राष्ट्राध्यक्षांचा संदेश घेऊन उपराष्ट्राध्यक्ष पॅरिसला गेले होते.

१९६२ सालांतहि त्यांचे दौरे चालूच होते. प्वर्टरिको राष्ट्रकुटुंबाच्या दहाव्या वर्धापनदिनाच्या समारंभाला उपस्थित राहण्यासाठीं आणि शांततापथकांच्या केंद्रांची पाहणी करण्यासाठीं त्यांनीं प्रवास केला. जमेकाच्या स्वातंत्र्यसमारंभाला राष्ट्राध्यक्षांचे प्रतिनिधि म्हणून ते उपस्थित होते. मध्यपूर्वेतील राष्ट्रांशीं अमेरिकन मदतीबाबत विचारविनिमय करण्यासाठीं त्यांनीं त्या भागाचाहि प्रवास केला.

त्या वर्षीचा ऑक्टोबर महिना म्हणजे महासंकटाचा महिना. क्यूबा प्रकरणीं युनायटेड स्टेट्स्‌नें करावयाच्या उपाययोजनेच्या तयारीसाठीं त्यांनीं 'ऑर्गनिझेशन ऑफ अमेरिकन स्टेट्स्'च्या परदेशी राजनैतिक प्रतिनिधींची बैठक टेक्ससमधील आपल्या निवासस्थानीं भरविली होती.

राष्ट्राध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारण्याचा प्रसंग येईपर्यंत जॉन्सन ह्यांचे दौरे चालूच होते. बेल्जम, हॉलंड, लक्झेंबर्ग ह्या देशांच्या दौऱ्यासाठीं त्यांनीं ५ नोव्हेंबर १९६३ ला प्रस्थान ठेवलें. परदेशांशीं व्यापार करण्याबाबतचें अमेरिकेचें धोरण त्या देशांना विशद करून सांगण्याचा हेतु ह्या दौऱ्यामागें होता. युनायटेड स्टेट्स्‌ला परत येण्यापूर्वीं त्या देशांना त्यांनीं पुन:पुन्हा आश्वासन दिलें कीं, अटलांटिक राष्ट्रांच्या एकजुटीवरच अमेरिकेचें परराष्ट्रीय आणि राष्ट्रीय धोरण आधारलेलें आहे.

ब्रुसेल्स येथें केलेल्या एका भाषणांत त्यांनीं सांगितलें, "अमेरिकेच्या उद्देशामागील प्रेरक शक्ति भागीदारीची भावना हीच आहे. अनेक भागीदारीच्या तत्त्वावरील संघटनांचें अमेरिका हें घटक राष्ट्र आहे. पॅसिफिक राष्ट्रांच्या बाबतींत, अमेरिका खंडांतील देशांच्या बाबतींत, फार काय युनायटेड स्टेट्स्‌मधील राज्यांच्या बाबतींतहि हें भागीदारीचेंच तत्त्व आहे."

वरील दौऱ्याच्या आधीं डोमिनिकन रिपब्लिकमध्यें त्याच्या अध्यक्षांच्या अधिकारग्रहणाच्या समारंभाला ते युनायटेड स्टेट्स्‌चे प्रतिनिधि म्हणून उपस्थित होते. पोप जॉन ह्यांच्या अंत्ययात्रेला राष्ट्राध्यक्ष केनेडींचे प्रतिनिधि म्हणून ते रोमला गेले होते. स्वीडन, फिनलंड, नॉर्वे, डेन्मार्क, आइसलंड ह्या देशांनाहि भेटी देऊन जॉन्सन ह्यांनीं ह्या दोस्त आणि तटस्थ राष्ट्रांना आश्वासन दिलें होतें कीं अमेरिकेला तुमच्याबद्दल सदैव आस्थाच राहील.

खुद्द युनायटेड स्टेट्स्‌मध्यें भ्रमंति करण्यांत उपराष्ट्राध्यक्षांचा जो मुख्य उद्देश होता तोच जगाच्या विस्तृत दौऱ्यामागेंहि होता. ह्या प्रवासांत ते राष्ट्राध्यक्षांच्या डोळयांची आणि कानांची भूमिका बजावीत असत. आणि अनेकदां राष्ट्राध्यक्षांच्या भावना बोलून दाखविण्याचें काम करीत असत. ह्या भेटी केवळ सदिच्छा-भेटी होत्या, त्यांना चिरस्थायी महत्त्व नव्हतें, असें लोकांना वाटलें असेल. पण वस्तुस्थिति उलट होती. प्रत्येक दौऱ्याहून परतल्यावर जॉन्सन राष्ट्राध्यक्षांपुढें त्या त्या देशाचें अर्थपूर्ण चित्र उभें करीत असत आणि त्याचा उपयोग युनायटेड स्टेट्स्‌च्या धोरणाला मार्ग-दर्शक म्हणून फार मोठ्या प्रमाणावर होत असे.

याशिवायहि ह्या दौऱ्यांचा दुसरा परिणाम होत असे. सेनेगलच्या पहिल्या भेटीच्या वेळीं त्यांनीं लोकांत मिसळण्याचें जें तंत्र अवलंबिलेलें होतें तेंच पुढें अन्य राष्ट्रांच्या भेटींतहि चालू राहिलें. शक्य होईल त्यावेळीं व्यासपीठा-वरून उतरून किंवा गाडींतून उतरून ते लोकांत मिसळत असत. आशियाई किंवा आफ्रिकाई लोकांच्या गर्दींत, त्यांची उंच हंसरी मूर्ति उभी आहे, त्या पुरुषाच्या स्वागतार्थ लोकांनीं हात उंचावलेले आहेत, आपल्या देशाला भेट देणाऱ्या पहिल्याच अमेरिकन उपराष्ट्राध्यक्षाच्या मित्रभावाला ते लोक स्मितपूर्वक साद देत आहेत, असें दृश्य दाखविणारीं छायाचित्रें वृत्तपत्रांत वारंवार प्रसिद्ध होतांना पाहायला मिळत असत.

१९६१ मध्यें जॉन्सन ह्यांनीं पाकिस्तानला भेट दिली त्यावेळीं त्यांनीं उत्स्फूर्तपणें एका उंटवाल्याशीं हस्तांदोलन करून त्याला अमेरिका पाहायला येण्याचें निमंत्रण दिलें. सहज दिलेल्या ह्या निमंत्रणाचा स्वीकार केल्याचें त्या उंटवाल्यानें कांहीं दिवसांनीं त्यांना कळविलें. कधीं येणार तेंहि कळविलें. ह्या प्रकाराचें आश्चर्य वाटलेलें असो वा नसो पण उपराष्ट्राध्यक्ष आणि राष्ट्र हीं त्याच्या स्वागताला सरसावलीं. त्या उंटवाल्याचें युनायटेड स्टेट्स्‌-मध्यें हार्दिक स्वागत झालें. जगांतील अनेक वजनदार प्रभावी पुरुष टेक्सस-मधील ज्या पशुवाडींतील निवासस्थानीं घरच्याप्रमाणें राहून गेले त्या जॉन्सन ह्यांच्या निवासस्थानीं त्या उंटवाल्यालादेखील पाहुणचाराचा लाभ झाला.

राजप्रतिनिधींनीं पाळावयाच्या शिष्टाचारांच्या भक्तांना मात्र, परदेशांत उपराष्ट्राध्यक्षांनीं अनेकदां असें अनौपचारिक सलगीनें वागावें हें आवडत नसे. "परराष्ट्र खात्यांतील लोक माझ्याकडे कसल्याशा अदृश्य एकनेत्री चष्म्यानें बघत असावेत असें मला वाटतें," अशी तक्रार एकदां खुद्द जॉन्सन ह्यांनींच राष्ट्राध्यक्षांपुढें केली होती. पण त्यांचें वागणें स्वतःच्या पिंडाला अनुसरून होतें. मैत्री आणि जिव्हाळा ह्यांच्या वातावरणाला तसाच प्रतिसाद दिल्यावांचून त्यांना राहावतच नसे.

अहंमन्य शिष्टांच्या टीकेला जॉन्सन ह्यांचें उत्तर तयार होतें. ते म्हणत असत, "ज्या लोकांवर वर्चस्व गाजवावयाचें त्यांच्यापासून अलिप्त राहण्यांत प्रतिष्ठा मानणाऱ्या राजशाही वृत्तीचा हा एक अवशेष आहे. पण देशांत ज्याप्रमाणें मोटारींतून उतरून लोकांत आपण मिसळतों तसेंच परदेशांत आपण वागलों नाहीं तर अमेरिकन राजकीय पद्धतीच्या आत्म्याची जगाला ओळख कशी करून देऊं शकणार ? आणि अखेर प्रतिष्ठा कोणाची ? —उपराष्ट्राध्यक्षपदाची कीं मानव जातीची ? —कोणाची प्रतिष्ठा आपल्याला सिद्ध करावयाची आहे ? "

जॉन्सन ह्यांचे दौरे वृत्तपत्रांत ठळकपणें गाजत असले तरी हे दौरे म्हणजेच कांहीं केनेडी सरकारच्या यशाला त्यांनीं लावलेला हातभार नव्हे. त्यांनीं अन्य प्रकारेंहि हातभार लावला. सर्वदा कार्यरत असणारा हा पुरुष उपराष्ट्राध्यक्षपदावरहि क्रियाशीलच राहिला.

सेनेटमधील बहुमतवाल्या पक्षाचे नेते लिंडन जॉन्सन उपराष्ट्राध्यक्षपदावर गेल्यानंतरहि बऱ्याचशा प्रमाणांत पूर्वींचेच लिंडन जॉन्सन राहतील असा कांहीं राजकीय निरीक्षकांचा कयास होता. कारभार शाखेकडून पुढें येणाऱ्या कार्यक्रमांत प्रतिनिधिसभेंत आणि सेनेटमध्यें पुढें रेटण्यासाठीं सूत्रचालकाची भूमिका ते बजावीत राहतील असें अनेकांचें भाकित होतें. त्यासाठीं कायदेमंडळांत असणाऱ्या पूर्वींच्या घनिष्ठ संबंधांचा उपयोग करून घेतला जाईल असें ह्या भविष्यवेत्त्यांचें म्हणणें होतें.

असें कांहीं घडण्याचा सुतराम् संभव नव्हता. शासकीय सत्तेची जी विभागणी परंपरेनें चालत आलेली आहे तिला बाध आणतां कामा नये असें मानण्याइतका त्या परंपरेविषयीं त्यांना गाढ आदर होता. त्यांच्याच शब्दांत

सांगायचें म्हणजे ती परंपरा त्यांच्या रक्तांत, हाडींमाशीं भिनलेली होती. म्हणून कारभार शाखेचा घटक बनल्यानंतर, कायदेमंडळ शाखेच्या काम-काजांत नाक खुपसण्याची कल्पना त्यांच्या मनाला शिवणें शक्यच नव्हतें. पुढील निवडणुकींत रिपब्लिकन पक्षाला मत देण्याचा विचार त्यांनीं करण्या-इतकेंच तें अशक्य होतें.

त्यांच्याकडे घटनात्मक कर्तव्य म्हणून सोंपविलेली एकच गोष्ट होती. सेनेटचा सभापति म्हणून कामकाज पाहणें. त्याप्रमाणें वॉशिंग्टनला असल्यास ते रोज थोडा वेळ त्या जागेवर स्थानापन्न होत असत आणि नंतर सेनेटच्या सभासदांनीं निवडलेल्या अध्यक्षाच्या हातीं सूत्रें सोपवीत. अर्थात् वॉशिंग्टनमध्यें असतील तेव्हांच तसें करणें शक्य होतें. त्याचप्रमाणें मधून मधून ते सेनेट-मधील डेमोक्रॅटिक पक्षाच्या नेत्यांच्या ओझरत्या भेटी घेत, अन्यथा, उप-राष्ट्राध्यक्षाकडून मदत न मिळतां किंवा अडथळे न होतां काँग्रेसचें कामकाज आपल्या परीनें चालू राहत असे.

आतां त्यांच्यावर असणाऱ्या जबाबदाऱ्यांचें स्वरूप निराळें होतें. त्या जबाबदाऱ्या मुख्यत्वेंकरून कारभारविषयक होत्या. राष्ट्राध्यक्ष केनेडीचे सल्लागार म्हणून ते त्यांना वारंवार भेटत असत. राष्ट्रीय सुरक्षा मंडळाच्या साप्ताहिक बैठकीला उपस्थित राहत असत. मंत्रिमंडळाच्या बैठकीला हजर असत. राष्ट्राध्यक्षांची, काँग्रेसमधील डेमोक्रॅटिक पक्षाच्या नेत्यांची साप्ताहिक बैठक होत असे त्या बैठकीलाहि जॉन्सनना कधीं कधीं हजर राहावें लागे.

२६ मार्च १९६३ रोजी तीन वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींना दिलेल्या मुला-खतींत आपल्या कामाबद्दल बोलतांना ते म्हणाले, " राष्ट्राध्यक्ष केनेडी, त्यांचा अधिकारीवर्ग आणि मंत्री ह्यांनीं प्रत्येक महत्त्वाच्या निर्णयाची माहिती मिळण्याची आणि त्यांत सहभागी होण्याची संधि मला दिलेली आहे. माझ्या कांहीं शिफारशी असल्यास त्या सादर करण्याचीहि संधि दिलेली आहे."

नॅशनल एरोनॉटिक् अँड स्पेस कौन्सिल, प्रेसिडेन्टस् कमिटी ऑन इक्वल एम्प्लॉयमेंट ऑपॉर्च्युनिटी, पीस कोअर्स अॅडव्हायसरी कौन्सिल, ह्यांचे ते अध्यक्ष होते.

नॅशनल एरो नॉटिक्स अँड स्पेस अॅडमिनिस्ट्रेशनच्या कार्यावर देखरेख ठेवण्यासाठीं स्पेस कौन्सिल होतें. त्या कौन्सिलच्या स्थापनेची तरतूद १९५८

च्या नॅशनल एरोनॉटिक्स अँड स्पेस ॲक्ट ह्या कायद्यान्वयें करण्यांत आलेली होती. ह्या कायद्याचें मोठें श्रेय जॉन्सन ह्यांना आहे. पण स्पेस कौन्सिलची प्रत्यक्ष स्थापना बरेच दिवस झालेली नव्हती. केनेडी राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर कायद्यांत दुरुस्ती होऊन उपराष्ट्राध्यक्ष हे स्पेस कौन्सिलचे अध्यक्ष असावेत अशी तरतूद करण्यांत आली. परराष्ट्रमंत्री, संरक्षणमंत्री, ॲटोमिक एनर्जी कमिशनचे अध्यक्ष आणि 'नासा 'चे प्रशासक हे कौन्सिलचे सभासद आहेत.

जॉन्सन ह्यांच्याकडे सोपविण्यांत आलेली ही कामगिरी अगदीं यथायोग्य होती. अंतराळविषयक कार्यक्रमाबद्दल त्यांना विलक्षण आस्था होती. त्याचे दूरगामी परिणाम त्यांनीं जोखलेले होते. उपराष्ट्राध्यक्षांनीं त्या कौन्सिलसाठीं नेमलेल्या तज्ज्ञांच्या अहवालाच्या आधारेंच त्यानीं १९६१ च्या प्रारंभीं राष्ट्राध्यक्ष केनेडींची खात्री पटवून दिली कीं अमेरिकेच्या अंतराळ संशोधन कार्यक्रमाचें लक्ष्य चालू दशकाच्या अखेरीच्या आंत चंद्रावर मानवाला उतरविणें हें असलें पाहिजे.

कमिटी ऑन ईक्वल एम्प्लॉयमेंट ऑपॉर्च्युनिटीचे अध्यक्ष ह्या नात्यानें उपराष्ट्राध्यक्षांनीं, मध्य सरकारचा संबंध असणाऱ्या योजनांतील नोकऱ्यांबाबत होणारा वर्गीय पक्षपात थांबविण्यासाठीं, निर्धारानें कंबर कसली. कमिटीच्या आणि स्वतःच्या कार्याचें स्वरूप शैक्षणिक असावें असा त्यांचा प्रयत्न होता. मोठमोठ्या उद्योगपेढ्यांचे उच्चाधिकारी, व्यापारी ह्यांना भेटून त्यांच्याशीं बोलणीं करून वर्णसंबंधाबाबत त्यांनीं चर्चा केली.

खाजगी चर्चेप्रमाणेंच जाहीरपणेंहि जॉन्सन ह्यांनीं हा प्रश्न हाताळला. एका सभेंत ह्या विषयावर बोलतांना ते म्हणाले, " मी स्पष्ट करूं इच्छितों कीं, आमची समिती ही कांहीं रोजगार पुरविणारी यंत्रणा नव्हे. अमुक एका वर्णाच्या, पंथाच्या, वर्गाच्या किंवा घराण्याच्या लोकांना ते असे आहेत म्हणूनच नोकऱ्या मिळवून देण्याचें काम आम्ही पत्करलेलें नाहीं. पण ते तसे आहेत ह्या कारणासाठीं कोणाला रोजगार मिळण्यांत अडथळा येऊं नये, असा प्रयत्न करणें हें मात्र आमचें काम आहे. आणि हें काम हा आमचा उद्योगधंदा आहे असें मी म्हणतों तेव्हां त्याच दृष्टीनें आम्ही हें काम करणार आहों असें मला म्हणायचें आहे."

आणि त्यांचे हे उद्गार वरवरचे नव्हते. वंशवर्णसमता आणि मानवी प्रतिष्ठा ह्यांच्याबद्दलची त्यांची भावना, श्रद्धा कांहीं नवी नव्हती. आणि जॉन्सन वरील शब्द ज्यांना ऐकवीत होते ते समजूतदारपणानें त्यांचें म्हणणें पटवून घेणार नसतील तर एक प्रभावी शस्त्र जॉन्सन ह्यांच्या हातांत होतेंच. सरकारी मक्ते देण्याची सत्ता हें तें शस्त्र होय. जॉन्सन ह्यांच्या मनधरणीचा आणि आवश्यक तेव्हांच तारतम्यानें वरील शस्त्र उगारण्याचा परिणाम झाला. प्रचंड प्रमाणावर रोजगार पुरविण्यास समर्थ अशा पन्नास मोठ्या कंपन्यांनीं कामगारभरती करतांना वर्णभेद न करण्याचें मान्य केलें.

कमिटी ऑन ईक्वल एम्प्लॉयमेंट ऑपार्च्युनिटी ह्या समितीचें काम, जॉन्सन ह्यांचें अत्यंत आवडतें, जिव्हाळ्याचें वाटणारें काम होतें. ते म्हणत असत, " ' लोकहो धीर धरा, तुमच्या वंशजांना अधिक चांगलें जीवन लाभेल,' हें सांगण्याचे दिवस आतां मागें पडले आहेत. खरें म्हणजे असें सांगण्याचे दिवस अनेक वर्षांपूर्वींच भूतकालांत जमा व्हावयास हवे होते. आजच्या क्षणालाच सर्वांना चांगल्या जीवनाचा लाभ मिळवून देण्याच्या प्रयत्नांवर माझी श्रद्धा आहे. आजचें चांगलें जीवन वंशजांसाठीं अधिक चांगलें बनविण्याच्या प्रयत्नांवर माझी श्रद्धा आहे. "

उपराष्ट्राध्यक्ष ह्या नात्यानें जॉन्सन जीं कामें करीत होते तीं, राजकीय अकलेच्या गड्डुचांच्या भाकितांपेक्षां वेगळीं होतीं. स्वतः जॉन्सन ह्यांच्या कल्पनेपेक्षांहि निराळीं असतील. पण तीं कामें उत्साहजनक होतीं, तशींच मेहनतीचीं आणि जादा वेळ खाणारीं होतीं. पण आयुष्यांत आजवर ज्या नेटानें ते आपल्यापुढील कर्तव्यें बजावीत आले होते त्याच नेटानें ते हीं कामें करीत होते. म्हणूनच तथाकथित विनोदी कार्यक्रम करणारे विदूषक, " लिंडन जॉन्सन ह्यांचा पत्ता काय ? त्यांचें झालें तरी काय ? " असला वाष्कळपणा करीत तेव्हां जॉन्सन ह्यांना चीड येणें स्वाभाविक होतें.

लिंडन जॉन्सन ह्यांचें ' काय झालें ? ' ह्याची पूर्ण कल्पना राष्ट्राध्यक्ष केनेडींना होती. अखंड सहकार्यामुळें त्यांच्यांतला परस्पर आदर वाढतच गेला. महत्त्वाचे धोरणविषयक निर्णय घेतांना उपराष्ट्राध्यक्षांची उपस्थिति पाहिजेच आणि सरकारच्या सर्व प्रश्नांची आणि समस्यांची परिपूर्ण माहिती उपराष्ट्राध्यक्षांना मिळालीच पाहिजे असा राष्ट्राध्यक्षांचा कटाक्ष असे.

कारकीर्दीच्या पहिल्या वर्षांतच, ता. १० ऑगस्ट १९६१ रोजीं राष्ट्राध्यक्ष आणि उपराष्ट्राध्यक्ष ह्यांनीं एकमतानें एक निर्णय घेतला होता. राष्ट्राध्यक्ष आपल्या कामाला असमर्थ ठरल्यास काय करावयाचें ह्या प्रश्नाचा विचार करून राष्ट्राध्यक्ष आयझनहॉवर आणि उपराष्ट्राध्यक्ष निक्सन ह्यांनीं एक कार्यपद्धति ठरवून टाकली होती. तीच कार्यपद्धति अनुसरण्याचें राष्ट्राध्यक्ष केनेडी आणि उपराष्ट्राध्यक्ष जॉन्सन ह्यांनीं एकमतानें ठरविलें होतें. ती पद्धति अशी : राष्ट्राध्यक्ष आपली जबाबदारी पार पाडण्यास असमर्थ झाले तर त्यांनीं उपराष्ट्राध्यक्षांना, तसें करणें शक्य असल्यास कळवावें. राष्ट्राध्यक्षाच्या गैरहजेरींत उपराष्ट्राध्यक्षानें दुय्यम राष्ट्राध्यक्ष म्हणून काम करावें. आपली असमर्थता उपराष्ट्राध्यक्षांना कळविणें राष्ट्राध्यक्षांना शक्यच होऊं नये असें त्या असमर्थतेचें स्वरूप असेल तर उपराष्ट्राध्यक्षांनीं मंत्र्यांशीं सल्लामसलत करून निर्णय घ्यावा. कोणत्याहि बाबतींत, राष्ट्राध्यक्षांची असमर्थता संपली कीं नाहीं हें स्वतः राष्ट्राध्यक्षांनींच ठरवावें आणि आपली जबाबदारी पुनः स्वीकारावी.

आयझनहॉवर आणि निक्सन ह्यांनीं वरील प्रकारची कार्यपद्धति निश्चित केली, त्याआधीं अशा स्वरूपाची कांहींच व्यवस्था नव्हती. व्हाइट हाऊस-तर्फे ह्या व्यवस्थेसंबंधीं निघालेल्या पत्रकांत म्हटलें होतें, " ह्याच कारणा-मुळें पूर्वीं होऊन गेलेले उपराष्ट्राध्यक्ष राष्ट्राध्यक्षाच्या असमर्थतेच्या काळांत आपणहून कांहीं निर्णय घेण्यास कचरत असत. आजच्या काळांत असा धोका पत्करतां येत नाहीं. म्हणूनच आधींच्या राष्ट्राध्यक्षांनीं ठरविलेली कार्यपद्धति अनुसरण्याचें राष्ट्राध्यक्ष केनेडी आणि उपराष्ट्राध्यक्ष जॉन्सन ह्यांनीं उभयपक्षीं मान्य केलें आहे. "

राष्ट्राध्यक्ष आणि उपराष्ट्राध्यक्ष ह्यांचे घनिष्ठ संबंध सतत वाढत गेले. ह्याचा एक परिणाम असा झाला कीं राष्ट्राध्यक्षांच्या कामाचें पर्वतप्राय स्वरूप जॉन्सन ह्यांना स्पष्टपणें कळून चुकलें.

आणि डलास येथें घडलेल्या दुर्घटनेनें अशी ही जबाबदारी सुन्न करणाऱ्या अकल्पित वेगानें लिंडन बेन्स जॉन्सन ह्यांच्या शिरावर येऊन पडली. ह्या जबाबदारीचें गांभीर्य इतर कोणाहि माणसापेक्षां त्यांनीं अधिक ओळखलें. पण अशा जबाबदारीला आपण डरणारे नाहीं हेंहि त्यांनीं दाखवून दिलें.

# १७

अमेरिकन जनतेच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या प्रश्नांवर सेनेटर जॉन्सन आणि उपराष्ट्राध्यक्ष जॉन्सन ह्यांचीं कांहीं ठाम मतें होतीं. आपलीं मतें व्यक्त करणें उपकारक ठरेल, कांहीं इष्ट गोष्ट साधण्याच्या दृष्टीनें पुढें पाऊल पडेल असें वाटल्यास तीं मतें बोलून दाखवायला ते मुळींच कचरत नसत. राष्ट्रीय महत्त्वाच्या कांहीं प्रश्नांवरील आपली भूमिका त्यांनीं अनेकदां इतक्या जोरदारपणें मांडलेली आहे कीं, त्या प्रश्नांवरील त्यांचीं मतें त्यांच्या मूलभूत राजकीय तत्त्वज्ञानाचाच महत्त्वाचा भाग आहे हें सहज सिद्ध झालें.

सेनेटर असतांना आणि उपराष्ट्राध्यक्ष झाल्यावर जॉन्सन ह्यांनीं आपलीं मतें अनेक मार्गांनीं व्यक्त केलेलीं आहेत. सेनेटमधील भाषणें, देशांत ठिक-ठिकाणीं निरनिराळ्या प्रकारच्या श्रोत्यांपुढें दिलेलीं व्याख्यानें, नभोवाणी व दूरचित्रवाणी ह्यांच्यावर केलेलीं भाषणें किंवा दिलेल्या मुलाखती, वृत्तपत्रें-नियतकालिकें ह्यांच्या प्रतिनिधींच्या प्रश्नांना दिलेलीं उत्तरें, इत्यादि मार्गांनीं जॉन्सन ह्यांचीं मतें व्यक्त झालेलीं आहेत.

त्यांच्या भाषणांना, राजकीय, आर्थिक, मानवी हक्कांसंबंधींच्या विचारांना, राष्ट्रीय महत्त्वाच्या प्रश्नांकडे पाहण्याच्या त्यांच्या दृष्टिकोनाची सखोल कल्पना देणाऱ्या त्यांच्या उद्‌गारांना ते राष्ट्राध्यक्षपदावर विराजमान झाल्या-मुळें विशेष महत्त्व आलेलें आहे.

त्यांच्या अशा उद्‌गारांपैकीं कांहीं पुढें उद्‌धृत करण्यांत आलेले आहेत.

## नागरिक हक्क

[ गेटिसबर्ग (पेन्सिल्व्हेनिया) येथें ता. ३० मे १९६३ रोजीं 'स्मरणदिना'-निमित्त केलेल्या भाषणांतून. ]

ह्या पवित्र स्थानावर एक शतकापूर्वी शौर्याचीं कृत्यें केलीं गेलीं, स्फूर्तिदायक शब्द उच्चारले गेले.

आज हयात असलेल्या आम्हांला त्याचा विसर पडलेला नाहीं. गेटिसबर्ग येथील त्या कृतींचा आणि उक्तींचा जगाला कधींच विसर पडणार नाहीं. आजच्या स्मरणदिनीं आपण एकत्र येऊन, जागतिक चिरशांततेसाठीं आणि जागतिक स्वातंत्र्य व न्याय प्रस्थापित करण्याची आमची आकांक्षा पूर्ण व्हावी यासाठीं प्रार्थना करून, आम्ही त्या कृतिउक्तींचा गौरव करीत आहों.

पवित्र प्रार्थनेच्या रूपानें आम्ही उच्चारलेल्या वचनाचें पालन करणें हें आमचें कर्तव्य आहे आणि शांतता आणि स्वातंत्र्याची आकांक्षा ह्यांचें जतन करण्यासाठीं अत्यावश्यक प्रयत्न करण्याचा निर्धार करूनच आम्ही त्या वचनाचें पालन करणार आहोंत.

सर्व जगभर शांतता नांदावी म्हणून आम्ही जागता पहारा करीत आहोंत.

जगांतून आक्रमकाची नामनिशाणी नाहींशी होईपर्यंत, जुलूमशाहीनें शस्त्रास्त्रें खालीं ठेवून शरणागति स्वीकारीपर्यंत, प्रत्येक भूमींत स्वातंत्र्याचा उदय होईपर्यंत आमचा जागता पहारा राहील. परराष्ट्रांच्या भूमीवर आमच्या सुपुत्रांनीं केलेलें बलिदान निरर्थक ठरणार नाहीं ह्याची हमी म्हणून हा जागता पहारा राहील.

शांततेसाठीं असा जागता पहारा ठेवीत असतांना आम्ही हेंहि लक्षांत ठेवावें कीं न्यायासाठींहि जागता पहारा पाहिजे. आमच्या देशाच्या रस्त्यारस्त्यांत, शाळांत आणि आमच्या अखिल जनतेच्या जीवनांत न्याय प्रस्थापित व्हावा ह्यासाठीं आमचा जागता पहारा हवा आहे. असें केलें तरच ह्या भूमीवर मरण पत्करणारांचें बलिदान व्यर्थ ठरणार नाहीं.

शंभर वर्षांपूर्वी गुलामांना स्वतंत्र करण्यांत आलें. शंभर वर्षें व्यतीत झाल्यानंतरहि निग्रो त्याच्या केवळ कातडीच्या रंगामुळें अद्याप गुलामगिरींतच आहे.

तो निग्रो आज न्याय मागत आहे.

आम्ही त्याला 'धीर धर' असें सांगतों. ही त्याच्या मागणीला साद नव्हे. ह्या भूमीखालीं चिरविश्रांती घेणाऱ्यांच्या हौतात्म्याला ही साद नव्हे.

विद्यमान समस्येची उकल करणें काळाच्या हातीं आहे, हें म्हणणें निरर्थक आहे. ती उकल करणें आपल्या हातीं आहे. इतिहासांत होऊन गेलेल्या आणि

-0072 दि: .. 28/12/4 9260

विद्यमान, सुधारलेल्या सुसंस्कृत समाजांतला एक थोर समाज म्हणून आम्हांला लाभलेला भाग्यठेवा गमावण्याची इच्छा नसेल तर, आपल्यापुढील आव्हानाला तोंड देण्याचा निर्धार करण्यासाठीं गोऱ्या आणि निग्रो अशा सर्व अमेरिकनांनीं एकत्र येणें अत्यावश्यक आहे.

शंभर वर्षांपूर्वी आपल्या राष्ट्राला गेटिसबर्गच्या ह्या रणक्षेत्रावर आपला आत्मा लाभला. आतां द्वेषाच्या रणक्षेत्रावर लांच्छनास्पद रीतीनें तो आत्मा आम्ही गमावतां कामा नये.

निग्रोला धीर धरायला सांगणें म्हणजे त्यानें जें पुरेपूर दिलें आहे त्यापेक्षां जास्त अपेक्षा करण्यासारखें आहे. पण त्याच्याकडून आणि सर्वच अमेरिकनां-कडून, स्वतंत्र आणि जबाबदार समाजाच्या वाटचालींत चिकाटीच्या प्रयत्नांची मात्र अपेक्षा आहे. तशी अपेक्षा न करणें म्हणजे राष्ट्रीय हितासाठीं सर्व नागरिकांनीं जें कर्तव्य बजावलें पाहिजे त्या कर्तव्याचीच अपेक्षा न करण्या-सारखें आहे.

जे कायद्याकडे पाठ फिरवितात त्यांना कायदा वांचवूं शकत नाहीं. पण जे कायद्याचा उपयोग करीत नाहींत त्यांच्याहि उपयोगी कायदा पडत नाहीं. अन्याय आणि विषमता ह्यांचा इतिहास म्हणजे कायद्याच्या दुरुपयोगाचा इतिहास. कायदा अपूर्ण ठरला नाहीं आणि ठरत नाहीं. पण कायद्यावर श्रद्धा न ठेवून, न्यायाचें उद्दिष्ट त्वरित गांठण्यासाठीं कायद्याचा उपयोग न करून आम्हीच कर्तव्यच्युत ठरलों आहोंत.

कायदा न करतांच निग्रोंसाठीं आपण जें केलें तें फार केलें असें गोऱ्यांना वाटत असेल तसेंच, कायद्याला अनुसरून आपण जें करीत आहों किंवा करूं शकूं त्याबद्दलची निग्रोंची कल्पनाहि तोकडी पडणें शक्य आहे.

निग्रोंना किंवा गोऱ्यांना धीर धरायला सांगणें निरर्थक आहे. पण त्यांना चिकाटीनें प्रयत्न करायला सांगणें हें निरर्थक नाहीं, सुयोग्यच आहे. कांहीं माणसें मोर्चे बांधूं शकतील. दुसरे कांहीं जण त्या मोर्च्यांवर तुटून पडूं शक-तील. पण त्या मोर्च्यांच्या ठिकाणीं जें घडेल त्यांतून समस्येचीं उत्तरें मिळणार नाहींत. आमच्या एकजुटीच्या, चिकाटीच्या प्रयत्नांतच तीं उत्तरें गवसतील. भरमसाट वचनें देणें ही वंचना आहे, तद्वतच वाजवीपेक्षां कमी अपेक्षा करणें हा भ्याडपणा आहे.

आजच्या क्षणीं ही वा ती जमात धोक्यांत आहे असें नव्हे तर राष्ट्राच्याच कसोटीची ही वेळ आहे. ज्यांना देशकल्याणाची तळमळ आहे त्या सर्वांनीं पुढें आलें पाहिजे. दक्षिणेंतल्या लोकांनीं, उत्तरेंतल्या लोकांनीं, गोऱ्यांनीं, निग्रोंनीं, सर्वांनींच पुढें पाऊल टाकून ह्या आव्हानाच्या काळांतून निश्चित निर्णय घेऊन मार्ग काढला पाहिजे.

निग्रो म्हणतो, "आजच पाहिजे." कांहीं जण म्हणतात, "कधींच मिळणार नाहीं." जबाबदार अमेरिकन म्हणतात – ह्या स्थळीं हुतात्मे झालेले म्हणतात, इथें बोलून गेलेला थोर पुरुष म्हणतो, – ह्या सर्वांचा आवाज एकच म्हणत आहे, "सर्वजण मिळून मिळवूं या" आणि तसें करण्याखेरीज अन्य मार्गच नाहीं.

न्यायाला वर्णाचा विसर पडल्याशिवाय, शिक्षणाला जमातभेदाचा विसर पडल्याशिवाय, संधि मिळण्याच्या बाबतींत माणसाच्या कातडीचा प्रश्न दृष्टीआड झाल्याशिवाय विमोचन ही नुसतीच घोषणा राहील. ती वस्तुस्थिति ठरणार नाहीं. विमोचनाची घोषणा वस्तुस्थितींत उतरविण्याच्या बाबतींत आम्ही जितके मागें राहूं, तितक्या प्रमाणांत स्वातंत्र्याची हमी देण्याच्या बाबतींत अपूर्ण ठरूं.

## जबाबदारी

[ ज्या काळांत शासन द्विदल होतें त्या काळांत ता. ४ जानेवारी १९५५ रोजीं सेनेटमधील बहुमतवाल्या पक्षाचे नेते ह्या नात्यानें सेनेटमधील डेमोक्रॅटिक पक्षाच्या परिषदेंत केलेल्या भाषणांतून. ]

निवडणुकींतील विजयाला 'बक्षिस' म्हणण्याची प्रथा आहे. पण अधिक वास्तववादी दृष्टीनें ती एक जबाबदारी आहे – वाढती जबाबदारी.

गेल्या दोन वर्षांपेक्षां पुढील दोन वर्षांत आपल्या पात्रतेची फार मोठी कसोटी लागणार आहे. काँग्रेसपुरतें बोलायचें तर सर्व बाजूंनीं आपल्यावर प्रकाशझोत रोखले जाणार आहेत.

ज्या न्यायालयाच्या निर्णयावर दाद मागण्याची सोय नाहीं त्या न्यायालयापुढें–अमेरिकन जनतेपुढें आपल्याला जाब द्यावा लागणार आहे.

माझी अशी श्रद्धा आहे कीं, अमेरिकन जनता आमच्याकडून अविरत जबाबदारीच्या वागणुकीची अपेक्षा करीत आहे. आमचें वर्तन विधायक, दूरदर्शी आणिराजनीतिकुशल व्हावें अशी जनता अपेक्षा करीत आहे. विरोधासाठीं विरोध किंवा पाठिंब्यासाठीं पाठिंबा हें धोरण जनतेला नको आहे.

देशाला उपकारक ठरेल असा विधायक कार्यक्रम डेमोक्रॅटिक पक्षानें आंखावा ही जनतेची इच्छा आहे.

## खाजगी उद्योगधंदे

[ ह्यूस्टन (टेक्सस) चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संस्थेपुढें ता. १२ ऑगस्ट १९६३ ला केलेल्या भाषणांतून. ]

स्वतंत्र खाजगी उद्योगधंद्यांना पाठिंबा देण्याचा प्रश्न आमच्या राजकीय पक्षांतील, पक्षीय पातळीवरील वादाचा प्रश्न आहे, ह्या कल्पनेशीं मी सहमत नाहीं. जो राजकीय पक्ष अमेरिकन उद्योगधंदेवाल्यांचा मित्र नाहीं तो अमेरिकन जनतेचाहि मित्र असूं शकत नाहीं असें माझें ठाम मत आहे. त्याचप्रमाणें माझें असेंहि ठाम मत आहे कीं जो जनतेचा सच्चा आणि सततचा मित्र नाहीं तो राजकीय पक्ष उद्योगधंदेवाल्यांचाहि मित्र असूं शकत नाहीं.

आपल्या स्वतंत्र समाजव्यवस्थेंत उद्योगधंदेवाले आणि राजकीय पुढारी हे एकमेकांचे स्वाभाविक शत्रू नाहींत. उलट दोघांनीं समंजस दोस्त म्हणून सहकार्य करणें हें, प्रत्येकाच्या यशाच्या दृष्टीनें आणि आमची पद्धति देशांत आणि जगांत यशस्वी ठरण्याच्या दृष्टीनें अत्यावश्यक आहे.

जगाच्या जीवनांत एका नव्या आणि वैशिष्टयपूर्ण युगांत आपण प्रवेश करीत आहोंत. आपल्या राष्ट्रांतहि ह्या नव्या युगाचा उदय होत आहे. हा दुर्मिळ सुसंधीचा काळ आहे. अशा वेळीं ज्या गोष्टी सुधारणें आवश्यक आहे हें आपल्याला माहीत आहे, त्या गोष्टी आपण सुधारूं शकतों. जे दोष घालविणें आवश्यक ते घालविण्याला हा योग्य काळ आहे. आपल्या ध्येयाच्या ज्या विजयाची आपण दीर्घकाल अपेक्षा करीत आलों आहोंत त्या विजयाची निश्चित आशा करावी असा हा काळ आहे.

ह्या संधीचा पूर्ण लाभ घ्यायचा असेल तर आपण एकजूट होण्याची नितांत गरज आहे. पोथीबंद सिद्धांत आणि तत्त्वें, शंका आणि हताशता ह्यांनीं आम्ही दुभंगलेले असतां कामा नये.

# अमेरिकेवरील श्रद्धा

[ जॅक्सनव्हिल (इलिनॉय) येथील मॅकमरी कॉलेजच्या उद्‌घाटनाच्या ता. २ जून १९६३ रोजीं केलेल्या भाषणांतून.]

आज आपलें राष्ट्र सामर्थ्यसंपन्न आहे; साऱ्या जगांत सामर्थ्यसंपन्न आहे. सार्वत्रिक शिक्षणाचा आज आपल्या लोकांत जेवढा प्रसार झाला आहे तेवढा पूर्वी कधींच झालेला नाहीं. निरनिराळ्या विभागांतील लोकांच्या कार्यक्षमतेची पातळी, बुद्धीची पातळी या सर्वसाधारणपणें समान आहेत. त्याबाबतींत निरनिराळ्या विभागांत कांहीं विषमतोल असेल तर तो अगदीं अल्प आहे.

भयंकर भयग्रस्त काळांत आपल्याला जीवन कंठावें लागलें आहे. अण्वस्त्र-युद्धाच्या छायेंत स्वतंत्र जगांत ऐक्य प्रस्थापित करण्याचा मार्ग आपण चांचपडत शोधीत आहोंत. संकट संपलेलें नाहीं, तें लौकर संपणार नाहीं.

परदेशांतील आमचे शत्रू दुराराध्य आहेत. आमच्या घरांत द्वेष आणि संशय ह्या घातक शक्तीचें अखंड थैमान चालू आहे. ह्या दोन्ही धोक्यांना आम्ही कमी लेखतां कामा नये. त्यांच्याशीं तडतोड करतां कामा नये. त्यांचा अनुनय करतां कामा नये.

अमेरिकन जनता कम्युनिस्टांकडून चिरडली जाणार नाहीं. मायेफिरू तिला ऱ्हासाकडे नेऊं शकणार नाहींत. कम्युनिझमच्या उरल्या सुरल्या शृंखला गंजत पडलेल्या असतील तेव्हां अमेरिका जोमानें वाढतच असेल.

अमेरिकन जनतेला हें माहीत आहे. अमेरिकेचा आत्मा दहशतीपुढें नमणारा नाहीं. संशयपिशाच्च त्याला विचलित करूं शकणार नाहीं. आत्मविश्वास बाळगणाऱ्या राष्ट्राचें आणि आत्मविश्वास बाळगणाऱ्या जनतेचें प्रगतीचें पाऊल निर्विवादपणें वेगानेंच टाकलें जात असतें. आणि आमची पूर्वतयारी चालू असतांनाच हें घडत आहे हा केवळ योगायोग नव्हे.

अंतराळ कार्यक्रमाच्या बाबतींत आम्ही आमची पूर्वतयारी केली आहे. आम्ही उशीरा सुरुवात करून इतकी वाटचाल केली आहे कीं पूर्वीच्या दुर्लक्षामुळें निर्माण झालेली भीति आम्ही झटकून टाकूं शकलों आहों. सरकारच्या कारभारांतील सुधारणांचें कार्य चालू आहे. निकामी आणि जुनाट झालेल्या

संघराज्यीय जमाबंदीविषयक कायद्यांत आवश्यक ती सुधारणा आम्ही करीत आहोंत. जनतेच्या जीवनांतील समस्यांचा विचार आम्ही तनमन लावून करीत आहों आणि भूतकालाचें दडपण आमच्यावर कमी आहे.

ह्या घटनांचा बोध दुर्लक्षिला जाण्यासारखा नाहीं. भवितव्याची आशाहि स्पष्ट आहे. अधिक सामर्थ्यसंपन्न अमेरिका, अधिक समंजस बनलेली अमेरिका, कार्यक्षम अमेरिका आपल्या देशांतील क्षितिजाच्या कक्षा वाढवील आणि त्याद्वारें जगाच्या विशाल क्षितिजाकडे स्वातंत्र्याचें पाऊल पडण्याकरतां नेतृत्व करण्यासाठीं लागणाऱ्या आपल्या सामर्थ्यांत भरच घालील.

## शिक्षण

[ ता. ९ नोव्हेंबर १९६१ रोजीं लिबर्टी ( मिझूरी ) येथील विल्यम जुवेल कॉलेजमध्यें केलेल्या भाषणांतून.]

शिक्षण ही समस्या नव्हे. शिक्षण ही संधि आहे.

[ फिलिफाइन्स विद्यापीठांत ता. १३ मे १९६१ रोजीं केलेल्या भाषणांतून. ]

दारिद्र्याचें बीज अज्ञानाच्या भूमींत रुजतें. अज्ञानाच्या भूमींतच रोगराई फोफावते. अज्ञानाच्या भूमींतच वंशसंघर्ष आणि धार्मिक संघर्ष ह्यांचीं मुळें रुजतात. अज्ञानाच्या भूमींतच कम्युनिझम जुलूमशाहीचीं कटुफळें जनतेला देण्यासाठीं पुढें येतो.

शिक्षण हीच मानवाची एकमेव आशा आहे. जागतिक चिरस्थायी शांततेला आवश्यक गोष्ट म्हणजे शिक्षण. भूक, उपासमार आणि अन्याय जगांत कुठेंहि असोत त्यांच्याविरुद्ध चाललेल्या झगड्यांत प्रगतीचा दरवाजा खुला करणारी किल्ली म्हणजे शिक्षण. आज शिक्षणच ग्रहांकडे आणि ताऱ्यांकडे जाणाऱ्या मार्गावर प्रकाशदीप दाखवीत आहे. सर्वांत विशेष म्हणजे, स्वातंत्र्य आणि शांतता ह्यांचीं उगमस्थानें शिक्षणांतच आहेत.

[ ता. ९ जून १९६३ रोजीं मेडफर्ड ( मॅसॅच्युसेट्स् ) येथील टफ्ट्स् विद्यापीठांतील भाषणांतून.]

शिक्षणाला अमेरिका दीर्घ कालापासून बांधली गेलेली आहे. पण गेल्या कांहीं वर्षांपासूनच शिक्षणाची खरी निकड जाणवूं लागली आहे.

आज आपण अशा युगांत प्रवेश केलेला आहे कीं तेथें कांहीं थोड्या लोकांना इतरांपेक्षां जास्त अनुकूल परिस्थिति मिळवून देणारी, चैनीची वस्तु शिक्षण ही राहिलेली नाहीं. आज ती सर्वांची एक निकड बनलेली आहे. आजच्या गुंतागुंतीच्या औद्योगिक जगांत शिक्षणाविना माणूस असहाय ठरतो.

शिक्षणाची जी पातळी पूर्वी आश्चर्यचकित करण्याइतकी उंच वाटे तीच आतां सर्वसाधारण पातळी ठरलेली आहे. पूर्वीं खंबीर शरीर आणि उपजत कौशल्य ह्यांच्या आधारावर जीं कामें मिळू शकत तीं मिळविण्यासाठीं आतां महाविद्यालयाची पदवी आवश्यक ठरली आहे. आपण खऱ्या अर्थानें 'शिक्षित मानवा'च्या युगांत प्रविष्ट झालेलों आहोंत.

तथापि केवळ कारागिरीचें ज्ञान आणि शिक्षण समरूप मानणें चूक आहे. ज्याला एकादें काम करण्यापुरतें शिक्षण मिळालेलें आहे तो माणूस सुशिक्षित नव्हे. तो केवळ पढविलेला माणूस म्हणतां येईल. अशा माणसाची स्वतंत्र समाजांत संपूर्ण सहभागी होण्याची पूर्ण पात्रता आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं.

शिक्षण म्हणजे केवळ महाविद्यालयांत मिळतें तें नव्हे. सर्व जीवन ही एक शैक्षणिक प्रक्रिया आहे. माझ्या मतें, मृत्यु म्हणजे मेंदूची विचार-चिंतन करण्याची आणि विकसित होण्याची शक्ति संपते तो क्षण होय.

## अंतरिक्ष

[ ता. ११ ऑक्टोबर १९५९ रोजीं वॉशिंग्टन (डी. सी.) येथें केलेल्या भाषणांतून. ]

रशियानें चालविलेल्या प्रयत्नांपुढें आपल्या प्रयत्नांचें पाऊल पडण्यासाठीं आपण पैसा, वेळ, शक्ति ह्या गोष्टी खर्चीं घातल्या पाहिजेत. आम्हांला निकडीची योग्य जाणीव आहे असें मला वाटत नाहीं.

[ ता. १९ एप्रिल १९६२ रोजीं न्यू ऑर्लिन्स येथें केलेल्या भाषणांतून. ]

आम्ही चंद्रावर जाणार आहोंत. कारण विश्वाचा शोध घेण्याच्या मार्गावरील तें अचूक पाऊल आहे. आम्ही टाकलेलें पाऊल, गुंतविलेल्या भांडवलावर मिळालेल्या भरपूर व्याजाप्रमाणें महत्त्वाचें आहे, हें आम्ही जाणून आहों.

[ ता. २३ एप्रिल १९६३ रोजीं डलास येथें केलेल्या भाषणांतून. ]

अंतराळअस्त्रांच्या साह्यानें जगावर वर्चस्व प्रस्थापित करण्याचा हेतु साध्य करण्याचा प्रयत्न कोणतेंहि राष्ट्र करणार नाहीं असें धरून चालणें हें

इच्छारंजन आहे, वास्तववादाला सोडून आहे. चंद्राचा पल्ला गाठणें म्हणजे धोका पत्करणें आहे. पण तो धोका आम्ही पत्करलाच पाहिजे. लक्षांत ठेवा कीं अंतराळांत जाण्यांतलें अपयश हें अधिक धोक्याचें आहे.

[ ता. २३ मार्च १९६३ रोजीं वॉशिंग्टन येथें गोडार्ड स्मृतिदिनाच्या खान्याच्या वेळीं केलेल्या भाषणांतून. ]

ज्यांची कितीहि किंमत मोजली तरी अपुरीच पडेल त्या आपल्या पद्धतीच्या आणि समाजाच्या मूल्यांशीं अंतराळप्रगतीचा स्पष्ट आणि अनिवार्य संबंध आहे ह्याची जाणीव ठेवली म्हणजे मग त्या प्रगतीबद्दल चिंतेचें कांहींच कारण नाहीं. स्वातंत्र्याचें रोपटें मोठें चिवट आहे, पण भोंवतींचें विश्व जर जुलूमशाहीच्या विषानें दूषित असेल तर तें रोपटें ह्या पृथ्वीवर वाढणार नाहीं आणि फुलांनीं बहरणार नाहीं.

स्वातंत्र्याच्या ध्येयाच्या बाबतींत यशस्वी व्हावयाचें असेल तर अंतराळ विज्ञान आणि राजकीय विज्ञान ह्यांच्यांतील दरी बुजविण्याकडे आम्ही मनापासून लक्ष दिलें पाहिजे. विज्ञानानें स्वातंत्र्याची सेवा आमच्या पद्धती-खालीं जितकी चांगली आणि विपुल बजावलेली आहे तितकी इतरत्र कुठेंच बजावलेली नाहीं. त्याचप्रमाणें, शास्त्रीय संशोधनाला आणि प्रगतीला आमच्या राजकीय पद्धतीनें जितका जास्त परिणामकारक हातभार लावलेला आहे तितका कुठेंहि लावलेला नाहीं.

यंत्रें परस्परांशीं बोलूं शकतील, एकमेकांबरोबर कामें करूं शकतील अशा ह्या काळांत तंत्र-प्रगति केलेल्या समाजांतील जबाबदार माणसांत परस्पर सहानुभाव नांदावा अशी अपेक्षा करणें किंवा आशा करणें गैरवाजवी खास नाहीं. आपल्या स्वातंत्र्याला अत्यावश्यक असणारीं उद्दिष्टें साध्य करण्यांत जास्तींत जास्त यश मिळविण्यासाठीं परस्पर सहानुभाव निर्माण करण्याचा मार्ग शोधून काढणें ह्या जबाबदार माणसांना शक्य आहे.

## अमेरिकन सरकार

[ सेनेटर असतांना एका नभोवाणीवरून केलेल्या भाषणांतून. ]

युनायटेड स्टेट्स् हें तरुण राष्ट्र आहे असें आम्ही मानतों. आणि अनेक बाबतींत तें तरुण आहे. जनतेचा कार्योत्साह आणि प्रगतिपरता

ह्या बाबतींत आपलें राष्ट्र तरुण आहे. जगाच्या इतिहासाच्या दृष्टीनें तरुण आहे. आम्ही भूतकालापेक्षां भविष्यकाळावर नजर लावतों ह्या दृष्टीनेंहि आमचें राज्य तरुण आहे.

पण, शासनाच्या क्षेत्रांत आम्हांला तरुण लेखतां येणार नाहीं. वस्तुस्थिति अशी आहे कीं युनायटेड स्टेट्स्‌ची शासनपद्धति ही न बदलतां अखंडपणें चाललेली जगांतील सर्वांत जुनी, शासनपद्धति आहे.

जगांतील राष्ट्रांची मोजदाद करा म्हणजे ह्या सत्याची तुम्हांला कल्पना येईल. आमच्या राष्ट्राच्या आजवरच्या आयुष्यकालांत आम्ही राजेशाह्या गडगडतांना पाहिल्या आहेत. लोकशाही राष्ट्रें उदयास आलेलीं पाहिलीं आहेत. जुलुमी सत्ता जमीनदोस्त झालेल्या पाहिल्या आहेत आणि त्यांचें स्थान कांहीं बाबतींत अधिक रानटी जुलमशाहीनें घेतलेलेंहि बघितलेलें आहे.

ह्या सर्व काळांतून, युद्धांतून, आर्थिक अडचणींतून, राजकीय मित्र-संबंधांत स्थित्यंतरें चालू असतांना युनायटेड स्टेट्स्‌ टिकाव धरून आहे. राष्ट्र म्हणून अधिक सामर्थ्यवान्‌ बनलें आहे. प्रातिनिधिक शासनानें सर्वांना स्वातंत्र्याचें भाग्य ह्या राष्ट्रांत लाभलेलें आहे.

मोठ्या राष्ट्रांतील जनतेची शासनविषयक सेवा पुरेशा प्रमाणांत बजावण्यासाठीं आमची मध्यवर्ति शासनयंत्रणा मोठी असणें अपरिहार्य आहे. पण राज्य सरकारें आणि स्थानिक स्वराज्य संस्था ह्यांच्या सत्तेवर आक्रमण करील आणि त्यांच्या जबाबदाऱ्या स्वतःकडे घेईल इतकी मात्र ती यंत्रणा अतिप्रचंड होऊं देतां कामा नये.

विद्यमान काळाची निकड भागविण्यासाठीं शासन भक्कम पाहिजे. हें सामर्थ्य त्या यंत्रणेंत वरपासून खालपर्यंत वाटलें गेलें पाहिजे. नगरपालिका, परगण्याच्या स्थानिक स्वराज्य संस्था, राज्यांच्या राजधान्या ह्यांच्या ठिकाणींहि वॉशिंग्टन ( डी. सी. ) प्रमाणेंच त्या सामर्थ्याचा संचार दिसला पाहिजे.

## कम्युनिझम

[ कम्युनिझमला तोंड कसें द्यावें ह्या प्रश्नावर सेनेटर असतांना केलेल्या भाषणांतून. ]

कम्युनिझमविरोधी लढ्यांत स्वतंत्र जनतेचें जास्तींत जास्त सामर्थ्य कोठें असेल तर तें स्थित्यंतराची पात्रता आणि परंपरागत इच्छा ह्यांत आहे,

निरनिराळ्या परिस्थितीशीं जमवून घेण्यांत आहे, जुन्या समस्यांना नवीं उत्तरें शोधण्यांत आहे.

सर्वंकषशाही पद्धतीपेक्षां लोकशाही पद्धति आगळ्या आहेत हें दर्शविणारी ही वस्तुस्थिति आहे. आमच्या स्वातंत्र्यामध्यें, बदलण्याचा हक्क अंतर्भूत आहे, बदलण्याची पात्रता समाविष्ट आहे.

शांततेसाठीं तळमळीनें क्रियाशील राहणें हें दुबळेपणाचें द्योतक आहे असें मानणारांपैकीं मी नाहीं, जे बलवान् आहेत, ज्यांचा स्वतःच्या सामर्थ्यावर विश्वास आहे तेच शांततेसाठीं परिणामकारक प्रयत्न करूं शकतात.

माझें असें ठाम मत आहे कीं, लोकशाही आणि कम्युनिस्ट अशा उभय जगांना जिवंत कसें राहतां येईल ह्या प्रश्नाचें उत्तर शोधून काढण्यासाठीं कम्युनिस्ट प्रतिनिधींबरोबर वाटाघाटी करण्याकरितां हें राष्ट्र पुरेसें सामर्थ्य-संपन्न राहिलें पाहिजे. आमच्या परराष्ट्रीय धोरणांत आमच्या पूर्वजांचा परखड वास्तववाद आणि प्रभावी कल्पनाशक्ति ह्यांची सांगड घालण्याची जरुरी आहे आणि तशी घालणें शक्य आहे.

आपल्या दोस्त राष्ट्रांनीं कोणता मार्ग स्वीकारावा ह्याचा आदेश देण्याची किंवा अन्य स्वतंत्र राष्ट्रांच्या जनतेनें निवडलेलीं सरकारें उलथून पाडण्याचा प्रयत्न करण्याची स्वातंत्र्यप्रेमी जनतेची कधींच इच्छा नसते.

काय शक्य आहे आणि काय शक्य नाहीं ह्याचा विचार करतांना आम्ही आत्मवंचना करून घेतां कामा नये. जिथें सामर्थ्य नसेल तिथें तें आहे असें आम्ही धरून चालतां कामा नये. त्याचप्रमाणें दौर्बल्य नसतांना तिथें तें आहे अशी कल्पना करून घेतां कामा नये.

कम्युनिस्ट साम्राज्य विस्तृत आणि अभेद्य आहे. जगांतील सर्वांत मोठ्या भूमीवर त्यानें हातपाय पसरलेले आहेत.

पण भीति आणि द्वेष ह्यांच्या आधारावर उभारलेल्या कोणत्याहि सामर्थ्या-प्रमाणें कम्युनिस्ट साम्राज्यांतहि कांहीं ढिसूळ जागा आहे. सर्वांत अशी मोक्याची जागा म्हणजे त्या साम्राज्यांतील जनताच.

मार्क्सप्रणीत स्वर्गाच्या खोट्या आश्वासनांना भाळून फसल्यामुळेंच अनेक देशांतील स्त्री-पुरुष नागरिकांनीं कम्युनिझमचें स्वागत केलें. पण कम्यु-निस्टांच्या आसुडाचा प्रसाद चाखल्यानंतर ज्यांना विमोचनाची इच्छा

झालेली नाहीं असे फारच थोडे लोक आहेत. कम्युनिस्टांनीं आक्रमिलेल्या आणि चिरडलेल्या देशांतदेखील स्वातंत्र्यभावना अद्याप जीवंत आहे. ती संपूर्णत: चिरडून टाकणें शक्य झालेलें नाहीं.

ह्या भावनेचा आविष्कार होऊं शकेल असे मार्ग शोधण्यासाठीं आम्ही कसून विचार केला पाहिजे आणि प्रयत्न केला पाहिजे.

स्वातंत्र्याचें रक्षण हें प्रत्येकाचें काम आहे. आम्ही कर्तव्यच्युत होऊं तर आमचींहि स्वातंत्र्यें गमावून बसूं. एकजुटीनें कार्य करूनच आम्ही त्या स्वातंत्र्याचें जतन करूं शकूं आणि अमेरिकन जनतेला संबंधित प्रश्नांची उमज झाल्याशिवाय आणि तिनें एकजूट केल्याशिवाय कांहींहि करतां येणार नाहीं. अगदीं कांहींसुद्धां करतां यावयाचें नाहीं.

## धर्म

[ राष्ट्राध्यक्षांकडील न्याहारीपूर्व प्रार्थनेच्या वेळीं, ता. १ फेब्रुआरी १९६१. ]

धर्मसंस्था आणि राज्यसंस्था अलग आहेत ह्याचा अर्थ सरकारी नोकरांच्या जीवनांतूनहि धार्मिक मूल्यांची फारकत करायची असा नव्हे, हें आपण लक्षांत ठेवण्याची आवश्यकता आहे. स्वतंत्र जनतेची सेवा बजावणारे आपण आणि आपल्या काळांतील जुलूमशहा ह्यांच्यांत फरक आहे, हें आगळेपण आपल्याला राखायचें असेल तर ईश्वराला हृदयस्थ ठेवून आपल्या हातांनीं सत्तेचा समतोलपणा राखला पाहिजे.

[ राष्ट्राध्यक्षांकडील न्याहारीपूर्व प्रार्थनेच्या वेळीं, १ मार्च १९६२. ]

आपण ह्या ठिकाणीं सर्वांत प्राचीन अशा एका सीमेवर उभे आहोंत. ईश्वराशीं मानवानें सख्यसंबंध जोडण्याची ही सीमा होय.

नैतिक अधिष्ठान असावें ह्याचा अर्थ, स्वतंत्र राष्ट्रांनीं दुर्बल बनलें पाहिजे किंवा दुर्बलतेचे मार्ग अनुसरले पाहिजेत असा नव्हे. राष्ट्रीय नेतृत्वाची सर्वोच्च नीति म्हणजे आपल्या श्रद्धांचें जतन करण्यासाठीं आवश्यक सामर्थ्य संपादन करणें आणि जतन करणें. आमच्या हातीं असलेल्या सत्तेचा उपयोग समंजसपणानें करण्याचें ज्ञान मिळावें म्हणून आम्ही प्रार्थना करावयाची आहे.

पं. ७००७८ ७२६० २८।१४६४

[ राष्ट्राध्यक्षांकडील न्याहारीपूर्व प्रार्थनेच्या वेळीं, ता. ७ फेब्रुआरी १९६३. ]

आमच्या घटनेनें राज्यसंस्था आणि धर्मसंस्था ह्यांची फारकत केलेली आहे. आमच्या पद्धतीचें सामर्थ्य ह्या अलगीकरणांत आहे हें आम्ही जाणतों. पण राष्ट्राच्या सदसद्विवेकबुद्धीला, राज्यांतील माणसें आणि परमेश्वर ह्यांची फारकत मान्य नाहीं. युनायटेड स्टेट्स् हें स्वतंत्र राष्ट्र या नात्यानें जगांत इतर राष्ट्रांमध्यें उभें राहिलें, तेव्हांपासून त्याच्या भवितव्याला वळण लावणाऱ्या पुरुषांना त्यांच्या प्रयत्नांत सामर्थ्याचा लाभ झाला तो त्यांनीं प्रार्थनेसाठीं गुढगे टेकल्यामुळेंच. त्या पुढाऱ्यांत आणि ईश्वरांत निर्माण झालेला सख्यसंबंध हाच आपल्या राष्ट्राच्या आणि आपल्या ध्येयामागील चिरसामर्थ्याचा झरा आहे.

[ व्हाईट हाउसच्या आंगणांत ख्रिसमसनिमित्त झालेल्या समारंभाच्या वेळीं, ता. २० डिसेंबर १९६१. ]

अंतिमत: आपलें सामर्थ्य भौतिक गोष्टींमध्यें नसतें. मानवतेच्या उच्चतर ध्येयांपुढें केवळ भौतिक वस्तूंचें महत्त्व कमी लेखण्यासाठीं लागणारें आत्मिक सामर्थ्य आपल्या ठायीं नसेल तर आपली संपत्ति, आपलीं शस्त्रास्त्रें, वडीं शहरें, प्रचंड इमारती ह्या गोष्टी आपल्याला कांहींहि देऊं शकणार नाहींत.

आत्मिक सामर्थ्याचें उगमस्थान श्रद्धा होय. विश्वाच्या नैतिक सत्तेवरील श्रद्धा. ध्येयांवरील श्रद्धा. जीवनांतील क्षुद्र अहंभावाची मर्यादा ओलांडून स्वत: पलीकडे असणाऱ्या ध्येयांकडे झेप घ्यायला माणसाला समर्थ बनविते ती श्रद्धा.

अमेरिकेच्या उद्दिष्टांबद्दल कोणीहि गैरसमज करून घेऊं नये. आमच्या राष्ट्रानें शांततेचा ध्यास घेतला आहे तो ख्रिस्ताला ज्या शांततेचा ध्यास लागला होता तिचा. माघार घेऊन मिळविलेली, जबाबदारी टाळून मिळविलेली भ्रामक शांतता नव्हे, तर प्रयत्नांची शिकस्त करून, जबाबदाऱ्या संपूर्ण पार पाडून संपादिलेली दिव्य शांतता आम्हांला हवी आहे.

अशा शांततेवरील आमची निष्ठा कदापि विचलित होणार नाहीं.

# १८

"कोणत्या प्रकारचे राष्ट्राध्यक्ष ते असतील?" असा प्रश्न अमेरिका विचारीत होती. जग विचारीत होतें.

ह्या प्रश्नाचें अखेरचें उत्तर भावीकाळच्या इतिहासकारांनीं द्यावयाचें आहे. पण इतिहासाच्या निर्णयाची वाट बघण्याइतका धीर धरणें ज्यांना शक्य नाहीं अशीं कोटयवधि माणसें आहेत. ते लोक ह्या प्रश्नाचें उत्तर कोठें मिळतें हें पाहण्यासाठीं धडपडूं लागले. कारण हा पुरुष जसा असेल आणि जें करूं शकेल त्याचा परिणाम त्या लोकांच्या जीवनावर अनेक प्रकारें होणार होता. त्या पुरुषासंबंधींची माहिती मिळविण्याकरतां लोकांची धडपड सुरू झाली. ते उत्कंठेनें वृत्तपत्रें, मासिकें पाहूं लागले. नभोवाणीला कान लावूं लागले. दूरचित्रवाणीवर ऐकायला आणि पाहायला मिळेल तें ऐकूं-पाहूं लागले. त्या पुरुषाबरोबर काम केलेल्या सरकारी अधिकाऱ्यांच्या उद्गारांकडे लक्ष देऊं लागले. त्या पुरुषाच्या मित्रांकडे वळूं लागले.

नव्या राष्ट्राध्यक्षांबद्दलच्या माहितीची अकस्मात् उद्भवलेली ही निकडीची मागणी पुरी करण्यासाठीं छापखान्यांतून प्रचंड साहित्य बाहेर पडूं लागलें. नभोवाणीवरून माहितीचा पाऊस पडूं लागला. ह्या माहितीपैकीं कांहीं माहिती चुकीचीहि होती, पण ही सारी माहिती अमेरिकन जनतेच्या कानांवर पडत होती. डोळे वाचीत होते. मनहि तें ज्ञान ग्रहण करीत होतें. माहितीच्या ह्या प्रचंड पर्वताचा बराचसा भाग किरकोळ तपशिलाचा होता. बराचसा भाग अप्रस्तुतहि असावा. पण बरीचशी माहिती वस्तुस्थितीला धरून होती, महत्त्वाची होती, मुद्देसूद होती. ही सर्व माहिती नागरिक उत्कंठेनें आणि आस्थेनें ग्रहण करीत होते.

ह्या सर्व ज्ञानांतून जें चित्र लोकांपुढें झटकन् उभें राहिलें ते दिलासा देणारें होतें. लोकांच्या भीतीचा निरास करणारें होतें.

पुन: एकदां अमेरिकन शासनपद्धतीच्या भक्कमपणाची कसोटी लागली होती. ती ह्या कसोटीला पूर्णपणें उतरली होती. त्याचबरोबर देशाला कळून आलें कीं, १९६० च्या निवडणुकींतील राष्ट्राध्यक्षपदाच्या उमेदवाराचें आपल्यावर मोठें ऋण आहे. कारण जॉन एफ्. केनेडी ह्यांचा आग्रह होता कीं राष्ट्राध्यक्षपदाला पूर्ण पात्र असेल असाच पुरुष उपराष्ट्राध्यक्षपदाचा उमेदवार असला पाहिजे. त्यांनीं तसा आग्रह धरला आणि अशा रीतीनें, ते युनायटेड स्टेट्स्च्या जनतेचे उपकारकर्तेच ठरले.

केनेडींचा असा आग्रह असल्यामुळेंच आजहि, त्यांच्या मृत्यूनंतर युनायटेड स्टेट्स्चें जगांतील स्थान टिकविण्यासाठीं लागणारा दूरदर्शीपणा आणि धडाडी असणारे राष्ट्राध्यक्ष जनतेला लाभलेले आहेत. अमेरिकन जनतेंतील दलितांची स्थिति सुधारण्यासाठीं निर्धारानें आणि खंबीरपणानें कृति करूं शकतील, दूरदृष्टीनें क्षितिजावर पुढें येणाऱ्या समस्यांचा वेध घेऊं शकतील असे राष्ट्राध्यक्ष अमेरिकन जनतेला लाभलेले आहेत.

ज्यांनीं १९५९ सालीं पुढील शब्दांत आपल्या निष्ठा सांगितल्या होत्या, असे राष्ट्राध्यक्ष युनायटेड स्टेट्स्च्या जनतेला लाभलेले आहेत. त्यांनीं सांगितलें होतें :

"पहिलें : प्रत्येक अमेरिकन व्यक्तीपाशीं सांगण्यासारखें कांहीं तरी असतें आणि तें त्या व्यक्तीचें म्हणणें दुसऱ्यांना ऐकविण्याचा हक्क, आमच्या समाजव्यवस्थेंत त्या व्यक्तीला आहे असें मला ठामपणें वाटतें.

"दुसरें : प्रत्येक राष्ट्रीय समस्येवर राष्ट्रीय तोडगा असतोच असतो असा माझा विश्वास आहे. आणि हा विश्वास असल्यामुळें, मला ठामपणें वाटतें कीं, प्रत्येक प्रश्नाला दोन बाजू अपरिहार्यपणें असतातच असें नव्हे.

"तिसरें : भौतिक, मानवी वगैरे सर्व प्रकारच्या साधनसामग्रीचा पुरेपूर उपयोग करणें हें सरकारी धोरणांचें परमोच्च उद्दिष्ट असलें पाहिजे असें मी मानतों. जे हक्क आम्ही अविभाज्य मानतों त्यांच्या संरक्षणाइतकेंच हें उद्दिष्ट श्रेष्ठ आहे.

" चवथें : माझ्या मतें, अपव्यय–साधनसामग्रीचा अपव्यय, जीवसंपत्तीचा अपव्यय किंवा सुसंधींचाहि अपव्यय–हा आपल्या समाजाचा कायमचा शत्रू आहे. आणि अपव्यय थांबविणें, ही सरकारच्या सर्व जबाबदाऱ्यांमध्यें अत्यंत कसून पार पाडलीच पाहिजे अशी जबाबदारी आहे. असा अपव्यय नष्ट झाला कीं सरकारवर एक अखंड जबाबदारी येऊन पडते. ही जबाबदारी सर्वच बाबतींत असते. नव्या संधीमुळें जनतेला मिळणारा लाभ, निष्काळजीपणानें केलेली भरमसाट उधळपट्टी आणि लादलेले जादा कर ह्यांच्या द्वारें लुबाडून सरकारनें स्वत: अपव्यय न करणें ही ती जबाबदारी आहे. "

व्यवहारज्ञान, धडाडी आणि बुद्धिमत्ता असलेले राष्ट्राध्यक्ष अमेरिकन जनतेला लाभलेले आहेत. ज्या देशावर ते प्रेम करतात त्या देशाच्या कल्याणासाठीं आवश्यक असणाऱ्या गोष्टी घडवून आणण्याची प्रतिभा आपल्यापाशीं आहे हें त्यांनीं वेळोवेळीं सिद्ध करून दाखविलेलें आहे. असे अत्यंत निष्ठावान् पुरुष अमेरिकन जनतेला राष्ट्राध्यक्ष लाभलेले आहेत.

**समाप्त ?**

**नव्हे; एक नवा प्रारंभ !**

## कॉंग्रेसच्या संयुक्त बैठकीपुढील

# राष्ट्राध्यक्ष जॉन्सन ह्यांचें भाषण

## ता. २७ नोव्हेंबर १९६३

सभापति महाशय, अध्यक्ष महाशय, प्रतिनिधिसभेचे सभासदहो, सेनेटचे सभासदहो आणि माझ्या अमेरिकन देशबांधवांनो :

आज इथें उभे राहण्याचें टळण्यासाठीं मी माझें सर्वस्व आनंदानें दिलें असतें.

आपल्या काळांतील महत्तम नेता आपल्याच काळांतील नीचतम कृत्याला बळी पडला आहे. आज जॉन फिट्झेराल्ड केनेडी जिवंत आहेत ते त्यांनीं मागें ठेवलेल्या उक्तिकृतींच्या रूपानें. मानवजातीच्या मनामनांत आणि स्मृतींमध्यें ते जिवंत आहेत. आपल्या देशबांधवांच्या हृदयांत ते जिवंत आहेत.

आपल्याला ही हानि किती वाटते तें व्यक्त करण्याला दुःखदर्शक अर्थाचे शब्दच नाहींत. आणि त्यांनीं अमेरिकेचा सुरू केलेला वेगवान् प्रगतीचा प्रवास तसाच पुढें चालू ठेवण्याचा आमचा निर्धार व्यक्त करण्यालाहि शब्द-सामर्थ्य अपुरें आहे.

अफाट अंतराळ जिंकण्याचें स्वप्न; अटलांटिक आणि पॅसिफिक ह्या दोन्ही महासागरांच्या किनाऱ्यावरील राष्ट्रांच्या भागीदारीचें स्वप्न; मागासलेल्या देशांत शांततापथकें पाठविण्याचें स्वप्न; आमच्या सर्व मुलांच्या शिक्षणाची सोय करण्याचें स्वप्न; काम मागणारांना आणि कामाची जरुरी असणारांना— सर्वांना रोजगार देण्याचें स्वप्न; वृद्धांची देखभाल करण्याची व्यवस्था करण्याचें स्वप्न; मानसिक आजारावर सर्वांगीण हल्ला चढविण्याचें स्वप्न; सर्वांत महत्त्वाचें म्हणजे वंशभेद, वर्णभेद कांहींहि असलें तरी सर्व अमेरिकनांना समान हक्क मिळण्याचें स्वप्न.

हीं आणि अशीं आणखी कांहीं अमेरिकेचीं स्वप्नें आहेत. जॉन केनेडींनीं आपल्या प्रयत्नांनीं, समर्पण बुद्धीनें ह्या स्वप्नांना जिवंतपणा आणला होता. ज्या कल्पनांचें आणि ध्येयांचें केनेडी हे एक दिव्य प्रतीक होते, त्या कल्पना आणि तीं ध्येयें परिणामकारक कृतीनें प्रत्यक्षांत आणलीं पाहिजेत आणि आणलीं जातीलहि.

जॉन केनेडी ह्यांच्या नेतृत्वाखालीं ह्या राष्ट्रानें दाखवून दिलें कीं, शांततेचा मागोवा घेण्याची धडाडी आमच्यांत आहे. आणि युद्धाचा धोका पत्करण्याचें धाडसहि आमच्यांत आहे. ज्यांना शांतता आणि स्वातंत्र्याचा ध्यास आहे त्यांचे आम्ही विश्वासू सन्मित्र आहोंत हें आम्ही सिद्ध केलें आहे. आणि आम्ही दाखवून दिलें आहे कीं जे स्वातंत्र्याचा मार्ग झिडकारतात आणि आमच्यावर किंवा आमच्या दोस्तांवर जुलूमशाहीचें जूं लादूं पाहतात त्यांचे आम्ही कडवे शत्रू आहोंत.

दक्षिण व्हिएतनामपासून तों पश्चिम बर्लिनपर्यंत आम्ही दिलेलीं अभिवचनें आम्ही पाळणार आहोंत. शांततेचा शोध अखंड करीत राहणार आहोंत. आमच्याशीं मतभेद असणाऱ्यांशीं देखील मतैक्याचें क्षेत्र कल्पकतेनें शोधण्याचा आमचा प्रयत्न चालूच राहील. आमच्याशीं समान उद्दिष्टांसाठीं सहभागी होणाऱ्यांशीं आमचें वर्तन उदारपणाचें आणि निष्ठेचें राहील.

शांततेच्या झगडयांत कुणी पराभूत होणार नाहीं; युद्धांत कुणी विजयी ठरणार नाहीं असें हें युग आहे. ह्या युगांत आम्ही जाणीव ठेवली पाहिजे कीं राष्ट्रीय सामर्थ्याइतकीच राष्ट्रीय संयम हीहि आमची जबाबदारी आहे. सत्तेचा वापर करायला आणि त्याचबरोबर सत्तेला मर्यादा घालायला एकाच वेळीं आम्ही तयार असलें पाहिजे. राष्ट्रीय हितसंबंधांचें रक्षण करायला आम्ही सज्ज असलें पाहिजे; त्याचबरोबर समान हितसंबंधासाठीं वाटाघाटींनाहि तयार असलें पाहिजे.

आम्ही जो मार्ग अनुसरला पाहिजे तो हा मार्ग आहे. जे आमच्या धैर्याची कसोटी बघतील त्यांना तें बावनकशी असलेलें दिसून येईल. बलवान् हा, सामर्थ्याचा उपयोग करण्याच्या बाबतींत न्यायी असूं शकतो, आणि न्यायी हा, न्यायाचें रक्षण करण्याइतका बलवान् असूं शकतो हें आम्ही नव्यानें दाखवून

देऊं. आणि आम्ही सर्वांना सांगू इच्छितों कीं आम्ही कुणाला कांहीं खास सवलती देणार नाहीं आणि कुणाचा छळवादहि मांडणार नाहीं.

अन्य देशांत आणि आमच्या देशांतहि आम्ही दारिद्र्याविरुद्ध, दैन्याविरुद्ध, रोगराईविरुद्ध, अज्ञानाविरुद्ध लढा चालू ठेवूं.

आमच्या देशांतील सर्वांची सेवा आम्ही करूं. अमुक एका वर्गाची, विभागाची, जमातीची नव्हे; तर सर्व अमेरिकन नागरिकांची सेवा आम्ही बजावूं.

हें राष्ट्र युनायटेड स्टेट्स् आहे. एकरूप उद्दिष्ट असलेल्या एकजूट झालेल्या जनतेचें राष्ट्र आहे. अमेरिकन जनतेची एकता ही विचारांच्या एकरूपतेवर अवलंबून नाहीं. आमच्यांत मतभेद आहेत. पण आतांहि पूर्वीप्रमाणें त्या मतभेदांतूनच सामर्थ्य संपादूं, दौर्बल्य नव्हे; शहाणपण संपादूं, नैराश्य नव्हे.

गेलीं बत्तीस वर्षें कॅपिटॉल हिल हेंच माझें घर आहे. मी तुमच्यासह अभिमानाचे अनेक क्षण अनुभवले आहेत. कृति करण्याची, संकटांना तोंड देण्याची, मतभेद असूनहि राष्ट्रीय हिताचे कार्यक्रम आंखण्याची जी युनायटेड स्टेट्स्च्या कॉंग्रेसची क्षमता आहे तिचा मला अभिमान वाटतो.

एका मारेकऱ्याच्या गोळीनें माझ्यावर राष्ट्राध्यक्षपदाचें प्रचंड ओझें लादलें आहे. तुमच्या मदतीची मला गरज आहे हें सांगायला आज मी इथें आलेलों आहें. मी एकाकी हा बोजा पेलूं शकणार नाहीं. अखिल अमेरिकेंतील सर्व अमेरिकनांची मदत मला हवी आहे.

ह्या राष्ट्रानें भयंकर आघात सोसला आहे. आजच्या आणीबाणीच्या क्षणीं युनायटेड स्टेट्स्चें सरकार ह्या नात्यानें तुमचें आणि माझें एक कर्तव्य आहे. अनिश्चितता, संशय, विलंब ह्यांचें उच्चाटण करून आम्ही निर्णायक कृति करण्यास समर्थ आहों हें दाखवून दिलें पाहिजे. आमच्या नेत्याला गमावणें ही भयानक हानि असली तरी ह्या प्रसंगानें आम्ही दुबळे न होतां, त्यांतूनहि सामर्थ्य मिळवूं हें दाखवून दिलें पाहिजे. आम्ही कृति करूं शकतों, करूं आणि तीहि ताबडतोब.

प्रातिनिधिक शासनाच्या ह्या मंदिरांतून मी जगाला सांगूं इच्छितों—आणि त्याबाबत कुणीहि भ्रमांत राहूं नये—कीं, हें सरकार संयुक्त राष्ट्र संघटनेला भक्कम पाठिंबा देत राहील. आमच्या दोस्तांना दिलेलीं अभिवचनें

सन्मानपूर्वक आणि निर्धारपूर्वक अमलांत आणील. इतर कोणापेक्षांहि वरच्या दर्जाचें लष्करी सामर्थ्य राखील. डॉलरचें स्थैर्य आणि खरेदी-शक्ति टिकवील. आशिया आणि आफ्रिका खंडांत आमचे जे परस्पर मदतीचे आणि सहकार्याचे कार्यक्रम चालू आहेत त्यांत भर घालील. ह्या गोलार्धाच्या प्रगतीसाठीं तेथील राष्ट्रांशीं एकजूट राखील.

ता. २० जानेवारी १९६१ रोजीं जॉन एफ्. केनेडी ह्यांनीं आपल्या देशबांधवांना सांगितलें होतें कीं आमचें राष्ट्रीय कार्य एक हजार दिवसांत, ह्या सरकारच्या कारकीर्दींत, फार काय पृथ्वीवरील आपल्या आयुष्य कालांतहि संपणारें नाहीं. इतकें सांगून ते म्हणाले होते, " पण आपण सुरुवात करूं या. "

आजच्या क्षणीं नवा निर्धार आम्ही केला पाहिजे. मी माझ्या सर्व अमेरिकन बांधवांना सांगूं इच्छितों कीं, " आपण काम पुढें चालूं ठेवूं या. "

आपलीं अत्यंत निकडीचीं कामें इथेंच, कॅपिटॉल हिलवरच आहेत.

पहिली गोष्ट ही कीं, आदरांजलि वाहण्यासाठीं कितीहि स्तुतिसुमनें उधळण्यापेक्षां, ज्यासाठीं राष्ट्राध्यक्ष केनेडी झगडले तें नागरिक हक्काचें विधेयक शक्य तों लौकर मंजूर करूनच आम्ही त्यांना आदरांजलि वाहूं शकूं.

प्रदीर्घ कालापासून आमच्या तोंडीं ह्या देशांतील समान हक्कांची भाषा आहे. समान हक्कांबद्दल शंभर वर्षांपेक्षां जास्त काळ आम्ही बोलत आलों आहोंत.

इतिहासाचें पुढील प्रकरण लिहिण्याची ही वेळ आहे. तें प्रकरण कायद्याच्या पुस्तकांत लिहावयाचें आहे.

१९५७ सालीं, आणि त्यानंतर १९६० सालीं मी जें सांगितलें तेंच पुनः आग्रहानें सांगू इच्छितों. नागरिक हक्कांचा कायदा करून आम्ही या देशांत वर्ण वा वंशभेदावर आधारलेला पक्षपात आणि दडपणूक ह्यांचें उच्चाटण करण्याच्या कार्यातील पुढील पाऊल टाकूं शकूं. त्यामुळें ह्या देशांत आणि देशाबाहेरहि राष्ट्राला अजोड सामर्थ्य लाभेल.

दुसरी गोष्ट ही कीं, ज्या करविषयक विधेयकासाठीं राष्ट्राध्यक्ष केनेडी वर्षभर झगडले तेंहि शक्य तितक्या लौकर मंजूर करूनच आम्ही त्यांचें कार्य पुढें चालविण्यासाठीं पाऊल टाकल्यासारखें होईल. राष्ट्रीय उत्पन्नांत आणि

मध्यवर्ति सरकारच्या उत्पन्नांत भर पडावी, मंदीच्या संकटांविरुद्ध हमी लाभावी ह्या उद्देशानें हें विधेयक तयार करण्यांत आलेलें आहे.

सारांश, विलंब लावण्याचा हा समय नाहीं. कृतीचा—खंबीर कृतीचा हा काळ आहे. भविष्यावर नजर ठेवून करावयाच्या कृतीचा हा काळ आहे. अमेरिकेंतील प्रत्येक घरांत आणि खेड्यापाड्यांत शिक्षणाचा प्रकाश पाडण्याला हातभार लावणारीं शिक्षणविषयक विधेयकें रेंगाळत आहेत, त्यांच्या बाबतींत आम्ही निधडेपणानें कृति केली पाहिजे. परराष्ट्रांना मदत करण्याबाबतचें विधेयकहि रेंगाळलें आहे. त्याला मंजुरी दिली पाहिजे आणि तसें करतांना आम्ही हें स्पष्ट केलें पाहिजे कीं, ह्या गोलार्धासंबंधीं किंवा जगासंबंधीं असलेल्या आमच्या जबाबदाऱ्या आम्ही टाळणार नाहीं, त्याचप्रमाणें परराष्ट्रीय राजकारणाची अंमलबजावणी करतांना कारभार यंत्रणेचा लवचिकपणा आम्ही गमावून बसणार नाहीं. ह्याशिवाय रेंगाळणाऱ्या अन्य विधेयकांच्या बाबतींतहि आम्ही भविष्यावर नजर ठेवून ताबडतोब कृति केली पाहिजे.

डॉलरला डॉलरइतकें मोल लाभलेंच पाहिजे असा माझा आग्रह आहे. सावधानता आणि मितव्यय ह्यांचा आदर्श सरकार घालून देईल. ह्याचा अर्थ असा नव्हे कीं आपल्या गरजा आम्ही भागविणार नाहीं किंवा वचनें पाळणार नाहीं. तसें घडणार नाहीं. आम्ही दोन्ही गोष्टी साधूं.

दोन्ही सभागृहांत सेवा बजावलेला एक ह्या नात्यानें माझें ठाम मत आहे कीं, कायदेमंडळ शाखेचें स्वातंत्र्य आणि अभंगत्व महत्त्वाचें आहे. मी वचन देतों कीं, मी सदैव त्या स्वातंत्र्याचा आणि अभंगत्वाचा आदर करीन. हा आदर माझ्या हाडींमासीं भिनलेला आहे.

तितक्याच ठामपणें, काँग्रेसची कार्यक्षमता, योग्यता, मतभेद असूनहि कृति करण्याच्या बाबतींत आहे असें मला वाटतें. मला विश्वास आहे कीं, निकड असल्यास काँग्रेस समंजसपणानें, नेटानें, त्वरेनें कृति करूं शकते.

आज तशी निकड आहे. ह्या क्षणीं आहे. मी तुमच्या साहाय्याची अपेक्षा करतों. आज आपण दुःखांत एकत्र आलों आहोंत. पण त्याचबरोबर नवा निर्धार आणि नवचैतन्य ह्यांच्या वातावरणांत एकत्र येऊं या. कृति, सहिष्णुता, परस्पर सहानुभाव ह्यांच्या वातावरणांत एकत्र येऊं या.

जॉन केनेडी ह्यांच्या जीवनानें जो आदेश दिला होता तोच त्यांच्या मृत्यूनें दिला आहे–तो आदेश म्हणजे अमेरिकेनें पुढें पुढेंच जात राहिलें पाहिजे.

मला गाढ आशा वाटते कीं आमचें भयानक दुःख आणि वेदना ह्या गोष्टी आम्हांला नव्या बंधुभावानें एकत्र येण्याची प्रेरणा देतील. दुःखाच्या क्षणीं आम्हांला एकरूप करतील.

तेव्हां आपण निर्धार करूं या कीं, जॉन फिट्झेराल्ड केनेडी ह्यांच्या जीवनाप्रमाणेंच त्यांचें बलिदानहि आम्ही व्यर्थ जाऊं देणार नाहीं. आभार-दिनाच्या या आजच्या आदल्या दिवशीं, आपण एकत्र आलों आहोंत. आपण ईश्वराचे आभार मानूं या. त्याची कृपा वांछूं या आणि एकमुखानें आपले चिरपरिचित आवडते शब्द उच्चारूं या :

अमेरिका, अमेरिका,
गॉड शेड ग्रेस ऑन दी
अँड क्राउन दाय गुड
विथ ब्रदरहुड
फ्रॉम सी टु शायनिंग सी.

[ America, America,
God shed grace on thee
And crown thy good
With brotherhood
From Sea to shining Sea. ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे